२५८८ नि.
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २५८८
REFBK-0022842

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना :**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1 JUN 1980
4 JUN 1980
18 JUN 1980
18 JUN 1980
29 JUN 1980
24/90
19 MAY 1982
9 DEC 1987
29 MAY 1987
12 DEC 1984
4 AUG 1985
17 APR 1988

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

निबंध
२७६८
२२८४२
संदर्भ शाखा
१५।२।८०

# प्रीतीपरि

REFBK-0022842

सेतुमाधवराव पगडी

प्रीतीपरि

प्रकाशन क्र. ४९९

प्रकाशक
वि. ग. परचुरे
परचुरे प्रकाशन मन्दिर
मेहता भवन, २ रा मजला
३११ राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुंबई ४

आवृत्ती पहिली
२०–१२–७९
© सेतुमाधवराव पगडी १९७९

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ,
पुणे ३०

मुखपृष्ठ सजावट
मोहन वाघ

मूल्य पंचवीस रुपये

२८८५
निबंध

माझा भाऊ राघवेंद्र
आणि
सौ. रजनी

यांस —

प्रीतीपरि

प्रकाशन क्र. ४९९

प्रकाशक
वि. ग. परचुरे
परचुरे प्रकाशन मन्दिर
मेहता भवन, २ रा मजला
३११ राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुंबई ४

आवृत्ती पहिली
२०-१२-७९
© सेतुमाधवराव पगडी १९७९
मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ,
पुणे ३०

मुखपृष्ठ सजावट
मोहन वाघ

मूल्य पंचवीस रुपये

२८८५
निबंध

माझा भाऊ राघवेंद्र
आणि
सौ. रजनी

यांस —

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | स्वप्नी जे देखिले ! | १ |
| २. | विश्वास ठेवा अगर... | ६ |
| ३. | अजीजची मैफल | १२ |
| ४. | १८५७ पूर्वीची दिल्ली | १८ |
| ५. | मंगलाष्टके | २४ |
| ६. | अहो तो कवी मी नाहीं | २९ |
| ७. | गुरु–शिष्य संवाद | ३४ |
| ८. | अहो रसिकत्वम् | ४३ |
| ९. | हे हकीम हे डॉक्टर | ५१ |
| १०. | प्राध्यापकाची व्यक्तिरेखा | ५६ |
| ११. | आणि हे प्राध्यापक ! | ६१ |
| १२. | कविश्रेष्ठ दाग | ६६ |
| १३. | साक्षरतेचे प्रयोग | ७२ |
| १४. | मुहमदकुली कुतुबशहाचे ऋतुसंहार आणि भामाविलास | ७७ |
| १५. | उर्दू काव्याची सामाजिक पार्श्वभूमी | ८८ |
| १६. | मानवी जीवनाचा महान भाष्यकार गालिब ! | ९५ |
| १७. | अबुलकलाम आजादांचे एक पत्र | १०६ |
| १८. | नवाब चारुदत्त आणि बेगम वसंतसेना | १२० |
| १९. | आम्ही व्याख्यान देतो | १२९ |
| २०. | ईराणचा कविसम्राट हाफिज शीराजी | १४३ |
| २१. | दिल्लीच्या फूलवालोंकी सैरची कथा | १५० |
| २२. | मला भेटलेले काही गप्पिष्ट | १६१ |

## . १ .

# स्वप्नी जे देखिले !

**[ मौलाना मदनी यांचे काही अनुभव ]**

मुसलमानांत सय्यद जमातीसंबंधी विलक्षण आदर आहे. थोर पैगंबरांची मुलगी फातिमा हिच्या वंशजांनाच सय्यद म्हणतात. गुरू घराण्याचे म्हणून सय्यदांबद्दल मुस्लिम समाजात फार मोठा भक्तिभाव आढळतो. उदाहरणार्थ, सर सय्यद अहमद, सुलेमान नदवी इत्यादी मंडळी ही पैगंबरांची वंशज समजली जातात.

थोर राष्ट्रीय पुढारी आणि जमियतुल उलेमाचे नेते मौलाना हुसेन अहमद मदनी यांचा जन्म इ. स. १८७१ मध्ये झाला. उत्तरप्रदेशातील उन्नाव जिल्ह्यात हुसेन अहमदचे वडील हे एका माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. हे घराणे टांडा ( फैजाबाद जिल्हा ) येथील होते. या गावात प्रमुख वस्ती मुस्लिम विणकरांची होती. पण हुसेन अहमदचे घराणे सय्यदांचे होते. लोकांचा या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. पण मौलाना फजल–रहमान गंज मुरादाबादी या श्रेष्ठ साधूने एकदा भर सभेत सांगितले की, ' तुमचे मुख्याध्यापक हबीबुल्ला ( हुसेन अहमदचे वडील ) हे सय्यद आहेत. यांचे मूळ पुरुष शहानूरुल्हक हे काल माझ्या स्वप्नात आले होते. ते मला म्हणाले, ' हबीबुल्लावर लक्ष ठेवा बरे.' हुसेन अहमद आपल्या नक्शे हयात ( जीवनचित्र ) या आत्मचरित्रात म्हणतात, ' तेव्हापासून आम्ही सय्यद आहोत याबद्दल लोकांना खात्री पटली. माझे वडील सांगत ' मी एक स्वप्न पाहिले. हजरत फातिमा ( पैगंबरांची कन्या ) या एका तलावाच्या काठावर बसून चरखा चालवीत होत्या. मी तलावाच्या पलीकडच्या काठावर उभा होतो. लेकरू आईकडे जावे तसा मी पोहत पोहत त्यांच्याकडे गेलो.'

माझ्या वडिलांनी मला आणखी एक स्वप्न सांगितले. ते म्हणाले, ' स्वप्नात मी पाहिले की हजरत इमाम हुसेन ( पैगंबरांचे नातू आणि फातिमाचे पुत्र ) हे घोड्यावर बसून धर्मयुद्धासाठी ( जिहाद ) रवाना होत आहेत. मी त्यांच्याजवळ उभा होतो. माझ्याकडे वळून ते म्हणाले, ' तू मेरी अवलाद है, तू माझी संतती आहेस.' हुसेन अहमद म्हणतात, ' इ. स. १८५७ पर्यंत आमच्या घराण्यात एकेकाळी चोवीस गावांची जमीनदारी होती. पण ही सारी जमीनदारी नाहीशी झाली. माझे वडील सेवानिवृत्त होऊन गावी परत आले तेव्हा फक्त एक शेत आमच्या ताब्यात

होते. माझ्या वडिलांनी उर्दू, फारसी आणि हिंदी या भाषांचे शिक्षण घेतले आणि शिक्षकाचा पेशा पत्करला. त्यांनी इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली पण पहिल्याच दिवशी स्वप्नात त्यांना आपले हात विष्टेने माखले आहेत असे आढळून आले. तेव्हा-पासून त्यांना इंग्रजीबद्दल तिटकारा निर्माण झाला.

सेवानिवृत्त झाल्यावर माझ्या वडिलांना आपण मक्केमध्ये जाऊन राहावे असे वाटू लागले. त्या वेळी मी देवबंद ( सहारणपूर जिल्हा, उत्तर प्रदेश ) येथील सुप्रसिद्ध मुस्लिम धर्मपीठात शिक्षण घेत होतो. या धर्मपीठात मी इ. स. १८९२ मध्ये दाखल झालो होतो. धर्मपीठाचे प्रमुख आचार्य शेखुलहिंद हे थोर देशभक्त होते. माझे वडील सर्व कुटुंबियांना घेऊन इ. स. १८९९ मध्ये मक्केला रवाना झाले. तोपर्यंत माझे अरबीचे आणि धर्मशास्त्राचे शिक्षण पूर्ण झाले होते. मीही वडिलांच्या बरोबर अरबस्थानात गेलो. आम्ही मदीना शहरात स्थायिक झालो. मी तेथे धर्म-शास्त्राच्या शाळेत नोकरी पत्करली. महिन्यात मला अरबी भाषेचा चांगला सराव झाला. माझ्याकडे खाजगी रीतीने शिक्षण घेण्यास अनेक विद्यार्थी येऊ लागले. त्यांत तुर्क, इजिप्त, अफगाणीस्तान इत्यादी देशांचे विद्यार्थी असत. शाळेच्या व्यवस्थापकांना माझी लोकप्रियता आवडली नाही. त्यामुळे मी आपल्या जागेचा राजीनामा दिला आणि मुलांचे खाजगी वर्ग चालवू लागलो. मदीन्याचे धार्मिक वातावरण आणि माझे धर्मनिष्ठ जीवन. थोर पैगंबरांचे मला स्वप्नात अनेक वेळा दर्शन घडले. ते प्रसंग असे :

(१) स्वप्नात पाहिले की थोर पैगंबर मशिदीतून निघत आहेत. त्यांच्या मुखात लाल भोपळयाच्या बिया होत्या. मी जवळ गेलो तसे त्यांनी आपले मुख उघडले. त्यातून काही बिया बाहेर पडल्या. त्यांची संख्या तीसच्या जवळपास होती. त्या आपल्या वस्त्रात साठविल्या.

(२) स्वप्नात पाहिले की मी मशिदीत झोपलो आहे. माझ्या अंगावर हिरवी शाल पडली आहे. आणि एक मनुष्य मला म्हणत आहे, ' तुझे पाय थोर पैगंबरांच्या पायाप्रमाणे आहेत. ' या स्वप्नाचा अर्थ गुरुवर्य हजरत गंगोही यांनी असा सांगितला की मी खरा पैगंबरभक्त आहे.

(३) स्वप्नात पाहिले की थोर पैगंबरांची समाधी उघडी असून मला त्यांचे दर्शन घडत आहे. त्यांचे शरीर तेजःपुंज होते. त्यांची नखे आणि ओठांवरील केसही वाढले होते. मी कात्रीने ते काढले.

(४) स्वप्नात पाहिले की मी मशिदीत गेलो आहे. थोर पैगंबर एका खुर्चीवर बसले आहेत. मी त्यांच्याजवळ जाऊन पोहोचलो. त्यांनी मला चार वस्तू दिल्या. त्यांपैकी एक आठवते. बाकीच्या तीनची आठवण राहिली नाही.

(५) एकदा मी एक कवितासंग्रह वाचीत होतो. त्यातील पुढील ओळ मी वाचली : ' हे थोर पैगंबरा, तुझ्या चेहऱ्यावरील अवगुंठन बाजूला सरकीव.'

हां अय हटीब रुखसे हटादो नकाब को– मशिदीत ही ओळ पुन्हा पुन्हा गुण-गुणत असता मला समाधी लागली. त्या अवस्थेत मला थोर पैगंबरांचे दर्शन घडले. ते अतिशय तेजःपुंज दिसत होते.

(६) एकदा मी कराचीहून गाडीने प्रवास करीत होतो. स्वप्नात पाहिले की थोर पैगंबर आणि खलिफा अबूबकर हे माझ्याजवळ उभे आहेत.

(७) स्वप्नात एकदा एक मोठा वृक्ष दिसला. त्याच्या शाखा चहूकडे पसरल्या होत्या. थोर पैगंबर हे वृक्षावर बसले असून त्यांच्या तेजाने मी दिपून गेलो आहे. ते काही तरी म्हणत होते. ते काय म्हणाले हे मला पूर्णपणे आठवत नाही.

**पहिले महायुद्ध**

अशा रीतीने माझा आयुष्यक्रम चालू होता. इतक्यात पहिले महायुद्ध सुरू झाले. तुर्क सैन्ये इजिप्तच्या दिशेने सरकत होती. युद्धाकरिता रिक्रूट भरती चालू होती. महिन्यात एक मोठी सभा भरली. त्यात माझे प्रभावी भाषण झाले. भारतीय तरुण सैन्यात दाखल झाले. महंमदजान काजानी आणि मौलाना हरमतुल्ला काजानी हे त्यांचे प्रमुख होते. तुर्क सेनापती जमालपाशा यांच्या नेतृत्वाखाली भारतीय तुकडीने सुएज कालव्याच्या आणि बीर सबाच्या लढाईत चांगलेच शौर्य गाजविले.

याच सुमारास देवबंद विद्यापीठाचे प्राचार्य गुरुवर्य शेखुलहिंद हे हिंदुस्थानातून मदिन्यास आले. त्यांच्या शिकवणीने मी प्रभावित झालो. इंग्रजांविरुद्ध आणि तुर्कांच्या बाजूने आमच्या चळवळी सुरू झाल्या. शेखुलहिंद यांनी मला आणि खलील अहमद यांना या चळवळीत ओढले. मदिन्याच्या विद्वानांचे (उलेमा) नेते मुफ्ती मामून तबरी यांच्याकडे तुर्क सेनापती अन्वर पाशा याने निरोप पाठविला की आपण मदिन्याच्या विद्वानांची भाषणे ऐकण्यास उत्सुक आहो. मदिन्यात मोठी सभा भरली. आमच्या भारतीय विद्वानांना अरबी चांगले येत होते. पण अरबीतून बोलण्याची सवय नव्हती. या बाबतीत माझी तयारी चांगली होती. मी जिहाद (धर्मयुद्ध) वर अरबीतून भाषण करून तुर्कांच्या बाजूने लढणे हे कसे आवश्यक आहे हे सप्रमाण सिद्ध केले. माझे भाषण सर्वांना अतिशय आवडले.

**इंग्रजांच्या अटकेत**

काही दिवसांनी मक्केचे शेखुल इस्लाम (धर्माचार्य) अब्दुल्ला सिराज यांचा एक नकीब (दूत) मदिन्याला आला. इंग्रजांच्या चिथावणीने आणि मक्केचा अरब प्रशासक शरीफ हुसेन याच्या सांगण्याने मक्केच्या धर्माचार्यांनी तुर्कांच्याविरुद्ध एक फतवा काढला होता. या फतव्यावर सही करण्याचे आमचे शेखुल हिंद यांनी नाकारले. चार दिवसांनंतर शरीफ हुसेन हा जद्दा या बंदरावर गेला. तेथून त्याने हुकूम पाठविला की मौलाना महमूद हसन (आमचे देवबंदचे धर्माचार्य शेखुलहिंद), त्यांचे सोबती, सय्यद हाशम आणि हकीम नुसरम हुसेन यांना ताबडतोब अटक

होते. माझ्या वडिलांनी उर्दू, फारसी आणि हिंदी या भाषांचे शिक्षण घेतले आणि शिक्षकाचा पेशा पत्करला. त्यांनी इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली पण पहिल्याच दिवशी स्वप्नात त्यांना आपले हात विष्टेने माखले आहेत असे आढळून आले. तेव्हापासून त्यांना इंग्रजीबद्दल तिटकारा निर्माण झाला.

सेवानिवृत्त झाल्यावर माझ्या वडिलांना आपण मक्केमध्ये जाऊन राहावे असे वाटू लागले. त्या वेळी मी देवबंद ( सहारणपूर जिल्हा, उत्तर प्रदेश ) येथील सुप्रसिद्ध मुस्लिम धर्मपीठात शिक्षण घेत होतो. या धर्मपीठात मी इ. स. १८९२ मध्ये दाखल झालो होतो. धर्मपीठाचे प्रमुख आचार्य शेखुलहिंद हे थोर देशभक्त होते. माझे वडील सर्व कुटुंबियांना घेऊन इ. स. १८९९ मध्ये मक्केला रवाना झाले. तोपर्यंत माझे अरबीचे आणि धर्मशास्त्राचे शिक्षण पूर्ण झाले होते. मीही वडिलांच्या बरोबर अरबस्थानात गेलो. आम्ही मदीना शहरात स्थायिक झालो. मी तेथे धर्मशास्त्राच्या शाळेत नोकरी पत्करली. महिन्यात मला अरबी भाषेचा चांगला सराव झाला. माझ्याकडे खाजगी रीतीने शिक्षण घेण्यास अनेक विद्यार्थी येऊ लागले. त्यांत तुर्क, इजिप्त, अफगाणीस्तान इत्यादी देशांचे विद्यार्थी असत. शाळेच्या व्यवस्थापकांना माझी लोकप्रियता आवडली नाही. त्यामुळे मी आपल्या जागेचा राजीनामा दिला आणि मुलांचे खाजगी वर्ग चालवू लागलो. मदीन्याचे धार्मिक वातावरण आणि माझे धर्मनिष्ठ जीवन. थोर पैगंबरांचे मला स्वप्नात अनेक वेळा दर्शन घडले. ते प्रसंग असे :

(१) स्वप्नात पाहिले की थोर पैगंबर मशिदीतून निघत आहेत. त्यांच्या मुखात लाल भोपळ्याच्या बिया होत्या. मी जवळ गेलो तसे त्यांनी आपले मुख उघडले. त्यातून काही बिया बाहेर पडल्या. त्यांची संख्या तीसच्या जवळपास होती. त्या आपल्या वस्त्रात साठविल्या.

(२) स्वप्नात पाहिले की मी मशिदीत झोपलो आहे. माझ्या अंगावर हिरवी शाल पडली आहे. आणि एक मनुष्य मला म्हणत आहे, ‘ तुझे पाय थोर पैगंबरांच्या पायाप्रमाणे आहेत. ’ या स्वप्नाचा अर्थ गुरुवर्य हजरत गंगोही यांनी असा सांगितला की मी खरा पैगंबरभक्त आहे.

(३) स्वप्नात पाहिले की थोर पैगंबरांची समाधी उघडी असून मला त्यांचे दर्शन घडत आहे. त्यांचे शरीर तेजःपुंज होते. त्यांची नखे आणि ओठांवरील केसही वाढले होते. मी कात्रीने ते काढले.

(४) स्वप्नात पाहिले की मी मशिदीत गेलो आहे. थोर पैगंबर एका खुर्चीवर बसले आहेत. मी त्यांच्याजवळ जाऊन पोहोचलो. त्यांनी मला चार वस्तू दिल्या. त्यांपैकी एक आठवते. बाकीच्या तीनची आठवण राहिली नाही.

(५) एकदा मी एक कवितासंग्रह वाचीत होतो. त्यातील पुढील ओळ मी वाचली : ‘ हे थोर पैगंबरा, तुझ्या चेहऱ्यावरील अवगुंठन बाजूला सरकीव.’

हां अय हटीब रुखसे हटादो नकाब को– मशिदीत ही ओळ पुन्हा पुन्हा गुण-गुणत असता मला समाधी लागली. त्या अवस्थेत मला थोर पैगंबरांचे दर्शन घडले. ते अतिशय तेजःपुंज दिसत होते.

(६) एकदा मी कराचीहून गाडीने प्रवास करीत होतो. स्वप्नात पाहिले की थोर पैगंबर आणि खलिफा अबूबकर हे माझ्याजवळ उभे आहेत.

(७) स्वप्नात एकदा एक मोठा वृक्ष दिसला. त्याच्या शाखा चहूकडे पसरल्या होत्या. थोर पैगंबर हे वृक्षावर बसले असून त्यांच्या तेजाने मी दिपून गेलो आहे. ते काही तरी म्हणत होते. ते काय म्हणाले हे मला पूर्णपणे आठवत नाही.

**पहिले महायुद्ध**

अशा रीतीने माझा आयुष्यक्रम चालू होता. इतक्यात पहिले महायुद्ध सुरू झाले. तुर्क सैन्ये इजिप्तच्या दिशेने सरकत होती. युद्धाकरिता रिक्रूट भरती चालू होती. महिन्यात एक मोठी सभा भरली. त्यात माझे प्रभावी भाषण झाले. भारतीय तरुण सैन्यात दाखल झाले. महंमदजान काजानी आणि मौलाना हरमतुल्ला काजानी हे त्यांचे प्रमुख होते. तुर्क सेनापती जमालपाशा यांच्या नेतृत्वाखाली भारतीय तुकडीने सुएज कालव्याच्या आणि बीर सबाच्या लढाईत चांगलेच शौर्य गाजविले.

याच सुमारास देवबंद विद्यापीठाचे प्राचार्य गुरुवर्य शेखुलहिंद हे हिंदुस्थानातून मदिन्यास आले. त्यांच्या शिकवणीने मी प्रभावित झालो. इंग्रजांविरुद्ध आणि तुर्कांच्या बाजूने आमच्या चळवळी सुरू झाल्या. शेखुलहिंद यांनी मला आणि खलील अहमद यांना या चळवळीत ओढले. मदिन्याच्या विद्वानांचे ( उलेमा ) नेते मुफ्ती मामून तबरी यांच्याकडे तुर्क सेनापती अन्वर पाशा याने निरोप पाठविला की आपण मदिन्याच्या विद्वानांची भाषणे ऐकण्यास उत्सुक आहो. मदिन्यात मोठी सभा भरली. आमच्या भारतीय विद्वानांना अरबी चांगले येत होते. पण अरबीतून बोलण्याची सवय नव्हती. या बाबतीत माझी तयारी चांगली होती. मी जिहाद (धर्मयुद्ध) वर अरबीतून भाषण करून तुर्कांच्या बाजूने लढणे हे कसे आवश्यक आहे हे सप्रमाण सिद्ध केले. माझे भाषण सर्वांना अतिशय आवडले.

**इंग्रजांच्या अटकेत**

काही दिवसांनी मक्केचे शेखुल इस्लाम (धर्माचार्य) अब्दुल्ला सिराज यांचा एक नकीब (दूत) मदिन्याला आला. इंग्रजांच्या चिथावणीने आणि मक्केचा अरब प्रशासक शरीफ हुसेन याच्या सांगण्याने मक्केच्या धर्माचार्यांनी तुर्कांच्याविरुद्ध एक फतवा काढला होता. या फतव्यावर सही करण्याचे आमचे शेखुल हिंद यांनी नाकारले. चार दिवसांनंतर शरीफ हुसेन हा जद्दा या बंदरावर गेला. तेथून त्याने हुकूम पाठविला की मौलाना महमूद हसन (आमचे देवबंदचे धर्माचार्य शेखुलहिंद ), त्यांचे सोबती, सय्यद हाशम आणि हकीम नुसरम हुसेन यांना ताबडतोब अटक

करून पाठविण्यात यावे. त्याप्रमाणे आम्हाला कैद करण्यात येऊन जद्दा बंदरावर नेण्यात आले. तेथे आम्ही एक महिनाभर अटकेत होतो. तेथूनच आम्हाला जहाजाच्या मार्गे सुएजला नेण्यात आले. तेथून रेल्मार्गाने आम्ही कैरोला गेलो. कैरोच्या तुरुंगात आमच्या जबान्या घेण्याचे काम सुरू झाले. तपासणी अधिकारी इंग्रज होता. त्याला उर्दू उत्तम येत होते. देवबंद, सीमा प्रदेश, काबूल इत्यादी ठिकाणी शेखुल हिंद यांच्या नेतृत्वाखाली जी कारस्थाने करण्यात आली होती त्याची इंग्रजांना खडान्‌खडा माहिती होती असे आम्हाला आढळून आले. एक महिनाभर चौकशीचे काम चालू होते. यानंतर सोळा फेब्रुवारी १९१७ रोजी आम्हांला माल्टा बेटात कैदी म्हणून पाठविण्यात आले. पाच दिवसांनी आम्ही माल्टाला पोहोचलो.

माल्टाच्या तुरुंगात आम्ही तीन वर्षे दोन महिने होतो. इ. स. १९२० मध्ये आमची तेथून सुटका झाली. माल्टा येथे अनेक तुर्क कैदी होते. त्यांत तुर्कांचे पंत-प्रधान होते. सर्वांनी आम्हांला जड अंतःकरणाने निरोप दिला. तुर्कांचे शेखुल इस्लाम खैरुद्दीन आफंदी यांनी आमच्याविषयी परमेश्वराजवळ प्रार्थना केली. सर्वांनी आमीन म्हटले आणि आम्ही सर्वांचा निरोप घेऊन बोटीत चढलो.

एकोणीस मे १९२० रोजी आमचे जहाज एडन बंदराला लागले. आम्ही तेथून हिंदुस्थानात तीन तारा पाठविल्या. एक देवबंद येथे नुसरत हकीम महंमद हसन यांना, दुसरी डॉक्टर अन्सारी यांना आणि तिसरी मुंबईचे हकीम अजमीरी यांना.

### मुंबईत

आठ जून १९२० रोजी आमचे जहाज मुंबई बंदरात आले. इंग्रजांची इच्छा ही की शेखुल इस्लाम यांना गुपचुप गाडीत बसवून देवबंदला पाठवून द्यावे. पण त्यांचा डाव फसला. मौलाना शौकतअलींच्या नेतृत्वाखाली हजारो लोकांनी आमचे स्वागत केले. मुंबईच्या मुसलमानांनी खेत्री मशिदीत प्रचंड सभा घेऊन शेखुलहिंद यांना मानपत्र दिले.

शेखुलहिंद महमूद हसन हे मुंबईत दोन दिवस होते. या दोन दिवसांत मौलाना अब्दुलबारी आणि महात्मा गांधी हे त्यांना भेटून गेले.

यानंतर शेखुलहिंद यांच्या सूचनेवरून मी खिलाफत कमिटीने सुरू केलेल्या कलकत्त्याच्या राष्ट्रीय धर्मपीठात प्राध्यापकाचे काम पत्करले. माल्टाहून परत आल्यावर मी काँग्रेसचा सभासद बनलो आणि सत्याग्रह आणि असहकार या चळ-वळींना स्वतःला वाहून घेतले. कराचीत भाषण केल्याबद्दल आमच्यावर खटला भरण्यात आला. त्यात मी, मौलाना महंमदअली, मौलाना शौकतअली आणि इतर यांना शिक्षा झाल्या. मला दोन वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली.

स्वातंत्र्याच्या चळवळीत हुसेन अहमद यांना अपार कष्ट सहन करावे लागले.

ते जमियतुल उलेमाये हिंदचे नेते होते. भारताच्या फाळणीला त्यांनी शेवटपर्यंत विरोध केला. त्यापायी त्यांना प्रतिस्पर्ध्यांची अपमानास्पद वागणूक सहन करावी लागली. पंजाबमध्ये प्रवास करीत असताना एकदा त्यांच्या डब्यात गुंड घुसले. त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला व त्यांच्या थोबाडीत मारली आणि त्यांच्या दाढीचे केस उपटले. पण हुसेन अहमदनी शांतपणे हे सर्व सहन केले.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्याचे हुसेन अहमद यांनी पाहिले. यानंतर थोड्या वर्षांनी या धर्मनिष्ठ राष्ट्रभक्ताचा मृत्यू झाला.

. २ .

# विश्वास ठेवा अगर...

**[ सतराव्या शतकातील प्रसिद्ध फारसी लेखकाच्या गंमतीदार आठवणी ]**

भारतामध्ये फारशी ही राजभाषा म्हणून सुमारे पाचशे वर्षे नांदली. या काळात (तेरावे ते अठरावे शतक) भारतातील शेकडो लेखकांनी फारसीतून साहित्यरचना केली. काव्य, इतिहास, धर्मशास्त्र, चरित्रे, आत्मचरित्रे, पत्रसंग्रह, राजकीय अखबार (दैनंदिन्या), सारांश सर्व विषयांवर जी ग्रंथनिर्मिती या काळात भारतात झाली तिची संख्या पन्नास हजारांपर्यंत सहज जाईल. फारशीतून काव्यनिर्मिती करणाऱ्या भारतीयांपैकी पाच जणांची नावे भारताच्या बाहेर इराण, तुराण या देशांतही गाजली. अमीर खुस्रौ (चवदावे शतक), फैजी (सोळावे शतक), अब्दुलकादर बेदिल (सतरावे शतक), मिर्झा गालिब (एकोणिसावे शतक) आणि इक्बाल (विसावे शतक).

अब्दुलकादर बेदिल हा धर्मनिष्ठ होता. मंत्रतंत्राही तो निष्णात होता असे दिसते. आपल्या आत्मचरित्रपर आठवणींत त्याने आपल्या आप्तेष्टांच्या आणि आपल्या गुरूंच्या मोठ्या गमतीदार आठवणी दिल्या आहेत. तो म्हणतो,

**भूत पळवून लावले**

लहानपणापासून मला मंत्रतंत्र, अंगारे धुपारे, भुते पळवून लावणे इत्यादी गोष्टींची सवय लागली. माझे गुरू हजरत शेख यांच्या तोंडून मंत्र बाहेर पडत ते मी माझ्या आठवणीत साठवून ठेवीत असे. एके दिवशी मी आपल्या मित्रांबरोबर खेळत होतो.

शेजारच्या घरात एका बाईला भुताने झपाटले होते. दोन दिवसांपासून तिच्यावर उपचार चालू होते. पण काही गुण येत नव्हता. मी त्या घरातील एका माणसाला बोलाविले आणि मंत्र पढून त्याच्या बोटावर फुंकर मारली. मी त्याला म्हटले की हे बोट तू त्या बाईच्या कानात घाल. त्याने तसे करताच भुताने एक मोठी किंकाळी फोडली आणि तो त्या बाईला सोडून पळून गेला. माझे गुरू शहासाहेब यांना ही हकीकत कळली तसे ते म्हणाले, 'तू हे मंत्र कोठे शिकलास?' मी म्हटले 'तुमच्याच तोंडून या मंत्रांचा उच्चार मी ऐकला.' मग गुरुवर्य म्हणाले, 'बाळ,

आजपासून तुला सिद्धी प्राप्त होतील.'

**आमचे गुरुवर्य**

आमच्या गुरुवर्यांचे, शहासाहेब यांचे चमत्कार काय वर्णावे ! बिहार प्रांतात एकदा ते नावेतून गंगा ओलांडीत होते. ऐन मध्यात नावाडी प्रवाशांकडून एकेक नाणे मागू लागला. शहासाहेबांनी त्याला पुष्कळ सांगितले की इतके पैसे माझ्यापाशी नाहीत. पण तो ऐकेना. उलट तो त्यांना शिव्या देऊ लागला. हे पाहून शहासाहेबांनी नावेतून उडी मारली आणि ते पाण्यावर जाऊन बसले. हा चमत्कार पाहून सगळे प्रवासी ओरडू लागले.

आमच्या शहासाहेबांना खजुराचा रस फार आवडे. एकेका वेळी ते कित्येक पेले रिकामे करीत.

**माझे काका**

माझे काका मिर्जा कलंदर हे सैन्यात अधिकारी होते. त्यांच्या अंगात विलक्षण बळ होते. लोखंडाचे मोठमोठे गज ते हाताने वाकवून सरळ करीत. त्यांचा चमत्कार असा की विंचू त्यांच्या जवळून जरी गेला तरी तो मरून पडत असे. त्यांनीच माझे शिक्षण केले.

**इसवी सन १६६०**

इ. स. १६६० मध्ये माझे मामा मिर्जा जरीफ यांच्याबरोबर ओरिसा प्रांतात गेलो. त्याच सुमारास गुरुवर्य शहासाहेब हेही प्रवास करीत तिकडे आले. तेथे ते तीन वर्षे होते. ओरिसाचा मोगल सुभेदार खान दौरान नावाचा होता. त्याच्यावर कोणी तरी विषप्रयोग केला होता. त्याच्या हातापायाची बोटे विषाने निळी काळी झाली होती. शरीरभर त्याला फोड आले होते. हकीम लोक उपचार करून थकले. शेवटी त्याने शहासाहेबांकडे दयेची याचना केली. शहासाहेब त्याच्याजवळ गेले. त्यांनी खान दौरानकडे फक्त एकदाच पाहिले. तो काय चमत्कार ! तो अगदी खणखणीत बरा झाला !

**दुष्ट असद**

तेथे असद नावाचा एक दुष्ट मनुष्य राहात होता. तो शहासाहेबांशी उद्धटपणे वागला. परमेश्वरी कोप पाहा. तो आपल्या पालखीत बसून चालला होता. शहराच्या वेशीपर्यंत त्याची पालखी पोहोचली नाही तोच विजांचा कडकडाट झाला. पालखी उलटली. पालखी वाहणाऱ्यांनी तपास केला तर असद कोठे दिसेना. शेवटी तो जवळच्या घाणेरड्या गटारात बेशुद्धावस्थेत पडलेला आढळला. त्याचे तोंड काळे ठिक्कर पडले होते. तोंडावरचे काळे धुऊन काढावे म्हणून पुष्कळ प्रयत्न झाले. पण काही उपयोग झाला नाही. ही गोष्ट शहासाहेबांना सांगण्यात आली.

ते म्हणाले, 'त्याने जो उद्धटपणा केला त्याबद्दल त्याला मृत्यू येणार हे ठरलेले आहे.' शेवटी हकीमांनी निर्णय घेतला की, गटारातील घाण असदला पाजण्यात आली तर त्याचा काळा ठिक्कर पडलेला चेहरा कदाचित बरा होईल. घाणीने भरलेले पाणी त्याला पाजण्यात आले. तो एक पेलाभर घाण प्याला, तोच तो कोसळून पडला आणि मरण पावला.

**गाढव**

एक दिवस तेथील हकीम ताहिर गीलानी हे शहासाहेबांपाशी आले. शहासाहेब हे हकीमसाहेबांना म्हणाले, 'आम्ही परमेश्वरापाशी प्रार्थना केली आहे की, तुमचे अंतरंग तुमच्या बहिरंगाप्रमाणेच शुद्ध व्हावे.' या गोष्टीला तीन दिवस झाले. आम्हाला असे कळले की हकीम ताहिरला वेड लागले आहे. शहासाहेब माझे मामा मिर्जा जरीफ यांना म्हणाले, 'हकीम ताहिरच्या उद्धाराचे दिवस जवळ आले आहेत.' शहासाहेब हकीम ताहिरपाशी गेले. त्याने आपली दर्दभरी कहाणी सांगितली ती अशी : हकीम ताहिर म्हणाला, 'माझे वडील हकीम नूरुद्दीन यांना आमच्या वाड्याच्या बागेत पुरले आहे. परवा संध्याकाळी मी नेहमीप्रमाणे त्यांच्या थडग्यावर फातिहा पढण्यासाठी (आत्म्याला शांती मिळावी म्हणून करतात ती प्रार्थना) म्हणून गेलो होतो. मी थडग्याजवळ जाऊन पोहोचलो तो तेथील विलक्षण दुर्गंधीने माझे डोके भणाणून गेले. मी पाहतो तो कबरीत एक सडलेले गाढव पडले होते. मी परत फिरू लागलो, तो कबरीतून आवाज आला, 'मी नूरुद्दीन आहे. मला भिऊ नकोस. माझ्या या अवस्थेपासून तू धडा शीक. मी गाढव झालो आहे. त्याचे कारण म्हणजे मी केलेली पापकृत्ये होत. माझे अंतरंग शुद्ध नव्हते.' असे सांगून हकीम ताहिर शहासाहेबांना म्हणाला, 'माझ्या वडिलांसंबंधीचा हा साक्षात्कार केवळ आपल्या कृपेमुळे झाला आहे बरे. आता आपण माझे अंतरंग शुद्ध करावे.' तिसऱ्या दिवशी हकीम ताहिर शहासाहेबांपाशी आला. शहासाहेबांनी त्याला आपल्याजवळ बसवून त्याच्यावर कृपा केली. यानंतर हकीम ताहिर तेथून उठला. तेथून तो चार पावले गेला असेल नसेल तोच तो धाडकन जमिनीवर कोसळला. लगेच त्याचा प्राण गेला. शहासाहेबांनी स्वतः त्याचा अंत्यविधी पार पाडला. अशा रीतीने हकीम ताहिरला शहासाहेबांच्या हातून मुक्ति मिळाली.

**माझे कौतुक**

वयाच्या दहाव्या वर्षापासून मी कविता करू लागलो. माझा मित्र होता तो तोंडात नेहमी लवंग बाळगी. मी त्याच्यावर पुढील ओळी रचल्या. त्या वेळी माझे वय दहा वर्षांचे होते.

माझा मित्र बोलू लागला की त्याच्या तोंडातून विलक्षण सुगंध येतो. हा काय लवंगांचा गंध आहे का गुलाब पुष्पाचा, का कस्तुरीचा सुगंध दरवळतो आहे ?

यारम हरगाह दर सुखन मी आयद
बूये अजबश दर दहन मी आयद
ई बूये करनफल अस्त या निकहते
गुरू
या राइहे मुश्के खतन मी आयद

माझ्या गुरुवर्यांसमोर मी पुढील रुबाई रचून दाखविली. अरे बेदिल, जगाच्या या सुखदु:खामधून तू अनासक्त होऊन आपला मार्ग आक्रम. कमी जास्त सोय आणि संकट यामधून असेच मार्ग आक्रमून जा. या जगाच्या उपवनातून प्रभातकाळच्या वायूप्रमाणे स्वच्छंदपणे आणि अलिप्तपणे निघून जा.

बेदिल ज गमव निशाते दौरां ब गुजर
अज बीशो कम मुश्किलो आसां बगुजर
दर गुल्शने दहर चूं नसीम दमे सुबह
आजादावराई दामन अफशांब गुजर

गुरुवर्य म्हणाले, या कवितेवरून कलेवरील प्रभुत्व दिसून येते.

**भुते पळविली**

मी अनेक वर्षे मथुरेत राहिलो. माझा एक मित्र जवळच्या एका किल्ल्याचा किल्लेदार होता. तो मला म्हणाला, 'तीन वर्षांपासून किल्ल्यात भुतांनी गर्दी केली आहे. किल्ल्यातील लोक जीव मुठीत धरून आहेत. मी पुढील ओळी रचल्या.

भुतांनो, दुसरीकडे निघून जा पाहू, तुम्हाला इतरत्र जागा काही कमी पडावयाची नाही.

बा इफारिया जहानी दीगर
जाय कम नीस्त मकानी दीगर

या ओळी मी एका झेंड्यावर लिहिल्या आणि तो भुताटकीच्या जागेवर नेऊन रोवला. त्या दिवसापासून किल्यातून भुते नाहीशी झाली.

**योगी**

एकदा मी दिल्लीहून लाहोरला चाललो होतो. मला माझा चाकू नीट करून घ्यावयाचा होता. मी लोहाराकडे गेलो. त्यांच्यापैकी एकाने अतिशय आदराने माझ्या हातातून चाकू घेतला. एका दृष्टिक्षेपात त्याने तो चाकू नीट केला. मी त्याला काही पैसे देऊ केले. त्याने नकार दिला आणि म्हटले, 'आम्ही एका कोपऱ्यात बसून परमेश्वरी कृपाप्रसादाची प्रतीक्षा करीत असतो.' मी त्याच्याकडे पाहिले. त्याचा आवाज इहलोकीचा वाटला नाही. मी आणखी काही क्षण तेथे थांबलो

असतो तर माझे अक्षरशः पाणी झाले असते. मी तेथून पळ काढला.

**पऱ्या**

दिल्लीत एका आळीत एक सुंदर घर होते. त्या घरात पऱ्या नांदताहेत असे मी ऐकले. मला त्या घरात राहण्याचा योग आला. त्याला दोन महिने झाले असतील नसतील तोच एके दिवशी संध्याकाळी शेकडो कावळे त्या घराभोवती जमले. मी माझे धनुष्यबाण उचलले आणि एका कावळ्यावर नेम धरला. अजून नेम लागला नव्हता तोच त्या कावळ्याची पिसे वाऱ्यात पसरली. आकाशात एक लांबच लांब अशी काळी रेघ बनली. क्षणभराने ती रेघ नाहीशी झाली. मी माझे धनुष्य एका कोपऱ्यात ठेवले होते. मी नमाज पढण्यास म्हणून वाकलो तो कोपऱ्यातून आवाज आला. मी वळून पाहिले तो धनुष्याचे तुकडे तुकडे झाले होते आणि धनुष्याची दोरी नाहीशी झाली होती. तेव्हापासून त्या घरातून पऱ्या नाहीशा झाल्या.

**चित्र**

अनूपचंद नावाचा माझा एक मित्र होता. तो चित्रकार होता. त्याने माझे चित्र काढले. चित्र हुबेहूब होते. मी मधे काही काळ आजारी होतो. माझा आजार सात महिने लांबला. एक दिवस माझा एक मित्र माझ्यापाशी येऊन बसला. त्याचे लक्ष चित्राकडे गेले. तो म्हणाला, ‘अरेरे ! हे चित्र खराब झाले आहे ! कुणीतरी याच्यावर पाणी टाकले आहेसे दिसते. चित्राचा रंग उडाला आहे.’ मीही ते चित्र पाहिले. पुढे काही दिवसांनी माझी प्रकृती बरी झाली. मला माझ्या चित्राची आठवण झाली. मी ते चित्र मागवून पाहिले. तो काय चमत्कार ! ते चित्र अगदी नव्याने तयार केल्यासारखे दिसले. चित्रात पूर्वीप्रमाणे रंग आणि तजेलाही होता. पाहणाऱ्यांना या गोष्टीचे आश्चर्य वाटले. मीही हतबुद्ध झालो. मी शेवटी ते चित्र फाडून टाकले.

**हा कोण ?**

शहा शुजाने औरंगजेबाशी लढण्याचे ठरविले. आम्ही शहाशुजाच्या लष्करात होतो (इ. स. १६५८). शहाजशुजाचा पराजय झाला. माझे नातेवाईक मिर्झा अब्दुललतीफ आणि मी लष्करातून पळालो. दहा दिवसांनी आम्ही पाटण्याला पोहोचलो. आम्ही तेथून पुढे निघालो. अब्दुललतीफ मागे राहिले. माझ्याबरोबर सरमस्तखान आणि मुबारिजखान हे होते. आम्ही पाटण्याच्या बाहेर भटकत असता आम्हाला टेकडीवर एक बंगला दिसला. आम्ही जवळ गेलो तो बाहेर अंगणात एक गंधर्वतुल्य मनुष्य बसला होता. त्याच्यासमोर आगटी पेटली होती. आम्ही त्याची विचारपूस केली. तो काही बोलला नाही. आम्ही फार आग्रह केल्यावर त्याने

पुढील ओळी म्हटल्या : वर्षानुवर्षे तुझ्या सुंदर चेहऱ्याच्या दर्शनासाठी मी दारोदार भटकत आहे. मला दर्शन देऊन माझी या भटकण्यातून सुटका कर बरे. तो पुन्हा पुन्हा या ओळी म्हणत होता. आमचीही शुद्ध हरपली. ओळ झाली तो काय, गेला तो गंधर्वतुल्य माणूस. कशाचाच पत्ता नव्हता.

. ३ .

## अजीजची मैफल

उर्दू ग्रंथांतून कवितांचे उतारेचे उतारे देण्याचा जो विलक्षण सोस आहे त्याचे अलिकडचे उदाहरण म्हणजे कमरुद्दीन अहमद यांनी लिहिलेले अजीज मिर्जा यांचे चरित्र होय. अजीज मिर्जा हे अलीगड विद्यापीठाचे पदवीधर होते. इ. स. १८८७ मध्ये ते हैदराबाद राज्यात नोकरीला लागले. तेथे ते गृहखात्याच्या सचिव-पदापर्यंत चढले. इंग्रजविरोधी कारस्थाने केल्याच्या आरोपावरून त्यांना इ. स. १९११ मध्ये हैदराबाद सोडावे लागले. यानंतर ते अलीगड विद्यापीठाच्या कार-भारात लक्ष घालू लागले. यानंतर ते अखिल भारतीय मुस्लिम लीगचे सेक्रेटरी झाले. या कामावर असतानाच इ. स १९१२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. ते उत्तम प्रशासक, पट्टीचे वक्ते, उत्कृष्ट साहित्यिक आणि निरलस कार्यकर्ते होते. त्यांचे चरित्रकार कमरुद्दीन यांनी जे लिहिलेले आहे त्याचा सारांश असा :

इ. स. १८८८ मध्ये अजीज मिर्जा अलिगडहून बी. ए. झाले. त्यांना हैदरा-बादेत नौकरी मिळाली. उत्तर प्रदेश सोडून त्यांना संस्थानी वातावरणात शिरावे लागले. परमेश्वराच्या योजनेत पक्ष्यांना पकडणारा पारधी हा निमित्तमात्र. कैद-खान्यात आम्हाला आणले ते अन्नोदक ऋणानुबंधाने होय.

निजामे जब्र मे सय्याद इक बहाना था
मुझे कफस मे जो लाया वो आबो दाना था

अजीज मिर्जाच्या गुणावर लुब्ध झाल्यामुळेच हैदराबादचे महसूल सचिव विकारुमुल्क यांनी त्यांना नोकरी देऊ केली.

पुष्पाचे सौंदर्य विकसित झाले की बागेत बुलबुल पक्ष्यांनी गर्दी केलीच. याचा अर्थच असा की गुणी माणसांना गुणग्राहकांची उणीव भासत नाही.

हुजूमे बुल्बुल हुवा चमन मे किया जो गुलने जमाल पैदा
कमी नहीं कदरदान की अकबर करे तो कोयी कमाल पैदा

हैदराबादेत सर सालारजंग दिवाण ( १८५३–१८८३ ) यांची कारकीर्द संपली होती. राज्याची प्रतिष्ठा वाढावी म्हणून त्यांनी अविरत परिश्रम केले. याच कारणांनी त्यांना इंग्रजांच्याकडून पुढ पुढे बराच त्रास सहन करावा लागला.

या बागेत आमचे घरटे होते हा आमचा गुन्हा झाला. आणि शिक्षा म्हणून

माळव्याने आमचे घरटे जाळून टाकले.

सजा ये थी के जला बागवा के हाथोंसे
खता ये थी के गुलिस्त मे आशियाना था

सालारजंगाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा लायकअली सालारजंग दुसरा (१८८३–१८८७) यास दिवाणगिरी मिळाली. पण निजामाच्या विरोधामुळे त्याला राजीनामा द्यावा लागला. आता सर अस्मानजहा हे दिवाण झाले ( १८८७ ते १८९३). सगळा कारभार राज्याचे सचिव विकारुलमुल्क यांच्या हातात होता. विकारुलमुल्क यांना इंग्रजी येत नव्हते. अजीज मिर्जा यांचे इंग्रजीवर चांगलेच प्रभुत्व होते. यामुळे विकारुलमुल्क यांना अजीज मिर्जाचा चांगला उपयोग करून घेता आला. इ. स. १८९१ मध्ये अजीज मिर्जा हे गृहखात्यात सहाय्यक सचिव बनले. यानंतर त्यांना बढती मिळत गेली. इ. स. १८९५ मध्ये ते न्याय आणि पोलिस या खात्यांचे सचिव झाले; हैदराबादेत मूळ देशी, आणि परप्रांतांतून आलेला नोकरवर्ग यांची आपसात स्पर्धा सुरू झाली होती.

हा संघर्ष जन्मभर चालू राहीलसे दिसते. कारण आम्ही पडलो तुर्क आणि आमची प्रेयसी आहे इराणी !

जंगो जुद्दल रहेगी शहीदी तमाम उम्र
ईरानियोंमें यार हैं तूरानियोंमें हम

यालाच मुल्की आणि गैर मुल्की ( स्वदेशी आणि परदेशी ) चळवळ असे हैदराबादेत नाव पडले. हे सगळे स्वार्थाचे राजकारण होय.

परमेश्वराला जाळ्यात पकडण्याचे हे सगळे डाव आहेत. ब्राह्मणाची आराधना, आणि मुल्लामौलवींची अजान ( प्रार्थनेची हाक ) यांत किती दम आहे हे माहीत का नाही ?

खुदा को दाम में लाने के सब ये धोके हैं
ब्रह्मनोंके भजन शेख की अजां मालूम

त्या वेळी हेंकिन्स नावाचा युरोपियन हा हैदराबादच्या पोलिस खात्याचा प्रमुख होता. उर्दू भाषेवर त्याचे चांगलेच प्रभुत्व होते. त्या वेळची एक आख्यायिका अद्यापपर्यंत हैदराबादकरांच्या आठवणीत आहे.

**अर्जाचा घोटाळा**

नज्म आणि नसर (पद्य आणि गद्य) काव्याला उर्दूत नज्म ( वृत्तबद्ध, छंदोबद्ध) म्हणतात. नसर म्हणजे गद्य. पण सरकारी खात्यालाही नज्म म्हणण्याचा हैदराबादेत प्रघात असे. उदाहरणार्थ नज्मो नस्क-जनरल अॅडमिनिस्ट्रेशन. नज्मे जमियत ( सैन्य खाते ), कारण नज्म म्हणजे शिस्त. यावरून नाजिम म्हणजे

खातेप्रमुख, व्यवस्थापक, हा शब्द बनला. मीर महफूज अली हे हेन्किन्सचे पर्सनल क्लार्क. ते उत्तर भारतातील राहणारे. त्यांना हैदराबादेतील वाक्सांप्रदाय माहीत नव्हते. त्यांच्यापाशी एके दिवशी एक गृहस्थ आले. ते म्हणाले, 'अहो, मी पूर्वी याच खात्यात होतो. पण माझे दुर्दैव, लोकांच्या सांगण्यावरून मी नज्ममध्ये ( म्हणजे नज्मे जमियत, सैन्य खाते ) अर्ज केला, पण मला आता पश्चात्ताप झाला आहे. मला याच खात्यात पुन्हा लावून द्या.

महफूज अलींना सैन्य खात्याला नज्मे जमीयते म्हणतात हे माहीत नव्हते. त्यांना वाटले नज्म म्हणजे पद्य. ते गंभीरपणे म्हणाले, 'तुम्ही चूक केली. तुम्ही पद्याऐवजी (नज्म) गद्यात अर्ज केला असता तर कदाचित त्याचा उपयोग झाला असता.' त्यांना वाटले की अर्जदार हा कवी असावा आणि काव्यातून अर्ज करण्याची त्याला सवय असावी. महफूज अलीचे हे भाषण जवळच्या खोलीत असलेले हेंकिन्स ऐकत होते. त्यांना हसू आवरेना. त्यांनी महफूज अलीखानांना म्हटले, 'अहो, येथे नज्म म्हणजे पद्य नव्हे. नज्म म्हणजे खाते.'

**बीड जिल्ह्याचे कलेक्टर**

इ. स. १९०३ मध्ये अजीज मिर्जा यांची बीड जिल्ह्याचे कलेक्टर म्हणून नेमणूक झाली. तेथे त्यांनी मोठे श्रम केले. जिल्ह्यात शांतता स्थापन केली, बंडाळ्या मोडून काढल्या. निःपक्षपती न्यायदान केले. आणि अशा रीतीने पुढे येणाऱ्या अधिकाऱ्यांचा मार्ग निष्कंटक केला.

हा वेडापीर पाहा, बोचणारे काटे हा आपल्या शरीरात रुतवून घेऊन गेला. त्यामुळे मागाहून येणाऱ्या प्रवाशांचे मार्गाचे कष्ट नाहीसे झाले.

चुभे जितने भी कांटे ले लगा दीवाना पैरों में
रहे गम आनेवालों के लिये इस तरह आसां की

एका खटल्यात एका आरोपीला फाशीची शिक्षा झाली होती. मिर्जांनी खटल्याचे कागदपत्र काळजीपूर्वक पाहिले. आरोपी निर्दोषी असून त्याला फाशीची शिक्षा होता कामा नये असे त्यांचे मत झाले. त्यांनी वरिष्ठांकडे जोरदार भाषेत पत्र लिहून कळविले की या माणसाला फाशी होता कामा नये. पत्राच्या शेवटी त्यांनी पुढील ओळी लिहिल्या,

अहो, अंतिम न्यायाचा दिवस ( लास्ट डे ऑफ जजमेंट ) जवळ येत आहे. निरपराधी माणसाचा खून कसा पचेल? खंजीर गप्प राहिला तरी अस्तनीवरचे रक्ताचे डाग ओरडत उठतील ना.

करीब है यारो रोजे महशर छिपेगा कुश्ता का खून क्योंकर
जो चुप रहेगी जबाने खंजर लहू पुकारेगा आसतीं का

बीड जिल्ह्यामध्ये अजीव मिर्जा यांना मोठी लोकप्रियता लाभली. बीड-मध्ये त्यांच्या नावाने अजीज मोहल्ला (अजीव आळी) कायम करण्यात आला. मद्यपी ज्या भांड्याला हात लावतील त्याचे मधुपात्र करून सोडतील आणि ज्या जागेवर बसून मद्यपान करतील, त्या जागेचे मद्यालय करूव सोडतील.

रिंद जिस जरफ को छूलें वही सागर बन जाये
जिस जगह बैठ के पी लें वही मैं खाना है

इ. स. १९०४ मध्ये अजीब मिर्जांची बदली नांदेड जिल्ह्याचे कलेक्टर म्हणून झाली. तेथेही ते लोकप्रिय झाले. पण तेथूनही त्यांची लवकर बदली झाली. लोकांना या गोष्टीची हळहळ वाटली. ते म्हणू लागले :

अरेरे, पापणी लवते न लवते तोच प्रियजनांचा सहवास संपुष्टात आला. फुलांचा बहर पोटभर अनुभविला नाही तोच वसंत ऋतू संपला.

हैफ दर चश्मे जदन सुहबते यार आखीर शुद
रुये गुल सैर न दीदम के बाहर अखिर शुद

इ. स. १९०५ मध्ये अजीज मिर्जा यांना बढती मिळून त्यांना हैदराबाद हायकोर्टाचे न्यायमूर्ती म्हणून नेमण्यात आले.

हायकोर्टावर त्यांनी एक वर्ष काम केले. ते काही एल. एल. बी. नव्हते की बॅरिस्टर. पण त्यांनी दिलेले निकाल उत्कृष्ट असत.

दैवी शक्ती माझ्या कानांत काही सांगते. माझी गीते म्हणजे ब्रह्मनादच समजा.

लिख देता है कुछ पीरे मुगा कानों में
नग्मे को मिरे गैब की आवाज कहो

हायकोर्टात ते विचारमग्न होऊन बसले. त्यांचा रुबाब सर्वांना जाणवायचा.

बैठे हैं यूं के जैसे किसी फिक्र में हैं गर्क
फिर भी तमाम बज्म पे छाये हुयेसे हैं

इ. स. १९०६ मध्ये अजीज मिर्जा यांना पुन्हा बढती मिळाली. ते न्याय-खात्याचे सचिव बनले. अजीज मिर्जांची ही कारकीर्द यशस्वी ठरली. ते मन लावून काम करीत.

प्रवास हा वाटसरूच्या सद्भावनेवर अवलंबून आहे. प्रेमाचा टप्पा तसे म्हटले तर दूर आहे आणि जवळही आहे.

खुलूसे नियते रहरौ पे मुनसिर है सफर
मुकामें इश्क बहोत दूर भी है पास भी है

कोणत्याही प्रकारचा पक्षपात ते करीत नसत. लाभाने आनंद किंवा हानीने दुःख ते मानीत नसत. आलेल्या प्रसंगाचे पाहुण्याप्रमाणे स्वागत करीत.

न शादी दाद सामाने न गम आवर्द नुकसाने
ब पेशे हिंमते माहर के आमद बूद मिहमाने

इ. स. १९०८ मध्ये हैदराबादेत मूसा नदीला भयंकर पूर येऊन हजारो माणसे मृत्युमुखी पडली. कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले. पीडितांचे दुःख निवारण करण्यात अजीज मिर्जांनी अप्रतिम कामगिरी बजावली. समाजकार्यातील त्यांचे यशच त्यांना पुढे तापदायक ठरले. लोकांना त्यांचा हेवा वाटू लागला. त्यांच्याविरुद्ध कारस्थाने शिजू लागली. पण अजीज मिर्जा आपल्या कार्याच्या छंदात मग्न होते.

या रानावनात आमच्यासारखे वेडे पीर काही कमी नाहीत. केवळ नशीब म्हणून मजनूचे नाव झाले इतकेच.

कुछ कम नहीं दश्ते नज्द में हम जैसे रहनवर्द
मज्नू का नाम हो गया किस्मत की बात है

पण या कारस्थानात इंग्रज रेसिडेंट आणि अधिकारी सामील झाले.

आपले भले होणे हवे असेल तर इंग्रजांशी भिऊन वागा. आपले नाक सुरक्षित ठेवायचे असेल तर तीक्ष्ण तलवारीला भिऊन वागा.

आफियत चाहो अगर अंग्रेज से डरते रहो
नाक रखते हो तो तेगे तेज से डरते रहो

बघू या आता काळ कुणाला अनुकूल आहे. तुमचा आपल्या धनुष्यबाणावर विश्वास तर मला माझ्या हिंमतीची खात्री आहे.

देखिये अब इतिफाक वक्त किसका साद दे
एतिबारे तीर तुझ को एतिबारे दिल मुझे

त्या वेळचे युवराज मीर उस्मान अलीखान (सध्याचे निजाम) यांना राज्यकारभाराची माहिती देण्याचे काम अजीज मिर्जांकडे देण्यात आले होते. स्वार्थी आणि मत्सरी व्यक्तींनी निजामच्या मनात भरवून दिले की अजीज मिर्जा हे युवराजांच्या कानाशी लागून तुमच्या विरुद्ध कारस्थाने करीत आहेत. एक बनावटी पत्र तयार करून निजामाच्या समोर ठेवण्यात आले. ही मात्रा लागू पडली आणि इ. स. १८१० मध्ये अजीज मिर्जांना एकाएकी हैदराबाद राज्याच्या बाहेर घालविण्यात आले.

बा कवे, आता नवीन विश्वाच्या शोधात चल पाहू. आपल्या रसिक नजरेला शोभतील अशी दृश्ये इथे नाहीत.

आजाद चल कोयी नयी दुनिया तलाश कर
जल्वे यहां बकद्रे मजाके नजर कहां

असे हे अजीज मिर्जाचे चरित्र आहे. या चरित्रात आलेल्या शेकडो काव्य-पंक्तींपैकी अगदी थोड्या वर दिल्या आहेत. या कविता समर्पक किती आणि अतिशयोक्तीने भरलेल्या किती हे रसिकांनी ठरवावे.

. ४ .

# १८५७ पूर्वीची दिल्ली

**[ अशी होती दिल्ली. सुखवस्तू, बेफिकीर, रसिक आणि रंगेली. १८५७ ने त्या जीवनाचा निकाल लावला. दिल्लीला कुणाची दृष्ट लागली कोण जाणे? खबर नहीं के उसे खागयी नजर किस की! ]**

मरहूम निजाम महबूब अलीखान (जन्म १८६६, मृत्यू १९११) यांचे लहानपणाचे शिक्षक नवाब सरवरुलमुल्क आगा मिर्जा देहलवी हे होते. ते उर्दू कविश्रेष्ठ मिर्जा गालिब याचे नातेवाईक असून दिल्लीचे रहिवासी होते. त्यांचा जन्म इ. स. १८४८ मध्ये झाला. आपल्या आत्मचरित्रात त्यांनी १८५७ पूर्वीच्या दिल्ली शहराच्या अनेक आठवणी दिल्या आहेत. ते म्हणतात :

आमच्या लहनपणी दिल्लीत सुखवस्तू माणसे ही उन्हाळ्यात नाश्ता करीत. त्यात समोसे आणि खिमा भरलेल्या टिकल्या (लहान वडे) यांचा समावेश होत असे. समोसे विकणाऱ्या बायका भल्या पहाटे घरोघर जाऊन समोसे विकीत. दुपारच्या वेळी बर्फ घातलेली कुलफी मलाई आणि कलिंगडी, खर्बुजे, संत्री इत्यादी इत्यादी खाद्ये येथे सेविली जात. रात्री गंडेरीवाले उसाच्या गंडेऱ्या विकीत फिरत. रात्री गरम दूध पिण्याचा प्रघात असे. गरीब माणसे सकाळी चणे भाजून खात. हिवाळ्यात गरीब माणसे पराठ्याचा नाश्ता करीत. श्रीमंत लोक शीरमाल आणि बाकरखानी (पराठ्याचे प्रकार पण खूप तूप घातलेले) यांचा नाश्ता करीत, चहा किंवा कॉफी यांचा अजिबात वापर नव्हता.

**कथाकथन**

लोकांना कथाकथनाची अतिशय आवड होती. १८५७ मध्ये इंग्रजांनी दिल्ली घेतली तेव्हा आम्ही शहर सोडून शहराबाहेर असलेल्या शिद्दीपूर या गावी राहिलो होतो. दर शुक्रवारी दुपारी शिद्दी गौहरच्या बागेत लोक जमत. अब्दुल्लाखान नावाचा कथाकार (दास्तान गो) होता. तो तासन्तास अमीर हम्जाच्या कथा सांगीत असे. त्या वेळी दिल्लीच्या लोकांची अतिशय दुर्दशा झाली होती. घरेदारे उध्वस्त झाली. लोक परागंदा झाले. पण वर्गण्या देऊन दास्तान (कथा) ऐकल्याशिवाय राहात नसत.

१८५७ पूर्वी दिल्ली गजबजलेली होती. बहादुरशहा ह्या नावाचा बादशहा होता. दवंडी देताना म्हणत ' खल्क ( प्रजा ) खुदाकी, मुल्क बादशहा का, हुकुम कंपनीबहादुरका.' दरबारचे रीतिरिवाज अगदी अकबराच्या काळापासूनचे, जसेच्या तसे पाळले जात. बहादुरशहाला कंपनीकडून महिन्याला एक लाख रुपये मिळत. शहाजादे आणि राजघराण्यातील इतर मंडळी ( यांना सलातीन म्हणत ) यांना महिन्या महिन्याला ठरलेल्या रकमा मिळत. चोपदार, खवास, बारीदार, वगैरे नोकरवर्गाचे पगारही वेळच्या वेळी दिले जात. बहादुरशहाचा वजीर हकीम अहसनुल्ला खान हा होता. शहराचे मुफ्ती ( न्यायाधीश ) मुन्शी खलीलुल्ला खान आणि त्यांच्या नंतर सद्रुद्दीन खान हे होते. बादशहाच्या याच एक लाख रुपयांच्या उत्पन्नातून दिल्लीतील कित्येक लोकांना थोडचा फार वृत्त्या दिल्या जात. त्यातच दिल्लीचे लोक खुश असत. दिल्ली सोडून जाण्याची त्यांची इच्छा नसे. कवी जौकने म्हटले आहे :

आजकाल दख्खन ( हैद्राबाद ) मधे काव्यादी विद्यांना खूपच आश्रय मिळत आहे. पण जौक, दिल्लीच्या गल्ल्या सोडून काय म्हणून कोणी तिकडे जावे ?

हैं दकन में इन दिनों गर्चे बहोत कद्रे सुखन
कौन जाये जौक पर दिल्ली की गलिया छोडकर

**विद्वान, कलावंत, कारागीर**

दिल्लीत त्या वेळी एकापेक्षा एक उत्कृष्ट असे विद्वान, कलावंत आणि कारागीर गोळा झाले होते. धर्माचा यात ( मशाइख ) शहा रफीउद्दीन आणि शहा अब्दुलकादर, फकीर लोकांत मिया फिदा हुसेन रसूलशाही, शहा अब्दुल अजीज, छोटे हाफिजजी ऊर्फ अखवंदजी, विद्वानांत मुफ्ती सद्रुद्दीनखान, मौलाना फजले हक खैराबादी, मौलाना सहबाई, कवींच्यात शेख इब्राहीम जौक, हकीम मोमिनखान मोमिन, मिर्जा गालिब, चित्रकारांमध्ये नटव्यांच्या गल्लीतील चित्रकार, शिक्के तयार करणारा बद्रुद्दीनखान, अत्तरांच्या व्यापाऱ्यांमध्ये दरीब्यावर राहणारा गुलाब गंधी, पाकशास्त्रातील तज्ज्ञ छोटे मिर्जा, शिप्यांच्यामध्ये शुजाअत बेग, रजतारीचे काम करणाऱ्यांत मिर्जा अली बेग, शिपाई–सरदारांत तालेयारखान आणि रिसालदार समंदखान, असे एक की दोन, किती म्हणून सांगावे.

**गजबजलेली दिल्ली**

दिल्लीतील बाजारपेठा इतक्या गजबजलेल्या असत की दिल्ली म्हणजे एक सजले दुल्हन ( नवरी मुलगी ) वाटे. तीन प्रहरापासून चांदणी चौकात गर्दी जमू लागे. त्या काळात दिल्लीत लोक डोक्यावर खूप केस राखीत. कानांच्या पाळयांपर्यंत केस असत. फकीर मुल्ला, मशाइखपैकी काहीजण तर कमरेपर्यंत येणारे लांब केस ठेवीत. तर काहीजण दर शुक्रवारी मुंडण करून घेत. दाढी न ठेवणे त्या काळात

अशक्यपणाचे आणि निर्लज्जपणाचे लक्षण समजले जात असे. लोक लांब दाढ्या ठेवीत. त्या वर फिरवीत. मिशा आकडेबाज ठेवीत. जणूकाय दोन विंचूच डंख मारण्यास टपले आहेत

**जुम्मा मशीद**

संध्याकाळच्या वेळी जुम्मा मशिदीजवळ पायऱ्यांवर गुधडी बाजार भरे. तेथे प्रतिष्ठित लोकसुद्धा गरम गरम कबाब खाण्यास जमत असत.

**कलावंतिणी**

कलावंतिणीचा धंदा त्या काळी जोरात चाले. मुल्ला मशाइख, फकीर हे सोडले तर कलावंतिणीची माडी न चढणारा विरळाच होता.

**एकी**

हिंदुमुसलमानांत पूर्ण ऐक्य नांदत होते. त्या काळी टोप्या कमी वापरीत. पगड्यांचाच प्रचार होता. हिंदू आणि मुसलमान हे आपसांत पगड्या बदलून पगडभाई म्हणजे मानलेले भाऊ बनत. इतिहासात राजा बिरबल, फैजी, राज तोडरमल, अबुल्फजल, जयपूरचे मिर्जा राजा खानखाना अब्दुल रहीम ही पगड-भाईंची उदाहरणे होत. हिंदु-मुसलमानांच्या बोलण्यात, वागणुकीत, पोशाखात काही फरक नव्हता. अकबराच्या काळचा जामानिमा मागे पडला. वर जाकीट असलेले लांब अंगरखेही वापरातून गेले होते. त्याऐवजी जाकीट (त्यांना चोळी म्हणत) नसलेले अंगरखे प्रचारात होते.

**भाषा**

लोक उर्दू बोलत. पण लेखन सगळे फार्सीतून चाले. हिंदु–मुसलमानांच्या बरोबर फारसीतून लिखाण करीत. माधोरामचा फारसी पत्रसंग्रह, मीनाबाजार, हिंदूंनी लिहिलेले फारसी ग्रंथ मुसलमानांच्या शाळांतून शिकविले जात.

**उत्सव**

होळी, दसरा, दिवाळी, बकरीद इत्यादी सणावारांच्या उत्सवात हिंदू व मुसलमान मिळूनमिसळून भाग घेत. १८५७ च्या पूर्वी होळीच्या प्रसंगी फत्ते-पुरीच्या आळीत लोक इंग्रजी कोर्ट-कचेऱ्यांची सोंगे आणीत. एक मनुष्य सूटबूट-ह्याट (मळकी) घालून रेसिडेंट बने. टेबल–खुर्ची मांडून समोर दऊत-टाक-कागद घेऊन बसे. मग कोणी शिरस्तेदार तर कोणी मोहरीर (लेखक) तर कोणी चपराशी बने. गल्ल्यागल्ल्यांतून सोंगे निघत. त्यांना यशू म्हणत. त्या काळी गुलाम रसूद नावाचा एक निर्दय कोतवाल होता. त्याच्यावर सोंगड्यांनी एक कविता केली होती.

हमारे हेसूने खाई भी बबूल
उसमें से निकला गुलाम रसूल

अशा जोडलेल्या ओळींना बानी म्हणत.

**इंग्रज**

त्या काळचे इंग्रज अधिकारी निःसंकोचपणे लोकात मिसळत. रेसिडेंट हा रात्री आपला दरबार करी. त्याच्या अंगावरचे कपडे म्हणजे डोक्यावर काबुली पद्धतीची अणुकचीदार आणि उंच असली टोपी, ढगळ कुडता, आणि अघळपघळ सैल पायजामा हे असत. तो मसनदीवर बसे. त्याच्यासमोर हुक्का मांडलेला असे. शहरातील प्रतिष्ठित मंडळी जमत. गप्पागोष्टी, काव्यचर्चाही चालत. बुद्धिबळांचा खेळ विलक्षण लोकप्रिय होता. शहराचे अमीर-उमराव इंग्रज अधिकाऱ्यांशी बरोबरीच्या नात्याने भेटत. मिस्टर फिट्ज-प्याट्रिक हे दिल्लीत न्यायाधीश होते. ते नेहमी लोहारूचे नवाब अमीनुद्दीनखान आणि जियाउद्दीनखान यांच्याकडे बुद्धिबळे खेळण्यासाठी म्हणून येत. ते पुढे पंजाबचे गव्हर्नर झाले.

एका इंग्रज अधिकाऱ्याने तर सर्वन नावाच्या एका मेवाती बाईशी निका लावला होता. तिचा भाऊ दिल्लीच्या रस्त्यातून मोठ्या तोऱ्यात चालत असे.

दिल्लीत फूलवाल्यांचा मेळा मोठा गाजत असे. दिल्लीजवळील मेहरौली-(कुतुबमिनारपाशी) पर्यंत मिरवणूक जात असे. तेथे कुतबुद्दीनच्या समाधीवर फुलांचा पंखा चढवीत. या समारंभात बादशहा आपल्या लवाजम्यानिशी भाग घेत. ख्वाजा मुइनुद्दीन चिश्ती यांच्या अजमीर येथील समाधीवर चढविण्यासाठी दिल्लीहून मेहंदी नेत. तिची मिरवणूकही भव्य असे. दिल्लीचे रस्ते, विशेषतः संध्याकाळी, इतके गजबजलेले असत की काही विचारायची सोय नाही. गर्दीतून वाट काढणे मुष्किल होई. त्या वेळी गाड्या, बग्ग्या यांचा विशेष प्रचार नव्हता. अमीर-उमराव आणि प्रतिष्ठित लोक हे हत्ती, घोडे, पालख्या, मेणे, हवादार (उघडे तख्त) यांचा वापर करीत.

जुम्मा मशिदीच्या पायऱ्यांवर मिळणारे कबाब, सुंठेचे पाणी आणि चटपटे इतके काही मजेदार असत की काही विचारू नका. मोगल आका, (दिल्लीतील जुन्या अमीर-उमरावांचे वंशज यांना आका म्हणत) हे खास दिल्लीचा अंगरखा अंगात आणि डोक्याला उपरणे (अंगोछा) गुंडाळून मोठ्या आवडीने कबाब खायला येत.

**लाल किल्ला**

लाल किल्ल्यातील राजपुत्रांत व्यभिचार आणि विलासीपणा ही अतिशय वाढली होती. पण किल्ल्यात बोलली जाणारी उर्दू ही टकसाळी (स्टँडर्ड) समजत. इदेच्या वेळी बादशहा हे मौलाबक्ष नावाच्या हत्तीवर स्वार होऊन मोठ्या समारंभाने इदग्याला जात. हा हत्ती नेहमी मस्तीत असे. बादशहाला इंग्रजांनी रंगूनला पाठविले. त्यानंतर या हत्तीने खाणेपिणे वर्ज्य केले आणि त्यातच त्याने प्राण सोडला.

**आका**

त्या काळात आका किंवा मोगल बच्चे हे सर्वत्र आढळतात. ही पोरे म्हणजे दिल्लीतील जुन्या आणि डबघाईला आलेल्या मोगल अमीर-उमरावांच्या कुटुंबांची होत. यांचे शिक्षण जवळजवळ नाहीच. जात आळशी. त्यामुळे कोणत्याही धंद्याला हे लायक नसत. पण प्रतिष्ठित कुटुंबांतील असल्यामुळे यांना कोणत्याही मैफलीत आणि बैठकीत प्रवेश मिळे. श्रीमंत आणि सुस्थितीतील लोक त्यांना वेळोवेळी मदत करीत तीवरच यांचे चालत असे. हे तरुण, देखणे, शिष्टाचारात मुरलेले, गप्पा रंगवून सांगण्यात वस्ताद, खानदानी आणि उदार वृत्तीचे असत. या आकांच्या अनेक विनोदी आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

**मक्केची यात्रा**

बादशहाच्या एका मोगल सेविकेचा एक मुलगा होता. त्याला मक्केची यात्रा करावी असे वाटले. त्याच्या बिचाऱ्या आईने त्याला या कामासाठी म्हणून बरीच रक्कम दिली. एक दिवस हे आका (मोगल बच्चा) बाजारात उभे राहून जो दिसेल त्याला आलिंगन देऊन त्याचा निरोप घेऊ लागले. लोक म्हणाले, 'आका, हा काय प्रकार आहे?' ते सांगत 'आम्ही मक्केच्या यात्रेला जात आहोत.' पुढे थोड्याच दिवसांत ते पुन्हा दिल्लीत दिसले. लोकांनी विचारले, 'काहो, मक्केची यात्रा इतक्या लवकर कशी आटोपली ?' तर हे म्हणतात काय? 'अहो, आम्ही तर जायचे ठरविले होते पण काय करावे? तेथे जाऊन आलेल्यांनी सांगितले की मक्केत मोगल बच्यांसाठी प्रार्थनेची वेगळी जागा नाही. मग आम्ही कसे जावे? जाण्याचा बेत रहित केला.' त्याची आई चिडली. तिने त्यांना खर्चासाठी पैसे देणे बंद केले. तर यांनी बादशहाला अर्जी काय लिहावी! कोंबडी रोज अंडे देत होती. ती आता कोरडी झाली आहे.– 'असील मुर्गी जो रोज अंडा दिया करती थी अब कुडक हो गयी.' बादशहाने त्यांना रोजी एक रुपाला चालू केला.

एक दुसरे आका माझे काका ख्वाजाजान यांच्या येथे राहात. एक दिवस ते आपल्या खोलीच्या बाहेर बसून हुक्क्याचे दम भरत होते. त्यांचा मुलगा त्यांच्या-समोर बसला होता. दोघेही भांगेच्या तारेत होते. आम्ही समोरच्या ओटयावर बसलो होतो. आकाने आपल्या मुलाला एकाएकी म्हटले, 'जाने पिदर, माझ्या जीवा, आज अरबी भाषेत बोलण्याची आम्हाला लहर आली आहे.' (त्यांना अरबीचा गंधही नव्हता.) मुलगा म्हणाला, 'जो हुकूम.' वडील म्हणाले, 'अना कम व कांही.' मुलाने म्हटले, 'बीबी भच्चू कांही.' आका चिडून म्हणाले, 'ओ नालायक, अना आणि कम हे अरबी शब्द आहेत पण हे बीबी भच्चू कुठले अरबी रे ?'

एकदा रमजानच्या महिन्यात उपवास करण्याचे त्यांनी ठरविले. सकाळ झाली तो आम्ही पाहिले की स्वारी भांग घोटण्यात मश्गूल आहे. आणि हुक्का

ओढते आहे. आम्ही विचारले, 'काहो, रमजानचा उपवास करणार होता ना ! मग हे भांग घोटणे काय ?' आका म्हणाले, 'काय करावे ? माझा उपासापूर्वीचा करण्याचा फराळ कुत्रा घेऊन गेला. मग मी कुत्र्याला बांधून ठेवले. म्हटले, बेटचा, फराळ तू केलास, आता उपासही तूच कर.'

अशी होती दिल्ली. सुखवस्तू, बेफिकीर, रसिक आणि रंगेली. १८५७ ने त्या जीवनाचा निकाल लावला. दिल्लीला कुणाची दृष्ट लागली कोण जाणे ?

खबर नहीं के उसे खागयी नजर किसकी

. ५ .

# मंगलाष्टके

उर्दूचे श्रेष्ठ आणि ज्येष्ठ कवी हफीज जालंधरी हे आपल्या आत्मचरित्रात म्हणतात :–

माझ्या लहानपणी म्हणजे मी चवथीच्या वर्गात होतो तेव्हा अ आणि ब हे दोघे माझे वर्गबंधू होते. मी त्यांची नावे सांगत नाही. ते अद्याप जिवंत असतील तर माझी मोठी पंचाइत व्हावयाची. मी सातवीपर्यंत शिकलो. पुढे गणितात नापास झाल्यामुळे मी शाळेला रामराम ठोकला. माझे अनेक वर्गबंधू ठिकठिकाणी पांगले. काहीजण जालंधरमध्येच कामाला लागले. कोणी मामलेदार कचेरीत कारकून झाला तर कोणी वकिलाच्या येथे लेखक म्हणून कामाला लागला. माझे अ आणि ब हे मित्रही जालंधरमध्ये अशाच कामाला लागले.

मी मात्र कवी बनलो. बऱ्याच ठिकाणी भ्रमंती करून मी जालंधरला परत आलो. हा काळ १९२२ चा होता. काव्यातील माझे गुरू कविश्रेष्ठ गिरामी यांच्या नेतृत्वाखाली मी एजाज नावाच्या साहित्याला वाहिलेल्या नियतकालिकाचा संपादक झालो. त्या वेळी माझे वय बावीस वर्षांचे होते. जालंधरमध्ये माझ्या कविता लोकप्रिय होऊ लागल्या होत्या. एके दिवशी मी आपल्या एजाज मासिकाच्या कचेरीत बसलो असताना अ आणि ब हे दोघे माझ्या खोलीत आले. आज ते मोठ्या आनंदात होते. त्यांनी मला सांगितले, 'आज आमचे विवाहसमारंभ आहेत. संध्याकाळी सेहाबंदी ( मुंडावळ बांधणे ) होणार आहे. आपण या समारंभाला हजर राहावे. त्यानंतरच्या वरातीतही सामील व्हावे. आज शनिवार आहे. आणि उद्या सुट्टीचा दिवस आहे. आपण नाही म्हणू नये.'

अ आणि ब हे दोघे सख्खे बंधू. त्यांच्या वधू या पण आपसात सख्ख्या बहिणी होत्या.

( आपण विवाहात मंगलाष्टके म्हणतो. मुसलमान समाजात अशा प्रसंगी कविता म्हणतात. त्यांना सेहरा ( मुंडावळ ) म्हणतात. ) अ आणि ब म्हणाले, 'आपण जालंधरमधील नावाजलेले कवी आहात. आपण आमच्या विवाहप्रसंगी एक सेहरा ( मुंडावळ गीत, मंगलाष्टक ) रचून म्हणावा अशी आमची विनंती आहे. आम्ही तुमचे वर्गबंधू आहोत हे विसरू नका.'

मला त्यांचे म्हणणे मान्य करावे लागले. ते निघून गेल्यावर मी कविता रचण्यास बसलो. वास्तविक पाहता सेहरा ( मंगलाष्टक ) लिहिणे इतके अवघड नव्हते. सेहऱ्यामध्ये नवऱ्यामुलाच्या रूपाचे वर्णन, मुंडावळीतील फुलांचे, मोत्यांच्या लडीचे आणि अशाच संबंधित वस्तूंची वर्णने असतात. आता मी कवितेत नवऱ्यामुलाचे काय वर्णन करावे ? अ आणि ब यांच्या तोंडावर देवीचे असंख्य वण होते. त्यांची नाके बसकी होती. त्यांचे चेहरे म्हणजे अद्याप न उमललेल्या कळ्याच असा मी त्यांच्या देवीच्या वणांचा सूचक उल्लेख केला. बसक्या नाकांना फुलांच्या बुटक्या गुच्छांची उपमा दिली. कविता रचताना मी कितीतरी सिग्रेटी फस्त केल्या असतील. त्या दिवशी दुपारी मी घरी जेवायलाही गेलो नाही. मी कविता करण्यास बसलो आहे हे ऐकून माझे वडील म्हणाले, 'शाइरी कारे बेकाराम.' काव्यरचना हा बेकारांचा उद्योग आहे. शेवटी एकदाचा सेहरा तयार झाला. तो चांगल्या आणि वळणदार अक्षरात लिहून काढा म्हणून मी आमच्या कचेरीतील लेखकाला बजाविले. आपल्या काव्यरचनेचा मला अभिमान वाटत होता. जालंधरचे माझे आप्तइष्ट आणि परिचित हे माझ्या काव्यरचनेच्या उद्योगाला फालतू समजत होते. त्यांना म्हणावे हा माझा सेहरा वाचून पाहा. मागे मोगल सम्राट बहादुरशहा यांच्या मुलाच्या लग्नात गालिब आणि जौक यांनी आपापले सेहरे वाचून दाखविले होते. त्या वेळी माझा पण सेहरा तो ऐकू शकला असता तर त्याने गालिब आणि जौक यांना कोपऱ्यात बसविले असते, याबद्दल मला तिळमात्र शंका नव्हती.

कविता लिहून झाल्यावर मी घरी गेलो. मार्चचा महिना होता. हवेत अद्याप थोडा गारवा होता. मी गरम पाण्याची आंघोळ केली. आईला आणि बायकोला कळविले की आज एका लग्नात मला जायचे आहे. सेहराबंदी, वरात आणि नंतरचे भोजन ही सर्व मी उरकूनच येणार आहे.

माझ्या आईने माझे चांगले कपडे काढून देण्यास माझ्या बायकोला सांगितले. बायकोने माझ्या विवाहातला कोट काढला. धुतलेला शर्ट, पांढरी सलवार, बऱ्यापैकी कोट आणि केशरी रंगाचा फेटा असा आमचा जामानिमा तयार झाला. माझ्या लग्नात याच फेट्यावर माझा सेहरा ( मुंडावळ ) बांधण्यात आला होता. त्या काळी मी कातड्याचा काळा कुळकुळीत पंपशू वापरीत होतो. तो सुद्धा मी मुशाइरा वगैरे कार्यक्रमास जाताना वापरीत असे. आजच्या समारंभासाठी मी ते पंपशू काढले.

मी कपडे करून झाल्यावर माझ्या आईने पेटीतून १० रुपये काढून मला दिले. ती मला म्हणाली, 'बेटा, तुझ्या मित्राचे लग्न आहे. ते आमचे भाऊबंद नसतील. पण ते तुझे मित्रच आहेत. त्यांच्या मुंडावळ बांधण्याच्या वेळी प्रत्येकाला पाच पाच रुपये दे.' माझ्या आईला काय माहीत की मी अकरा ओळींचा सेहरा त्यांच्यावरून ओवाळून टाकणार होतो. मी दहा रुपये घेऊन खिशात ठेवून दिले.

मी घरून निघालो. माझे लेखक ऑफिसमध्ये माझी वाट पाहात उभे होते. मी त्यांच्याकडून माझी कविता घेतली आणि एकदा वाचून पाहिली. मोठ्या ऐटीत मी कागदाचे बंडल माझ्या खिशात खोचले आणि वरपक्षाच्या घराकडे निघालो.

**वरमंडप**

वरांच्या घराशेजारी एक मैदान होते. तेथे सगळी मंडळी जमली होती. अंधार पडू लागला होता. सतरंज्या अंथरल्या होत्या. मध्ये एक हरिकेन कंदील ठेवला होता. जवळच्या घराच्या भिंतीला एक लालटीन लटकावले होते. पंचवीस तीस म्हातारे–कोतारे आणखी एका कंदिलाच्या भोवती वेटोळे करून बसले होते. पोरे-सोरे सतरंज्यांवर धिंगाणा घालीत होती. वरपक्षाचे घर लागूनच होते. तेथे बायका ढोलकी वाजवून गाणी म्हणत होत्या. तो गोंधळ आमच्या कानावर सारखा येत होता. आकाशात अष्टमीचा चंद्र होता. त्याचा क्षीण प्रकाश चहूकडे पसरला होता.

एक वयस्क गृहस्थ आपल्यासमोर एक परात ठेवून बसले होते. हे नवऱ्या-मुलाचे वडील होते. हे मामलेदार कचेरीत कारकून होते. अ हा आपल्या वडिलांच्या उजवीकडे बसला होता. त्याच्या जवळच एक सूटबूट घातलेले गृहस्थ बसले होते. त्यांच्या समोरच्या परातीत काही तांदूळ आणि थोडी साखर ही ठेविली होती. जवळच एक वही ठेवली होती. जवळच एक कंदील होता. सुटात असलेले गृहस्थ हे रजिस्टर-मध्ये आमंत्रितांची नावे नोंदीत होते. आलेल्यांपैकी कोणी दोन, कोणी तीन तीन आणि कोणी पाच रुपये नवऱ्या मुलाच्या वडिलांना देत होते. ते रुपये परातीत तांदूळ आणि साखर यांच्या ढिगाऱ्यावर मांडण्यात येत. मी पण दहा रुपये दिले.

रजिष्टरातील आमंत्रितांचा आणि दिलेल्या रकमेचा नोंदणीचा कार्यक्रम संपला. यानंतर नवऱ्या मुलाने आपल्या मामाच्या ( सुटाबुटातील गृहस्थ ) कानात मोठ्याने सांगितले, ‘ हे हफीज जालंधरी आहेत. यांनी दहा रुपये तर दिलेतच. शिवाय ते आज सेहरा ( मंगलाष्टके ) म्हणणार आहेत. ’

आता तुम्हीच सांगा, काव्यवाचनाला ते वातावरण योग्य होते काय ? मुंडावळी बांधलेले दोन नवरे मुलगे, त्यांचा सुटाबुटातील मामा, रुपये गोळा करून पिशवीत घालण्यात गुंतलेला नवऱ्या मुलाचा बाप, नवऱ्या मुलीच्या घरी जाऊन भोजनावर ताव मारण्यास आतुर झालेले आमंत्रित म्हातारे–कोतारे, जवळच्या घरातून येणारा ढोलकांचा कर्कश आवाज, वरातीबरोबरचे बाजेवाले आपली वाद्ये सरसाऊन तयार झालेले आहेत, चंद्राचा क्षीण प्रकाश आणि त्याहूनही क्षीण असलेला कंदिलाचा प्रकाश ! माझी हिंमतच खचली होती.

‘ अब जिगर थाम के बैठो मेरी बारी आयी ’

कवितेचा कागद घेऊन मी कसाबसा उभा राहिलो. कोणीतरी बाजेवाल्यांना म्हटले, अरे, बाजा थांबवा, काव्यवाचन होणार आहे. मामासाहेब कंदील घेऊन

माझ्याजवळ आले. ते ठेंगणे होते आणि मी होतो उंच. त्यांनी कंदील उचलून माझ्या उजव्या बाजूस धरला आणि मंडळींना ओरडून सांगितले,

'साहबो, ये शाहीर हैं. सेहरा सुनायेंगे' माझ्याकडे वळून 'हां शाइर साहब, हो जाये सेहरा.'

मी कविता वाचण्यास सुरुवात केली. मधेच मी डोळे वर करून पाहिले, समोर बसलेल्या मंडळींत, म्हातारेकोतारे, कारकून, मुन्शी वगैरे होते ते. त्यांना काव्यात रस नव्हता. शिवाय ते भुकेने व्याकुळ झाले होते. काव्यश्रवण म्हणजे त्यांना भयंकर संकट वाटत होते. माझे कवितेचे शब्द ते जणू काय न चावताच गिळून टाकीत होते. सर्वत्र मृतवत् शांतता पसरली होती. इतक्यात माझ्या खांद्यामागून खो खो चा आवाज ऐकू येऊ लागला. त्याबरोबरच माझ्या हातातील कागद फड-फडू लागला. माझ्या खांद्यावर कुणाचा तरी श्वास जोराजोरात पड लागला. कवितावाचन थांबवून मी मागे वळून पाहिले. पाहतो तो नवऱ्यामुलाचे मामासाहेब खो खो करून हसत होते. हसे बाहेर पडू नये म्हणून त्यांनी हातरुमाल तोंडात कोंबून ठेवला होता. तरी त्यांचे हसू उफाळून बाहेर पडत होते. तेही विचित्र आवाजात.

माझी काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच केलेले बरी. पण करता काय! कविता वाचून संपविल्याशिवाय गत्यंतर नव्हते. या मूर्खांच्या बैठकीत आल्याबद्दल मी मनातून स्वतःला शेकडो शिव्या मोजल्या असतील. मी कविता कशी संपविली ते एक परमेश्वरच जाणे. कविता वाचून झाल्यावर कुण्या एकाने तरी वाहवा, सुभानल्ला, मरहबा, क्या बात है, फिरसे इर्शाद (पुन्हा म्हणा) असे म्हणावे? पण ते सगळे खेटरासारखी तोंडे करून बसले होते.

माझी कविता संपली रे संपली तोच मंडळी उठून चालायला लागली. वराती-बरोबर मीही चालू लागलो. थोडे लांब गेल्यानंतर मी एकदम थबकलो. असे वाटले की नको या लोकांची संगत, नको ते भोजन. सरळ घरचा रस्ता धरावा. हा विचार करून मी मागच्या मागे सटकलो. हे लोक मला शोधायला येतील म्हणून माझ्या घरचा जवळात जवळ असलेला रस्ता धरला.

हाय दैवा! हा रस्ता चिखलाने भरलेला होता. मी घाईघाईने चालत होतो. रस्ता कसला, चिखलच चिखल. ठिकठिकाणी डबकी साचली होती. एकाएकी माझा पाय घसरला आणि मी एका डबक्यात जाऊन कोसळलो. माझे कपडे चिखलाने भरून गेले. तोंड चिखलाने माखले होते. मंगलाष्टके म्हणायला गेलो. झक मारली असे वाटले. मी कसाबसा घरी पोहोचलो. त्या वेळी माझे ध्यान पाहण्यासारखे होते.

आज कवी म्हणून माझा कितीतरी लौकिक झाला आहे. कधी कधी मी स्वतःबद्दल विनोदी उद्‌गार काढतो. माझ्या एका कवितेची ओळ पुढीलप्रमाणे आहे:

अप्सरातुल्य तरुणींच्या तोंडून माझ्या कविता ऐकून मी दिसायला कसा

आहे हे पाहण्यासाठी अनेक माणसे माझ्याकडे आली.

परी रुखोंकी जबांसे कलाम सुनके मिरा
बहोत से लोग मिरी शकल देखने आये

मंगलाष्टकांचा बोजवारा झाल्यानंतरचे माझे ध्यान त्यांनी पाहिले असते तर !

. ६ .

# अहो तो कवी मी नाही

## [ उर्दू कवीच्या टोपणनावामुळे उडालेला गोंधळ ]

उर्दू आणि फार्सी साहित्यात संशोधकांना बुचकळयात पाडणारी गोष्ट म्हणजे एकाद्या साहित्यकृतीचे कर्तृत्व कोणत्या लेखकाकडे जाते हे ठरविणे होय. उर्दू–फारसी कवी आपले काव्यातील विशिष्ट असे नाव ठेवतात. आपल्याकडील गोविंदाग्रज, कुसुमाग्रज, केशवसुत, माधवानुज इत्यादी नावे अशाच प्रकारची होत ... उर्दू–फारसीत अशा नावांना तखल्लुस म्हणतात. मौज ही की तेच तखल्लुस ठेवणारे एकाहून अधिक कवी होऊन गेले. कालांतराने एखाद्या विशिष्ट साहित्यकृतीचे जनकत्व तेच तखल्लुस धारण करणाऱ्यांपैकी कुणाकडे जाते हे समजणे अवघड होऊन बसते. भलत्याच लेखकांकडे अशा साहित्याचे कर्तृत्व लादल्यामुळे उर्दू– फारसी साहित्यात मोठा गोंधळ उडाला आहे. त्याची काही उदाहरणे पुढे दिली आहेत.

(१)

औरंगजेबाची मुलगी जेबुन्निसा बेगम ही अगदी साधारणपैकी कवयित्री होती. तिच्या कविताही चार दोनहून अधिक नसाव्यात. तिचे कवितेतील नाव होते मख्फी (लपलेली). इराणमध्येही मख्फी नावाचा प्रसिद्ध कवी होऊन गेला. त्याचा कवितासंग्रह जशाचा तसा औरंगजेबाच्या मुलीच्या नावाला चिटकविण्यात आला. अद्यापही इराणी कवीच्या कविता जेबुन्निसेच्या आहेत असे समजून त्या म्हणून दाखविण्याचा मोह चांगल्या चांगल्या विद्वानांना आवरत नाही.

(२)

अजमीरचे सुप्रसिद्ध साधू ख्वाजा मुइनुद्दीन चिश्ती यांच्या बाबतीतही असाच प्रकार घडला आहे. कोण्या मुइन नावाच्या कवीचा काव्यसंग्रह या बिचाऱ्या साधूच्या माथी मारण्यात आला आहे.

(३)

बगदादचे सुप्रसिद्ध साधू हजरत गौस अल आजम यांचे नाव मुहियुद्दीन होते. मुहीलारी नावाचा एक कवी होऊन गेला. त्याने फुतुहुल हरमैन नावाचे एक दीर्घकाव्य लिहिले. त्याचे दीर्घकाव्य साधू गौसुल आज्जम यांच्या नावावर खप-

विण्यात आले. लखनौच्या नवलकिशोर प्रेसने तर गौसुल आज्जमचा कवितासंग्रह म्हणून इतरांची काव्ये खपविली आणि कवितासंग्रहाच्या अनेक आवृत्या काढल्या आणि लोकांच्या भोळेपणाचा लाभ घेऊन चांगलीच कमाई करून घेतली.

(४)

सर्वांत विलक्षण उदाहरण अबू सईद अबूल खैरच्या तथाकथित रुबायांचे आहे. कारण याबाबतीत अनेक पाश्चात्य आणि पौर्वात्य पंडितांची दिशाभूल झाली आहे. त्याचा तपशील असा :

शेख अबू सईद अबुल्खैर या नावाचे एक थोर सूफी होऊन गेले. त्यांचा मृत्यू इ. स. १०४८ मध्ये झाला. त्यांनी आपल्या सबंध आयुष्यात एक रुबाई आणि दोन ओळी यापलीकडे काव्य रचले नाही.

पण हा चमत्कार पाहा. त्यांच्या मृत्यूनंतर सहाशे वर्षांनी कवींच्या परिचयात्मक ग्रंथातून अबू सईदच्या नावावर मोडणाऱ्या रुबाया आढळून येऊ लागल्या. हळूहळू या फुटकळ रुबायांचा संग्रह होऊ लागला. अबू सईदच्या म्हणून एकशे ब्याहत्तर रुबायांचा संग्रह असलेले एक हस्तलिखित आज लंडन येथील ब्रिटिश म्युझियममध्ये आहे. या हस्तलिखिताचा काळ इ. स. १६३५ चा आहे. दुसरे एक हस्तलिखित कलकत्त्याच्या एशियाटिक सोसायटीत आहे. हे इ. स. १७२१ चे असून यात दोनशे अठ्ठावीस रुबाया आहेत. अशा रीतीने त्या बिचाऱ्याच्या नावावर लादलेल्या रुबायांची संख्या फुगू लागली. बरे, हे संग्रह केवळ हस्तलिखितांच्या स्वरूपातच राहिले असे नाही. त्यांची मुद्रणे होऊ लागली.

इ. स. १८७५ मध्ये मीर हसन दोस्त संभली यांनी तजकिराये हुसेनी नावाचा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात अबू सईदच्या म्हणून एकावन्न रुबाया छापण्यात आल्या. हा ग्रंथ नवलकिशोर प्रेसमध्ये प्रसिद्ध करण्यात आला.

याच वर्षी सुप्रसिद्ध जर्मन प्राच्यविशारद हर्मान एटे याने अबू सईदच्या ब्याण्णव रुबाया प्रसिद्ध केल्या. भूपालहूनही असाच एक संग्रह इ. स. १८८०मध्ये बाहेर पडला. एशियाटिक सोसायटी, कलकत्ता, या संस्थेच्या नियतकालिकात तर तीनशे एक रुबाया अबू सईदच्या नावावर छापण्यात आल्या. इराणमध्येही अबू सईदच्या काव्यसंग्रहाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत.

इ. स. १९२५ मध्ये तर लाहोरच्या दयाळसिंग कॉलेजचे प्राध्यापक मिया यांनी जी आवृत्ती काढली तीत चारशे त्रेचाळीस रुबाया देण्यात आल्या आहेत.

प्राध्यापक ब्राऊन हे फारसीचे मोठे पंडित. त्यांनी तरी अबू सईदसंबंधी काय उद्‌गार काढावेत? ते म्हणतात, 'आता आपण रुबायांचा तिसरा प्रख्यात कवी अबू सईद याची चर्चा करू या.' हार्न आणि पिजी हे पाश्चात्य पंडित अबू सईदला रुबाया रचणारा मोठा कवी समजतात.

वस्तुस्थिती आहे ती वेगळीच. अबू सईदचा खापरपणतू महंमद याने इ. स.

१२०३ मध्ये म्हणजे अबू सईदच्या मृत्यूनंतर शेसव्वाशे वर्षांनी अबू सईदसंबंधी एक ग्रंथ लिहिला आहे. त्याच्या चुलत भावाने असाच आणखी एक ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथातून अबू सईदच्या आध्यात्मिक थोरवीचे वर्णन आहे. पण अबू सईद कविता रचीत असल्याचा कोठेच उल्लेख नाही.

शेवटी हा गोंधळ दूर करण्यासाठी ढाका विद्यापीठाचे प्राध्यापक अंदलीब-शादानी यांनी या तथाकथित रुबायांचे जनक कोण याचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यांना आढळून आले की चोवीस रुबाया तर सुप्रसिद्ध सूफी कवी जामी याच्या आहेत.

**हे सूफी**

ऊहदुद्दीन किरमानी नावाचे एक सूफी ( इ. स. ११४० ) च्या सुमारास होऊन गेले. त्यांनी म्हटलेली एक रुबाई अबू सईदच्या नावे घातल्याचे प्राध्यापक अदलीब यांना आढळून आले. या रुबाईची हकीकतही मोठी गमतीदार आहे.

हे ऊहदुद्दीन किरमानी या सूफी संतांना देखणी पोरे फार आवडत. एखादा सुंदर मुलगा त्यांना दिसला रे दिसला की ते त्याला घट्ट आलिंगन देत आणि सोडता सोडीत नसत. एकदा साधुमहाशय बगदादला गेले. बगदादच्या खलिफाचा मुलगा अतिशय सुंदर आणि देखणा होता. साधू किरमानींना भेटावे असे त्याने ठरवले. पण त्याच्या अधिकाऱ्यांनी त्याला सांगितले कीं 'आपण त्यांच्याकडे जाऊ नये, सुंदर मुलगा दिसला की ते त्याला छातीशी घट्ट आवळून बसतात.' खलिफाचा मुलगा म्हणाला, 'ते मला हात तर लावू देत, मी तलवारीने ठार मारीन. हा सूफी कसला. काफर दिसतो.' खलिफाच्या मुलाचे विचार किरमानींनी अंत-र्ध्यानाने ओळखले. तो समोर येताच किरमानींनी पुढील ओळी म्हटल्या :

खंजिरावर माझे डोके टेकावे, किंवा आपल्या इच्छापूर्तीसाठी मस्तक गम-वावे या गोष्टी मला अवघड नाहीत. काफराला मारण्यासाठी म्हणून तू आला आहेस ना ? ठीक आहे. तुझ्यासारखा गाजी मला मला लाभणार असेल तर काफर होणे कुणाला आवडणार नाही ?

सहल अस्त मरा बर सरे खंजर बूदन
या बहरे मुरादे रवीश बे सर बूदन
तू आमदायी के काफरे रा बकुशी
गाजी चू तुई खुश अस्त काफर बूदन

या रसिक सूफीच्या वरील ओळी बिचाऱ्या अबू सईदच्या माथी मारण्यात आल्या. अशाच प्रकारच्या खालील शृंगारिक ओळी आहेत भलत्यांच्या, पण मिर-वितात अबू सईदच्या म्हणून !

माझी प्रेयसी चौदा वर्षांची आहे. सौंदर्यात ती चतुर्दशीच्या चंद्राप्रमाणे

(उर्दू– फारसीत पौर्णिमेच्या चंद्राची उपमा देत नाहीत. कारण पौर्णिमेनंतर चंद्रकला क्षीण होऊ लागते.) आहे. परमेश्वरा, या सौंदर्याला उतरती कळा लागू देऊ नकोस. माझी प्रिया शंभर वर्षेपर्यंत चवदा वर्षांची राहो.

माझ्या प्रियेचे नाक सरळ आहे. फारसीतील सरळ रेषेने दर्शविले जाणारे अलीफ हे अक्षरच जणू. चांदीच्या पानावर (प्रियेच्या गौर वदनावर) हे अक्षर रेखले आहे. पण छे, ही उपमा पटत नाही. प्रियेचे सरळ नाक म्हणजे पूर्णचंद्राचे दोन भाग कुठे पडतात हे पाहण्यासाठी परमेश्वराने मुखावर मधोमध आपले बोट ठेवले आहे असे का म्हणू नये ?

हे प्रिये, तुझे मुख म्हणजे सौंदर्याचा दर्या, तुझे ओठ म्हणजे लाल माणके, तुझे केस म्हणजे सुगंधी द्रव्य (ॲम्बर), तुझे मुख म्हणजे शिंपले, दात म्हणजे मोती, तुझ्या भुवया म्हणजे नौका, कपाळावरील आठ्या म्हणजे दर्यावरील लाटा, तुझे विभ्रम हे दर्यातील भोवरे आणि तुझे नेत्र म्हणजे तुफान वादळ.

आता दिवसरात्र नमाज आणि परमेश्वरस्मरण यात घालविणारा सूफी अबू सईद वरीलप्रमाणे ओळी कशाला रचील ? त्याचा आत्मा वर आकाशात ओरडत असेल की अहो, मी कवी नाही. मी आहे साधाभोळा परमेश्वरभक्त. या ओळी माझ्या नाहीत. पण ऐकतो कोण ?

(५)

**हे साधू कोकशास्त्राचे भाषांतरकार**

असाच एक प्रकार जियाउद्दीन नख्शबी या धर्मपंडिताच्या आणि सूफीच्या बाबतीत घडला आहे. हा मूळचा मध्य आशियातील नख्शब या गावचा. मंगोल लोकांनी मध्य आशिया उध्वस्त केला तेव्हा इतर हजारो माणसांप्रमाणे जियाउद्दीनने हिंदुस्थानची वाट धरली. उत्तर प्रदेशात बदायून येथे तो स्थायिक झाला. त्याचा मृत्यू इ. स. १३५० मध्ये झाला. जियाउद्दीन हा परमेश्वराचा निस्सीम भक्त होता. सूफी मार्गावर त्याचे अनेक ग्रंथ आहेत. विशेषतः सिलक अलसुलूक (अध्यात्माची माळ) हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा मानला जातो.

अशा या भगद्भक्ताच्या नावावर एक विलक्षण पुस्तक लादले गेले आहे. हा ग्रंथ म्हणजे कोकशास्त्राचा फारसी अनुवाद आहे. अनुवादाचे नाव ठेवले आहे लज्जातुन्निसा स्त्रियांची लज्जत.

हे हस्तलिखित अलीगड विद्यापीठाच्या ग्रंथालयात असून ग्रंथावर लिहिले आहे– 'तसनीफ हजरत अबूतुराबजिया नख्शबी रहमतुल्ला अलिया.' 'हजरत जिया नख्शबी यांचा हा ग्रंथ, परमेश्वराची त्यांच्यावर कृपा आहेच.'

विद्वानांनी शेवटी ठरविले की जिया नख्शबीचा या कोकशास्त्राशी काही संबंध नाही. हा कोण्यातरी दुसऱ्यानेच रचलेला ग्रंथ दिसतो. ग्रंथात एक–दोन

ठिकाणी शेरशाही हा शब्द आढळतो. त्यामुळे हा ग्रंथ शेरशहाच्या काळातील (१५३०) कुणा लेखकाचा असावा. हो, देह दलन करणाऱ्या तपस्यांचा कोकशास्त्राशी काय संबंध ?

(६)

**गालिबचा गोंधळ**

फालतू ओळी नामवंत कवीच्या गळयात मारण्याचा चाळा काही चावट माणसे करीत. मुक्ती मौलवी अब्दुलकादरखान गमगीन हे रामपूरचे राहणारे. हे अतिशय बुद्धिमान होते. इ. स. १८०९ मध्ये ते मुरादाबाद येथे इंग्रजांच्या नोकरीत शिरले. लॉर्ड विलियम बेंटिकच्या कारकीर्दीत ते मुरादाबादचे मुख्य न्यायाधीश झाले. ते बऱ्यापैकी होते. त्यांना खानबहादुर ही पदवी होती. त्यांचा स्वभाव काहीसा लोकांना बनविण्याचा होता. इ. स. १८३८ मध्ये ते दिल्लीला आले आणि बहादुरशहापाशी सहा महिने राहिले. एकदा ते कविश्रेष्ठ गालिब यांना म्हणले, ' कविसम्राट, आपल्या कवितासंग्रहात मी या ओळी पाहिल्या. पण त्यांचा अर्थ काही मला लागला नाही.'

प्रथम म्हशीच्या अंड्यातून घासलेट तेल काढून घ्या आणि मगच अंड्यातून औषध बनवा.

पहले तू रोगने गिल भैंस के अंडे से निकाल
फिर दवा जितनी है कुल भैंस के अंडे से निकाल

गालिब थक्कच झाला. माझ्या संग्रहात फालतू ओळी ? तो घाबरून ज्याला त्याला विचारू लागला, ' अहो, या ओळी माझ्या काव्यसंग्रहात आहेत का हो ? ' शेवटी गालिबचा मित्र आणि टीकाकार मुस्ताफाखान शेफ्ता • याने गालिबला सांगितले की अब्दुलकादरखानाने तुमची थट्टा केली आहे व ती मनावर घेऊ नका.' तेव्हा कोठे कविसम्राटाचे समाधान झाले.

. ७ .

# गुरु-शिष्य संवाद

**[ भारतीय मुसलमानांतले एक नामांकित विद्वान धर्मपंडित सुलेमान नदवी व त्यांचे शिष्य व चित्रकार गलाम महंमद यांच्यातील प्रश्नोत्तरांचा एक मनोरंजक मासला ! ]**

भारतातील मुसलमानांत विद्वान आणि गाढे धर्मशास्त्रज्ञ म्हणून नावाजलेले सुलेमान नदवी (जन्म बावीस नोव्हेंबर १८८४, मृत्यू बावीस नोव्हेंबर १९५३) यांचे चरित्र त्यांचे शिष्य गुलाम महंमद यांनी प्रसिद्ध केले आहे. सुलेमान नदवी यांनी उर्दू भाषेत अनेक महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. सुप्रसिद्ध इतिहासज्ञ शिब्ली नोमानी यांनी महंमद पैगंबरांचे चरित्र लिहिण्यास घेतले होते. दोन खंड प्रसिद्ध झाल्यावर नोमानींचा मृत्यू झाला. सुलेमान नदवींनी पुढील चार खंड लिहून काढले आणि अशा रीतीने पैगंबरांचे सहा खंडांत संपूर्ण चरित्र प्रसिद्ध झाले. हा ग्रंथ अतिशय लोकप्रिय झाला असून त्याची अरबी, फारसी, तुर्की इत्यादी भाषांतून भाषांतरे झाली आहेत. भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांना सुलेमान नदवी यांनी लिहिलेले दोन ग्रंथ महत्त्वाचे वाटतात : (१) अरबांच्या दर्यावर्दी हालचाली. (२) भारत आणि अरब यांचे संबंध. सुप्रसिद्ध सूफी कवी उमर खय्याम यांच्यावरील त्यांचे मौलिक संशोधन महत्त्वाचे गणले गेले आहे. त्यांचे संशोधनात्मक लेख शेकडोंनी भरतील. धर्मशास्त्र, इतिहास, साहित्य या तिन्हीही विषयांवर त्यांचे सारखेच प्रभुत्व होते.

**सूफी पंथी**

पुढे पुढे सुलेमान नदवी हे अध्यात्माकडे वळले. त्यांनी अश्रफ नाथवी या सुप्रसिद्ध सूफीकडून उपदेश घेतला आणि ते सूफी बनले. धर्मनिष्ठांना त्यांचे वागणे आवडले नाही. धर्मकर्मनिष्ठांना सूफी पंथाचे वावडे आहे. पण नदवींनी त्यांची पर्वा केली नाही. सूफी पंथातील त्यांचा अधिकार थोर होता. शेकडो शिष्यांनी त्यांचा गुरुपदेश घेतला. त्यांपैकीच सुलेमान नदवींचे शिष्य आणि चरित्रकार गुलाम महंमद हे हैदराबादचे राहणारे असून सध्या पाकिस्तानात असतात. हैदराबादेत ते सरकारी नोकरीत होते. सुलेमान नदवींच्या आध्यात्मिक योग्यतेचा त्यांच्या मनावर परिणाम

होऊन त्यांनी त्यांचा उपदेश घेतला. चरित्रग्रंथातून गुलाम महंमद यांच्या नितान्त गुरुभक्तीचा जागजागी प्रत्यय येतो. गुलाम महंमदनी आध्यात्मिक आणि इतर विषयांसंबंधी शंका विचाराव्या आणि गुरूंनी शंकेचे निरसन करावे. यासंबंधीची अनेक पत्रे गुलाम महंमदनी आपल्या चरित्रग्रंथातून दिली आहेत. ती वाचकांना उद्बोधक आणि मनोरंजक वाटतील.

सुलेमान नदवी यांचा जन्म बिहार प्रांतात बावीस नोव्हेंबर १८८४ रोजी झाला. प्राथमिक आणि धार्मिक पद्धतीचे शिक्षण मोठे बंधू अबू हबीब, फुलवारी येथील मुस्लिम मठाचे व्यवस्थापक मुहियुद्दीन यांजकडे आणि दरभंग्याच्या शाळेत झाले. यानंतर वयाच्या सतराव्या वर्षी ते मुस्लिम धर्मशास्त्राचे सुप्रसिद्ध विद्यापीठ नदवतुल उलेमा लखनौ येथे इ. स. १९०१ मध्ये दाखल झाले. येथे त्यांना शिबली नोमानी या जगप्रसिद्ध विद्वानाच्या सहवासाचा लाभ झाला. अरबी, फारसी, तत्त्वज्ञान, हदीस (पैगंबरांच्या आख्यायिका), मुस्लिम व्यवहारधर्मशास्त्र (फिका), कुराण इत्यादी विषयांवर त्यांनी असामान्य प्रभुत्व संपादन केले. अरबी भाषा तर ते आपल्या मातृभाषेसारखे बोलत. इ. स. १९०६ मध्ये त्यांनी आपला आभ्याक्रम पूर्ण केला. संशोधनाचे काम करण्याची त्यांना याच सुमारास गोडी लागली.

इ. स. १९०७ मध्ये ते अलनदवा या नियतकालिकाचे संपादक झाले. याच सुमारास नदवतुल उलेमामध्ये प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. इ. स. १९१२–१३ मध्ये ते काही महिन्यांसाठी अबुलकलाम आजाद यांच्या अल्हिलाल या नियतकालिकाच्या संपादकवर्गात काम करीत होते. इ. स. १९१३ च्या अखेरीस त्यांची नेमणूक पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये प्राच्यविद्याचे प्राध्यापक म्हणून झाली. याच सुमारास त्यांचा ‘ उमरखय्याम ’ वरील मौलिक प्रबंध प्रसिद्ध झाला.

डेक्कन कॉलेजमध्ये सुलेमान नदवींना फार दिवस राहता आले नाही. नोव्हेंबर १९१४ मध्ये शिब्ली नोमानी आजारी पडले आणि त्यांनी तार पाठवून नदवींना आपल्याकडे बोलावून घेतले. यानंतर अल्पकाळातच शिब्लींचा मृत्यू झाला. शिब्लींनी उत्तर प्रदेशात आज्जमगड येथे दारुल्मुसभिफीन (ग्रंथकारपीठ) नावाची अकाडेमी स्थापन केली होती. तिचे काम नदवींच्यावर येऊन पडले. या विद्यापीठाने आजपर्यंत दीडशेच्यावर संशोधनात्मक ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून या पीठाचे नियतकालिक ‘ मारिफे ’ हे नियमितपणे निघत आहे. हे केवळ संशोधनाला वाहिलेले नियतकालिक आहे.

**खिलाफत शिष्टमंडळासमवेत**

इ. स. १९२० मध्ये खिलाफतचे शिष्टमंडळ विलायतेस गेले होते. त्यात मौलाना महंमदअलींच्याबरोबर सुलेमान नदवी हेही होते. इ. स. १९२४ मध्ये सौदी अरेबियाचा राजा इब्न सऊद आणि मक्केचा अधिपती हुसेन शरीफ यांच्यात

युद्ध झाले. त्यांच्यात तडजोड घडवून आणण्यासाठी भारतीय मुसलमानांचे एक शिष्टमंडळ अरबस्तानात गेले होते. याचे नेतृत्व सुलेमान नदवी यांनी केले. मार्च १९२६ मध्ये ते जमीयतुल उलेमाच्या कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष निवडले गेले. त्याच वर्षी ते इब्न सऊदनी बोलाविलेल्या जागतिक मुस्लिम परिषदेला हजर राहिले.

पण सुलेमान नदवींचा पिंड राजकारणी माणसाचा नव्हता. ते हाडाचे धर्मशास्त्रज्ञ आणि इतिहाससंशोधक होते. इस्लाम धर्माच्या विविध पैलूंवर त्यांनी शेकडो लेख लिहिले. राजकारणात ते मधूनमधून सल्लामसलत देत, पण प्रत्यक्ष भाग घेण्याचे टाळीत. ते म्हणत, 'मला चेंबर प्रॅक्टिक्स समजते. पब्लिक प्रॅक्टिस येत नाही.' इ. स १९२५ मध्ये सुलेमान नदवी यांनी मद्रास येथे मुस्लिम शिक्षण परिषदेच्या अधिवेशनात इस्लाम धर्मावर व्याख्याने दिली. ही अतिशय लोकप्रिय ठरली. या व्याख्यानांचे इंग्रजी भाषांतरही 'लिविंग प्रॉफेट' या नावाने प्रसिद्ध झाले आहे. व्याख्यानांचा अरबी अनुवादही सीरियामध्ये प्रसिद्ध झाला आहे.

**अध्यात्माकडे**

आजमगड येथे संशोधनाचे कार्य करीत असताना सुलेमान नदवी हळूहळू अध्यात्माकडे वळू लागले. केवळ ज्ञानाच्या जोरावर परमेश्वराचा लाभ होत नाही.

अकल गो आस्तान से दूर नहीं
इसकी तकदीर में हुजूर नहीं

थानाभवन येथे अश्रफ अली थानवी नावाचे थोर साधुपुरुष राहात होते. त्यांच्याशी सुलेमान नदवींचा संबंध आला तो प्रथम १९३५ मध्ये. तो वाढत जाऊन शेवटी त्यांनी इ. स. १९३८ च्या ऑगस्टमध्ये लखनौ येथे अश्रफ अलींच्याकडून गुरुपदेश घेतला. यापूर्वी ते साधुसंतांच्या दर्ग्यांना भेटी देत होते आणि त्यांना साक्षात्कारही होत होता. सुप्रसिद्ध मुस्लिम धर्मशास्त्रज्ञ मुजदिद सिरहिंदी यांच्या समाधीवर ते गेले असता त्यांना त्या महापुरुषाचे दर्शन झाले. त्याने विचारले, 'माझे ग्रंथ वाचले आहेत काय ?' यांनी सांगितले की, 'हो. वाचले आहेत.' सिरहिंदींनी विचारले, 'त्यांचा अर्थ समजला का ?' यांनी सांगितले, 'थोडा थोडा अर्थ लागला आहे.' हे बोलणे होत असताना सुलेमान नदवींना मूर्च्छा आली. असाच अनुभव त्यांना मुलतान येथील सुहरावर्दी पंथाचे सूफी बहाउद्दीन जकरिया यांच्या समाधीवर आला.

गुरुपदेश घेऊन सुलेमान नदवी आजमगडला परत आले. त्यांचा सर्व काळ ध्यान, धारणा, यम, नियम, समाधी यांत जाऊ लागला. कट्टर मुसलमान हे आचारनिष्ठ आणि कर्मनिष्ठ असतात. सूफी पंथातील गुरुभक्ती, मठ, दर्गा, गुरुशिष्यपरंपरा इत्यादी त्यांना मान्य नाही. सुलेमान नदवींमध्ये झालेल्या या स्थित्यंतराने त्यांच्यात खळबळ उडाली. संस्थेकडे नदवींचे दुर्लक्ष होऊ लागले. तसेच त्यांचे सहकारी

त्यांच्यावर चिडू लागले. परमेश्वरभक्तीत मग्न झालेल्या नदवींना आता संशोधनपर कामात लक्ष लागेना. शेवटी संस्थेत फाटाफूट होऊन नदवींना संस्थेच्या बाहेर पडावे लागले. इ. स. १९४२ मध्ये त्यांच्या गुरूंनी त्यांना आपला खलीफा, (प्रतिनिधी) म्हणून नेमले. याचा अर्थ असा की नदवींना आता इतरांना उपदेश देण्याचा अधिकार प्राप्त झाला. अश्रफ अली थानवी हे वीस जुलै १९४३ रोजी मरण पावले. त्यांनी रचलेले कुराणभाष्य हे अतिशय लोकप्रिय आहे. या ग्रंथाचे बारा खंड आहेत.

**भोपाळ येथे**

आज्जमगडच्या संस्थेशी संबंध सुटल्यावर सुलेमान नदवी इ. स. १९४६ मध्ये भूपालला गेले. तेथे त्यांना काजी अलकजा (मुख्य काजी) आणि जामे अहमदीयाचे प्राचार्य म्हणून नेमण्यात आले. मासिक पगार एक हजार आणि राहण्यास सरकारी इमारत, या सोयी त्यांना करून देण्यात आल्या. या जागेवर ते आक्टोबर १९४९ पर्यंत होते. तोपर्यंत भूपाल संस्थान हे भारतीय संघराज्यात विलीन होऊन गेले होते. सुलेमान नदवींनी आपल्या जागेचा राजीनामा दिला. आणि आक्टोबर १९४९ मध्ये ते मक्केच्या यात्रेला गेले. तेथून ते त्याच वर्षी डिसेंबर १९४९ मध्ये भारताला परत आले.

पाकिस्तान सरकारने राज्यघटनेबाबत सल्लामसलत देण्यासाठी विद्वान धर्मशास्त्रज्ञांची समिती नेमली होती. सुलेमान नदवी हे जून १९५० मध्ये पाकिस्तानात स्थायिक झाले. वरील समितीचे अध्यक्षपद त्यांना मिळाले. पाकिस्तानातच त्यांचा मृत्यू २२ नोव्हेंबर १९५३ रोजी झाला.

नदवींचे चरित्रकार गुलाम महंमद हे हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठाचे पदवीधर. एल. एल. बी. च्या वर्गात असताना त्यांनी सुलेमान नदवींचा उपदेश घेतला. त्यांच्या पत्रांतून त्यांची नितान्त भक्ती, सरळपणा आणि लहान सहान गोष्टीबद्दलही गुरूकडे धाव घेण्याची वृत्ती ही व्यक्त होतात. काही पत्रांतील मजकूर वाचकांना मनोरंजक वाटेल. ही प्रश्नोत्तरे पाहा.

शिष्य : (पान ४०२). मला स्वप्न पडले. आपण माझ्याकडे टक लावून पाहात आहात. थोड्या वेळाने मी पुन्हा आपल्याकडे पाहिले. एका खाटेच्या भोकातून आपण माझ्याकडे पाहात होता. पण आपल्या चेहऱ्यावर दाढी-मिशा नव्हत्या. हा काय प्रकार आहे ? मला वाटते आपली माझ्यावरील कृपा वाढत आहे.

गुरुमहाराज : स्वप्नाला महत्त्व देऊ नका. आपल्यावर परमेश्वरी कृपा आहे असे समजा.

पान ४४१

या रमजान महिन्यात मी दाढी काढून टाकली. आपण हे पाप केले म्हणून पश्चात्ताप झाला आहे. आता पुन्हा दाढी वाढवीत आहे. ही आपलीच कृपा.

गुरुमहाराज : शाबास !

शिष्य : सैतान पैगंबरांचे रूप धारण करू शकत नाही म्हणतात. तसेच तो गुरुमाउलीचेही रूप धारण करू शकत नाही असे म्हणतात. हे खरे आहे काय ?

गुरुमहाराज : याला धर्मशास्त्राचा आधार नाही.

पान ४४५

शिष्य : हैद्राबादेतील माझे वरिष्ठ अधिकारी माझ्या चेहऱ्यावरची दाढी पाहून माझ्यावर रुष्ट झाले आहेत. ते म्हणतात, 'तुम्ही हवे तितके नमाज पढा ना. पण दाढी का ठेवता ? दाढी ठेवल्याने अनेकांच्या नोकरीतील बढत्या थांबल्या.' मी म्हटले, 'माझे काम पाहा. माझी दाढी का पाहता ?' यावर ते म्हणतात, 'ही खलीफांची राजवट नाही. हे इंग्रजांचे राज्य आहे. हैद्राबाद हे इंग्रजांच्या प्रभावाखाली आहे.

गुरुमहाराज : तुम्ही निर्धाराने दाढी राखून राहा. सैतान अशी संकटे आणतो त्याला तोंड दिले पाहिजे. दुश्मन अगर कवी असा निगहबान कवी तर असा शत्रू समर्थ असेल. पण आपला रक्षक त्याहूनही अधिक समर्थ आहे.

शिष्य : लोक म्हणतात, दाढी ठेवण्याची घाई का करता ? नोकरीत बढती मिळू द्या. लग्न होऊ द्या. मग खुशाल दाढी ठेवायची असती. माझे मन डळमळत आहे. आपण आशीर्वाद द्यावा म्हणजे मला दाढी राखण्याची हिंमत येईल.

गुरुमहाराज : आपल्या टीकाकारांचा धिक्कार करा. पैगंबर दाढी राखीत याची आठवण सतत बाळगा. म्हणजे तुमच्या शंकाकुशंका नाहीशा होतील.

पान ४५८

काही वेळा सभांना आणि बैठकींना जातो. तेथे परस्त्रिया असतात. अशा वेळी मी आपली मूर्ती माझ्या नजरेसमोर आणतो. यामुळे माझे लक्ष परस्त्रियांकडे जात नाही. याची आपण परवानगी द्यावी.

गुरुमहाराज : मुद्दाम म्हणून माझी मूर्ती डोळ्यांसमोर आणू नका. आपोआप असे घडत असेल तर हरकत नाही. परमेश्वराची आठवण ठेवा आणि दृष्टी खाली ठेवीत जा म्हणजे परस्त्रियांकडे पाहण्याचे टळेल. अर्थात हेही हिंमतीचे काम आहे.

पान ४६०

एल. एल. बी. च्या परीक्षेला बसावे म्हणतो. परवागगी द्यावीशी वाटली तर द्यावी.

गुरुमहाराज : तो विषय आवडत असेल तर निरुपाय म्हणून परवानगी देतो.

पान ४६६

शिष्य : एकटा असताना मी कधी कधी कविता गुणगुणू लागतो. काही हरकत नाही ना ?

गुरुमहाराज : एकांतात गुणगुणण्यास हरकत नाही.

पान ४६८

शिष्य : एक स्वप्न पाहिले. माझेच प्रेत मी वाहून नेऊन दफन केले. याचा अर्थ काय ?

गुरुमहाराज : जीवन क्षणभंगुर आहे. परमेश्वर शाश्वत आणि सत्य आहे. आपल्याला त्याचे सान्निध्य लाभावे याची ही जाणीव आहे.

पान ४७३

ज्यांच्यापर्यंत इस्लामचा संदेश पोहोचला नाही ते नर्कात जळून मरतील काय ? असे असेल तर परमेश्वराचा न्याय तो काय ?

गुरुमहाराज : ज्या बिगर मुस्लिमांत धर्मांतराची चळवळ पोहोचली ते नर्कात काय म्हणून जातील ? पण मुसलमान म्हणविणारे धर्मच्युत झाले आहेत. ते नर्कात जातील.

पान ४७७

पूर्वी तीन हजार वेळा नामस्मरण करीत होतो. आता चार हजारचा जप चालू आहे. आशीर्वाद द्यावा.

गुरुमहाराज : बहुत उत्तम. हळूहळू वाढवीत जा.

पान ४७७

शिष्य : परनिंदा ऐकण्याचे प्रसंग येतात. स्वतःही निंदा करण्याचा मोह होतो. काय करावे ?

गुरुमहाराज : ऐकू नये आणि करू नये. दुसरा काय उपाय आहे ?

शिष्य : मशिदीच्या अंगणात किंवा मशिदीजवळ कुणाला पुरणे, किंवा कबरीजवळ मशीद बांधणे योग्य आहे काय ?

गुरुमहाराज : योग्य आहे.

पान ४९६

शिष्य : लग्न ठरते आहे. आशीर्वाद द्यावा.

गुरुमहाराज : आशीर्वाद. आईबापांची सेवा करावी. पण स्त्रीच्या हक्काकडे दुर्लक्ष करू नये.

पान ५०९

शिष्य : लग्न झाल्यापासून आज महिना सव्वा महिना झाला, अनेक नमाज चुकले (रात्रीचे), धर्मकर्मे नीट होत नाहीत. आशीर्वाद द्यावा.

गुरुमहाराज : लग्न म्हणजे जीवनातील महत्त्वाचे स्थित्यंतर होय. त्या वेळी हे असे व्हायचेच. तरी तुमचे काहीच नाही. अनेकांची स्थिती आणखी वाईट होते. परमेश्वर तुम्हाला निर्धाराचा मार्ग दाखवो.

पान ५११

शिष्य : माझी पत्नी आपल्याला सलाम सांगते आहे,—

गुरुमहाराज : तुमच्या पत्नीला म्हणावे, आपले नाव लिहू नका. अमक्याची पत्नी म्हणून लिहीत जावे.

पान ५२३

शिष्य : स्वप्न पाहिले, माझ्या मिशा वाढल्या असून मी कात्रीने त्या कापीत आहे. याचा अर्थ काय ?

गुरुमहाराज : तुमच्यात सुधारणा होत आहे त्याचा हा संकेत आहे. (उर्दूमध्ये इसलाह हा शब्द हजामत आणि सुधारणा या दोन्ही अर्थांसाठी वापरतात. सुलेमान नदवी यांनी इसलाह हाच शब्द त्या पत्रात वापरला आहे. 'इससे इसलाह की तरक है इसलाह हो रही है.')

शिष्य : स्वप्नात माझी शेरवाणी गुडघ्यापर्यंत असते ती टाचेपर्यंत मोठी झालेली दिसली.

गुरुमहाराज : अंगरखा वाढणे हे धर्मकर्माच्या ज्ञानाचे लक्षण आहे.

पान ५२४

स्वप्नात साप, वाघ माझ्यावर हल्ला करीत आहेत असे वाटते.

गुरुमहाराज : पोट बिघडल्याचे लक्षण आहे. नसल्यास साप, वाघ हे अहंकार समजावेत.

इ. स. १९४७ पासून हैद्राबादेत रजाकारांची धामधूम सुरू झाली. या संदर्भात गुलाम महंमद आपल्या गुरूंना विचारतात.

पान ५५४

वीस नोव्हेंबर १९४७ चे पत्र

मजलिसे इतेहादुल्मुसल्मीन (रजाकार संघटना) यांच्या आज्ञेप्रमाणे युद्ध केल्यास ते जिहाद (धर्मयुद्ध) होईल काय ?

असे नसेल तर आणि स्वतःच्या रक्षणार्थ कोणी लढून मरेल तर तो शहीद (धर्मयुद्धात मृत) समजावा काय ?

गुरुमहाराज : ही काही आपल्या एकट्याच्या हातची गोष्ट नाही. मग काळजी करण्याचे कारण काय ? हैदराबादने गेली दोनशे वर्षे ज्या चुका केल्या त्यांची फळे आता भोगण्याची वेळ आली आहे. धर्मात दंभाचार, धर्मनिषिद्ध आणि धर्मबाह्य वागणूक, आणि निजामाचे शियापंथाकडे वळणे या गोष्टींनी तर हैदराबाद राज्याची उन्नती होणे शक्य नाही. निजामाला पश्चात्ताप होईल असे परमेश्वर करो. आपले प्राण आणि वित्त यांचे संरक्षण करताना कोणी मारला गेला तर तो शहीद समजावा.

शिष्य : मला शिपाईगिरी येत नाही. जिहादची हिंमत होत नाही. आशीर्वाद द्यावा.

गुरुमहाराज : प्रयत्न करावा.

शिष्य : काफर आणि मुसलमान यांच्यात युद्ध सुरू झाले. (हैदराबादचे हिदु-मुसलमान) आणि कोणी मुसलमानाने त्यात भाग घेण्याचे टाळले तरी तो गुन्हा होईल काय ?

गुरुमहाराज : होय. पण ते युद्ध खरोखरीचं सद्धर्म आणि काफरी ( ईमान और कुफ्र) यांत होत आहे असे तुम्हांला वाटत असेल तर. पण सध्याच्या राजकारणात स्वार्थ हा धर्माचा बुरखा घालून फिरत आहे. पान ५७३ / एप्रिल १९४८.

शिष्य : पत्नीला स्वप्न पडले. त्यात तिचे केस पांढरे झालेले तिला दिसले.

गुरुमहाराज : संततीचा योग दिसतो.

(गुलाम महंमद लिहितात, हे उत्तर आल्यावर मी 'पत्नीला विचारले तो तिला गर्भ राहिल्याचे कळले. धन्य गुरुमहाराजांच्या ज्ञानाची ! )

इ. स. १९४८ च्या सप्टेंबरमध्ये हैदराबादेत पोलिस अॅक्शन झाले. गुलाम महंमदनाही आपण पाकिस्तानला जावे असे वाटू लागले—

पान ५७७, ऑक्टोबर १९४८

शिष्य : मक्केत जाऊन राहावे म्हणतो.

गुरुमहाराज : आपण सध्या नोकरीत आहात. आपले वडीलही नोकरीत आहेत. पोटापाण्याची इतर सोय होईपर्यंत आपण सध्याची नोकरी सोडू नये.

पान ५८२, ५८३, १४ डिसेंबर १९४८

हैद्राबादेत काफरांनी ( हिंदूंनी ) लुटालूट, पळवापळवी सुरू केली आहे. स्थलांतर करावे काय ?

गुरुमहाराज : आपल्या जागेवर राहावे.

पान ५८४, ३० डिसेंबर १९४८

शिष्य : मी एक स्वप्न पाहिले. एक मोठा हौद आहे. पाणी स्वच्छ आहे. पण आत डुकरांसारखे दिसणारे भयंकर प्राणी आहेत. पाण्यात उतरून पोहावे असे वाटले. पण हिंस्र प्राण्यांच्या भीतीने प्रथम पाण्यात उतरण्याची हिंमत झाली नाही. नंतर उतरून पोहू लागलो. तो जनावरे माझ्या समोरून पळून जाऊ लागली. या स्वप्नाचा अर्थ मी असा लाविला की या काफरांच्या राज्यात (पोलिस अॅक्शननंतर हैद्राबाद भारतात विलीन झाले.)मला शत्रूंची पीडा होणार नाही.

गुरुमहाराज : अर्थ बरोबर दिसतो.

शेवटी जून १९४९ मध्ये गुलाम महंमद हे पाकिस्तानात निघून गेले. कराचीहून ते गुरुमहाराजांना लिहितात.

(पान ६००)

कराचीत बायका पर्दा पाळत नाहीत. यामुळे अनेक अनर्थ होतात.

गुरुमहाराज : परमेश्वराची प्रार्थना करावी. यापलीकडे काय करणे शक्य आहे? हिंदुस्थानात हिंदूंचा जोर आहे तर पाकिस्तानात फिरंगी संस्कृतीचा जोर आहे.

असा हा गुरुशिष्य-संवाद आहे. गुलाम महंमद यांनी लिहिलेले हे सुलेमान नदवींचे चरित्र तजकिराये सुलेमान या नावाने प्रसिद्ध असून ते इ. स. १९६० मध्ये इदाराये मजलिसे इल्मी ( ज्ञान मंडळ ) या संस्थेने कराचीहून प्रकाशित केले.

ग्रंथात सुलेमान नदवींची काही बोधवचने दिली आहेत. त्यांपैकी त्यांचे पुढील विचार थक्क करून सोडणारे आहेत. मार्च १९४४ मध्ये सुलेमान नदवींनी हैद्राबादेत एक भाषण केले (पान ३८२). तेथील मुसलमानांना उद्देशून ते म्हणाले,

'काफरांच्या बरोबर सहकार्य करून एक वेळ राज्य चालू शकेल. पण अन्यायावर चाललेले राज्य फार दिवस टिकणार नाही.'

राज्याचे ध्येय केवळ राज्य करणे असू शकत नाही. धर्मांतर आणि धर्मप्रसार (तबलीग व इशा अतेदीने) हे त्याचे ध्येय असावे. हैदराबाद सरकारने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले ही दुःखाची गोष्ट आहे. हैदराबादचे मुसलमान फक्त बारा टक्के आहेत. त्यांनी केवळ नोकरीवर विसंबून राहणे धोक्याचे आहे. त्यांनी शेती, व्यापार आणि उद्योगधंदे यांच्यावर ताबा मिळविणे आवश्यक आहे.

पान ३०४, सुलेमान नदवी म्हणतात,

'दाराशिकोह गादीवर आला असता तर मुसलमानांचे राज्य टिकले असते. पण इस्लाम नष्ट झाला असता. औरंगजेब गादीवर आल्यामुळे, त्याच्यानंतर मुसलमानांचे राज्य राहिले नाही हे खरे. पण इस्लाम तर शिल्लक राहिला.'

धन्य गुरुमाऊली, धन्य शिष्योत्तम ! सुलेमान नदवींचा मृत्यू पाकिस्तानात झाला. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो ! चरित्रकार गुलाममहंमद हे आता पाकिस्तानात आहेत. तेथे ते सुखाने राहोत.

. ८ .

# अहो रसिकत्वम

[ सामान्य जनांच्या जीवनाला काव्यरूप देणारा सामान्य जनांतील लोकप्रिय उर्दू कवी नजीर अकबराबादी याचा काव्यपरिचय ]

सुप्रसिद्ध उर्दू कवी नजीर अकबराबादी (जन्म १७४०, मृत्यू १८३०) हे आग्र्याला होऊन गेले. त्यांच्या उर्दू कविता हिंदीला आणि बहुजन समाजाला जवळच्या असल्यामुळे अतिशय लोकप्रिय झाल्या आहेत. आग्र्याचा बाजार, आग्र्यातील समाजाच्या सर्व थरांतील माणसे, अमीर, गुलहौशी, तरुण, वेश्या, वारांगना, कलावंत कसबी, कारागीर,– सारांश समाजातील सर्व थरांचे चित्रण नजीरच्या काव्यात उतरले आहे. यमुनेचे वर्णन, तेथील जलक्रीडा, आग्र्यातील दसरा–दिवाळी–होळी इत्यादी सण इत्यादींचे रसभरित वर्णन नजीरने केले आहे. गालिबसारखे उच्चभ्रू कवी नजीरच्या काव्यावर नाक मुरडत, पण नजीरने त्यांची मुळीच पर्वा केली नाही. नजीर हा वृत्तीने रंगेल आणि रसिक होता. हे पिकले पान शेवटपर्यंत मनाने हिरवे राहिले. उर्दूप्रमाणे नजीरचे फारसी भाषेवरही प्रभुत्व होते. त्याने लिहिलेले आठ लहान फारसी ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. हे गद्य ग्रंथ आहेत, पण त्यांत नजीरच्या स्वरचित अशा फारसी कविता जागोजाग दिल्या आहेत. या कविता वेगळ्या अशा एकत्रित केल्या तर एक चांगलाच दीवान (कवितासंग्रह) तयार होऊ शकेल.

नजीरच्या या फारसी पुस्तिकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : (१) इन्शाये बज्मे ऐश– विलास मंडळाची हकीकत, (२) तर्जे तकरीर– संभाषणाची पद्धत, (३) मजमाये मजामीन– लेखसंग्रह, (४) इन्शाये मैफिल–मैफिलीचे वर्णन, (५) हुस्न बाजार–सौंदर्य हाट, (६) इन्शाये कद्रमतीन– प्रतिष्ठित मूल्ये, पत्रसंग्रह, (७) राना जेबा– चंचल सुंदरी, (८) नर्मी गजीन दिलपसंद आणि मुलायम नजीरचे नववे पुस्तक फहम करीन, सुबोध, हे अद्याप उपलब्ध झाले नाही. या ग्रथांची जी हस्तलिखिते उपलब्ध झाली आहेत, ती नजीरच्या मृत्यूनंतर अवघ्या आठ वर्षांनी म्हणजे इ. स. १८३८ मध्ये लिहिली गेली आहेत.

**इन्शाये बज्मे ऐश**

या ग्रंथाची फक्त चौतीस पाने आहेत. या ग्रंथात आग्र्यातील माणसे, उत्सव,

समारंभ, यमुना, ताजमहाल इत्यादींची वर्णने आहेत.

स्वतःबद्दल लिहिताना हे रंगेल कवी काय म्हणतात ते पाहा.

या प्रसन्न ओळींचा लेखक मी षौकिन असा नजीर आहे. मला समजू लागल्यापासून सौंदर्याची आराधना मला आवडू लागली. मी सुंदर तरुणींशी स्नेह करू लागलो. मनोरम तरुणींच्या नेत्रांतील मदिरा मी आपले शहाणपण विकून मिळविली. अप्सरासम तरुणींच्या नेत्रकटाक्षातील मादक धुंदी मी आपली शुद्ध देऊन मिळविली. तरुणींच्या लाल ओठांच्या पुढे मी आपली हृदयरूपी लाल माणकांची खंडणी ओतली. माझ्या धर्मनिष्ठेचे मोती देऊन मी तरुणींचा केशकलाप हाताळला. मी दिसायला असातसाच आहे. असे असूनही चंद्रवदना माझ्यावर सदैव प्रसन्न राहिल्या. माझे कपडेही असेतसेच, तरीही वस्त्रालंकारांनी नटलेल्या तरुणींची माझ्यावर कृपाच होत होती. मी लीन असलो तरी माझा रुबाब असा की आपल्या सौंदर्याचा गर्व वाहणाऱ्या तरुणी मला प्रथम नम्र अभिवादन करीत. सौंदर्यसाम्राज्याच्या सम्राज्ञी माझ्या आज्ञा कधीच मोडीत नसत आणि माझ्या आज्ञेशिवाय काही करीत नसत. नाहीतर माझी मर्जी खप्पा व्हायची. माझे पोटापाण्याचे साधन म्हणजे माझा शिक्षकाचा पेशा आहे. या धंद्यातही माझे माथे नखरेल युवतींच्या चरणावर टेकलेले असते.
कविता—

नाज, नखरे, गर्व हा सौंदर्याचा सरंजाम होय आणि प्रेमाचे लक्षण म्हणजे पूर्ण निष्ठेने या सौंदर्याला शरण जाणे होय. सौंदर्याच्या बागेची बहार काय तर त्यात विहार करणारे प्रेमिक हृदयरूपी बुल्बुल आणि कुमरी हे पक्षी. या सौंदर्याची एकच झळक कर्मठ धर्मशास्त्र्याने पाहिली मात्र, त्याने एकांतवास सोडून दिला. सुंदरींनी आपले दर्शन दिले. हृदयाला सुखद अशा हजारो संवेदना झाल्या. ही सौंदर्याची कृपा, हे सौंदर्याचे उपकार, हे नजीर, माझ्या हृदयाचा पुष्पगुच्छ प्रफुल्लित आहे. परमेश्वरा, सौंदर्याचे उपवन सदैव टवटवीत ठेव.

दीड पानाची, कवितेची एकच ओळ. नजीर म्हणतात, एकदा काही कवी, काही श्रोते आणि काही सुंदर तरुणी जमल्या होत्या. तेथे मी एक कविता म्हणून दाखविली. कवितेचा एकच चरण दीड पानाचा होता. तो पाहा :

"एका सकाळी मी यमुनेच्या काठावर गेलो. तेथील दृश्ये पाहात मी एके ठिकाणी बसलो. मनात एकच आकांक्षा होती की कोणी सुंदरी भेटावी. ती कशी असावी तर, सुशोभिनी मनोहरा दिल्बरे जेबा. तिचा चेहरा प्रभातकाळच्या सूर्यासारखा, बरुखे मिहरबर अफजा, असावा. शरीर शेवंतीच्या फुलासारखे, बतने नस्तरन् असा शोभनीय बांधा, बकदे जेबे दुबाला, लाल माणकाप्रमाणे ओठ, वलबे लाले शखर खा, मधुर संकेत करणारी, बशाराते तरबजा, अशा तरुणीने लवकर प्रगट व्हावे, तिने सूर्याप्रमाणे दृष्टीस पडावे, तिने आपले उज्ज्वल सौंदर्य दाखवावे, तिने आपला केशसंभार मोकळा सोडलेला असावा, तिच्या ओठांना सुगंधी चूर्ण

लावलेले असावे, तिचा वर्ण आरशापेक्षाही अधिक शुभ्र असावा, तिच्या एका कटाक्षाने चिंता-काळज्या दूर व्हाव्या. अशा सुंदरीची वाट पाहात असता एकाएकी ती प्रकट झाली. ती सौंदर्यसम्राज्ञी होती, तिचे केश इतके सुगंधी की रैहान फुलाला त्यांचा हेवा वाटावा. तिची वृत्ती कृपेची होती. तिचा चेहरा पाहून प्रफुल्ल पुष्पांना हेवा वाटला असता. चेहरा रश्क गुले खंदा, तिच्या भुवया धनुष्याकृती होत्या. अबरुवान हम दो कमान सान, तिच्या चंचल आणि नर्गिसी नयनांना काजळ लावले होते. तिच्या पापण्या हृदयाचा भेद करणाऱ्या होत्या. तिच्या ओठांवर आणि दातांवर विडा रंगला होता, तिची हनुवटी म्हणजे बागेत फुललेले सफरचंदच जणू—जकनश सेवे गुलिस्तान, हनुवटीची खळी विलोभनीय अशी होती. तिच्या कानांत कुंडले होती, तिच्या गळयात उंची आणि चकाकणारे अलंकार होते, तिच्या हातावर आणि दंडावरही भरपूर अलंकार होते, तिचे वक्ष:स्थळ म्हणजे चमेलीचा गुच्छच जणू. पोट आणि नाभिस्थळ मनोहर, शिकम व नाफ निकूतर, कंबर नाजुक, पाठ म्हणजे सोन्याचे पान जणू मांड्या आणि पोटऱ्या उज्ज्वल, तिचे पाय म्हणजे मुलायम मखमल, बांधा सुरूच्या झाडाप्रमाणे, अंगावरील वस्त्रे अत्तराने सुगंधित झालेली. वदन चंद्रासारखे महरुखे, ती सौदामिनी वर्क वशे, पुष्पांगी, गुब्धने, नखरेल गमजाकुने, हृदय वेधणारी दिल शिकने, प्रसन्न नेत्रांची खुश निगहे, रुसणारी इश्वादिहे होती. तिच्या मस्तकावरील शिरोभूषण वाकडे होते, कज कुलहे, ती मोहिनी होती, सहर गेर, ती स्वभावाने चांगली, पण छळ करण्यात आनंद मानणारी होती, दिल्बरे खुशखू व जफाजू. तिचे कुंतल वक्र होते, खम व पेस बर गेसू. ती अप्सरेप्रमाणे होती, परीरु. तिच्या अंगाला चमेलीच्या फुलासारखा सुगंध येत होता, समनबू.

**आता कवितेची दुसरी ओळ :**

ती माझ्याजवळ आली. मला वाटले सुरूचे झाड आले. गुलाबपुष्प आले, चमेली आली, नर्गिसची व शेवंतीची फुले आली, अहिपुष्पे ( लाला ) आली, डाळिंबाची फुले आली, लाला व नारवन आमद, तिचा जिव्हणीरूपी फुलांचा गुच्छ आला, वक्र असे सुंबल द्रुम आले, कस्तुरीचा सुगंध आला, वस्त्रांचा सुगंध आला, सारांश सगळी फुलबाग आली, एडनची मोत्याची माळ आली, यमनची लाल माणके आली.

तिचे ओठ हलले. ती म्हणाली, ' बोला, तुमची काय हालहवाल आहे? तुम्ही सुखी आहात की कष्टी ? तुमचा काळ कसा जातो ? तुमची काय इच्छा आहे ? तुम्ही या शहरचे राहणारे की बाहेरचे ? ' तिच्या मादक ओठांतून निघालेले शब्द मी ऐकले. मी तिच्याजवळ गेलो. तिचे नेत्र गुलाबी मदिरेप्रमाणे होते, तिच्या नेत्रांत जादू होती, माझे प्राण आणि हृदय मी तिच्यावरून ओवाळली. मी तिला म्हटले, ' हे सुरेखे, मी सुंदरीच्या सौन्दर्याचा चाहता आहे, रूपावंत तरुणीचा दास आहे,

त्यांच्या नाज नखऱ्यावर मी स्वतःला ओवाळून टाकणारा आहे, माझे सगळे आयुष्य विलासात गेले आहे. त्यांचे मनोरंजन हाच माझा स्वभाव. सुंदरीची नावे सतत माझ्या ओठांवर खेळत असतात. मी पुष्पांगीवर लुब्ध होणारा बुलबुल आहे. सुरूच्या झाडाप्रमाणे ऊंच बांधा असलेल्या तरुणीवर अनुरक्त होणारा कुमरी पक्षी आहे.

त्या पुष्पांगीने माझे शब्द ऐकले. तिचे लक्ष माझ्यावर गेले. त्या क्षणी कृपा केली, ती मला बागेत घेऊन गेली, तेथे फुले फुलली होती, बुलबुल पक्षी गात होते. ती मनोरमा, ती पुष्पवर्णा, ती अप्सरा, ती सुरेखा कशी दिसली म्हणाल तर, तिचा चेहरा गुलाबासारखा, तिचे नेत्र म्हणजे मदिरेचे पेले, तिचे वागणे, चालणे, बोलणे सर्व गोड होते. तिने माझ्यावर पूर्ण कृपा केली.'

कवितेच्या या दोनच ओळी वर दिल्या आहेत. इतके दीर्घ वृत्त कुणी पाहिले असेल काय ? का ' पद्यपंक्तीची तरफ आमुच्या ( नजीरच्या ) करी विधीने दिली असे.

कवी नजिरने या पुस्तकात अशा किती तरी गोष्टी दिल्या आहेत; हा कवी रंगेल आणि रसिक होता. कधी बागेत कोण्या सुंदरीबरोबर गाठी-भेटी होत आहेत, कधी वस्त्रालंकारांनी भरलेल्या त्या तरुणीबरोबर बागेची सहल चालली आहे कधी यमुनेच्या काठावर नजीर बागेत चंद्रमुखीच्या बरोबर मध्यरात्रीपर्यंत गप्पा मारीत आहे, कधी वृक्षाखाली बसून अभिसारिकांची वाट पाहणे चालले आहे.

काश्मीर गौरतनु लेवुनि रत्नकांची
रेघेसमान दिसते अभिसारिकांची
अंधार हाचि निकषोपल भासला गे
त्यांचे जणू प्रणय हेम कसास लागे

नजीर म्हणतात, एके दिवशी मी बागेत गेलो, तेथे मंडळी बसली होती. त्यांच्यात एक सुंदरी होती, ती समोरील विलोभनीय दृश्य पाहात बसली होती. तिचे सुगंधी केश वाऱ्यात उडत होते. तिची जिव्हणी कळीप्रमाणे होती. मी अतिशय आनंदाने तिच्याजवळ बसलो. जमलेल्या मंडळींपैकी एका कवीने पुष्पवदनांच्या केशकलापावर एक कविता म्हटली. मला ती अतिशय आवडली. मी कवितेची स्तुती केली, तो त्या तरुणीने मला म्हटले, ' अहो, तुमचा काव्याकडे ओढा असेलच तर कविता म्हणा. लपवून ठेवू नका.' मी तिच्या वक्र आणि सुगंधी कुंतलांकडे पाहून पुढील ओळी म्हटल्या :

या गुलाबी गालांच्या सुंदरीचा केशकलाप म्हणजे शिकाऱ्यांच्या जाळ्यापेक्षाही अधिक प्रभावी आहे. शिकाऱ्याच्या जाळ्यात फार तर एक-दोन पक्षी सापडतात. पण यांच्या जाळ्यात हजारो सावजे अडकतात.

ई जुल्फे गुलइजारान
  विहतर अजदामे यारान
दर दाम थक दो तादूर,
  दर हल्काअश हजारान

कवी नजीर, आपण धन्य आहात !

कवी नजीर अकबरबादी आपल्या फारसी ग्रंथांतून अनेक मनोरंजक गोष्टी (स्वतःच्या आठवणी) देतात, त्यांपैकी काही पुढे दिल्या आहेत.

(१)

एका नखरेल तरुणीने पत्र पाठवून माझ्याकडे बदामांची (उर्दूत बादाम म्हणतात) मागणी केली. मी त्याप्रमाणे बदाम पाठविले आणि तिला लिहिले की बदाम कशाला हवे होते ? तिने लिहिले की तुला बादाम (जाळचात) अडकविण्याचा माझा उद्देश आहे.

(२)

एक धवलतनू तरुणीपाशी मी गेलो आणि तिला म्हटले, 'चांगले सफरचंद (उर्दूत सेब म्हणतात) आले आहेत. ती म्हणाली, 'आण बरे.' मी म्हटले, 'माझे हात सेब (सफरचंद) पर्यंत पोहोचले नाहीत.' तरुणीने म्हटले, 'बे आसेब (कष्टाविना) सेब (सफरचंद) हाती लागणार कसे ?'

(३)

खर्बुजाचे दिवस आले. खर्बुजे म्हणजे गोड फळ. त्यांची मिठ्ठास काय वर्णावी ! अगदी मनपसंद म्हणा. मी एका चंचल तरुणीपाशी बसलो होतो. खर्बुजे आली. तिने फळाच्या लांब फोडी केल्या. एक फोड हातात घेऊन ती म्हणाली, 'फोड बरीच बाकदार आहे.' जमलेल्या मंडळींपैकी अनेकांनी फोडीची स्तुती केली, पण चंद्रकोरीप्रमाणे भुवया असलेल्या त्या तरुणीला स्तुतीचे शब्द पटले नाहीत. मग मी फोडीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले : 'अगे, तू ही फोड अशी कापलीस तिचा उद्देश तुझ्या ओठांना पसंतीदर्शक बाकदारपणा यावा हा होय,' यावर ती तरुणी हसली. मी पुढील ओळ म्हटली, 'या फोडीने तुझ्या मधुर ओठांचे चुंबन घेतले. आता याच फोडीच्या चुंबनाचा लाभ माझ्या ओठांना लाभो.'

काशे के बोसाये लबे शीरीने तू गिरफ्त
ख्वाहम के बोसाये लबे
ऊ तालबम रसीद

(४)

एक तरुणी माझ्याजवळ आली. तिने माझ्या हातातील कागद काढून घेतला. त्यावर मी पुढील दोन ओळी लिहिल्या होत्या :

तुझे चंद्रबिंबाप्रमाणे दिसणारे मुख इकडे वळले की, प्रेमिकांवरील तुझी कृपा द्विगुणित झाली असे वाटेल. तुला पाहून आरसा स्तिमित झाला आणि आपल्या शरीराचे डोळे करून तुझ्याकडे पाहू लागला. तुझ्या गालाकडे बागेतील फुलाने पाहिले मात्र, त्याने वैफल्याच्या जाणिवेने आपले कपडे फाडून टाकले. (पाकळ्या गळून पडल्या.)

(५)

एक नर्तकी माझ्याकडे आली. तिला एक पत्र पाठवावयाचे होते. ती निरक्षर होती हे उघड आहे. ती मला म्हणाली, 'ज्याला पत्र लिहावयाचे आहे, त्याच्या मी अंकित आहे.' मी विचारले, 'पत्रात काय लिहू ?' ती म्हणाली, 'काही तरी आकर्षक आणि मजेदार असे लिही.' मी म्हटले, 'मी तुझे पत्र लिहून देईन. पण त्यासाठी मला तुझे एक चुंबन हवे. तुझ्याशी मीलन जुळून येईल असे वाटत नाही. मग चुंबन तरी मिळावे.'

ती म्हणाली, 'उडत गेलास. अरे, ज्याला पत्र लिहीत आहे तो दोन महिन्यांपासून माझ्या मीलनासाठी तळमळत आहे. पण ते अद्याप जमत नाही आणि तू दोन अक्षरे लिहिणार तर त्यासाठी तुला चुंबन हवे काय ?'

मी म्हटले, 'हे पत्र चुंबनावर अवलंबून आहे' (बहमीन मुनहसिर). मग ती म्हणाली, 'असे असेल तर आटप लवकर– गुप्त, मुख्तसर.'

(६)

म्हातारपणात मी एकदा एका तरुणीकडे गेलो. तिने विचारले, 'कुणीकडे आलात ?' मी म्हटले, 'तुझे सौंदर्य पाहण्यासाठी.' ती म्हणाली, 'अहो, तुमचे हे वय एकान्तवासाचे आहे का गल्ल्याबोळ भटकण्याचे ?' तिचे हे बोलणे ऐकून मी नाखूश झालो (नाखुश गर्दीदम). ती म्हणाली, 'अहो, हा काळ स्मरणी ओढण्याचा आहे का असे देहभान हरपण्याचा ?' माझ्या कपाळाला आठ्या पडल्या (अबरू कशीदम). ती पुन्हा म्हणाली, 'का हो, हा काळ पथ्ये पाळण्याचा की मदिरापानाचा ?' या तिच्या बोलण्याने मला दुःख झाले (रंजीदम).

(७)

एका तरुणीच्या सौंदर्याची मी ख्याती ऐकली. मी तिच्या घरी गेलो. तिच्या घरापर्यंत पोहोचण्यासाठी मला वेडयावाकडया गल्ली–बोळांतून जावे लागले. तरुणीची गाठ पडली. तिने मला विचारले, 'येथे कसे येऊ शकलात ?' मी पुढील ओळी म्हटल्या.

'बशौके दीदनत बेषाक या तरसीदा तरसीदा'– तुला पाहण्यासाठी हिंमतीने अगर भीत भीत 'बहर सूरत दर ईजा आदम पुरसीदा पुरसीदा'– हर प्रयत्नाने या ठिकाणी आलो विचारपूस करीत.

(८)

एकदा मी एका तरुणीच्या प्रेमात सापडलो. माझ्या हृदय-पक्ष्याला मी तिच्या प्रेमजाळ्यात अडकविले. मी तिची किती तरी मनधरणी केली. पण तिने माझ्याकडे लक्ष दिले नाही. मी तिची किती म्हणून खुशामत करावी ! मी अगदी अजीजीला आलो. त्या चंचल आणि नखरेल युवतीबद्दल मी दुसऱ्या स्नेहल तरुणीजवळ तक्रार केली ती पुढील कवितेतून.

बागेत वसंतऋतू आला आहे. तो आपल्या पूर्ण वैभवासहित. फुले आली, बुल्बुल आले, हिरवळ आली, फळे-फुले आली. झाडाझाडाभोवती, फुलांच्या वेली-वेलीपाशी हंस आले, तदरौपक्षी आले, कोकिळा आल्या,– आणि हे पक्षी शेकडोंनी आले. लोकांचे मनरंजन करण्यासाठी म्हणून बागेत अहिपुष्पांचा (लाल) सडा पडला, शेवंतीचा सडा पडला, डाळिंबे शेकडोंनी फुलली आणि कवी नजीर मात्र बागेतील तरुणींना विचारीत हिंडत होता की, ती गुलरुख (फुलासारख्या चेहऱ्याची) ती गुलइजार (गुलाबी गालाची) बागेत आली आहे काय ?

(९)

एक तरुणी यमुनेवर आंघोळ करून परत जात होती. तिच्या आंघोळीमुळे यमुनेचे पाणी शेवंतीप्रमाणे झाले आणि पाण्याला रैहान फुलांचा सुगंध आला. त्या तरुणीने ब्राह्मणाकडून संकल्प ऐकला. आंघोळीनंतर तिने कपाळाला गंध लावले. तिला पाहणाऱ्यांची हृदये अस्वस्थ झाली. ती आपल्या घराकडे जाऊ लागली. ती मंदमंद पाउले टाकीत चालू लागली. माझे हृदय तिच्या केशकलापात अडकून बसले. तिच्याशी संभाषण करण्यास मिळावे असे मला वाटू लागले. मी तिच्या मागोमाग चालू लागलो.'

सुंदरीच्या मागे लागण्यात हृदयाला ज्या सुखद संवेदना होतात त्यांची कल्पना फक्त सौंदर्योपासकच करू जाणेत.

त्या तरुणीचे लक्ष माझ्याकडे गेले. मी म्हटले, अय दिलाराम (मनोरमे) जय सीताराम. ती हसली आणि म्हणाली, 'तुला काय हवे आहे ?' मी म्हटले, 'सांगू का ?' ती म्हणाली 'सांग.' मी म्हटले, 'श्री रामचंद्रांनी लंका जिंकली. तुझ्या सौंदर्याने माझ्या हृदयाचा गड जिंकला आहे.' ती म्हणाली, 'तुझ्या बोलण्याची साक्ष ?' मी म्हटले, 'हनुमंत'. यावर ती मनमोकळेपणाने हसली आणि मग आम्ही गप्पागोष्टी करीत तिच्या घरापर्यंत गेलो.

(१०)

**आग्र्याची वर्णने**

आपली जन्मभूमी आग्रा (म्हणजेच अकबराबाद) या शहरावर नजीरचे अतिशय प्रेम होते. तो म्हणतो, आग्रा हे मोठे शहर आहे. या शहरात असंख्य

इमारती आहेत. पऱ्यांच्या लोकात रत्नांच्या इमारती असतील. पण आग्र्यातील इमारतींच्या पासंगालाही त्या उतरणार नाहीत. चीनमधील बागा वैभवशाली असतील. पण आमच्या बागा पाहून त्यांचे चेहरे पांढरे फटफटीत पडतील. येथे घरोघर अप्सरा आहेत. गच्ची-गच्चीवर मनोहर रूप आढळून येते. प्रेमिकांवर त्यांची कृपा असते. गुलाबी चेहऱ्याच्या त्या युवती जेव्हा रुसवा दाखवितात, तेव्हा त्यांचा गोडवा द्विगुणित होतो. कविता– या शहरातील लोक सदा सुखी राहोत, हे अकबराबाद शहर सदैव गजबजलेले राहो, या शहराचे मनोहर स्वरूप काय वर्णावे? हा नजीर या शहराच्या सामान्य रहिवाश्यांपैकी एक आहे.

### यमुना

यमुनेचे पाणी म्हणजे शर्करामिश्रित दूधच जणू! यमुनेची कृपा अखंड वाहते आहे. कशी म्हणाल तर उपवनातील प्रभातकाळच्या वाऱ्याप्रमाणे, अगर बागेतील वासंतिक वायूप्रमाणे. तिच्या काठावर केव्हाही पाहा– आंघोळ करणाऱ्यांची गर्दी असते. त्यातल्या त्यात गुलाबी कपोलांच्या युवती गर्दी करतात, त्या वेळची बहार काही विचारू नका. नदीत पोहणारी मंडळी इतकी कुशल आहेत की त्यांना यमुनेचे पाणी म्हणजे जमिनीवर पसरलेली पांढरी शुभ्र चादर वाटते. नजीर म्हणतात, 'मी ताजगंज मोहल्ल्यात राहतो. कित्येक वर्षांपासून मी सकाळी शहरात येतो आणि संध्याकाळी ताजगंजला परत जातो. माझी वाट ज्या बाजारातून जाते तेथील स्त्रियांचे लावण्य काय वर्णावे! अप्सरांनाही त्यांचा हेवा वाटावा. त्यांचे सुगंधी केश, त्यांचे गुलाबी गाल, त्यांचा सुडौल बांधा, त्यांचे नखरेल चालणे यांचे किती वर्णन करावे!

### वर्षाऋतूचे वर्णन

आग्र्यात पावसाळा आला की अशी मजा येते की सांगता सोय नाही. नदीला प्रचंड पूर, जिकडे तिकडे हिरवेगार, दृष्टी टाकावी तेथपर्यंत आकाशात काळे काळे ढग, मेघांचा गडगडाट आणि विजांचे चमकणे चालूच आहे. मत्तमयूरांचा ध्वनी, बेडकांचे ओरडणे ही लक्ष वेधून घेतात. वृक्षाच्या पर्णांवरून पाणी ठिबकत असते. नदीचा पूर पाहण्यासाठी लोकांची गर्दी. झिमझिम पाऊस. काय हे निसर्गाचे विविधरंगी रूप! काय हा चमत्कार! सुभानअल्ला! धन्य परमेश्वराची! नजीरने अमका विषय वर्णन करण्याचा सोडला आहे असे नाही. फार काय, आग्र्यातील भाजीविके, पानपट्टीचे दुकानदार, सारांश– सगळ्या थरांना त्याने आपल्या साहित्यात स्थान दिले आहे.

गालिबसारखे कवी त्याला नाके मुरडोत, पण या लोककवीचे स्थान सामान्य जनांच्या हृदयात अढळ आहे.

२०८८६
२२८४२
निबंध

· ९ ·

# हे हकीम हे डॉक्टर

**[ हकीम–डॉक्टरांच्या दोघा सुप्रसिद्ध उर्दू साहित्यिकांनी लिहिलेल्या मनोरंजक आठवणी ]**

सुप्रसिद्ध साहित्यिक आणि अलीगड विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक रशीद अहमद सिद्दीकी यांनी अलीगडच्या अनेक गंमतीदार आठवणी, आशुफ्ता बयानी मेरा (माझी निरर्थक बडबड) या छोटचाशा ग्रंथात दिल्या आहेत. ते म्हणतात,

'एकोणीसशे वीसपूर्वी अलीगड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी कर्जन हॉस्पिटल आणि एक यूनानी दवाखाना अशा दोन संस्था होत्या.'

**हकीमसाहेब**

यूनानी दवाखान्यावर एक हकीम काम करीत. त्यांचे एक मदतनीस होते. त्यांना हकीमसाहेब मुन्शीजी म्हणून हाक मारीत. आणि आम्ही सगळे त्यांना हकीमजी म्हणत असू. त्यांना आम्ही मुन्शीजी म्हटले तर आवडत नसे. मग ते आमच्यावर रागावत आणि औषधात सरबत मिसळून देण्याचे टाळीत. उलट आम्ही त्यांना हकीमजी म्हणून आदराने हाक मारली की ते खुश होत आणि हकीमांनी आमच्याकरिता लिहून दिलेली औषधे बाजूला सारून ते आम्हाला गुपचूपपणे सरबत अगर मुरंबा देऊन टाकीत. या मुन्शीजींना हसताना कधीच कोणी पाहिले नाही. त्यांची एकच कुरकुर असे. विद्यार्थी आजारी पडून आपल्याकडे येत का नाहीत ही. कारण औषधांपैकी एखाद्या दिवशी जोशांदा (काढा) शिल्लक राहिला तर हकीमसाहेब त्यांना जाब विचारीत. सामान्यपणे येणाऱ्या प्रत्येक रोग्याला दोनच औषधे देण्यात येत. एक जोशांदा (काढा, सर्दीवरील औषध) किंवा एखादी पूड. त्या काळात हकीम लोक रोगाचे निदान करण्यात मुळीच वेळ दवडीत नसत. त्यांचा सगळा वेळ औषधाची योजना करण्यात जाई. सिद्दीकी म्हणतात, 'त्या वेळेपासून माझी एक सवय झाली आहे. यूनानी उपचारात माझी भूमिका अशी आहे की, हकीम माझ्या रोगाचे निदान काहीही करोत. मी औषध मात्र माझ्या मनासारखे करून घेईन. यामुळे बरेच लाभ होतात. पहिली गोष्ट म्हणजे हकीमाने रोगाचेही निदान करावयाचे आणि औषध तयार करावयाचे, हे श्रम फार होतात. मी सुचविलेल्या उपायाने कामाची वाटणी रोगी आणि हकीम यांच्यात बरोबरीची होते. म्हणजे हकीमाने

रोगाचे निदान करावे आणि रोग्याने आपल्याला हवे ते औषध घ्यावे. याचा आणखी एक फायदा होतो तो हा की, या पद्धतीने उपचाराचे आणि रोगाचे निरनिराळे प्रकार उजेडात येतात. तिसरा फायदा हा की, गालिबच्या उक्तीप्रमाणे—

मैं न अच्छा हुवा बुरा न हुवा

मी बरा झालो नाही आणि माझी प्रकृती पण खालावली नाही.

म्हणजे रोग बरा होवो अगर न होवो, औषध मात्र गोड आणि मजेदार. बरे, रोग्याचे मानवी हक्क सुरक्षित राहात. म्हणजे आपल्या मर्यादेत राहून त्याला आपले आरोग्य टिकविण्याचे अगर न टिकविण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहात असे.

**डॉक्टर**

सिद्दीकी म्हणतात, ' कर्जन हॉस्पिटलच्या वरिष्ठ डॉक्टरांशी आमचा विशेष संबंध येत नसे. मदतनीस डॉक्टर शफाअतुल्ला नावाचे होते. शफा म्हणजे आरोग्य. पण विद्यार्थी त्यांना हलाकतुल्ला म्हणत. हलाकत म्हणजे सर्वनाश. डॉक्टरसाहेब ठेंगणे, वयस्क पण सुदृढ प्रकृतीचे होते. ते आपली दाढी वर कल्ल्यावर चढवीत. दाढीला नेहमी कलप असे. त्यांचा आवाज मोठा कडक असे. त्यांच्या हाताला कंप होता. ते औषध कागदावर लिहीत तेव्हा त्यांच्या हाताची तर्जनी सारखी उडत असे. त्या काळात कोणी विद्यार्थी औषधासाठी दवाखान्यात जाऊ लागला तर दोन चार मित्र त्याच्याबरोबर असत. एकदा असेच आम्ही तिघे-चौघेजण दवाखान्यात गेलो होतो. डॉक्टरसाहेबांचे बोट उडत होते आणि ते औषधाचे नाव लिहीत होते. आमच्यापैकी एकाने म्हटले– ' कुर्बान जाइये इस कमालपर,' या कौशल्यावरून जीव ओवाळून टाकावासा वाटतो. डॉक्टरसाहेब लिहीत जातात आणि त्याचबरोबर टाइपही करीत जातात– ' डॉक्टरसाहेब लिखते भी जा रहे हैं और टाइप भी करते जाते हैं.' हे ऐकून डॉक्टरसाहेबांना अतिशय राग आला. ते गर्जून म्हणाले, ' बदतमीज, (अशिष्ट, असभ्य) निकल जा अभी हिस्पिताल से.' माझा सोबती निघून जाऊ लागला. आमच्यापैकी दोघातिघांनी त्याला धरले आणि मोठ्याने ओरडून त्याला म्हटले, ' तुला मी असाच जाऊ देणार नाही. डॉक्टरसाहेबांचे पाय धर आणि क्षमा माग. नाही तर तुला आम्ही येथेच मारून टाकतो.' आमच्या सोबत्याने डॉक्टरांचे पाय धरले. यावर डॉक्टर विरघळले आणि आनंदित होऊन त्यांनी त्याला आलिंगन दिले.

एकदा आमच्या एका सोबत्याच्या बोटाला फोड झाला होता. फोड पिकला. त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी असे ठरले. आमचा सोबती मिळमिळीत होता. तो काही केल्या दवाखान्यात जाण्यास तयार होईना. आम्ही त्याला जबरदस्तीने उचलून नेले. फारसीत म्हण आहे, मित्राचा हात धरणारा (मदत करणारा) खरा मित्र समजावा.– दोस्त आं बाशद के गीरद दस्ते दोस्त. पण येथे तर आम्ही आमच्या सोबत्याला जखडून घेऊन चाललो होतो. डॉक्टरसाहेबांनी आपली अवजारे बाहेर

काढली. आमचा सोबती ओरडत होता. डॉक्टरांनी अस्तन्या चढविल्या. हातात चाकू घेतला. तर्जनी उडू लागली. त्यांनी बेधडक रोग्याच्या हातावर चाकू चालविला. इतक्यात एक किंकाळी ऐकू आली. आम्ही घाबरून पाहिले तो काय, डॉक्टरांनी उडत्या तर्जनीमुळे आपल्या हातावरच शस्त्राचा आघात करून घेतला होता !

(२)

अलाहाबाद विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक एजाज हुसेन हे उर्दूचे सुप्रसिद्ध साहित्यिक आहेत. त्यांनीही लखनौचे प्रसिद्ध हकीम मुन्ने आगा यांची एक आठवण दिली आहे.

**हकीम मुन्ने आगा**

एजाज़ हुसेन म्हणतात, ‘मला बरेच दिवसांपासून वाताचा विकार होता. मी अनेक हकीमांची औषधे घेतली; पण गुण काही येईना. लखनौचे प्राध्यापक आणि माझे मित्र इहतिशाम हुसेन यांनी शेवटी मला एक पत्र लिहिले की, येथे लखनौमध्ये हकीम मुन्ने आगा नावाचे हकीम आहेत. ते फार नामांकित आहेत. तुम्ही लखनौला या. आपण तुमची प्रकृती त्यांना दाखवू. मी लखनौला गेलो. आम्ही हकीमसाहेबांना भेटलो. इहतिशाम हुसेन त्यांना म्हणाले, ‘हकीमसाहेब, एजाज हुसेन हे माझे गुरू आहेत. आपण यांचे उपचार काळजीपूर्वक करावे.’ मला त्यांचे हे बोलणे काहीसे चमत्कारिक वाटले. नंतर मला समजले की, इहतिशाम हुसेन यांना हकीमसाहेबांचा स्वभाव माहीत झाला होता. हकीमसाहेब म्हणाले, ‘अहो एजाज-साहेब तुमचे गुरू तर ते माझे भाऊ समजा. मी त्यांना असे औषध देईन की त्यांचा वातविकार दूर झालाच पाहिजे. माझी नाडी पाहण्यापूर्वी हकीमसाहेबांनी प्रथम माझ्या पगाराची चौकशी केली. नंतर माझ्या रोगाची माहिती करून घेतली. यानंतर ते म्हणाले, ‘मी तुम्हाला औषध देतो. योगायोग पाहा, दरभंग्याच्या महाराजांनाही जवळ जवळ हाच विकार आहे. मी त्यांच्यासाठी औषध तयार केले आहे, ते तुम्ही घेऊन जा.’ मी आपल्या रोगाची हकीकत सांगत असताना ते ती प्रसन्न मनाने ऐकत होते.

हाल सुनते हैं मरीजोंका फसाने की तरह

रोगी आपली हकीकत सांगताना ते एखादी कथा ऐकावी तशी आवडीने ऐकतात.

दरभंग्याच्या महाराजांना जवळ जवळ (तोच रोग नव्हे) तोच रोग आहे हे ऐकून मी सचित झालो. मी औषधाची किंमत विचारली. ते म्हणाले, हे औषध मी दुसऱ्याकरिता तयार केले आहे; त्यातून काही वाचले आहे ते तुम्ही घेऊन जा. तुम्हाला विशेष काही खर्च येणार नाही. तुमच्या सगळ्या औषधाची किंमत सातशे रुपये होते. तूर्त तुम्ही निम्मे घेऊन जा. त्याची किंमत साडेतीनशे होईल. तुम्ही

तीनशे दिले तरी चालतील.' हकीमसाहेबांचे उद्गार ऐकून मी सर्द झालो. पण करता काय, माझ्यापाशी दोनशे रुपये होते. त्यात इहतिशाम हुसेन यांनी शंभराची भर घातली. अशा रीतीने हकीमसाहेबांना तीनशे देऊन आणि औषध घेऊन आम्ही परत आलो !

दोन-तीन दिवसांनी आम्ही पुन्हा त्यांच्याकडे गेलो. इहतिशाम हुसेन त्यांना म्हणाले, 'हकीमसाहेब, तुमचा इलाज एजाजसाहेबांना फार महाग पडतो आहे. ते आजारांतून बरे झाले तरी त्यापायी होणाऱ्या खर्चामुळे यांच्या मेंदूवर परिणाम होण्याची शक्यता आहे.' हकीमसाहेब हसून म्हणाले, 'अहो, मी हकीम आहे तसाच ठक पण आहे. माझे रोगी श्रीमंत तरी हवेत नाही तर सुंदर तरी हवेत. नबाब, राजे-महाराजे यांचा इलाज करतो किंवा सुंदर वारांगनांची नाडी पाहतो. त्यांचे सौंदर्य पाहून त्यांच्या नाडीवरचा हात काढावासा वाटत नाही.' हकीम-साहेबांचे हे स्पष्ट बोलणे ऐकून आम्हांला हसू आले. यावर ते म्हणाले, 'तुम्हाला विश्वास वाटणार नाही. पण मुर्शिदाबादेच्या नबाबसाहेबांची हकीकत सांगतो ती ऐका. मी मुर्शिदाबादच्या नबाबाच्या पदरी होतो. एकदा माझ्या पत्नीने लखनौहून पत्र पाठविले की मुलाची सुंता करण्याचा समारंभ आहे. तर दहा हजार रुपये पाठवून द्या. मी पडलो गरीब हकीम. माझ्यापाशी इतके रुपये कुठून असणार ? पण मुहूर्त तर जवळ आलेला. काय करावे, सुचेना. याच विचारात मग्न होऊन मी फिरायला गेलो. नबाबसाहेबांच्या बागेत मी पोहोचलो. बागेचा माळी गढलची फुले (आपल्याकडील कोरांटीच्या फुलांसारखी) उपटून फेकीत होता. मी त्याला विचारले, 'या फुलांचे तुम्ही काय करता ?'

तो म्हणाला, 'मी ती फेकून देतो.' मला एक कल्पना सुचली. मी त्याला म्हटले, 'माझ्याकडे दोन टोपली भरून फुले पाठीव बरे.' फुले आली. मी फुलांचे सरबत तयार केले. त्यात सुगंधी द्रव्ये मिसळली आणि दोन बाटल्या भरून सरबत घेऊन गेलो. नबाबाच्या खानसाम्याला मी दहा रुपये दिले आणि त्याला म्हटले, 'नबाब-साहेब पोलो खेळून येतील तेव्हा त्यांना हे सरबत दे, आणि मी चिठ्ठी लिहून देतो ती त्यांना दे.' चिठ्ठीत मी लिहिले होते, 'आपण निस्संकोचपणे या सरबताचे सेवन करावे.'

माझ्या सांगण्याप्रमाणे खानसाम्याने केले. नबाबसाहेब पोलो खेळून आले. त्यांना खूप तहान लागली होती. त्यांनी माझी चिठ्ठी पाहिली. सरबत पिऊन ते खुष झाले. त्यांनी मला बोलावून घेतले. नबाबसाहेब मला म्हणाले, 'हे सरबत छान आहे. मला फार आवडले. याच्या अजून बाटल्या तयार करा. एका बाटलीला काय खर्च येतो?' मी म्हटले, 'सरकार, पंधरा रुपये.' नबाबसाहेब म्हणाले, 'मग पाचशे बाटल्या सरबत तयार करा पाहू'. मी म्हटले, 'सरकार, एक हजार बाटल्या तयार केल्या तर काटकसर होईल. एका बाटलीला दहा रुपये पडतील.' नबाब-

साहेब खुष झाले. ते म्हणाले, ' कल्पना छान आहे. हजार बाटल्या तयार करा.' मी म्हटले, ' सरकार, मला त्याचे दहा हजार रुपये लागतील. ते मला देण्यासाठी खजिनदाराला हुकूम व्हावा.' नवाबसाहेबांनी लगेच हुकूम लिहून दिला. मी ताबडतोब दहा हजार रुपये उचलले. दोन-तीन दिवसांनी मी सरबताच्या पन्नास बाटल्या घेऊन गेलो. नवाबसाहेबांना मी त्या बाटल्या दिल्या आणि त्यांची परवानगी घेऊन मी लखनौला आलो. मुलाच्या सुंतासमारंभात दहा हजार रुपये खर्च केले.

मी हकीमसाहेबांना विचारले, ' का हो, पन्नास बाटल्यांवरच कसे भागले ? ' हकीमसाहेब हसून म्हणाले, ' अहो, तुम्ही या नबाब लोकांना ओळखत नाही. ही माणसे एकदा हुकूम दिल्यावर विसरून जातात. तुम्हाला आश्चर्य वाटेल, त्या पन्नास बाटल्यांपैकी काही शिल्लक राहिल्या. वर्षभर कोणी याचीही चौकशी केली नाही, की या बाटल्या कशाच्या आहेत आणि का आणल्या आहेत ? '

मी हकीमसाहेबांना म्हटले, ' अहो, यात तुमच्या हिकमत ( वैद्यकी ) च्या ऐवजी मला तर हिकमत अमली ( मुत्सद्देगिरी ) दिसते.'

हकीमसाहेब म्हणाले, ' अहो, असेच करावे लागते. बनारसच्या महाराजांचे उदाहरण घ्या. त्यांना रोग-बीग काही नव्हता. पण रोगाच्या संशयाने ते पछाडले होते. मी हे ओळखले. मी त्यांना साधे टॉनिक दिले. थोडयाच वेळाने मी दरबारात हजर असलेल्या मंडळींना म्हटले, ' पाहा ठाकूरसाहेब, पाहा पंडितजी, महाराजांच्या चेहऱ्यावर काय झपाटयाने तेज येत चालले आहे. ' दरबारी मंडळींना होकार देण्याशिवाय गत्यंतर नव्हते. संध्याकाळी मी औषध देताना महाराजांना म्हटले, ' ईश्वराची कृपा झाली. परवापासून आपण मुर्गीचे मांस ( मुर्गे मुसल्लम ) खाऊ शकाल. ' एका आठवडयात तिसऱ्या दिवशी मीच त्यांना मुर्गी खाऊ घातली. अन्नात थोडी पाचक द्रव्ये घातली होती. महाराजांना रोगच नव्हता. आपण बरे झालो म्हणून ते खुष झाले. मला त्यांनी आठवडाभर ठेवून घेतले. जाताना त्यांनी मला बारा हजार रुपये आणि एक मौल्यवान दुशाल या वस्तू दिल्या. आम्ही त्या घेऊन प्रसन्न चित्ताने लखनौला परत आलो.

. १० .

## प्राध्यापकाची व्यक्तिरेखा

[ उर्दूमधील एका तऱ्हेवाईक प्राध्यापकाच्या काही मनोरंजक आठवणी ]

अलाहाबाद विद्यापीठाचे उर्दूचे सेवानिवृत्त प्राध्यापक एजाज हुसेन हे उर्दू शाखेचे प्रमुख जामिन अली यांच्याबद्दल आपल्या आठवणी देताना लिहितात :

**जामिन अली**

जामिनसाहेबांची उर्दूचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली ती इ. स. १९२४ मध्ये. मी त्या वेळी बी. ए. च्या वर्गात होतो. उर्दू हा माझा विषय होता. जामिनसाहेब हे राहणी-साहणीत पौर्वात्य पद्धतीचा आदर्श होते. चुडीदार पायजामा, शेरवाणी आणि इराणी पद्धतीची उंच टोपी हा त्यांचा पोशाख असे. सुरुवातीला ते मन:पूर्वक काम करीत. काव्याचा अर्थ ते उत्तम रीतीने समजावून देत. पण पुढे हळूहळू त्यांचे लक्ष या कामावरून कमी होऊ लागले. गप्पागोष्टींत ते रंगून जाऊ लागले. मोठ्या माणसांत मिसळणे, मेजवान्या देणे आणि झोडणे हा त्यांचा आवडीचा छंद-बनला. उर्दू शाखेत ते एकटे होते तोपर्यंत ते मेहनतीने काम करीत. पुढे विद्यापीठात उर्दूचे एम. ए.चे वर्ग चालू झाले. आणखी एका प्राध्यापकांची आवश्यकता भासू लागली. या जागेवर सय्यद महंमद हफीज यांची नेमणूक झाली. जामिन अली आणि सय्यद महंमद हफीज यांचे अपसांत कधीच पटले नाही. ते एक दुसऱ्याला पाण्यात पाहू लागले. विद्यार्थ्यांच्या ऐवजी ते स्वत:चाच विचार करू लागले. अशा परिस्थितीत अध्यापन कसले आणि अध्ययन कसले !

जामिनसाहेब नेहमी विचारात मग्न असत. विचार करता करता कधी कधी त्यांचे ओठ हलत. कधी कधी ते हातवारे करीत. लोकांना वाटे की ते कल्पनेतही हफीजसाहेबांशी भांडत आहेत. तुम्ही त्यांच्याशी बोलत असता ते आपल्याच विचारात मग्न असतात आणि मग तुम्ही गप्प झाला की ते आपल्या तंद्रीतून बाहेर येऊन म्हणायचे, ' बेशक, आप सही फर्मा रहे हैं. मैं देखूंगा, बात नाजुक है, सोचने का मौका दीजिये. इन्शाल्ला ! सब ठीक हो जायगा.'– निस्संशय, आपले म्हणणे बरोबर आहे. ही गोष्ट जरा नाजुक आहे. मला विचार करू द्या. परमेश्वर करील तर सगळे काही होईल.'

**उर्दूचा प्रचार**

विद्यापीठात आणि बाहेर जामिनसाहेब हे उर्दूच्या प्रचारार्थ नेहमी झटत यात काही संशय नाही. उर्दूची माधुरी, तिचे महत्त्व, तिचे सर्वव्यापी स्वरूप यावर ते नेहमी प्रभावीपणे बोलत. उर्दूचा प्रचार करणे हे आपले कर्तव्य आहे असे ते समजत. त्यांचे घर म्हणजे एक साहित्य मंदिरच म्हणा ना ! साइल, सफी, साकिब, अजीज इत्यादी कवी वर्षातून एकदा तरी येऊन त्यांच्याकडे दोनचार दिवस राहून जात. इतर साहित्यिकांचीही त्यांच्याकडे ये-जा असे. आगा हश, नाटककार जोश, मलीहाबादी शेख मेहदी हसन नासरी, बेखुद मोहानी इत्यादींची आणि माझी पहिली भेट जामिन अलींच्याच घरी झाली.

बैठकीचे शिष्टाचार पाळण्यात मला जामिनसाहेबांसारखा मनुष्य आढळला नाही. संस्कृती, शिष्टाचार, वागणूक, पाहुणचार, आगत-स्वागत इत्यादींत त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. कदाचित याच कारणांनी त्यांना आपले अध्यापनाचे कार्य समाधानकारक रीतीने पार पाडता येत नसावे. विद्यापीठात ते वक्तशीरपणे आले आहेत असे प्रसंग विरळाच असत. त्यांच्या घरी माणसे बसली असली आणि विद्यापीठात जाण्याची वेळ झाली तरी हे काही तोंडाने म्हणावयाचे नाहीत, की ‘आता तुम्ही जा, मला विद्यापीठात जावयाचे आहे.’ तसे म्हणणे त्यांना पौर्वात्य संस्कृतीच्या विरुद्ध आणि म्हणून अशिष्ट वाटले असते.

**अरेरे, मला का नाही सांगितले ?**

एकदा काय झाले, विद्यापीठात काही योजना आखण्यात आल्या होत्या. त्यामुळे उर्दूच्या खात्याचे नुकसान होण्याची भीती होती. मी आणि इतर काही प्राध्यापक जामिनसाहेबांच्या घरी गेलो. गोष्ट निकडीची होती. संध्याकाळी सहाच्या आधी जे काही करावयाचे ते करणे प्राप्त होते. सहाच्या नंतर मात्र वेळ निघून जाणार होती. आम्ही जामिनसाहेबांच्या घरी जाऊन त्यांना म्हटले, ‘एक महत्त्वाची गोष्ट आपल्या कानावर घालण्यासाठी आम्ही आलो आहोत. आम्हाला एकान्त हवा. तखलिये की जरुरत है. जरा बाजूला चला, आणि आमचे म्हणणे ऐकून घ्या.’ ते म्हणाले, ‘बहोत अच्छा.’ पण एक गृहस्थ तेथे बसले होते. ते आग्र्याचे राहणारे होते. त्यांचे आणि जामिनसाहेबांचे बोलणे संपेना. आम्ही अस्वस्थ होऊ लागलो. एकदुसऱ्याची तोंडे पाहू लागलो. आम्हाला राग येऊ लागला. पण हे सांगावे कसे ? हे शिष्टाचाराच्या विरुद्ध ठरले असते. शेवटी मी धाडस करून म्हटले, ‘आता आम्ही निरोप घेतो. ज्या कामासंबंधी आम्ही आलो होतो त्याबद्दल काही बोलणे आता निरर्थक आहे.’ यावर काहीसे चिडून जामिनसाहेब म्हणाले, ‘चला, तुमचे काय म्हणणे आहे ते ऐकून घेऊ.’ ते उठून उभे राहिले. समोर असलेल्या पाहुण्यांना ते सांगू लागले, ‘तुमचा अशा रीतीने निरोप घ्यावा लागत आहे याचा मला भारी

संकोच वाटतो. पण काय करू ? मी लाचार आहे.' पाहुणे म्हणत, त्यात काय आहे ? आणि जामिन म्हणत, मी शरमेने अर्धमेला झालो आहे.

यातच आणखी पंधरा मिनिटे गेली. शेवटी पाहुण्यांना एकदाचा निरोप देऊन ते आमच्याकडे वळून म्हणाले, 'बोला, काय आहे, क्या बात है ? ' मी काहीसे चिडून म्हटले, 'आता ते सांगणे निरर्थक आहे. वेळ निघून गेली आहे.' हे ऐकून ते घाबरून म्हणाले, 'का, काही काळजीची बातमी आहे काय ? ' मी त्यांना सगळी हकीकत सांगितली. ती ऐकून त्यांना फार वाईट वाटले. ते म्हणाले, 'अरेरे ! हे फार अयोग्य झाले. निरर्थक गोष्टीत मूल्यवान वेळ गेला. तुम्ही विनाकारण संकोचाने वागलात. तुम लोगोंने तकल्लुफसे काम लिया. मला जबरीने उठवावयाचे असते, मुझे जबरदस्ती क्यौं न जगहसे उठा दिया ?' मी म्हटले, 'अहो, तुम्ही महत्त्वाच्या बोलण्यात गुंतला होता. आम्हाला काही सांगण्याची हिंमत झाली नाही.' यावर ते म्हणाले, 'महत्त्वाचे कुठले बोलणे ? पाहुणे आपल्या घरच्या गोष्टी सांगत होते. पण त्यांना मध्येच अडवून बैठक संपविणे मला कठीण होते. तुम्ही मला मूर्ख समजा. पण आपली जुनी संस्कृती आणि शिष्टाचार यांचा निकाल लावणे माझ्याच्याने होणे नाही. तुम लोग चाहे इसे हिमाकत समझो मगर पुरानी तहजीब व अखलाक का खून मैं नहीं कर सकता.' जामिनअलींच्या अशा वागणुकीने वेळेवर त्यांनी कधी वर्ग घेतला आहे असे कधीच घडले नाही. ते वर्गात येईपर्यंत वेळ होऊन गेलेली असे. यानंतर ते ऑफिसचे काम करू लागत. काही विद्यार्थी आलेच तर त्यांना म्हणत, 'किताब खोलो, पढना शुरू करो.'

मुले पुस्तके घेऊन वाचू लागत आणि जामिनसाहेब समोरच्या फायली काढून बसत. मधून मधून एखाद्या शब्दाचा अर्थ सांगत. एखाद्या कवितेचे स्पष्टीकरण आवश्यक असले तर मात्र फायली बाजूला ठेवून ते काव्याचा अर्थ इतक्या उत्तम रीतीने समजावून देत की मुले खुश होत. हे रोज असेच शिकवीत जातील तर किती बरे होईल असेच विद्यार्थ्यांना वाटे.

**यू. टी. सी.**

अलहाबाद विद्यापीठात यू. टी. सी. सुरू करण्यात आली. जामिनसाहेब यू. टी. सी. त दाखल झाले. लोकांना आश्चर्य वाटे ते याचे की, जामीनसाहेबासारखा हळुवार वृत्तीचा आणि पौर्वात्य राहणीत मुरलेला माणूस यू. टी. सी. ची लष्करी शिस्त कशी पाळू शकेल ? पण जामिनसाहेब यू. टी. सी. त एक नाही दोन नाही तब्बल चौदा वर्षे राहिले. आणि सेकंड लेफ्टनंटपासून कॅप्टनच्या हुद्यापर्यंत पोहोचले. ते यू. टी. सी. तही विशेष प्रसंगाने मुशाहिरे ( कवि संमेलने ) घडवून आणीत. बाहेरच्या कवींच्याऐवजी विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्याकडून कविता म्हणवून घेत आणि स्वतःही विनोदी कविता करीत. यू. टी. सी. च्या कँपमध्ये ते राजे-नवाबांसारखे

राहात. त्यांच्या तंबूत एकीकडे टेबल, खुर्ची, कोट, पाटलूण या वस्तू दिसत, तर दुसरीकडे शेरवाणी, चुण्या घातलेला तलम कुडता आणि सलीमशाही जोडा या आढळत. सिग्रेट आणि सिगार याला जोडून हुक्का आणि पानदान असत. एकीकडे लव्हेंडरचा सुगंध तर दुसरीकडे लखनवी अत्तराची खुशबू वातावरण दरवळून टाकी. एकीकडे नाश्त्यासाठी हलवा, मिठायी आणि जेवणासाठी पुलाव, केशरभात, खूर्मा, शीरमाल ही पक्वान्ने तर दुसरीकडे इंग्रजी पद्धतीची जेवणी तयार असत. इंग्रज अधिकारी तर त्यांना नबाब जामिन अली म्हणत. जामिन अलींचा स्वभावच त्यांना अध्ययन– अध्यापनाकडे लक्ष वळवू देत नसे. त्यात वर वर्णिलेले उद्योग– ‘ज्याफती, मेजवान्या आणि गप्पागोष्टी यांची भर; मग काय विचारता? त्यांनी लग्न उशीरा केले. त्या वेळी त्यांचे वय पंचेचाळीस वर्षांचे असावे आणि मग ते पूर्ण अर्थाने कुटुंबवत्सल बनले. हातांना लेखणीची सवय राहिली नाही. पुस्तके कपाटात धूळ खात पडून राहिली. घराबाहेरचा वेळ मित्रांच्या गप्पागोष्टींत किंवा कमिटयांमध्ये जावयाचा. या कारणांनी ते अध्ययन– अध्यापनाच्या कामात कधीच रमू शकले नाहीत.

**इस्तिखारा**

जामिन अली हे धार्मिक प्रवृत्तीचे शियापंथी मुसलमान होते. इस्तिखारा म्हणजे हातातील स्मरणीच्या मण्यांच्या मदतीने शकुन पाहणे. मनाशी धरलेला आकडा आला तर ठरविलेले काम करावे; नाही तर नाही. जामिन अलींची ही सवय इतक्या पराकोटीला गेली होती की त्यांचा हा स्वभाव त्यांच्या मित्रांच्या थट्टेचा विषय बनला होता. उदाहरणार्थ, ते आजारी पडले तर कोणत्या हकीमाला किंवा डॉक्टराला बोलवावयाचे याचा इस्तिखारा (प्रश्न, शकुन) पाहात. बरे, डॉक्टरांनी औषध लिहून दिले की ते घ्यावे की नाही याचा ते इस्तिखारा पाहात. औषध तयार होऊन औषध घेऊ नये असे इस्तिखाऱ्यात निघाले तर औषध फेकून देत. या त्यांच्या स्वभावामुळे कोणी वैद्य, हकीम, डॉक्टर त्यांना उपचार करण्यास कबूल होत नसे.

एकदा उन्हाळयाचा मोसम होता. रात्रीचे दहा वाजले होते. जामिनसाहेबांचा भाचा याकुब हुसेन हा माझ्याकडे आला आणि घाबऱ्याघुबऱ्या सांगू लागला की जामिनसाहेबांची तब्बेत फार बिघडली आहे. तुम्हाला त्यांनी ताबडतोब बोलाविले आहे. मी तसाच उठून त्यांच्या घरी गेलो. त्यांच्याभोवती बरीच मंडळी जमली होती. त्यांत त्यांचे साडू हकीम मूर्तिजा हुसेन हेही होते. जामिनसाहेबांनी मला पाहताच आपल्याजवळ बोलाविले. डोळयांत अश्रू आणून ते म्हणाले, ‘बेटा, मेरा आखरी वक्त आगया. मुझे तुमसे कुछ कहना है इसे वसीयत (मृत्युपत्र) समझकर सुनलो.’ त्यांचे मन रमविण्यासाठी मी त्यांना म्हटले, ‘तुमचा नेहमीचा विनोदी

स्वभाव जात नाही. तुम्ही ज्याला मृत्युपत्र म्हणता त्याला मी गजल समजतो. या गजलेचा अंतिम चरण तुम्ही म्हणण्याआधी मी तुम्हाला विचारतो की, तुम्हाला झाले आहे तरी काय ?' यावर ते म्हणाले, 'तुम्हाला या वेळीही थट्टाच सुचते ना ?' मी म्हटले, 'अहो, तुम्ही या वेळी मरणे शक्य नाही. तुम्हाला पोटात वात धरला आहे म्हणून तुम्ही घाबरला आहात.' ते म्हणाले, 'मी इतक्यात मरत नाही हे तुम्हाला कसे कळले ?' मी म्हटले, 'तुम्हाला माहीतच आहे की मी इंग्रजांच्या कबरस्तान (ग्रेवयार्ड, सिमेटरी) जवळ राहतो. या कबरीची व्यवस्था ठेवण्यासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी यमराज आपल्या दूतांना घेऊन नेहमी तेथे येत असतात. मी इकडे येत होतो तेव्हा ते तेथे उभे होते. मी त्यांना विचारले, 'काय महाशय, कुठे जाण्याचा विचार आहे, कहिये हजरत, किधर का इरादा है ?' यमराज म्हणाले, 'आम्ही यूरोपकडे चाललो आहोत. तेथे लवकरच महायुद्ध सुरू होणार आहे. तुम्ही अगर तुमचे प्राध्यापक जामिन अली यांच्या मागे आम्ही सध्या लागत नाही. जामिनना म्हणावे, आपल्या रोगावर इलाज करा, पण इस्तिखारा पाहण्याच्या भानगडीत पडू नका.' जामिनसाहेब हसले. ते म्हणाले, 'बरे आहे. मी इस्तिखारा पाहात नाही. आपली स्मरणी काढून ठेवतो. मग तर झाले ?'

मी डॉक्टर बॅनर्जींना बोलावण्यासाठी गेलो. गाडीत बसल्यावर त्यांनी विचारले, 'कुठे जायचे आहे ?' मी म्हटले, 'जामिन अलींच्याकडे.' हे ऐकताच ते म्हणाले, 'ओ दॅट इस्तिखारा प्रोफेसर ! काही झाले तरी मी काही त्यांच्याकडे जाणार नाही.' असे म्हणून ते मोटारीतून उतरून चालायला लागले.

असे होते मरहूम सय्यद जामिन अली. अलाहाबाद विद्यापीठाचे उर्दू शाखेचे प्रमुख प्राध्यापक.

गोष्ट लहानशी, पण तिची एक कादंबरीच बनली.

इतनीसी बात थी जिसे अफसाना करदिया.

• ११ •

# आणि हे प्राध्यापक !

**[ अलाहाबाद विद्यापीठातील उर्दूच्या प्रमुख प्राध्यापकांच्या काही मजेदार आठवणी ]**

अलाहाबाद विद्यापीठातील उर्दू शाखेचे सेवानिवृत्त प्रमुख प्राध्यापक डॉक्टर एजाज हुसेन हे प्राध्यापक हफीज सय्यद यांच्या आठवणी सांगताना लिहितात :

इ. स. १९२६ मध्ये उर्दूच्या प्राध्यापकाची एक जागा भरावयाचे ठरले. या जागेसाठी अनेक अर्ज आले. १९२६ पर्यंत हिंदुस्थानातील कोणत्याही विद्यापीठात उर्दू एम. ए. चे वर्ग नव्हते. त्यामुळे अर्जदारांत उर्दू घेऊन एम. ए. झालेले असणे शक्य नव्हते. फारसीचे अध्यापक अगर फारसी घेऊन एम. ए. झालेले अर्जदार होते. हफीज सय्यद हे फक्त बी. ए. होते. बी. ए. मध्येही उर्दू हा त्यांचा विषय नव्हता. ते फक्त बी. ए., एल. टी. होते. अशा स्थितीत त्यांची निवड होणे कठीण होते. जामिनसाहेबांना कोणी एम. ए. ( फारसीचा का असेना ) हवा होता. पण हफीज सय्यद यांनी प्रथमपासूनच ओरड करण्यास सुरुवात केली की, जामिनसाहेब ( उर्दू शाखेचे प्रमुख ) हे शिया आहेत आणि मी शिया पंथाचा त्याग करून सुन्नी झालो आहे, म्हणून ते माझ्याविरुद्ध आहेत. काही ठिकाणी ते सांगत फिरू लागले की मी थिऑसॉफिस्ट आहे. अॅनी बेझंटचा भक्त आहे. सगळ्या प्रमुख धर्मांतील वैशिष्ट्यांवर माझी श्रद्धा आहे. या सर्व प्रचाराचा परिणाम असा झाला की, जामिन अलिसाहेबांचा विरोध असूनही हफिजची उर्दू शाखेत लेक्चरर म्हणून नेमणूक झाली.

हफीजसाहेबांच्या आगमनाने चांगलीच खळबळ उडाली. त्यांची बोलण्याची ढब, आणि सततची आत्मस्तुती यामुळे विद्यापीठाचे इतर प्राध्यापकही गडबडले. त्यांनी दाढीमिशांना काट दिला होता. डोक्यावर केस थोडे होते. पण मानेपाशी आणि कानशिलापाशी बरेच होते. त्यामुळे लांब केस राखल्याचा भास निर्माण होई. तोंडावर देवीचे वण होते. आणि तोंडात कृत्रिम दात बसविलेले होते. हफीजसाहेब नेहमी सुटाबुटात असत. ते गोष्टी करत ते एखाद्या तत्त्वज्ञाप्रमाणे. त्यांच्या बोलण्यात अनेक पौर्वात्य, पाश्चात्य ग्रंथकार, धर्मप्रमुख इत्यादींचे उल्लेख येत. लोकांना

ते ऐकून प्रथमदर्शनी वाटे की, हफीजसाहेबांपाशी प्रचंड माहिती आहे आणि ते अतिशय विद्वान असावेत. ते बहुतेक वेळा इंग्रजीतूनच बोलत आणि नेहमी दोन चार इंग्रजी नियतकालिके जवळ वाळगीत. यांतून हफीजसाहेबांनी केलेली ग्रंथपरीक्षणे असत. त्यांच्यासमोर बसलेल्याने ते लेख वाचून आपली भरपूर स्तुती करावी अशी त्यांची सारखी धडपड असे. सुरुवातीच्या बैठकीत तरी त्यांचे बोलणे ऐकून लोक गारीगार होत यात शंका नाही.

उर्दू शाखेचे प्रमुख सय्यद जामिन अली व हफीज सय्यद यांचा आपसातील विरोध ते मरेपर्यंत टिकला. हफीजसाहेबांचा नेहमी हाच प्रचार असे की, मी सुन्नी म्हणून हे शिया लोक माझा द्वेष करतात. या विरोधामुळे अध्यापनाकडे दोघांचेही दुर्लक्ष झाले.

अशीच शाळा आणि असेच शिक्षक असले तर विद्यार्थ्यांचा निकालच लागला असे समजावे !

गर हमीं मकतब अस्त व ई मुल्ला
कारे तिफलां तमाम ख्वाहद शुद

एजाज हुसेन म्हणतात, मी एम्. ए. च्या वर्गात होतो तेव्हा माझा हफीजसाहेबांशी पहिल्याने संबंध आला. वर्गात मी आणि अमरनाथ बैजल असे दोघेच विद्यार्थी होतो. ते वर्ष १९२६–२७ चे होते. आमच्या उर्दू डिपार्टमेंटचे वातावरण बिघडले होते. काही विद्यार्थी जामिनसाहेबांच्या पक्षाचे तर काही हफीजसाहेबांचे समजले जात. आम्ही जामिन अलीसाहेबांचे आहोत असा हफीज सय्यदांचा ग्रह होता. त्यामुळे ते वर्गात नेहमी आमच्यावर वक्रदृष्टी ठेवून असत. आमचे दोष काढून आम्हाला फजित करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. कधी उच्चाराचे दोष पकडून, तर कधी कवितांचे अर्थ आम्हाला नीट येत नाहीत म्हणून ते आमची टिंगल उडवीत. कधी कधी आम्हाला वर्गाबाहेरही जावे लागे.

### दडपून दिली

एकदा हफीजसाहेब हे आम्हाला कवी अकबर अलाहाबादी यांच्यावर लेक्चर देत होते. त्यांनी एक दीर्घ निबंध लिहून आणला होता. तो आम्ही उतरून घेतला. निबंध उत्कृष्ट असाच होता. आम्ही हफीजसाहेबांच्या विद्वत्तेने अक्षरशः दिपून गेलो. वर्ग संपून आम्ही बाहेर आलो तसे आम्ही त्यांची सारखी स्तुती करीत होतो. तेथून निघून आम्ही विद्यापीठाच्या लायब्ररीत गेलो. परीक्षा जवळ आली होती. अभ्यासासाठी उपयुक्त अशी पुस्तके आणि नियतकालिके आम्ही चाळू लागलो. उर्दू या मासिकाचे जुने अंक चाळता चाळता आमची दृष्टी एका लेखावर खिळली. तो लेख अकबर अलाहाबादीवर होता. लेख लिहिणारे होते सुप्रसिद्ध साहित्यक अब्दुलमाजिद दर्याबादी. आम्ही तो लेख वाचण्यास सुरुवात

केली. वाचता वाचता आम्ही सारखे बुचकळ्यात पडत होतो. आणि एकमेकांच्या तोंडाकडे पाहात होतो. लेख वाचून झाल्यावर आम्हा दोघांना हसू कोसळले. तो लेख म्हणजे प्राध्यापक हफीज यांनी आपला म्हणून आम्हाला वाचून दाखवलेला आणि लिहिण्यास लावलेला निबंधच. हा लेख अब्दुलमाजिदनी चार वर्षांपूर्वी लिहिला होता. त्या वेळी अकबर अलाहाबादींना मरून दोन वर्षे झाली होती. त्यात आजपर्यंत चार वर्षांची भर पडली होती. पण हफीजसाहेबांनी आम्हास लिहिण्यास लावलेल्या निबंधात अकबरना मरून दोन वर्षे झाली असेच होते. खरे म्हणजे 'सहा वर्षे' असायला हवे होते.

आम्ही तो अंक लायब्ररीतून काढला आणि बरोबर घेतला. दुसऱ्या दिवशी प्राध्यापक हफीज वर्गात आले. आम्ही मोठ्या आदराने आणि गंभीरपणे त्यांना विचारले, 'आपण काल अकबर अलाहाबादीवर जो निबंध सांगितला तो खरोखरीच अप्रतिम होता. पण एक गोष्ट आमच्या लक्षात येत नाही. हाच लेख चार वर्षांपूर्वी छापला आहे. लेखक म्हणून आपले नाव नाही, अब्दुलमाजिद दर्याबादी यांचे नाव आहे. असे कसे झाले ?'

प्राध्यापकांनी काहीसे घाबरूनच आम्हाला विचारले, 'तुम्हाला कसे कळले ? कैसे मालूम ?' आम्ही तो अंक त्यांना दाखविला. हफीजसाहेब बराच वेळपर्यंत तो लेख पाहात होते. यानंतर एक दीर्घ निःश्वास सोडून ते आम्हांला म्हणाले, 'इसका जवाब कल दूंगा, याचे उत्तर उद्या देईन.'

दुसऱ्या दिवशी त्यांनी उत्तर दिले ते हे : 'मी आणि अब्दुलमाजिद यांनी एकाच ठिकाणी बसून अकबर अलाहाबादीवर लेख लिहिले आणि 'उर्दू' मासिकात पाठवून दिले. संपादकांना माहीत होते की मी आणि अब्दुलमाजिद म्हणजे एक आत्मा आणि दोन शरीरे. त्यांनी चुकून माझ्या लेखावर अब्दुलमाजिदचे नाव छापले.'

हफीजसाहेबांचे हे सारवासारवीचे उत्तर ऐकून आम्ही खो खो करून हसू लागलो. त्यांना आमचे हसणे आवडले नाही. ते आमच्यावर भयंकर रागावले आणि आम्हाला अद्वातद्वा बोलू लागले. त्यांनी जे शब्द वापरले ते सांगण्यासारखे नाहीत. फिर वो कहा जो काबिले इजहार भी नहीं. आम्ही ही जशास तसे म्हणून त्यांची हजेरी घेतली. हफीजसाहेबांनी आम्हाला वर्गाच्या बाहेर घालविले. आम्ही घडलेली हकीकत विद्यापीठाचे उपकुलगुरू गंगानाथ झा यांना लिहून कळविली. त्यांनी हफीजसाहेबांचा जाब मागितला. शेवटी असे ठरले की, आम्ही यापुढे हफीजसाहेबांच्या वर्गात जाऊ नये. अशा रीतीने या प्रकरणाचा शेवट झाला.

**ग्रंथालय**

हफीजसाहेबांना ग्रंथ जमविण्याचा नाद होता. पण याच्यामागे स्वतःच्या

बडेजावाचेच प्रदर्शन व्हावे ही वृत्ती होती. मरहूम प्राध्यापक मेहदी हसन नासरी यांना ते म्हणाले, 'अहो, पाहिलेत ना माझ्या ग्रंथालयात कशी आणि किती पुस्तके आहेत ती ! असे असूनही जामिनसाहेब मला नालायक समजतात, याला काय म्हणावे ! मला तर काही समजत नाही.' यावर नासरी म्हणाले, 'मला समजले. आपल्या अलाहाबादमधील प्रसिद्ध ग्रंथविक्रेते रामनारायणलाल यांच्या दुकानात यापेक्षा किती तरी अधिक पुस्तके आहेत. पण म्हणून त्यांना कोणी विद्वान समजत नाही.'

**डॉक्टरची पदवी**

हफीज सय्यद हे मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेला बसले आणि तेथून त्यांनी एम. ए.ची पदवी घेतली. यानंतर इ. स. १९३० मध्ये ते डॉक्टरेट मिळविण्यासाठी म्हणून यूरोपला गेले. इंग्लंडमध्ये त्यांनी उर्दू कवी बहरी याच्या 'मनलगन' या काव्यावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविली. फ्रान्समधील माउंटप्लेर विद्यापीठात त्यांनी फ्रेंच भाषेत एक प्रबंध लिहिला. विषय होता, 'हिंदू तत्त्वज्ञानातील आशावाद.' यावर त्यांना डी. लिटाची पदवी मिळाली.

यूरोपहून परत आल्यावर हफीजसाहेब कित्येक महिने आम्हाला यूरोपच्या गप्पा सांगत. यूरोपमध्ये असताना त्यांना भेटण्यास आलेल्या बडयाबडया व्यक्तींची व्हिजिटिंग कार्डस त्यांनी जपून ठेवली होती. येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींना ती कार्डे दाखवून ते म्हणत, 'तुम्ही मला काय समजता ? किती मोठी माणसे मला भेटण्यास येत ते पाहा.– आप मुझे क्या समझते हैं ? ऐसे बडबडे लोग मुझसे मिलने आया करते थे.'

एक दिवस त्यांना मी विचारले, 'डॉक्टरसाहेब, आपण विलायतेत एका उर्दू कवीवर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविली. पण तुमचा मार्गदर्शक प्राध्यापक कोण होता ? तो उर्दू भाषेचा कोणी विद्वान असावा.' हफीजसाहेब म्हणाले, 'अहो, काय विचारता, त्याला फक्त उर्दू बोललेले समजत असे.' मी म्हटले, 'अशा माणसाच्या मार्गदर्शनाखाली उर्दू कावीवर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविण्यात काय फायदा ?' ते म्हणाले, 'मी एकच डिग्री मिळविण्यासाठी थोडाच गेलो होतो ? मला तर अनेक डिग्ऱ्या मिळवायच्या होत्या. पाहा, मी दोनदोन, तीन-तीन डॉक्टरेट मिळविलेच की नाही ? हिंदुस्थानात हे शक्य झाले नसते. पण इतके करूनही विद्यापीठाने माझा पगार वाढविला नाही. येथे गुणग्राहकता अशी नाहीच.'

मी म्हटले, 'आहे खरे. पण विद्यापीठाचे जाऊ द्या. आमच्या नजरेत तर आपली प्रतिष्ठा द्विगुणित झाली आहे. आम्ही सगळेजण आपल्याला डॉक्टरच म्हणतो.'

ते म्हणाले, बरोबर आहे. मानही काही कमी नाही. मला विद्यापीठाची

काय पर्वा आहे ! जगाला माझी कदर आहे. पाहा पाहा ही विजिटिंग कार्डे. कशी कशी माणसे मला भेटण्यास येत.'

असे म्हणून त्यांनी कार्डे माझ्यासमोर धरली.

**उदारमतवादी ?**

हफीजसाहेब आपल्याला थिऑसाफिस्ट म्हणवीत. कधी कधी भगवी कफनी घालून खडावा वाजवीत ते रस्त्यावरून जात. असेच जात असता त्यांना वाटेत प्राध्यापक सूरजप्रसाद खत्री हे भेटले. 'हुजुर, कुटीतून निघून स्मशानाकडे चाललात का कुठे देवळात जाण्याचा बेत आहे ?' हफीजसाहेब म्हणाले, 'काय हो, तुम्ही मला साधू समजत नाही ? पाहा, माझ्या खिशात गीता आहे.' प्राध्यापक खत्री म्हणाले, 'तुमचे अनेक खिसे आहेत. एखाद्या खिशातून बायबलही बाहेर पडावयाचे.' यावर हसून ते म्हणाले, 'हे पाहा, मी मेल्यावर माझे हिंदू पद्धतीने दहन करा बरे का.' खत्री म्हणाले, 'अहो, तुमचे मरण काही सोपे नाही. आणि मग हिंदूंच्या दोन मण लाकडांचा नाश करण्याच्या मागे का लागला ?'

हफीजसाहेब वृत्तीने व्यवहारी होते. पण आपल्याला अध्यात्मात मोठा अधिकार आहे असे ते भासवीत. पण त्यांच्या या वागणुकीने काही माणसे विरोधक बनली, तर अनेकांना ते कोणी साधुपुरुष असावेत असे वाटू लागले. यामुळे त्यांच्या नोकरीत आणि इतर व्यवहारांत त्यांना लाभच झाला.

अग्निपूजक, मूर्तिपूजक आणि मुसलमान हे सर्व माझ्या हाताचे चुंबन घेतील. माझ्या एका हातात मूर्ती तर दुसऱ्या हातात कुराण ही राहतील.

हाथ चूमेंगे मिरे गब्र व मुसलमान दोनों
एक में दस्तें सनम एक में कुरां होगा

सारांश काय, अशा रीतीने हफीजसाहेबांनी यशस्वी रीतीने आपली जीवनयात्रा संपविली !

असे होते डॉक्टर महंमद हफीज सय्यद, अलाहाबाद विद्यापीठाचे उर्दू शाखेचे प्रमुख.

. १२ .

# कविश्रेष्ठ दाग

[ सुप्रसिद्ध उर्दू कविश्रेष्ठ दाग यांच्या आठवणी ]

सुप्रसिद्ध उर्दू कविश्रेष्ठ दाग (जन्म १८३१, मृत्यू १९०५) यांनी वेळोवेळी आपल्या आयुष्यातील अनेक आठवणी सांगितल्या आहेत. त्यांपैकी पुढे काही दिल्या आहेत. दाग म्हणतात,

काव्यरचनेत मी प्रथम बहादुरशहा बादशहा ( शेवटचा मोगल बादशहा ) यांचे युवराज फतेहुल्मुल्क मिर्जा फखरू (हे दागचे सावत्र वडील) याचा शिष्य झालो. माझे ' दाग ' हे कवितेतील नाव त्यांनीच ठेवले. माझ्या दोन चार गजलांची दुरुस्ती त्यांनी केली. यानंतर त्यांनी मला राजकवी जौक यांचे शिष्यत्व पत्करण्यास सांगितले. हा समारंभ हजरत कुतबुद्दीन बखत्यार काकी यांच्या दर्ग्यात पार पडला. त्या वेळी बहादुरशहा आणि मिर्जा फखरू हे दोघेही हजर होते. मिर्जा फखरू यांनी माझ्याकडून राजकवी जौक यांना एक शाल आणि पाच अश्रफ्या भेट म्हणून दिल्या. जौकनी त्याच वेळी माझ्या एका गजलेत सुधारणा करून दिली. अशा रीतीने मी जौकचा शिष्य झालो. त्या दिवसापासून मी रोज दुपारी त्यांच्या घरी जात असे. आणि संध्याकाळपर्यंत त्यांच्यापाशी राहात असे. जौक हे बादशहाच्या आणि माझ्या कवितांत सुधारणा करावयाच्या त्या स्वतः लिहून काढीत. इतर शिष्यांच्या कविता एकजण वाचून दाखवी आणि ते काय सुधारणा करावयाच्या ते सांगत. त्या तो उतरून घेई. अर्थात बैठकीत त्या वेळी कोणी नसल्यास ते स्वतः दुरुस्त्या लिहून काढीत.

लाल किल्ल्यातील वातावरण नृत्यगायन, काव्यरचना इत्यादींनी भरून गेले होते. मेलेली हृदयेही जिवंत होऊन उठावी असे ते वातावरण होते. मी तर जन्माबरोबरच संवेदनाशील हृदय घेऊन आलो होतो. हृदयात प्रेमाच्या लहरी उठू लागल्या. साहजिकच मन काव्यरचनेकडे वळू लागले. त्यात बहादुरशहा बादशहा आणि युवराज मिर्जा फखरू यांची माझ्यावर पूर्ण कृपा. मग काय विचारता ? माझ्या कवितांची चांगलीच प्रसिद्धी होऊ लागली. सहबाई, आजुर्दा, मिर्जा गालिब इत्यादी विद्वान आणि कवी हे माझे कौतुक करू लागले.

**गालिब आणि दाग !**

एकदा मिर्जा गालिब हे एक गजल घेऊन बहादुरशहापाशी आले. गजलेतील दोन ओळी पुढीलप्रमाणे होत्या :

तुझ्या परिसरातून आज आम्ही अपमान आणि अप्रतिष्ठा घेऊन बाहेर पडलो. स्वर्गातून आदिमानवाला कसे निघावे लागले याची कथा आम्ही ऐकत होतो. तिची प्रचीती आज आली,

निकलना खुल्दसे आदम का सुनते आये थे लेकिन
बहोत बे आबरु होकर तिरे कूचेसे हम निकले

बादशहांना या धाटणीची कविता फार आवडली. ओळींचा शेवटचा शब्द 'निकले' या धर्तीवर मुशाहऱ्यातून कविता म्हटल्या जाव्या अशी त्यांनी आज्ञा केली.

मी त्या वेळी अज्ञान होतो. उत्साहाच्या भरात मी एक गजल तयार केली. आणि मुशाहऱ्यात हजर झालो. माझ्या गजलेतील पुढील दोन ओळी मी म्हटल्या,

माझ्या दीर्घ निःश्वासांचा काहीच परिणाम झाला नाही; त्यामुळे तर ती गर्वाने फुगून गेली आहे. आमचा भ्रमाचा भोपळा फुटला. परमेश्वरा ! अशी आपत्ती कुणाच्याही वाट्याला न येवो.

हुये मगरुर जब के आप मेरी बे असर देखी
किसीका इस तरह यार बन दुनिया में भरम निकले

बादशहांना या ओळी फार आवडल्या. त्यांनी मला जवळ बोलावून माझ्या कपाळाचे चुंबन घेतले.

मिर्जा गालिब याची ही गजल प्रसिद्ध आहे.

पूर्वी आम्हाला आमच्या मनःस्थितीचे हसू येत असे. आता आमची उदासीनता पराकोटीला गेली आहे. आता कशाचेही हसू येत नाही.

आगे आती थी हाले दिल पे हंसी
अब किसी बात पर नहीं आती

याच धाटणीवर मी पुढील ओळी रचून म्हटल्या. तरुणीच्यावर आमचे मन जात नाही असे नाही. पण हे प्रिये ! तुझ्याकडे जसे आम्ही आकृष्ट झालो तसे इतरांच्या बाबतीत झाले नाही.

दिलबरोंपर तबीयत आती है
इसतरह इस कदर नहीं आती

गालिबनी या ओळी माझ्याकडून अनेकदा म्हणवून घेतल्या. त्यांना त्या भारी आवडल्या. यानंतर पुढील ओळी म्हटल्या,

हृदय जिंकून घेण्यासाठी योजावयाचे मार्ग भिन्न आहेत. अगे, हे हृदय तुला फुकट मिळणार नाही.

दिलके लेनेकी घात है कुछ और
ये तुझे मुफ्त बर नहीं आती

या ओळी ऐकताच गालिब तळमळून गेले. आपल्या मांडीवर हात आपटून ते म्हणाले, ' खुदा नजरे बद से बचाये,–परमेश्वरा, तुला कुणाची दृष्ट लागू न देवो, वाईट नजरेपासून तुझे रक्षण करो. साहबजादे, तुमने कमाल कर दिया,–बेटा, तू तर कमालच केलीस.'

मी दर दोन-तीन दिवसांनी गालिबच्या सेवेत हजर होत असे. आम्ही अनेक विषयांवर बोलत असू. आम्ही बुद्धिबळे खेळत असू. मी हरलो की गालिब म्हणत, ' आता तुम्ही आपली एक गजल म्हणून दाखवलीच पाहिजे. हाच तुम्हांला दंड.' असाच एकदा मी डाव हरलो असताना गालिब म्हणाले, ' हं, होऊ द्या एक गजल.' मी गजल म्हणणार होतो तोच गालिब म्हणाले, ' नाउमीदी उसकी देखा चाहिये. या माझ्या कवितेच्या धाटणीवर तुम्ही गजल म्हणून दाखवा.' मी लगेच पुढील ओळी म्हटल्या,

बा कालचक्रा, प्रलयच का होईना, एकदा होऊन जाऊ दे. काहीच घडत नाही. डोळ्यांना ते दृश्य तरी दिसू दे.

अय फलक सामाने महशरही सही
अपनी आखों को तमाशा चाहिये

गालिब म्हणाले, ' वाहवा, माझ्या गजलेतील अर्थ तुम्ही बरोबर व्यक्त केलात.' असे म्हणून त्यांनी आपल्या स्वतःच्या पुढील ओळी म्हणून दाखविल्या. सारखे काही ना काही घडत राहिले पाहिजे. यानेच घराची कळा राहते. सुखाचे प्रसंग नाही तर दुःखाचे का असेनात,

एक हंगामेंपे मौकूफ है घर की रौनक
नौहाये गम ही सही नग्माये शादी न सही

यानंतर मी पुढील ओळी म्हटल्या,

तुझ्या रूपाबद्दल काय म्हणावे ? पण तुझ्याकडे टक लावून जे पाहात आहेत ते खरे प्रेक्षणीय आहेत.

तेरे जल्वे का तो क्या कहना मगर
देखने वाले की देखा चाहिये

या ओळी ऐकून गालिब स्तिमित झाले. यापुढील ओळी या होत्या,

उद्या तुझ्या नजरेतून आम्ही उतरलो तर उतरू दे, पण आज तरी आम्हाला

राह्यला जागा पाहिज. तुझ्या नजरेत आम्हाला स्थान दे बरे.

जो तिरी नजरों से कल गिर ही पडे
आज तो कोयी ठिकाना चाहिये

या ओळी ऐकताच गालिब अगदी विव्हल झाले. ते मला म्हणाले, 'थांब.' त्यानंतर ते उठले. त्यांनी माझ्याभोवती चार वेळ प्रदक्षिणा घातली. प्रदक्षिणेच्या वेळी ते पुन्हा पुन्हा माझ्या वरील ओळी गुणगुणत होते.

**जौक आणि दाग**

आपल्या वयाच्या अकराव्या वर्षी दाग हे जौकचे शिष्य झाले. हा गुरुशिष्य-संबंध चौदा वर्षे टिकला. तो जौकच्या मृत्यूनेच तुटला.

कधी कधी जौकने दोन ओळी म्हणाव्या आणि उत्तरादाखल दागनी त्याच धाटणीच्या ओळी म्हणून दाखवाव्या, असेही होत असे.

एकदा जौकने म्हटले, 'दाग, या ओळी पाहा. ज्याला पूर्वी ठोकरा बसल्या आहेत त्याने प्रेमाच्या मार्गात सांभाळून चालावे.

रखे कदम संभलके रहे इश्क में वही
आगे भी जिसको ठोकर लगी हुयी

मी माझ्या ओळी म्हटल्या,

बा व्याकुळ हृदया, ही कुणाची झळ लागते आहे? छातीत आग पेटल्या-सारखी वाटते आहे.

ये किसीकी लौ है अय दिल मुज्ततर लगी हुयी
इक आग सी है सीनेके अंदर लगी हुयी

जौक म्हणाले,

तुझ्या पापण्यांवर हे हृदय टांगले आहे. या पापण्या कसल्या, काळजात पाश रुतला आहे.

मिजगांसे तेरी लाग है दिल पर लगी हुयी
इक फांस सी कलेजेके अंदर लगी हुयी

मी पुढील ओळी म्हटल्या :

हा कर्मठ मदिरा नको नको म्हणत आहे. हे वरकरणी आहे. आतून ही द्राक्ष-कन्या नक्कीच याला चिकटलेली आहे.

बेशक है कुछ लगाव जो करता है ये गुरेज
जाहिद से दुख्ते रज है मुकर लगी हुयी

यावर जौकनी आपल्या ओळी म्हटल्या,

हृदय जिंकून घेण्यासाठी योजावयाचे मार्ग भिन्न आहेत. अगे, हे हृदय तुला फुकट मिळणार नाही.

दिलके लेनेकी घात है कुछ और
ये तुझे मुफ्त बर नहीं आती

या ओळी ऐकताच गालिब तळमळून गेले. आपल्या मांडीवर हात आपटून ते म्हणाले, 'खुदा नजरे बद से बचाये,–परमेश्वरा, तुला कुणाची दृष्ट लागू न देवो, वाईट नजरेपासून तुझे रक्षण करो. साहबजादे, तुमने कमाल कर दिया,–बेटा, तू तर कमालच केलीस.'

मी दर दोन-तीन दिवसांनी गालिबच्या सेवेत हजर होत असे. आम्ही अनेक विषयांवर बोलत असू. आम्ही बुद्धिबळे खेळत असू. मी हरलो की गालिब म्हणत, 'आता तुम्ही आपली एक गजल म्हणून दाखवलीच पाहिजे. हाच तुम्हांला दंड.' असाच एकदा मी डाव हरलो असताना गालिब म्हणाले, 'हं, होऊ द्या एक गजल.' मी गजल म्हणणार होतो तोच गालिब म्हणाले, 'नाउमीदी उसकी देखा चाहिये. या माझ्या कवितेच्या धाटणीवर तुम्ही गजल म्हणून दाखवा.' मी लगेच पुढील ओळी म्हटल्या,

बा कालचक्रा, प्रलयच का होईना, एकदा होऊन जाऊ दे. काहीच घडत नाही. डोळ्यांना ते दृश्य तरी दिसू दे.

अय फलक सामाने महशरही सही
अपनी आखों को तमाशा चाहिये

गालिब म्हणाले, 'वाहवा, माझ्या गजलेतील अर्थ तुम्ही बरोबर व्यक्त केलात.' असे म्हणून त्यांनी आपल्या स्वतःच्या पुढील ओळी म्हणून दाखविल्या. सारखे काही ना काही घडत राहिले पाहिजे. यानेच घराची कळा राहते. सुखाचे प्रसंग नाही तर दुःखाचे का असेनात,

एक हंगामेंपे मौकूफ है घर की रौनक
नौहाये गम ही सही नग्माये शादी न सही

यानंतर मी पुढील ओळी म्हटल्या,

तुझ्या रूपाबद्दल काय म्हणावे ? पण तुझ्याकडे टक लावून जे पाहात आहेत ते खरे प्रेक्षणीय आहेत.

तेरे जल्वे का तो क्या कहना मगर
देखने वाले की देखा चाहिये

या ओळी ऐकून गालिब स्तिमित झाले. यापुढील ओळी या होत्या,

उद्या तुझ्या नजरेतून आम्ही उतरलो तर उतरू दे, पण आज तरी आम्हाला

राह्यला जागा पाहिज. तुझ्या नजरेत आम्हाला स्थान दे बरे.

जो तिरी नजरों से कल गिर ही पडे
आज तो कोयी ठिकाना चाहिये

या ओळी ऐकताच गालिब अगदी विव्हल झाले. ते मला म्हणाले, ' थांब.' त्यानंतर ते उठले. त्यांनी माझ्याभोवती चार वेळ प्रदक्षिणा घातली. प्रदक्षिणेच्या वेळी ते पुन्हा पुन्हा माझ्या वरील ओळी गुणगुणत होते.

**जौक आणि दाग**

आपल्या वयाच्या अकराव्या वर्षी दाग हे जौकचे शिष्य झाले. हा गुरुशिष्य-संबंध चौदा वर्षे टिकला. तो जौकच्या मृत्यूनेच तुटला.

कधी कधी जौकने दोन ओळी म्हणाव्या आणि उत्तरादाखल दागनी त्याच धाटणीच्या ओळी म्हणून दाखवाव्या, असेही होत असे.

एकदा जौकने म्हटले, ' दाग, या ओळी पाहा. ज्याला पूर्वी ठोकरा बसल्या आहेत त्याने प्रेमाच्या मार्गात सांभाळून चालावे.

रखे कदम संभलके रहे इश्क में वही
आगे भी जिसको ठोकर लगी हुयी

मी माझ्या ओळी म्हटल्या,

बा व्याकुळ हृदया, ही कुणाची झळ लागते आहे ? छातीत आग पेटल्यासारखी वाटते आहे.

ये किसीकी लौ है अय दिल मुज्ततर लगी हुयी
इक आग सी है सीनेके अंदर लगी हुयी

जौक म्हणाले,

तुझ्या पापण्यांवर हे हृदय टांगले आहे. या पापण्या कसल्या, काळजात पाश रुतला आहे.

मिजगांसे तेरी लाग है दिल पर लगी हुयी
इक फांस सी कलेजेके अंदर लगी हुयी

मी पुढील ओळी म्हटल्या :

हा कर्मठ मदिरा नको नको म्हणत आहे. हे वरकरणी आहे. आतून ही द्राक्ष-कन्या नक्कीच याला चिकटलेली आहे.

बेशक है कुछ लगाव जो करता है ये गुरेज
जाहिद से दुख्ते रज है मुकर लगी हुयी

यावर जौकनी आपल्या ओळी म्हटल्या,

या हंड्याच्या आतून ही ज्योत हळूच बाहेर पाहते आहे. पतंगावरही ही अनुरक्त झालेली दिसते.

करते है जेरे बुर्काये फानूस ताक झांक
परवाने से है शम्मा मुकर्रर लगी हुयी

जौक म्हणाले, 'बोला, दाग, तुमच्या ओळी चांगल्या का माझ्या ?' मी नम्रपणे म्हणालो, 'उस्ताद, आपका शेर बहोत रोशन है, आपली कविता दैदीप्यमान (शमा परवाना ज्योत पतंग यांचा उल्लेख म्हणून ) आहे.'

**जलाल आणि दाग**

'एका मुशाहऱ्यात' दाग म्हणतात, कवी जलाल हजर असताना मी पुढील ओळी म्हटल्या,

तुझ्या जादूगार नयनांची कमाल आहे. त्यांच्यामुळे एकजण बरा होतो तर एक आजारी पडतो.

ये तिरी चश्मे फुसूंगर में कमाल अच्छग है
एक का हाल बुरा एक का अच्छा है

कवी जलालनी माझ्या ओळींचा पहिला चरण बदलून पुढील ओळी म्हटल्या,

माझे हृदय आणि तुझे डोळे, दोन्ही आजारी; पण एकाची स्थिती चांगली (तुझ्या डोळ्यांची ) तर दुसऱ्याची वाईट ( माझ्या हृदयाची, )

दिल मिरा आंख तिरी दोनों हैं बीमार
मगर एक का हाल बुरा एक का हाल अच्छा है

कवी जलालच्या एका शिष्याने एक मुशाहरा केला होता. त्यात मी पुढील ओळी म्हटल्या,

अगे तुझा हट्टच आहे ना. तुझ्यासाठी मी आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या स्वागतासाठी माझ्या डोळ्यांच्या पायघड्या करण्यास तयार आहे. पण काय करू ? या डोळ्यांत तुझी मूर्ती बसली आहे ना. तिच्या पायघड्या कशा कराव्या ?

आंखें बिछाये हम तो अदू की राह में
पर क्या करें के तू है हमारी निगाह में

दाग म्हणतात, 'या ओळी मी म्हटल्या मात्र, मुशाहऱ्यातील मंडळींनी स्तुतीचा वर्षाव केला. त्यांनी सभागृह अक्षरशः डोक्यावर घेतले. काहींनी तर आपल्या कविता फाडून माझ्यासमोर ठेवल्या. माझ्या लोकप्रियतेने मी धन्य झालो. मंडळींनी कमीत कमी वीस पंचवीस वेळा माझ्याकडून वरील ओळी म्हणवून घेतल्या. तरी त्यांचे पोट भरले नाही. माझे इतके कौतुक पुन्हा क्वचितच झाले असेल.

**दाग आणि निजाम !**

दागनी निजामच्या दरबारात नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला. पण कित्येक दिवस त्यांच्या प्रयत्नास यश आले नाही. पण एकदा ते राजवाड्यात गेले असता निजाम महबूब अलीखान (जन्म १८६६, मृत्यू १९११) यांनी त्यांना कविता म्हणण्यास सांगितले. दागही मोठे समयसूचक. त्यांनी तात्काळ पुढील ओळी म्हटल्या,

आमचे हे वैभवाचे दिवस आज मन्सूरने पाहिले तर, तोसुद्धा अहंब्रह्मास्मिचा घोष सोडून माझे स्तुतिगान करू लागेल. दाग, तुझी चर्चा ज्याच्या त्याच्या तोंडी राहील. तुझा वैभवाचा काळ आता जवळ येतोच आहे.

देखे मन्सूर अगर आज जमाना तेरा
हो अनलहककी जगह लब पे तराना तेरा
दाग हर एक जबा पर हो फसाना तेरा
वो दिन आते हैं वो आता है जमाना तेरा

यानंतर थोड्याच दिवसांनी दाग यांची निजामाचे राजकवी म्हणून नेमणूक झाली.

. १३ .

# साक्षरतेचे प्रयोग

**[अफगाणिस्तानचे राजे अब्दुरहमनखान (१८८० ते १९०१) यांनी आपले आत्मचरित्र लिहून ठेवले आहे; त्यातलाच हा काही मनोरंजक भाग]**

अफगाणिस्तानचे राजे अमीर अब्दुरहमनखान ( जन्म इ. स. १८४२, मृत्यू तीन ऑक्टोबर १९०१) हे आपल्या आत्मचरित्रात लिहितात—

माझे वडील अमीर महंमद अफजलखान (बलख प्रांताचे सुभेदार आणि राजे दोस्त महंमदखान यांचे पुत्र, मृत्यू इ. स. १८६७) यांनी माझ्या शिक्षणाची उत्तम सोय केली होती. पण लिहिणे-वाचणे शिकण्यात माझे मन मुळीच लागत नसे. या दृष्टीने मी खराच ढ होतो. दिलेले धडे पाठ करणे अगदी जिवावर येई. स्वारी-शिकारीचेच विचार सदैव डोक्यात घोळत असत. आज धडा पाठ केला की दुसऱ्या दिवशी मी तो विसरून जात असे. पण अभ्यासावाचून गत्यंतर नव्हते. माझ्या शिक्षकाने आपल्या कामात मुळीच कुचराई केली नाही. पण शिक्षणाकडे माझेच लक्ष नव्हते, त्याला ते तरी काय करतील ?

**मी साक्षर कसा झालो ?**

या गोष्टीला काही वर्षे झाली. काबुलचे सुभेदार अमीर आज्जमखान यांच्या मुलीशी माझा विवाह होणार होता. एके दिवशी मी माझ्या तख्तापुल नगरात दरबार करीत होतो. त्या वेळी काबुलहून माझ्या नावाने एक पत्र आले. ते पत्र माझ्या प्रेयसीचे, अमीर आज्जमखानाच्या मुलीचे होते. तिने पत्र आणणाऱ्या दूताला बजावले होते की, हे पत्र अब्दुरहमनच्या हातात दे आणि याचे उत्तर त्यांच्याचकडून लिहून घेऊन मोहरबंद लखोटयात घेऊन ये.

मला तर लिहिता-वाचता येत नव्हते. जे काही लिहिणे-वाचणे शिकलो होतो ते मी पूर्णपणे विसरून गेलो होतो. माझ्या प्रेयसीचे पत्र पाहून माझ्या मनाची स्थिती काय झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी ! माझी छाती धडधड करू लागली. कितीदा तरी मी स्वतःचा धिक्कार केला. प्रेयसीचे पत्रसुद्धा वाचता येऊ नये, यापेक्षा शरमेची कोणती गोष्ट असू शकेल.? मी भला माणूस होतो. पण मी निरक्षर होतो. ही गोष्ट माझ्या मनाला फार लागली त्या दिवशी मी सगळे

कामकाज आटोपून रात्री बिछान्यावर पडलो. पण अतीव दुःखाने माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या होत्या. मी परमेश्वराची करुणा भाकली. दिवंगत साधु-संतांनी परमेश्वरापाशी माझी शिफारस करावी म्हणून त्यांचीही प्रार्थना केली. परमेश्वराला आळविताना मी म्हटले, 'अय खुदावंत पाक, मला ज्ञान दे. ज्ञानाच्या योगे माझे हृदय प्रकाशमान होऊ दे. मला लिहिणे-वाचणे येऊ दे. जनसमाजात मला तू शरमिंदा होऊ देणार नाहीस याची मला खात्री आहे.'

**स्वप्न**

रात्रभर मी रडत होतो. पहाटे कुठे माझा डोळा लागला. मला स्वप्न पडले. स्वप्नात मला एका साधुपुरुषाचे दर्शन घडले. तो मध्यम उंचीचा होता. पण ताठ उभा होता. त्याचे डोळे बदामाच्या आकृतीप्रमाणे होते. भुवया कोरीव होत्या. त्याला लांब दाढी होती. चेहरा गौरवर्ण होता. त्याच्या हाताची बोटे लांबसडक आणि पातळ होती. त्याने भुऱ्या रंगाचे पागोटे घातले होते. त्याच्या कमरेला शेला होता. त्याच्या हातात एक लांब काठी होती. काठीला लोखंडाची मूठ बसविली होती. मला भास झाला तो हा की, तो साधुपुरुष माझ्या डोक्यापाशी उभा आहे. तो मला हळूच सांगत आहे, "अब्दु-रहमन, ऊठ आणि लिहिण्यास लाग." मी दचकून जागा झालो. पाहतो तो आसपास कोणीच नव्हते. मी पुन्हा झोपी गेलो. स्वप्नात तो साधुपुरुष पुन्हा आला आणि म्हणाला, "मी तुला सांगितले ना लिही म्हणून, आणि तू झोप काढतो आहेस!" मला पुन्हा जाग आली. पाहतो तो तेथे कोणीच नव्हते. मी पुन्हा झोपी गेलो. स्वप्नात पुन्हा तो साधुपुरुष आला आणि दरडावून म्हणाला, "या खेपेस तू पुनः झोपलास तर या काठीने तुझी छाती फोडून काढीन.' त्यांचे हे शब्द ऐकून मला भीतीने कापरे भरले. या खेपेस मी झोपलो नाही. मी आपल्या नोकराला हाक मारली. आणि त्याच्याकडून कागद, दौत, लेखणी हे साहित्य मागविले. शिकत असताना मी अक्षरे काढीत होतो ती परत आठवू लागलो. परमेश्वरी चमत्कार पाहा, ती अक्षरे माझ्या डोळ्यांसमोर फिरू लागली. माझ्या आठवणी पुन्हा उसळून आल्या. मी मागे जे काही वाचले होते ते पुन्हा आठवू लागलो. मी कागदावर एकेक अक्षर उतरवू लागलो. अशा प्रकारे सूर्योदय होईपर्यंत मी साठ ओळी लिहून काढल्या. काही अक्षरे चुकली होती. काही जोडाक्षरे जमली नाहीत. पण माझे लिखाण मी पाहिले. कोणीही ते वाचू शकेल असे होते. अर्थात त्यात चुकाही भरपूर होत्या. मी तो कागद फाडून पुन्हा तोच मजकूर लिहिण्यास सुरुवात केली. मला अवर्णनीय आनंद झाला होता.

सकाळी माझ्या अधिकाऱ्यांची दोन पत्रे माझ्या नावाने आली होती. ती मी वाचून काढली. त्यांनी लिहिलेला मजकूर मला पूर्णपणे समजला. याचाही मला विशेष आनंद झाला.

दरबाराची वेळ झाली. माझे टपाल वाचून दाखविणारा माझा चिटणीस आला. मी त्याला म्हटले, "आजच्या डाकेतील पत्रे मी स्वतः वाचणार आहे. माझ्या चुका तू मला सांगत चल." यावर तो काहीसे हसून म्हणाला, 'पण हुजुरांना वाचता कुठे येते ?' मी एक पत्र उचलले आणि त्याला म्हटले, 'बरे तर, मी वाचू शकतो की नाही ते पाहा.' असे म्हणून मी पत्रे वाचण्यास सुरुवात केली. त्या पत्रांची उत्तरेही मी चिटणिसाकडून लिहवून घेतली. त्या दिवशी मी दोनशे पत्रे वाचली आणि शंभर पत्रांची उत्तरे दिली !

काही दिवसांनी मला चिटणिसाची आवश्यकता राहिली नाही. थोड्याच अवधीत मी समग्र कुराणाचे पठण पूर्ण केले. दिवंगत साधुसंतांच्या नावाने मी दानधर्म केला. मी लिहू-वाचू लागलो. या गोष्टीची इत्थंभूत हकीकत मी आपल्या वडिलांना लिहून कळविली. त्यांनाही या गोष्टीचे फार कौतुक वाटले. त्यांनी मला एक रत्न-जडित तल्वार, किमखाबची दहा वस्त्रे, काश्मिरी लोकरीची दहा वस्त्रे माझ्याकडे पाठविली. मी परमेश्वराचे आभार मानले आणि वडिलांनाही आभाराचे पत्र पाठविले.

**राज्याचा बंदोबस्त**

अफगाणिस्तानाच्या गादीर अमीर अब्दु–रहमन आले (वीस जुले १८८०). तेव्हा राज्याचा बंदोबस्त अगदीच सुमार होता. त्याचे वर्णन करताना अब्दुलरहमन म्हणतात,

अफगाणिस्तानचा कारभार कसा चालत होता हे खालील गोष्टीवरून चांगले सिद्ध करता येईल.

एका माणसाने एक बाग तयार करण्याचे ठरविले. त्याने ते काम कंत्राट-दाराकडे लावून दिले. त्याला आगाऊ पैसे दिले आणि अमक्या अमक्या तारखेपर्यंत बाग तयार झाली पाहिजे असे त्याला बजावले. कंत्राटदाराने दिलेली रक्कम खर्च करून टाकली. त्याने बाग काही तयार केली नाही. पण ज्या दिवशी बाग पूर्ण व्हावी असे ठरले होते त्या तारखेस कंत्राटदार हा मालकाकडे जाऊन त्याला म्हणाला, 'हुजूर, बाग तयार झाली आहे. आपण ती पाहण्यास चलावे.' कंत्राट-दाराने मालकाला जमिनीच्या एका तुकड्यावर नेऊन उभे केले. मालक पाहतो तो तेथे काहीच नाही. यापुढील संवाद पाहा.

**बाकी सर्व ठीक**

मालक : अहो, या जमिनीत एक झाडसुद्धा लागलेले नाही. असली कसली बाग ?

कंत्राटदार : साहेब, एक झाडें सोडून दिली तर बाकी सर्वकाही पूर्ण आहे.

मालक : पण बागेत पाणी खेळवायला पाहिजे. कालवा तर मला कोठेच दिसत नाही.

कंत्राटदार : एक कालवा सोडून बाकी सर्वकाही तयार आहे.

मालक : बागेभोवती भिंती हव्यात म्हणजे जनावरे आत येऊन बागेची नासधूस करणार नाहीत. भिंती कोठे आहेत ?

कंत्राटदार : एक भिंती सोडल्या तर बाकी सर्वकाही ठीक आहे.

मालक : अहो, जमिनीत नांगरही चाललेला नाही.

कंत्राटदार : ते एक सोडले तर बाकी सर्वकाही ठीक आहे.

अफगाणिस्तानची अशीच अवस्था 'बाकी हर शै दुरुस्त' (बाकी सर्वकाही ठीक) हेच शब्द सर्वांच्या तोंडी होते. पण प्रत्यक्षात पाहावे तर कशास काही पत्ता नाही !

**दाढी ओढली**

आता न्यायदानाची पद्धतच घ्या. प्रत्येक लहानमोठ्या व्यक्तीला बादशहासमोर उभे राहून आपली दाद मागण्याचा अधिकार असे. दाद मागण्याची पद्धतही विचित्रच होती. फिर्यादी हा बादशहाच्या समोर उभा राहून बादशहाची दाढी ओढी आणि पागोटे हिसकावून घेई. दाढीची शरम बाळगा आणि मला न्याय द्या असा या वागणुकीचा अर्थ असे. अब्दु–रहमन म्हणतात, एके दिवशी मी स्नानगृहात जात होतो. एक फिर्यादी जोडपे माझ्या मागोमाग स्नानगृहात आले. नवऱ्याने पुढे होऊन माझी दाढी धरली आणि बायकोने मागून माझे पागोटे ओढण्यास सुरुवात केली. तो नवरा माझी दाढी इतक्या जोराने ओढू लागला की मला अतिशय त्रास होऊ लागला. दुर्दैवाने ऐन त्याच वेळी स्नानगृहावर कोणी पहारेकरी हजर नव्हता. मी त्या जोडप्याला आवर्जून म्हटले, 'अहो, माझी दाढी किती जोराने ओढीत आहात ? सोडा ती दाढी. मी तुमची फिर्याद ऐकण्यास तयार आहे. त्यासाठी दाढी ओढण्याची आवश्यकता नाही.' पण व्यर्थ. शेवटी मी त्यांच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घेतली. त्या दिवशी मला वाटले की, आपणही युरोपियन लोकांप्रमाणे दाढी काढून टाकली असती तर बरे झाले असते. त्या दिवसापासून मी आपल्या स्नानगृहावरील पहारा कडक केला.

**अधिकाऱ्यांना बदडून काढले**

माझ्या दरबारात आणखी एक विचित्र पद्धत होती. दरबारात भेटीदाखल म्हणून मेवामिठाईच्या करंड्या येत आणि मुख्यमंत्र्यापासून साध्या अधिकाऱ्यापर्यंत सर्वांना वाटल्या जात. पण अधिकाऱ्यांना दम निघावा ना ? करंडी आली रे आली की मुख्यमंत्र्यापासून खालपर्यंत सगळेजण करंडीवर तुटून पडत, आणि गपागपा मेवामिठाई खाऊ लागत. जो दंडेली करी त्याला अधिक वाटा मिळे. मी त्यांना खूप

समजावले की, ' हे वर्तन रानटीपणाचे असून आपल्या बादशहाच्या समोर रानटी जनावराप्रमाणे वागणे बरे नाही. असे करण्यात तुमची व माझी सारखीच फजिती आहे.' पण माझ्या सांगण्याकडे त्यांनी मुळीच लक्ष दिले नाही. एकदा ईद (सण) आला. त्या दिवशीच्या दरबारात ते नेहमीप्रमाणे मेवामिठाईवर रानटी जनावरां-प्रमाणे तुटून पडले. मला भयंकर राग आला. मी पहाऱ्यावरच्या शिपायांना हुकूम केला की, या सर्वांना चांगलेच बदडून काढा. त्या दिवशी मुख्यमंत्र्यापासून खालच्या अधिकाऱ्यापर्यंत सर्वांना बेदम मारहाण झाली. मला हसू आले, आणि वाईटही वाटले की, मेवामिठाईच्या पायी यांची डोकी फुटली आणि रक्तपात झाला. पण माझ्या शिक्षेचा असा परिणाम झाला की, माझ्या दरबारातील ही अशिष्ट परंपरा एकदम बंद झाली.

# . १४ .

## मुहंमदकुली कुतबशहाचे
## ऋतुसंहार आणि भामाविलास

गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्यातील मुहंमदकुली कुतुबशहा हा अतिशय रसिक आणि रंगेल असा बादशहा होऊन गेला. त्याच्यापूर्वी गोवळकोंड्याचा किल्ला हीच कुतुबशाही राज्याची राजधानी होती. पण मुहंमदकुलीने गोवळकोंड्याच्या किल्ल्यापासून पाच मैलांच्या अंतरावर मूसा नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर नवीन शहर वसविले. मुहंमदकुलीची प्रेयसी आणि पट्टराणी भागामती ही एक सुप्रसिद्ध नर्तकी होती. ती चंचलम् नावाच्या खेड्यात राहात होती. तेथेच इ. स. १५९२ मध्ये नवीन शहर वसविण्यात आले. भागामती या नावावरून त्या शहराला भागानगर म्हणू लागले. पुढे मुहंमदकुलीने भागामतीशी लग्न करून तिला आपली पट्टराणी बनविली. त्या वेळी त्याने तिला 'हैदर महल' हा किताब दिला. त्यामुळे कागदोपत्री भागानगरचा उल्लेख हैदराबाद असा होऊ लागला. या शहराची स्थापना इ. स. १५९२ मध्ये झाली.

मुहंमदकुली कुतुबशहाचा जन्म इ. स. १५६६ मध्ये झाला. वयाचे चौदावे वर्ष संपण्यापूर्वीच तो भागामतीच्या प्रेमात सापडला. त्याचा बाप इब्राहीम कुतुबशहा याला ही गोष्ट आवडली नाही. पण मुहंमदकुली हा रोज रात्री मूसा नदी ओलांडून भागामतीला भेटण्यास जात असे. आख्यायिकेप्रमाणे एकदा त्याने एका वादळी रात्री पूर आलेल्या नदीत आपला घोडा घालून पलीकडचा किनारा गाठला होता. त्यामुळे घाबरून जाऊन इब्राहीम कुतुबशहाने आपल्या मुलाच्या सुरक्षिततेसाठी नदीवर पूल बांधून दिला, आणि आपल्या मुलाची प्रणयाची वाट निर्धास्त करून दिली !

आपल्या बापाच्या मृत्यूनंतर मुहंमदकुली हा इ. स. १५८० मध्ये गादीवर बसला. त्याची राजवट इ. स. १६११ पर्यंत चालली. मदिरासेवन आणि स्त्री-संग यांमुळे तो अवघ्या पंचेचाळिसाव्या वर्षी मरण पावला.

मुहंमदकुलीसारखा रंगेल बादशहा कुतुबशाही घराण्यात दुसरा झाला नाही. विजापूरचे आदिलशहा, अहमदनगरचे निजामशहा आणि विजयानगरचे राजे यांच्याशी त्याच्या किरकोळ लढाया झाल्या. राज्यातही मधून मधून बंडे उद्भवत.

पण बादशहाचा कल एकंदरीत शांततेकडे असे. जहांगीरप्रमाणे त्याने आपले सगळे आयुष्य विलासात घालविले. त्याच्या काळात मोगलांची दृष्टी अहमदनगरकडे वळली होती, पण गोवळकोंड्याकडे त्यांनी अद्याप लक्ष दिले नव्हते. त्यामुळे मुहंमदकुलीला आपले सर्व आयुष्य विलासात घालवित आले.

मुहंमदकुली हा एक प्रतिभावान कवी होता. दक्षिणी उर्दूत त्याने रचलेल्या कवितांची संख्या पाचसहा हजारांपर्यंत सहज जाईल. त्याचे विपुल असे फारसी काव्यही उपलब्ध आहे. त्यांच्या उर्दू कवितांच्या ओळी पन्नास हजारांवर आहेत.

विविध विषयांवर मुहंमदकुलीने काव्य रचले आहे. धर्मपर कविता आहेत. इमारती, बागा, शहरे यांवर कविता आहेत. निरनिराळ्या ऋतूंची वर्णने आहेत. सण-वार, उत्सव, वाढदिवस, यांवर त्याने लिहिले आहे. आपल्या अनेक प्रेयसींची वर्णने त्याने केली आहेत. मुहंमदकुलीचा जनानखाना मोठा होता. अनेक लावण्यवती त्याच्या जनान्यात होत्या. त्यातल्या त्यात त्याच्या आवडत्या अशा बारा प्रेयसी होत्या. त्यांच्या संगतीत रममाण होताना त्याच्या प्रतिभेला विलक्षण बहर येई.

## ऋतुसंहार

वसंतऋतूवरील त्याची कविता पाहा–

शाह के मंदिरमें सादत की खबर लाया वसंत ।
नैन पुतलीके चमन मे फूल फल लाया वसंत ।।

सब्ज (हरित) सारे नौरतन कस्वत (कशीदा) किये है रंग रंग ।
सर्व (सुरू) की मीना (मधुपात्र) मेंभी शबनम (दव) की मय ( मदिरा)
पाया वसंत ।।

सारे फूलोंकी वसंत का फूल मेहमानी ( पाहुणचार ) किया ।
गुल प्याला बनके खिदमतके लिये आया वसंत ।।

जोत माणिकसे वसंत के गुल खिले ( उमलले ) आलममने ( जगात )
अपने फूलोसे फलकपर लाल रंग छाया वसंत ।।

मिहर के रंगमें ( सूर्याप्रमाणे ) वसंत का रंग झलकता नूरसा ( तेज ) ।
और चंद्रके हौज में चंदनसी महाकाया वसंत ।।

मोती और याकूत के घरघर में अंबारां ( ढीग ) लगे ।
हर मिस्कीन ( भिकारी ) को खाकानसम ( मालकासमान ) करके
दिखलया वसंत ।।

शुक्र ईजद (परमेश्वराचे आभार) कर मआनी (कवी) रात दिन आनंदसे।
तेरे मंदिर में खुशी आनंद से आया वसंत ॥

पावसाळ्याचे वर्णन करताना मुहंमदकुली म्हणतो–

" वर्षाऋतू प्राप्त झाला. कळ्यांची सत्ता सुरू झाली. कारण हिरव्या फांद्यांना आता फुलांचे मुकुट लाभत आहेत !

मेघांतून पडणाऱ्या जलबिंदूंनो, आपले पेले भरून घ्या. पाहा पाहा एकेक सुंदरी कशी नटून थटून बाहेर पडत आहे ! या सुंदरींची शरीरे थंडीमुळे कंपायमान होत आहेत. त्यांची वक्षस्थळे हलत आहेत आपल्या प्रियकराला पाहून त्यांच्या. कंचुकी तटातट तुटत आहेत !

या सुंदरी आपल्या चेहऱ्यावरील अवगुंठन बाजूला सारून पुन्हा आपले चेहरे झाकून घेतात त्या वेळी त्यांचे चेहरे विजेप्रमाणे चमकत असलेले दिसतात !

या सुंदरींच्या कुंतलांतील फुले म्हणजे आकाशातील तारे जणू. अरे, ही यगाची पद्मिनी तर नव्हे ? चहूकडे मेघगर्जना ऐकू येत आहे. धो धो पाऊस पडत आहे. वनात मयूर गात आहेत. त्यांच्या प्रेमगीतांनी वातावरण भरून गेले आहे.

हे कुतुबशहा, परमेश्वरकृपेने वर्षाऋतू आला आहे. आता प्रेम आणि प्रणय (इश्क व आशिकी) यांच्या साह्याने राज्य कर बरे."

आपल्या प्रेयसींना उद्देशून मुहंमदकुली म्हणतो.

" वर्षाकाळचे मेघ गर्जत आहेत. सख्यांनो, नटून थटून या, पावसाचे थेंब हळूहळू पडत आहेत. त्यांत तुम्ही आपल्या कंचुकी भिजवून घ्या. म्हणजे तुमचे तारुण्य खुलून दिसेल !

परमेश्वराने वाऱ्यात असंख्य फुलांचा सुगंध पसरवून दिला आहे. या सुंदरींनो, तुम्ही माझ्या हृदय-मंदिरात प्रवेश करा.

पाहा, फांद्यांवर तांबडी फुले फुलली आहेत. तुम्ही पण आपल्या गौरबाहूंवर लाल जडावाचे भुजबंद लावा.

मेघामुळे आकाश आणि पृथ्वी यांचा रंग एकच झाला आहे. काय सुंदर दृश्य आहे ! आज विलासाचा दिवस आहे. सख्यांनो, तुम्ही आज मेघमल्हार ऐकवा. तुम्ही साऱ्याजणी आज तांबडी वस्त्रे परिधान करा. आकाशातील सूर्याप्रमाणे तुम्ही तळपायला हवे. तुम्ही आपल्या ओष्ठरूपी पात्रांतून प्रेमाची मदिरा या बादशहाला पाजा. नर्तकींना तुम्ही आपल्या चंचल नेत्रांतील मादक मदिरा पाजा, म्हणजे या राजमंदिरात त्यांचे नृत्य बहारीचे होईल."

आपल्या सख्यांचे वर्णन करताना तो म्हणतो :—

" आकाशात मेघांची दाटी झाली आहे. मेघगर्जना ऐकून या सुंदरी चहूकडून आल्या आहेत. त्यांच्या विविध आणि भडक अशा रंगांच्या वस्त्रांवरून जमिनी-

वरच विद्युल्लतेचा विलास सुरू झाला आहे. या चंचल सुंदरींनी पावसाच्या थेंबांनी आपल्या कंचुकी भिजविल्या आहेत. त्या आता झोपाळंचावर झोके घेत आहेत.

त्यांनी प्रेममदिरा सेवन केली आहे, त्यांच्या तारुण्याला बहर आला आहे. आपल्या मादक नेत्रांतून कटाक्ष फेकीत त्या धुंद होऊन क्रीडा करीत आहेत.

या तन्वांगींच्या कंचुकींचे बंद तुटले आहेत. त्यांच्या अंगाअंगातून प्रेममदिरा उसळून बाहेर पडत आहे. त्या आपल्या नेत्रकटाक्षांनी माझे हृदय विद्ध करीत आहेत. आपल्या वस्त्रालंकारांमुळे त्या झगमगत आहेत. पुन्हा पुन्हा त्या माझ्याशी लगट करीत आहेत. चालताना त्यांचा तोल जात आहे.

प्रत्येक जण दुसरीहून अधिक आकर्षक दिसत आहे. त्यांना पाहून भले भले लोक रस्ता भटकतील ! या चंचल तरुणी धुंद पावले टाकीत चालतात त्या वेळी त्यांच्या वस्त्रांतून गळलेले मोती त्यांना पाहून लज्जेने विरघळून जात आहेत.

परमेश्वराची कृपा ! या सुंदरी रात्रंदिवस कुतुबशहाच्या संगतीत असतात. आणि आपले मनोवांच्छित साध्य करून घेतात."

आणखी एका कवितेत तो म्हणतो,

" आकाशात देवदूतांनी मृगाला आमंत्रण दिले आणि त्याप्रीत्यर्थ समुद्रातील मोती त्यांनी आकाशातून पृथ्वीवर उधळले.

पृथ्वीने आपल्या मस्तकावर रत्नखचित शिरोभूषण घातले आहे. ती अंगात विविध मण्यांची चोळी ल्याली आहे. जिकडे तिकडे हिरवी, निळी, तांबडी फुलझाडे फुलली आहेत. जिकडे तिकडे हिरवेगार झाले आहे. वनातील मोर ओरडत आहेत. विविध रंगी पक्षी धुंद होऊन बागांतून गात आहेत.

अहो, या हिरव्या वनात लाल फुले उमलली नाहीत, तर हिरव्या मण्यांच्या पात्रांतून दवबिंदूंच्या तेलाने पेटलेल्या ह्या ज्योती आहेत !

हे दृश्य पाहून मोहक तरुणी, विविध वस्त्रालंकारांनी नटून आपल्या यौवनाचा भर दाखवीत क्रीडा करीत आहेत.

यांची वक्षस्थळे पांढरीशुभ्र आहेत. त्यांवरचे काळे स्तनाग्र पाहून कुणालाही वाटावे की पांढऱ्या शुभ्र आकाशात हे दोन काळे ढग जमले आहेत !

क्रीडेसाठी माझ्या सख्या मदिरा प्याल्या आहेत. चमेलीच्या भागातून भ्रमर मेघमल्हार गात फिरत आहेत. फुलांना चिकटणारे हे भ्रमर म्हणजे पांढऱ्या चमेलीच्या गालावरचे हे तीळच होत !

या सुंदरीच्या पैंजणांच्या झंकारांनी माझी स्थिती तडफडणाऱ्या माशासारखी झाली आहे."

पुढील कवितेत या बादशहाने मस्त (धुंद) या शब्दाचा वापर कसा केला आहे पहा :

चढी (चढली) मस्त, बही मस्त, डली मस्त, रही मस्त ।
मुखा (मुख) मस्त, सदा मस्त, सहन (सजली) मस्त, परी मस्त ॥
खडी मस्त, अचल मस्त, ढली (ढळली) मस्त, ओढी (घातली) मस्त ।
गजक ( चाल ) मस्त, नकल ( हालचाल ) मस्त, बचन ( वाणी ) मस्त
परी मस्त ॥
तिला (टिळा) मस्त, तुरा मस्त, घरी मस्त, घडी मस्त ।
शकर (साखर) मस्त, चुमन (चुंबन) मस्त, हसन (हास्य) मस्त
परी मस्त ॥
चोळी मस्त, खुली (उघडली), मस्त, कमळ मस्त, भवर (भ्रमर) मस्त ॥
कुतुब (कवी) मस्त, करी मस्त, यौवन मस्त, परी मस्त ॥

वरील कविता पाहून त्या वेळच्या दक्षिणी उर्दूत मराठी शब्द किती तरी आढळतात, हे दिसून येईल.

या रसिक बादशहाने फुगडीवरही कविता केली आहे.

सखी तान दे मुझ टिटकती खडी ।
केढान ढकती खेलकर हटकती खडी ॥
जो ढान ढकनी के खेल खेल आई दहन ।
न सीख फूकडी फू खेल मसक्ती खडी ॥
खुई (घाम) के बूंदोंसे बुझे ज-रीन चहर ।
जूं अबरोंमें (मेघांत) बिजली झुमकती खडी ॥
मुहंमदशहा है इस जमाने का शाइर ।
नबी सदके इस नेह (स्नेह) ठुमकती खडी ॥

## भामा विलास

मुहमंदकुली कुतुबशहाची तर 'नारी मज बहु असती' अशी स्थिती होती. पण त्यातल्या त्यात बारा प्रेयसी त्याच्या आवडत्या दिसतात. आपल्या कवितांतून त्याने त्यांची ठिकठिकाणी वर्णने केली आहेत. त्यांची नावे पाहा : (१) नन्ही (२) सावळी (३) कोवळी (४) प्यारी (५) गोरी (६) छबेली (७) लाला (८) लालन (९) मोहन (१०) महबूब (११) मुस्तरी (१२) हैदर महल.

मुहंमदकुलीच्या कवितांवरून त्यांच्या प्रेयसी कशा होत्या याची कल्पना येते. त्यांपैकी काहींची वर्णने पाहा :

**नन्ही**

उंच बांधा, चंद्रासारखे मुख, तेजस्वी डोळे, सुगंधा, अशी नन्ही ! प्रथम ती भोळी आणि लाजाळू होती. लवकरच तिच्या तारुण्याला बहर आला. बोलण्या-चालण्यात ती संकोच करी. तिला मदिरा आवडत नसे. दारू पाजणेही तिला पसंत नसे. ती डोळ्यांत काजळ घाली. ती मदनफुलाच्या रंगाची साडी नेसीत असे. साडीच्या पदराला मोती लावलेले असत. नन्ही पुढे हसतमुख, चतुर, विनोदी आणि हजरजबाबी बनली. तिचे वर्णन करताना मुहंमदकुली म्हणतो—

नन्हीप्रमाणे सुंदर स्त्री सप्तलोकांत सापडणार नाही. तिच्या आठवणीची धुंदी कुतुबशहाला चढली आहे. तिचे मनोरंजन करण्यासाठी तो आपल्या दुतारीवर दिव्य राग छडीत आहे.

सख्यांनो, नन्हीच्या प्रेमात मी मोती उधळीत आहे. नन्ही माझ्याबरोबर प्रेमाचे खेळ खेळत आहे. हे सुगंधे, तुझ्या शरीरातील सुगंधाने आत्मा तृप्त झाला आहे. तुझ्या डोळ्यांतील काजळ काय शोभा देते म्हणून सांगू ! तू काजळ का लावतेत ते सांगू का ? आपला हेवा करणाऱ्यांची दृष्ट तुला लागू नये म्हणून !

नन्ही, तू चांदण्या रात्रीत बाहेर पडतेस तेव्हा चंद्र लज्जित होऊन ढगाआड लपतो. आकाशात तारकांची दाटी झाली आहे ती तुझ्यावरून आपला जीव ओवाळून टाकण्यासाठीच !

**सावळी**

सावळीचा बांधा उंच आहे; जणू काय सुरूचे झाड तिच्यावरून कुर्बान झाले आहे. सावळी, तुझ्याकडे पाहताच माझी शुद्ध हरते. आपल्या चंचल नेत्रांतून तू कटाक्ष फेकतेस तेव्हा माझे अंगन् अंग प्रभावित होते. तुझ्या हास्यामुळे तुझी दंत-पंक्ती चंद्राप्रमाणे शोभा देते. सुरूच्या झाडाप्रमाणे असलेला आपला उंच बांधा घेऊन तू मंदमंद पावले टाकीत चालतेस तेव्हा तुझे दीर्घ कुंतल तुझ्यावर चवऱ्या ढाळण्याचे काम करतात.

**कोवळी**

मधुपात्र हातात घेऊन कोवळी उभी आहे. ती इतकी सडपातळ आणि नाजुक आहे की वाऱ्याच्या झुळुकीनेही ती हलू लागते. तिने आपल्या केसांत फुले घातली आहेत. तिच्या सुंदर चेहऱ्यावरील तिची भुवयांची हालचाल पाहून ती कोणी दिव्यांगना आहे असे वाटू लागते. वरकरणी तिने संकोचाचा आव आणला आहे. पण अवगुंठनाच्या आतून तिच्या चंचल नेत्रांचे नृत्य चालू आहे. तिच्या शरीरातूनच नवरत्नांना तेजाचा लाभ झाला. सूर्य आणि चंद्र (सूर्यहार आणि चंद्रहार) हे तिच्या गळ्यातील अलंकार बनले आहेत.

हे कोवळी ! तुझा बांधा पाहून बागेतील सुरूची झाडे आपापसात कुजबुज करू लागली आहेत. मी माझ्या पापण्यांची शय्या रचली आहे. हे प्रिये, या शय्येवर तू विश्रांती घे. लाल माणकांनी तुझ्या ओठांपासून रंगाची भीक मागितली आहे. तुझ्या कृशकटीच्या आसक्तीत मी केसांपेक्षाही कृश झालो आहे. तुझी कंबर तारेहूनही बारीक आहे. दख्खनच्या या सखीला (कोवळीला) पाहून मला माझ्या गोऱ्या आणि सावळ्या सख्यांचा विसर पडला आहे. हे कोवळी, नेत्रपल्लवी करण्यासाठी तू माझ्या नजरेला नजर भिडवितेस तेव्हा मला माझी नजर टिकविणे अशक्य होते. तू सोन्याची प्रतिमा आहेस. तुझ्या गुलाबी नेत्रांत दर्याच्या लाटा चालू असतात. सूर्यतेजाप्रमाणे तुझे गाल, तुझी दंतपंक्ती, नव्हे नवरत्ने जडविली आहेत. तुझा चंचलपणा काय सांगावा ! सुंदरींच्यावर तूच राज्य करावे हे बरे. हे गुलाबी नेत्रांच्या सखे, तू मला हृदयापासून प्रिय आहेस.

अरे, ही चंचला हिरवी साडी नेसून आणि केसांत फुलांचा तुरा लावून पुन्हा माझ्याजवळ आली आहे. हिच्या अल्लड गतीवरून हिच्यावर मदिरेची धुंदी चढली आहे असे वाटते. हिच्या नेत्रांत रंगीत रेषा दिसत आहेत. या प्रेयसीचे प्रेम, हिच्या पायांतील नूपुरांचा नाद ही म्हणजे मनाला आशा, शरीराला विलास आणि कानाला आसक्ती यांचा लाभ झाल्याप्रमाणे आहे. अहो, ही मला कठोर बोलते, आपण दुःखी आहो असे भासविते, आणि माझी खुशामत करते. सारांश, या ना त्या निमित्ताने ती मला आपल्यापासून दूर जाऊ देत नाही. ही फार चतुर आहे. प्रेमाची मर्मज्ञ आहे."

**प्यारी**

ही रूपगर्विता असावी. मुहंमदकुली म्हणतो :

"सख्यांनो, तुम्ही प्यारीची समजूत घालून तिला घेऊन या बरे. नाज नखरे हे तिचे शिरोभूषण होय. तिला म्हणावे, कुतुबशहाने बघ आपला प्रासाद कसा शृंगारला आहे. पण तुझ्यावाचून काळ कंठणे त्याला अशक्य झाले आहे. तू ये आणि माझ्यावर आपली मोहिनी घाल. तुझ्या अद्वितीय सौंदर्याला तुझ्या नाज नखऱ्याने शोभाच आली आहे. तू लावण्यवतींची सम्राज्ञी आहेस. साऱ्याजणी तुला प्रेमरूपी करभार अर्पण करतात. तुझ्या मुखाकडे मी क्षणभर जरी पाहिले तरी तो एक क्षण मला शंभर वर्षांच्या विलासासमान वाटतो.

हे प्यारी, आपल्या रूपावर इतका गर्व करणे बरे नाही. हे तारुण्य काय नेहमी टिकून राहणार आहे ? आपल्या प्रियकराबरोबर क्रीडा करणे यातच यौवनाचे सार्थक आहे. तुझ्यावरच आमचे विलास चालू आहेत. तू साजशृंगार करून येतेस. तुझ्या भालप्रदेशावरील घर्मबिंदू पाहून मला फुलांवरील दवबिंदूंची आठवण होते.

हे प्यारी, तुझ्या विरहामुळे मला रात्र रात्र निद्रा येत नाही. तुझे प्रेमपीडित

**नन्ही**

उंच बांधा, चंद्रासारखे मुख, तेजस्वी डोळे, सुगंधा, अशी नन्ही! प्रथम ती भोळी आणि लाजाळू होती. लवकरच तिच्या तारुण्याला बहर आला. बोलण्याचालण्यात ती संकोच करी. तिला मदिरा आवडत नसे. दारू पाजणेही तिला पसंत नसे. ती डोळ्यांत काजळ घाली. ती मदनफुलाच्या रंगाची साडी नेसीत असे. साडीच्या पदराला मोती लावलेले असत. नन्ही पुढे हसतमुख, चतुर, विनोदी आणि हजरजबाबी बनली. तिचे वर्णन करताना मुहंमदकुली म्हणतो—

नन्हीप्रमाणे सुंदर स्त्री सप्तलोकांत सापडणार नाही. तिच्या आठवणीची धुंदी कुतुबशहाला चढली आहे. तिचे मनोरंजन करण्यासाठी तो आपल्या दुतारीवर दिव्य राग छडीत आहे.

सख्यांनो, नन्हीच्या प्रेमात मी मोती उधळीत आहे. नन्ही माझ्याबरोबर प्रेमाचे खेळ खेळत आहे. हे सुगंधे, तुझ्या शरीरातील सुगंधाने आत्मा तृप्त झाला आहे. तुझ्या डोळ्यांतील काजळ काय शोभा देते म्हणून सांगू! तू काजळ का लावतेत ते सांगू का? आपला हेवा करणाऱ्यांची दृष्ट तुला लागू नये म्हणून!

नन्ही, तू चांदण्या रात्रीत बाहेर पडतेस तेव्हा चंद्र लज्जित होऊन ढगाआड लपतो. आकाशात तारकांची दाटी झाली आहे ती तुझ्यावरून आपला जीव ओवाळून टाकण्यासाठीच!

**सावळी**

सावळीचा बांधा उंच आहे; जणू काय सुरूचे झाड तिच्यावरून कुर्बान झाले आहे. सावळी, तुझ्याकडे पाहताच माझी शुद्ध हरते. आपल्या चंचल नेत्रांतून तू कटाक्ष फेकतेस तेव्हा माझे अंगन् अंग प्रभावित होते. तुझ्या हास्यामुळे तुझी दंतपंक्ती चंद्राप्रमाणे शोभा देते. सुरूच्या झाडाप्रमाणे असलेला आपला उंच बांधा घेऊन तू मंदमंद पावले टाकीत चालतेस तेव्हा तुझे दीर्घ कुंतल तुझ्यावर चवऱ्या ढाळण्याचे काम करतात.

**कोवळी**

मधुपात्र हातात घेऊन कोवळी उभी आहे. ती इतकी सडपातळ आणि नाजुक आहे की वाऱ्याच्या झुळुकीनेही ती हलू लागते. तिने आपल्या केसांत फुले घातली आहेत. तिच्या सुंदर चेहऱ्यावरील तिची भुवयांची हालचाल पाहून ती कोणी दिव्यांगना आहे असे वाटू लागते. वरकरणी तिने संकोचाचा आव आणला आहे. पण अवगुंठनाच्या आतून तिच्या चंचल नेत्रांचे नृत्य चालू आहे. तिच्या शरीरातूनच नवरत्नांना तेजाचा लाभ झाला. सूर्य आणि चंद्र (सूर्यहार आणि चंद्रहार) हे तिच्या गळ्यातील अलंकार बनले आहेत.

हे कोवळी ! तुझा बांधा पाहून बागेतील सुरूची झाडे आपापसात कुजबुज करू लागली आहेत. मी माझ्या पापण्यांची शय्या रचली आहे. हे प्रिये, या शय्येवर तू विश्रांती घे. लाल माणकांनी तुझ्या ओठांपासून रंगाची भीक मागितली आहे. तुझ्या कृशकटीच्या आसक्तीत मी केसांपेक्षाही कृश झालो आहे. तुझी कंबर तारे-हूनही बारीक आहे. दख्खनच्या या सखीला (कोवळीला) पाहून मला माझ्या गोऱ्या आणि सावळ्या सख्यांचा विसर पडला आहे. हे कोवळी, नेत्रपल्लवी करण्यासाठी तू माझ्या नजरेला नजर भिडवितेस तेव्हा मला माझी नजर टिकविणे अशक्य होते. तू सोन्याची प्रतिमा आहेस. तुझ्या गुलाबी नेत्रांत दर्याच्या लाटा चालू असतात. सूर्यतेजाप्रमाणे तुझे गाल, तुझी दंतपंक्ती, नव्हे नवरत्ने जडविली आहेत. तुझा चंचलपणा काय सांगावा ! सुंदरींच्यावर तूच राज्य करावे हे बरे. हे गुलाबी नेत्रांच्या सखे, तू मला हृदयापासून प्रिय आहेस.

अरे, ही चंचला हिरवी साडी नेसून आणि केसांत फुलांचा तुरा लावून पुन्हा माझ्याजवळ आली आहे. हिच्या अल्लड गतीवरून हिच्यावर मदिरेची धुंदी चढली आहे असे वाटते. हिच्या नेत्रांत रंगीत रेषा दिसत आहेत. या प्रेयसीचे प्रेम, हिच्या पायांतील नूपुरांचा नाद ही म्हणजे मनाला आशा, शरीराला विलास आणि कानाला आसक्ती यांचा लाभ झाल्याप्रमाणे आहे. अहो, ही मला कठोर बोलते, आपण दुःखी आहो असे भासविते, आणि माझी खुशामत करते. सारांश, या ना त्या निमित्ताने ती मला आपल्यापासून दूर जाऊ देत नाही. ही फार चतुर आहे. प्रेमाची मर्मज्ञ आहे."

**प्यारी**

ही रूपगर्विता असावी. मुहंमदकुली म्हणतो :

"सख्यांनो, तुम्ही प्यारीची समजूत घालून तिला घेऊन या बरे. नाज नखरे हे तिचे शिरोभूषण होय. तिला म्हणावे, कुतुबशहाने बघ आपला प्रासाद कसा शृंगारला आहे. पण तुझ्यावाचून काळ कंठणे त्याला अशक्य झाले आहे. तू ये आणि माझ्यावर आपली मोहिनी घाल. तुझ्या अद्वितीय सौंदर्याला तुझ्या नाज नखऱ्याने शोभाच आली आहे. तू लावण्यवतींची सम्राज्ञी आहेस. साऱ्याजणी तुला प्रेमरूपी करभार अर्पण करतात. तुझ्या मुखाकडे मी क्षणभर जरी पाहिले तरी तो एक क्षण मला शंभर वर्षांच्या विलासासमान वाटतो.

हे प्यारी, आपल्या रूपावर इतका गर्व करणे बरे नाही. हे तारुण्य काय नेहमी टिकून राहणार आहे ? आपल्या प्रियकराबरोबर क्रीडा करणे यातच यौवनाचे सार्थक आहे. तुझ्यावरच आमचे विलास चालू आहेत. तू साजशृंगार करून येतेस. तुझ्या भालप्रदेशावरील घर्मबिंदू पाहून मला फुलांवरील दवबिंदूंची आठवण होते.

हे प्यारी, तुझ्या विरहामुळे मला रात्र रात्र निद्रा येत नाही. तुझे प्रेमपीडित

आम्ही. आमच्या या रोगाचा उपचार धन्वंतरीच्यानेही होणे नाही. तू अधरामृत मला देणार नाहीस तोवर माझा रोगही बरा होणार नाही. तुझ्या विरहात मी मेणाप्रमाणे वितळून चाललो आहे. पण तू म्हणजे कठीण अशी खडीसाखर. तू विरघळण्याचे नाव घेत नाहीत. तुझे चालणे, तुझे बोलणे, तुझे विभ्रम यासंबंधी काय बोलावे ? तू मला हवे ते बोल पण मला निराश करू नकोस. प्यारी, तुझा प्रत्येक शब्द माझा निकाल लावीत आहे. तुझे बोलणे म्हणजे तीक्ष्ण खंजीरच जणू. तुझे कुंतल म्हणजे नागीण. तिचे विष भयंकर आहे. तू क्रीडा करतेस तेव्हा तुझ्या केशकलापामुळे तू गारुड्याप्रमाणे भासतेस. तुझ्याभोवती भ्रमराप्रमाणे फिरत मी तुझे सुगंधसेवन करतो. तुझ्या शरीरातून कस्तुरी आणि चंदन यांचा सुगंध येतो."

**गोरी**

गोरीबद्दल मुहंमदकुली म्हणतो :

गोरीचे सुंदर मुख पाहून चंद्र लज्जित होऊन ढगाआड लपला आहे. गोरी म्हणजे सुवर्णलता आहे. तिच्यातून सूर्याप्रमाणे तेज बाहेर पडत आहे. हे गोर, तू रसरंगाच्या उपवनातील कळी आहेस. तुझ्या मधुर ओठांत धगधगीत मदिरा भरली आहे. या मदिरेने प्रियकरांची हृदये जळून कबाब बनत आहेत.

चंद्रावर ढग पसरतात (छटा ढगांच्या जणू शशिभोवती, बटा कचांच्या निटिलावरती) तसे तुझे कुरळे कुंतल तुझ्या चेहऱ्यावर पसरले आहेत. तुझ्या मस्त गतीने हत्ती लज्जित झाले आहेत. हे कुतबशहा, पैगंबराच्या कृपेने तुला गोरीचा लाभ झाला आहे. तिला बाहुपाशात घेऊन तिच्याबरोबर मदिरापान कर बरे.

गोरी म्हणजे प्रेमाची प्रतिमा होय. सगळ्या सुंदरींत ती छबेली शोभते. सर्व चंद्रमुखींत तूच रसीली आहेस. पद्मिनीचा शृंगार तुला शोभत आहे. तुझ्या शरीरासाठीच सोळा शृंगार निर्माण झाले आहेत. कारण तुझे सौंदर्य अद्वितीय आहे. तुझ्यासारखी सुंदर सखी मला कोठेच आढळत नाही. ही सुंदरी मला लाभली ही पैगंबराची माझ्यावर कृपाच होय !

हे गोरी, तू प्रेमाची पुतळी आहेस. तू माझ्या हृदयात उभी आहेस. प्रेमाचे खेळ खेळण्यासाठी ती तयार होऊन उभी आहे. हे गोरी, तू मला मदिरा पाज बरे. तुझ्या प्रेममदिरेची धुंदी मला चढली आहे. गोरीचा चेहरा चंद्राप्रमाणे आहे. तिचा भालप्रदेश तेजस्वी आहे. तिचे कुंतल विखुरले आहेत. तिचे ओठ रसीले आहेत. तिचे चालणे मस्त आहे. तिचे वक्षस्थळ उन्नत आहे. तिचे शरीर फुलाप्रमाणे प्रफुल्ल, मृदू आणि नाजुक आहे.

**छबेली**

हिच्या गालावर तीळ आहे. तिचा केशकलाप स्वैर आहे. तिचे डोळे सावज हेरणाऱ्या शिकाऱ्याप्रमाणे आहेत. तिने डोळ्यांत काजळ घातले आहे. तिच्या

ओठांत अमृत भरले आहे. पुष्पकळ्यांप्रमाणे तिची दंतपंक्ती आहे.

**लाला**

हिच्या अंगाअंगातून यौवन ओसंडून वाहत आहे. प्रेमाची भुकेली, विरहात तळमळणारी. हिचे चालणे पाहून पाहणारे धुंद होतात !

**लालन**

मधुर ओठ, हंसगतीनं चालणं, कळीपेक्षाही नाजुक, लहान वयाची, अल्लड.

**मोहन**

जादुगार नयन, नाजनखरेवाली, चेहऱ्यावर मीलनाची उत्सुकता, नेत्रांत रात्रीच्या विलासाची धुंदी. ती हिरवी साडी नेसली आहे. साडीची किनार सोनेरी रंगाची आहे !

**मेहबूब**

गुलाबाप्रमाणे कपोल, बारीक कंबर, तिला सोनेरी रंगाचा फेटा बांधण्याची हौस आहे !

**हैदर महल**

हैदर महल म्हणजेच भागमती. ही पुढे मुहंमदकुलीची पट्टराणी झाली. तो युवराज असतानाच ती त्याची प्रेयसी होती. तो गादीवर आल्यानंतर ती त्याच्या दरबारात नर्तकी म्हणून राहिली.

मशिदीतील महिरपीप्रमाणे तिच्या भुवया आहेत. त्यांच्या समोरच मी आपले मस्तक टेकतो. ती माझ्या दरबारात नृत्य करीत आहे.

> भवां (भुवया) के ताक (महिरपी) में सिजदा करूँ मैं ।
> हुए साई मिरी महफिल में रक्कास (नृत्य) ।।

कुतबशहाला एका अनमोल मौक्तिकाचा लाभ झाला आहे. या नर्तकीने आपल्या नृत्याने कमाल केली आहे.

> कुतबशहा पाइया है बेबहा दुर (अनमोल मोती) ।
> हुई अप नाच थे कामिल में रक्कास ।।

पैगंबराच्या कृपेने आणि हे प्रिये, तुझ्या प्रेमाने मी हे शहर (भागानगर) वसविले आहे. त्याच्याहून मला दुसरे कोणतेच शहर आवडत नाही.

> नबी सदके तुज नेह (स्नेह) शहर मैं है कुतब ।
> नहीं कोई शहर इस शहर थे अलज (पसंत) ।।

मुहंमदकुलीला मुलगा नव्हता. भागमतीपासून त्याला एक मुलगी हयातबख्श बेगम झाली. मुहंमदकुलीने आपला पुतण्या मुहंमद याच्याशी तिचा विवाह करून दिला. महंमदकुलीनंतर त्याचा पुतण्या मुहंमद हा गादीवर आला (१६११–१६२५). त्याचा मुलगा अब्दुल्ला कुतबशहा याने अनेक वर्षे राज्य केले (१६२५–१६७२). हयातबख्श बेगम आपल्या मुलाच्या कारकीर्दीत मरण पावली (इ. स. १६६६). भागमती ऊर्फ हैंदर महल हिचा मृत्यू तिच्या नवऱ्याच्या हयातीत इ. स. १६१० च्या सुमारास झाला.

मुहंमदकुलीच्या कवितांतून इतरही काही प्रेयसींची नावे मिळतात. बिल्कीस जमानी, हातम, हिंदी छोरी, पद्मिनी, सुंदर, सजन, रंगीली यांचीही वर्णने त्याने केली आहेत.

त्याच्या कवितांतून काही ठिकाणी शृंगाराची वर्णने अतिशय भडक आहेत. त्यांतील ओळी देणे सद्भिरुचीच्या विरुद्ध होईल. त्याच्या गजलांतील काही ओळी पुढे दिल्या आहेत. प्रेयसीच्या तोंडी त्याने पुढील ओळी घातल्या आहेत :

सुनो लोग मेरी प्रेम की कहानी ।
के पीला है रंग आशिकी की निशानी ।।

तुमन (तुझ्या) इश्क भेद्या, है मंज (मजला) बालेबाला ।
के हुई हू तुमन पेम (प्रेम) में मैं दिवानी ।।

पैगंबराच्या कृपेने मला कुतबशहासारखा अनमोल प्रियकर लाभला यापेक्षा आकर्षक अशी कोणती प्रेमकहाणी असू शकेल ?

नबी सदके कुतबा जगत मोल पाया ।
सो वो इश्क है इससे नहीं, खुशकहानी ।।

प्रियेचे नेत्र म्हणजे कटचारी. छे, पण कोणतीही दुधारी कटचार त्यांची बरोबरी करू शकणार नाही.

प्रियेच्या नयनांत विलास भरला आहे. तिचे कुंतल जिवाला आनंद देणारे आहेत. प्रियेचे गाल म्हणजे चंद्र-सूर्यच जणू.

पिया के नैनांमे बहोत छंद हैं ।
ओ दो जुल्फ है, जीव का आनंद है ।।

मोहन के ओ दो गाल तशबीह है ।
सूरज एक दुजा सो चूं चंद है ।।

प्यारी के नैनां हैं जैसे कटारे ।
न सम उसके अंगे कोई है दोधारे ।।

तुझा प्रेमज्वर ज्याला चढला त्याला औषध म्हणजे तुझे लाल माणकासारखे ओठ होत.

असर तुज मुहब्बत का जिसको चढेगा ।
तिरे लालबिन उसको कोई न उतारे ।।

ती चंद्रमुखी आहे. तिच्या चेहऱ्यावर तेज ओसंडून वाहते. पैगंबराची कृपा, कुतबशहाबरोबर ती मदिरेचे पेल्यावर पेले रिकामे करीत आहे.

नबी सदके कुतबासो मद पीवे जमजम ।
वो चंदमुख के जिस मुखसे ज्योती सिंगारे ।।

सर्व सुंदरींत तुझे सौंदर्य खुलून दिसते. तुझे शरीर मदिरेप्रमाणे गुलाबी आहे.

तिरा हुस्न हस्नां में भाया दिसे ।
मदन प्याला रंग अंग सुहाया दिसे ।।

तुझ्या नेत्रांतील निद्रेची मादकता पाहून मदिरेने भरलेल्या पात्राचा भास होतो.

इश्क नींद तुज नैन म्याने सुहे ।
सुराही प्याला भराया दिसे ।।

हृदयाच्या बागेत मी प्रेमाचे बी पेरले आहे. त्यातून आनंदफुले फुलली आहेत.

इश्क बीज पेऱ्या हू दिलबाग में ।
अनंद फूल उससे खिलाया दिसे ।।

अशी अनेक उदाहरणे देता येतील. मुहंमदकुली कुतबशहाची प्रेमकवने म्हणजे कल्पनेचे खेळ नव्हते. त्याच्या विलासी जीवनातून त्या कविता बाहेर पडल्या आहेत. सुप्रसिद्ध उर्दू साहित्यिक पैगंबरवासी डॉक्टर मुहियुद्दीन कादरी जोर यांच्या शब्दांत सांगायचे तर विलासाच्या क्षेत्रातील तो खरा मर्द होता. 'मुहंमदकुली सही मानोंमें इस मैदान का मर्द था.'

. १५ .

# उर्दू काव्याची सामाजिक पार्श्वभूमी

उर्दू साहित्याचा इतिहास पाहता आपल्याला दोनच कालखंड प्रामुख्याने आढळून येतात. इसवी सनाच्या बाराव्या शतकापासून उर्दू ही बोली भाषा म्हणून उत्तर भारतात अस्तित्वात आली. अठराव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत तिला उत्तर भारतात साहित्याची भाषा म्हणून स्थान लाभलेच नाही. फारसी ही दरबारी भाषा म्हणून नांदत होती. त्यामुळे घरी उर्दू बोलणारे हे फारसी भाषेतूनच साहित्य-निर्मिती करू लागले. कवी, इतिहासकार, धर्मशास्त्रज्ञ, राजकारणी माणसे ही सर्व आपल्या ग्रंथलेखनात फारसी भाषेचाच आश्रय घेत. इ. स. च्या बाराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत भारतात फारशीतून प्रचंड साहित्य निर्माण झाले. अमीर खुस्रौ, फैजी, काशी, सायब, उर्फी, जहरी, नजीरी, बेदिल, हे प्रमुख कवी, अबुल्फजल, निजामुद्दीन, अब्दुल कादर, जियाउद्दीन, फरिश्ता, सय्यद अली, इत्यादी इतिहासकार, मीर हसन, रुक्नुद्दीन, गेसूदराज, निजाद्दीन औलिया, शर्फुद्दीन मुनेरी इत्यादी धर्मनिष्ठ लेखकांनी फारसी साहित्यात मोठी मोलाची भर घातली.

उत्तर भारतात उर्दूला बोलभाषेहून अधिक स्थान मिळाले नाही. पण दक्षिण भारतात सोळाव्या शतकापासून उर्दू बोलभाषेला साहित्याचा दर्जा प्राप्त होऊ लागला. दक्षिणेत फारसीतून ग्रंथरचना झाली नाही असे नाही. बहामनी आणि त्यांच्यानंतर आलेल्या दक्षिणच्या अहमदनगर, गोवळकोंडा आणि बिजापूर येथील सुलतानांनी फारसी पंडितांना, कवींना आणि साहित्यिकांना आश्रय दिला. पण त्याचबरोबर त्यांनी उर्दूतून साहित्यरचनेला प्रोत्साहन दिले. वजिही, नुस्रती, इत्यादी कवींची काव्ये उर्दूतूनच आहेत. गोवळकोंड्याचे मुहंमदकुली, मुहंमद, अब्दुला हे कुतुबशहा आणि विजापूरचे इब्राहीम आणि अल्ली हे आदिलशहा हे स्वतः उत्तमपैकी उर्दूचे कवी होते.

औरंगजेबाच्या काळात मुगल जेव्हा दक्षिणेत आले तेव्हा तेथील उर्दू साहित्याची भरभराट पाहून त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. मुगल घरी-दारी उर्दूच बोलत. पण लेखनाची वेळ आली की मग कुणाला साधे पत्र लिहायचे का असेना, सगळा व्यवहार फारसीतून चालायचा. ईराणहून फारसी भाषिकांची हिंदुस्थानात सारखी वर्दळ चालू असे. त्यामुळे उत्तर भारतात फारसीचे स्थान अनेक शतके

टिकून राहिले होते.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली. मोगल सम्राट ऐषआरामी बनले. मराठ्यांनी माळवा, गुजरात, ओरिसा, खानदेश, इत्यादी सुभे आपल्या ताब्यात आणले. मोगलांचे प्रबळ सुभेदार स्वतंत्र बनले. ईराणहून फारसी भाषिकांची होणारी आवक बरीचशी कमी झाली. फारसी पंडितांची संख्या कमी कमी होऊ लागली. यामुळे दक्षिणचा कवी वली याच्या उर्दू गजला इ. स. १७३० च्या सुमारास दिल्लीला पोहोचताच त्या अल्पावधीतच लोकप्रिय झाल्या आणि लोक उर्दूकडे वळू लागले.

**संगीतात भारतीय प्रभाव**

मोगलांच्या दरबारात फारसी संगीत आणि इराणची संगीत वाद्ये यांना आश्रय होता. पण त्याहूनही अधिक आश्रय भारतीय संगीताला मिळाला. भारतीय संगीतशास्त्राचा अभ्यास अनेक मुसलमानांनी केला. शहाजहानच्या दरबारातील मुल्ला फकीरुल्ला याने तर मानसिहाच्या मनकौतुहलाचा रागदर्पण या नावाने फारसीत अनुवाद केला. ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याने शहाजहानच्या दरबारातील अनेक गवयांची नावे दिली आहेत. मुगल दरबारातील भारतीय संगीततज्ज्ञ हिंदी भाषेतूनच आपल्या रचना करीत. तानसेन, बिलासखान, खुशहालखान, नेमतखान इत्यादी गवयांची परंपरा भारतीय संगीतालाच वाहिलेली होती. भारतीय राग-रागिण्यांच्या बरोबरच अदारंग आणि नेमतखान सदारंग यांनी ख्याल, टप्पा इत्यादींचा प्रसार केला. सदारंगाच्या ठुमऱ्यांतील भाषाही अस्सल हिंदी वाटते. तिला फारसीचा स्पर्शही झालेला नाही. खालील ठुमऱ्या पाहा :

जानें ना दूँ गगरि भरन को,
सदा रंगीले ठाडो तटपर
बूंद बूंद चारों ओर
घटा छाई बिजरी चमकत है
सदा रंगीले महंमद शहा

बरसे है मेहा बूंद बूंद चारो ओर,
जाने न दूंगी पिया को मैं तो रोखुंगी नींदो मे मूंद मूंद
रैन अंधेरी कारी बिजरी चमके
सदारंग बिना नींद न लागे
मेंहा बरसे बूंद बूंद

निजामुमुल्काचा सरदार दरगाह कुलीखान सालारजंग हा इ. स. १७३८ मध्ये निजामाबरोबर दिल्लीला गेला होता. त्याने दिल्ली येथील रंगेल जीवनाचे वर्णन

केले आहे. त्याच्या ग्रंथाचे नाव आहे मुरक्के देहली ( दिल्लीचे अल्बम ). त्यात तो नेमतखान सदारंग याजबद्दल म्हणतो, " संगीतावर त्याचे प्रभुत्व अप्रतीम आहे. संगीतातील ख्याल या प्रकाराचे जनकत्व त्याच्याकडेच आहे."

**एक आख्यायिका**

महंमदशहाच्या दरबारात बीनकारांना विशेष महत्त्व नसे. अदारंग आणि नेमतखान सदारंग हे बीनकार होते. सदारंगने याबद्दल महंमदशहापाशी तक्रार केली. यावर चिडून महंमदशहाने सदारंगला कैदेत टाकले. कैदेत असताना सदारंगने ख्याल संगीताची सुरुवात केली. ही गायकी लोकप्रिय झाली. महंमदशहाने हे पाहून सदारंगची कैदेतून मुक्तता केली आणि त्याला दरबारात बोलावून त्याचा मान-सन्मान केला. अदारंग आणि सदारंग यांच्या ख्याल गायकीमुळेच लोकांचे ध्रुपदा वरून लक्ष उडाले. ख्याल गाण्याचे उदाहरण पाहा

झन झन झन पायल बाजे
कैसे जाऊं पी को मिलन
जागो मोरी सास ननंदिया।
देवरनिया और जेठनिया
अगर सुने मेरु बागरु व नेकू
और सुन पावे महंमदशहा रंगीले

**झन झन झन पायल बाजे**

ख्याल गायकीमुळे सदारंगला विलक्षण लोकप्रियता लाभली. दरगाहकुली-खान सालारजंग याने आपल्या मुरक्के देहलीत म्हटले आहे की सदारंग हा एक बादशहा सोडून इतर कोणासमोरही नतमस्तक होत नसे. सदारंगाच्या ख्याल गायकीचे अनुकरण करणारे त्या काळी अनेकजण होते. दरगाह कुली खान याने अजी अमरूद याच्या गायकीचा या संदर्भात उल्लेख केला आहे.

ख्याल, टप्पा या गायनप्रकाराच्या बरोबरीने जंगला हा प्रकारही त्या काळी रूढ झाला होता. याला रतगूला असेही म्हणत. भैरवीचा हा एक प्रकार होता. यात महंमदशहाच्या काळी गाजलेली नर्तकी आणि गायिका नूरबाई ही प्रसिद्ध होती.

**नूरबाई**

या गायिकेचा थाट काय सांगावा ! दरगाह कुलीखानाने म्हटले आहे की, अमीरउमराव तिची भेट व्हावी म्हणून आर्जवे करतात. तिचा वाडा म्हणजे अमीरांचा दरबारच वाटतो. तिचे नोकर चाकर अगणित आहेत. ती बादशहाच्या दरबारात जाते तेव्हा हत्तीवर बसून तिचे गाणे व्हावे म्हणून अमीरउमराव तिला जडजवाहिरे देत. याशिवाय तिच्या घरी बरीच रक्कम पाठवीत. तेव्हा कोठे ती

गाण्याच्या कार्यक्रमास कबूल होई. कार्यक्रम संपल्यावर तिला आणखी बिदागी द्यावी लागे.

### चिमनीबाई

बादशहाची ही एक आवडती गायिका. बादशहा तिच्यावर आसक्त होता. दुसरी गायिका कमानबाई तिचे बादशाही महालात अनेक कार्यक्रम होत.

१७३८ च्या पूर्वी ( नादिरशहाची स्वारी होण्यापूर्वी ) दिल्लीतील समाज विलक्षण ऐषआरामी बनला होता. अमीर उमरावांत मदिरापानाचे व्यसन कमालीचे होते. याशिवाय देखण्या मुलांचा षौकही सर्वत्र पसरला होता. औरंगजेबकालीन सरदार फिदवी खान याचा मुलगा आजमखान याच्याबद्दल दरगाव कुली लिहितो,

आजमखान रंगेल होता. त्याला देखण्या मुलांचा षौक होता. याच्या जहागिरीचे सगळे उत्पन्न केवळ या पोरांच्यावर खर्च होई. आणखी एक सरदार मिर्जा मन्नू याच्याभोवती देखण्या पोरांचा घोळका सतत असे. त्यांच्या मैफलीला दरगाह कुलीने गुलाबी चेहऱ्यांचा सुगंध, देखण्यांचे नंदनवन असे म्हटले आहे. दुसरे सरदार लतीफखान हे तर नेहमी मदिरापानात दंग असत. त्यांच्या येथे नूरबाई, आजि सदारंग यांचे गाण्याबजावण्याचे कार्यक्रम अनेकदा होते. अशाच एका कार्यक्रमाला स्वतः दरगाह कुलीखान हजर होता. आणखी एक सरदार किशनसिंग हा होता. त्याने कसलपुरा नावाचा मोहल्ला बसविला. तेथे वेश्यांची वस्ती असे. दिल्लीतील एकंदर समाजाचे लक्ष खावेप्यावे व मजा करावी यापलीकडे नसे. धर्मकर्मे रुढीप्रमाणे पार पाडली जात. सणावाराच्या अगर पीर-औलियांच्या पुण्यतिथीच्या दिवशी लोक निजामुद्दीन औलिया, कुतुबुद्दीन बखत्यार काकी, शहा तुर्कमान इत्यादींच्या दर्ग्यावर जात. तेथे रात्रभर कव्वाली, गजला, ख्याल, टप्पा, जंगला इत्यादींच्या मैफली रंगत.

वहिदीपुऱ्यातील एका कबरीची मौज अशी की, तेथे दरवर्षी दिल्लीतील कलावंतिणी, सारंग्ये, बजवय्ये सगळे जमत. उत्तम आणि उंची दारूने कबर धुतली जाई. त्यानंतर रात्रभर पिराच्या समाधीपाशी गायन आणि नर्तन यांचा कार्यक्रम होई. यामुळे त्यांच्या आत्म्याला समाधान लाभेल अशी दिल्लीतील कलावंतिणींची समजूत असे.

वर सांगितल्याप्रमाणे फारसी भाषेतील संगीत भारतात सामान्य लोकांत पसरले नाही. लोकप्रिय संगीताची भाषा हिंदी असे. आज आपण जिला उर्दू म्हणतो तिलाच त्या काळात लोक हिंदी म्हणत. आणि हिंदी काव्याला भारवा म्हणत. फारसी भाषा मागे पडू लागली तिचे एक कारण म्हणजे त्या काळच्या दिल्लीतील भारतीय संगीताचा प्रभाव हा होय.

**मर्सिये आणि कथाकथन**

मर्सिया म्हणजे शोकगीते. इस्लाममधील प्रसिद्ध अशी शोककथा म्हणजे पैगंबराचा नातू हुसेन याचा करबल्याच्या मैदानावर झालेला अमानुष वध ही होय. यामुळेच मुसलमान लोक मुहरम महिन्याचे दहा दिवस सुतकासारखे पाळतात. या काळात करबल्याच्या प्रसंगावर शेकडो शोकगीते म्हटली जातात. हे सगळे मर्सिया साहित्य विलक्षण प्रभावी आहे. अठराव्या शतकापर्यंत हे मर्सिये फारसी भाषेतून रचिले जात. पण फारसी जाणणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली. विशेषतः बायकांपैकी फारच थोड्यांना फारसी समजत असे. त्यांची मागणी पुरविण्यासाठी म्हणून मर्सिये गायक उर्दूतून मर्सिये म्हणू लागले. हां हां म्हणता त्यांना लोकप्रियता लाभली. मुहंमदशहाच्या काळात उत्तम मर्सिये गाणारे असे अकरा इसम दिल्लीत होते. दिल्लीत उर्दूतून आपले व्यवहार करणारा वर्ग म्हणजे कथाकथकांचा होय. त्यांना दास्तानगो म्हणत. त्या काळी दिल्लीत बादशहापासून सामान्य माणसांपर्यंत सर्वांना गोष्टी ऐकण्याचा षौक असे. बादशहापाशी धंदेवाइक कथाकथक असत. रात्री बादशहाला झोप येण्यापूर्वी ते अमीर हम्जा, अलफलैला, बद्रमुनीर, हातमताई किंवा अशाच अनेक अद्‌भुत कथा सांगत. दिल्लीच्या चांदणी चौकात धंदेवाइक कथाकथक तासन्‌तास राजपुत्रांच्या, राक्षसांच्या, पऱ्यांच्या अद्‌भुत कथा सांगत असत. त्या ऐकण्यासाठी लोकांची गर्दी जमत असे. या कथा उर्दूतून सांगितल्या जात. त्यामुळे त्या अतिशय लोकप्रिय झाल्या.

दिल्लीच्या समाजाला आता वीररसाचे वावडे झाले होते. बादशहा निष्क्रिय आणि अमीरउमराव ऐषआराम असा प्रकार होता. अकबराचा पराक्रम आणि औरंगजेबाची जिद्द ही कधीची इतिहासजमा झाली होती. मराठयांच्याकडून मोगल एकसारखे मार खात होते. १७३७ च्या मार्चमध्ये बाजीराव याने दिल्लीवर धडक मारली त्या वेळी दिल्लीत सर्वांची पाचावर धारणा बसली. मोगलांत शिपाईगिरी नावालाच शिल्लक राहिली. शिपायांचे वर्णन पुढील ओळींत पाहा.

अहो, यांनी लढाईचे तोंड पाहून वीस वर्षे झाली; आता हे औषध खाऊन जगत आहेत. घरातील दारू बाहेर काढून ती पीत बसतात. यांचा वेष पाहिला तर कोणाला वाटावे की हे म्हणजे जंगलातील चित्तेच होत. यांच्या गळयात सोन्याच्या साखळया आणि हाताला सोन्याचे बाजुबंद ही आढळून येतात.

लडे हुये तो बरस बीस इन को बीते थे
दुआके जोरसे दाई दवाके नीते थे
शरावे घरकी निकाले मजेसे पीते थे
निगारो नक्श में जाहीर गोया के चीते थे
गले में हंभलिया बाजूपर तिला के नाल

बादशहाकडे वर्दी येई की, आज मराठ्यांनी गुजरात व्यापली आहे, उद्या ते माळव्यात पसरत आहेत, परवा ते दिल्लीकडे येतील. यावर बादशहा सैन्य घेऊन निघत काय ? छे ! ते उदास होऊन लाल किल्ल्याच्या हौदातील मासे पाहात बसत, आणि मग निजामुल्मुल्कासारखे सरदार बाजीरावाला पत्रे लिहीत, 'तुमच्या वागणुकीने बादशहाच्या मनाला अतिशय दुःख होत आहे. हे तुम्हाला शोभते काय ?'

मोगलांची अशी दैना उडाली होती. बादशहाची ही स्थिती तर सामान्यांचे काय सांगावे ? कठोर वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून सगळेच कधी पिरांच्या दर्ग्यात जमून गाणेबजावणे ऐकत तर कधी चांदणीचौकात गोष्टी ऐकत बसत; किंवा देखण्या मुलांच्या मागे लागत. नाही तर वेश्यांची माडी चढत. दर्ग्याचे उरुस म्हणजे नेत्रपल्लवी आणि करपल्लवी यांची खैरात असे. कोणी रथापाशी (बैलगाडी) जाऊन संकेत करतो. उलट तिकडून पडदा बाजूला सारून नेत्रपल्लवी होते. सगळे मजेत आणि प्रसन्नपणे चालले आहेत. प्रणयव्यापारात प्रत्येकजण तज्ज्ञ बनला आहे.

कोई रथपास आकर करता इशारे
कोई पर्दे उठा जडता नजारे
चले जाते थे सब खुश वक्त व दिलशाद
फनूने आशिकी पे हर एक उस्ताद

एकीकडे सामान्य जनतेत फारसीची आवड आणि त्या भाषेचे ज्ञान ही कमी झाली. दुसरीकडे भारतातील फारसी साहित्यिकांना इराणहून आलेले फारसी भाषिक तुच्छ लेखू लागले. भारतातील फारसी साहित्यिक विद्वत्तेत कमी होते असे नाही. पण फारसी ही त्यांची मातृभाषा नव्हती. इराणहून आलेला हजीनसारखा कवी चक्क म्हणू लागला की तुम्ही लोक फारसीतून काय कविता करता. तुम्ही आम्हा लोकांची बरोबरी कधी तरी करू शकाल काय ? फारसी ही आमची मातृभाषा आहे, तुमची नव्हे. सौदा आणि मीर अशा कविश्रेष्ठांनाही याचा अनुभव आला. त्यातच नादिरशहाने ईराणहून येऊन दिल्ली उद्ध्वस्त केली. पंचवीस ते तीस हजार माणसे ठार मारली आणि सत्तर ऐंशी कोटी रुपयांची लूट घेऊन तो निघून गेला. या घटनेचा परिणाम भारतातील फारसी साहित्यिकांवर झाल्याशिवाय राहिला नाही. हळूहळू फारसी पंडित उर्दूकडे वळू लागले. खान आरजू या भारतीय कवीनेच कविश्रेष्ठ सौदा याला म्हटले,

'मिर्जा, फारसी आता तुमची मातृभाषा नाही. त्या भाषेत तुम्ही कितीही केले तरी फारसी मातृभाषा असलेल्या साहित्यिकांच्या प्रशंसेला पात्र होणारे काव्य तुम्ही करू शकणार नाही. तुमची प्रवृत्ती काव्यरचनेला अनुकूल आहे. उर्दूत तुम्ही काव्यरचना कराल तर अद्वितीय ठराल.'

भाषा कोणतीही असो, विषय उत्तम असला पाहिजे. साहित्यरचना केवळ

फारसी भाषेवरच अवलंबून आहे असे नाही. फारसीमध्ये तू कितीही प्राविण्य मिळवशील ? आपल्याच भाषेत तू उत्तम कर बरे.

कोई जबान हो लाजिम है खूबीयेज्मू
जबाने फर्स पे कुछ मुन्हसर सुखन तो नहीं
कहांतक उनकी जबां तू दुरुस्त बोलेगा
जबान अपनीमें तू बांध मानीये रंगी.

पिरांचे उरूस किंवा प्रतिष्ठितांच्या घरचे समारंभ इत्यादींच्या निमित्ताने जमणाऱ्या मेळाव्यांत कवी आपल्या कविता म्हणून दाखवीत. फारसी काव्यवाचनाच्या कार्यक्रमाला मुशाइरे म्हणत आणि उर्दू काव्यवाचकांच्या कार्यक्रमाला मराख्ते म्हणत. हळूहळू फारसी कवितांच्या मुशाइऱ्यांना येणाऱ्यांची संख्या कमी झाली. उलट मराख्ते हे उर्दू काव्यवाचनाचे असल्यामुळे लोक अशा कार्यक्रमांना अधिकाधिक संख्येने हजर राहू लागले. अशा अनेक मराख्तांची नोंद त्या काळच्या ग्रंथांतून आपल्याला आढळून येते. सुप्रसिद्ध कवी खान आरजू, मीर तकी मीर, ख्वाजा मीर दर्द इत्यादींनी उर्दू काव्यवाचनाचे कार्यक्रम घडवून आणण्यात फार मोठा भाग घेतला. अशा कार्यक्रमांत फारसी भाषापंडित आपल्या उर्दू कविता म्हणून दाखवीत. फारसी थोडीबहुत जाणणारे पण उर्दू काव्याची हौस असणारे होतकरू कवी आपल्या साहित्यिक जीवनाची सुरुवात अशा कविसंमेलनांतून करीत. अशी संमेलने दीर्घ काव्याच्या वाचनाला उपयुक्त ठरत नाहीत. त्यामुळे चौदा अगर एकवीस ओळींच्या गजला संमेलनांतून म्हटल्या जाऊ लागल्या. आणि उत्तम गजला आणि गजलाकार यांना लोकप्रियता लाभू लागली. लखनौ, रामपूर, पाटणा, भूपाल, इत्यादी ठिकाणी अशा कार्यक्रमांची अनुकरणे होऊ लागली. त्यामुळे दिल्लीच्या कवींना आणि दिल्लीत रूढ झालेल्या उर्दू भाषेला देशभर मान्यता मिळाली. आणि दक्षिणी उर्दू मागे पडू लागली.

फारसीची जागा उर्दूने घेतली खरी, पण फारसी काव्याचे प्रकार आणि काव्यात वापरले जाणारे संकेत हे उर्दूत समाविष्ट झाले. शमा परवाना (दिवा-पंतग), गुलबुलबुल, सय्याद आशियाना (पारधी आणि घरटे), फलके गर्दू (काल-चक्र किंवा खचक्र), मैखाना (मद्यालय), साकी (मदिरा पाजणारा), जुलूम कर-णारी प्रेयसी (ही वारांगनाच असावयाची. हे सोज्ज्वळ गृहिणीचे चित्रण नाही.) किंवा नुक्तीच मिसरूड फुटत असलेला देखणा पोरगा (या मधुर ओठांवर विलसणारी ही मिसरूड नव्हे. ओठांवरची साखर टिपण्यासाठी लागलेली मुंग्यांची रांग आहे.)

लबे शीरीं पे श्रीजन के नहीं खते सियाह
डार टूटी है मिठाई पे शकर खूरों की

असे संकेत उर्दू काव्यात आले. उर्दू काव्याच्या उत्क्रांतीची सामाजिक पार्श्वभूमी ही अशी आहे.

. १६ .

# मानवी जीवनाचा महान भाष्यकार गालिब !

[ है और भी दुनिया में सुखनवर बहोत अच्छे ।
कहते हैं कि गालिबका है अंदाजे बयां और ॥ ]

कविश्रेष्ठ मिर्जा असदुल्लाखां गालिब याच्या मृत्यूला काल पंधरा फेब्रुवारी रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. उर्दू कविमालिकेत मीर, सौदा, मोमिन, जौक, दाग इत्यादी अनेक प्रसिद्ध कवींची नावे आपल्याला आढळून येतात. पण गालिबला जी लोकप्रियता त्याच्या हयातीत लाभली, आणि गेल्या शंभर वर्षात लाभत आली आहे ती त्या प्रमाणात वरील कवींना लाभली नाही. गालिबच्या लोकप्रियतेचे रहस्य त्याच्या जीवनविषयक अनुभवातून बाहेर पडलेल्या विचारांत, जीवन-निष्ठेत आणि अप्रतिम अशा प्रेमगीतांत आहे.

उर्दू काव्याचे अनेक प्रकार आहेत. वस्तुनिष्ठ वर्णनाच्या दीर्घ कवितांना 'मस्नवी' म्हणतात, प्रार्थनागीतांना 'मनाजात' आणि 'नात' म्हणतात, वीरगीतांना 'रजिमया' म्हणतात, स्तुतिगीतांना 'कसीदा' म्हणतात. पण आपण ज्यांना भावगीते म्हणतो त्यांचा समावेश 'गजल' या प्रकारात करण्यात येतो. आपल्या बहात्तर वर्षांच्या आयुष्यात ( जन्म १७९७, मृत्यू १८६९ ) गालिबने फार्सी आणि उर्दू या दोन्ही भाषांतून काव्यरचना केली. त्याची फार्सी कविता त्याच्या उर्दू कवितांच्या चौपटीने तरी अधिक आहे. त्याने आपल्या उर्दू–फार्सी काव्यांत कसीदा, मर्सिया ( शोकगीत ), नात, मनाजात, मस्नवी, रुबाई हे सर्व प्रकार हाताळले. पण त्याच्या प्रतिभेचे विस्मित करून सोडणारे दर्शन आपल्याला घडते ते त्याच्या गजलांतून. आपल्या गजलांतून त्याने जीवन, अध्यात्म, निष्ठा, प्रेम, प्रियाराधन इत्यादींसंबंधाने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांचे वर्णन करताना त्याची शैली ही वैशिष्ट्यपूर्ण बनते.

## हसतमुखाने दुःख झेलले

दुःखमय जीवन जगत असतानाही जीवनाकडे हसतखेळत पाहण्याचा त्याचा स्वभाव आहे. खोल आणि आत्यंतिक अशा दुःखमय प्रसंगातही तो अशा रीतीने वर्णन करतो की, वरवर पाहणाऱ्यांना वाटावे की, याला विषेश दुःख झाले नसावे.

पण तेच थोड्याशा बारकाईने पाहिले की गालिबवर दुःखाचा किती भयंकर आघात झाला आहे, याची वाचकाला कल्पना येते. याचे एक उदाहरण पाहा. गालिबला सात मुले झाली, पण ती सगळी अल्पायुषी ठरली. शेवटी त्याने आपल्या मेहुणीचा मुलगा 'आरिफ' याला आपला मुलगा मानले. तो आरिफवर जिवापाड प्रेम करीत असे. पण दुर्दैवाने आरिफ हा ऐन तारुण्यात मरण पावला. या घटनेने गालिबला किती दुःख झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी. पण ते व्यक्त करण्याची त्याची शैली पाहा; म्हणजे त्याने दाखविलेल्या सयंमात किती दुःख भरले आहे याची कल्पना येईल. आरिफला उद्देशून गालिब म्हणतो—

'हे आरिफ, या लोकातून निघून जाण्यापूर्वी तू माझी वाट पाहायची असती. आता एकटाच निघून गेलास ना? मग काही दिवस तुला परलोकात एकटेच राहावे लागेल.

कालच तू या जगात आलास, आणि आजच जातो म्हणतोस हे काय? आजचा मुहूर्त चांगला होता? मला माहीत आहे की प्रत्येक दिवस हा काही चांगल्या मुहूर्ताचा नसतो. पण म्हणून काय झाले? आजच निघून जाण्याची काय घाई होती?

अरे, असा काय तू सचोटीचा होतास म्हणून मृत्यूने आपल्या कराराचा तगादा केल्याबरोबर तू त्याच्या हाकेला ओ दिलीस? त्याला अजून काही दिवस टाळायचे असतेस!

बरे, मी आणि 'नय्यर' तुला आवडत नसू. पण घरातील पोराबाळांचे कौतुक अजून काही दिवस पाहायला तुला काय झाले होते?

लाजिम था के देखो मेरा रस्ता कोई दिन और ।
तन्हा गये क्यौं ? अब रहो तन्हां कोई दिन और ।।

आये हो कल और आजहि कहते हो कि जाऊं ।
माना के हमेशा नहीं अच्छा कोई दिन और ।।

तुम कौन से ऐसे थे खरे दादो सितद के ।
करता मलकुल मौत तकाजा कोई दिन और ।।

मुझसे तुझे नफरत सही, 'नैयर' से लढाई ।
बच्चोंका भी देखा न तमाशा कोई दिन और ।।

**पडदा पद्धतीची हद्द !**

गालिबच्या आयुष्यात एक प्रेमप्रकरण होऊन गेले. तारुण्यात एका नर्तकीवर त्याचे प्रेम जडले होते. पण ती थोड्याच दिवसांत मरण पावली. तिच्यावरच्या शोकगीतात गालिबची हीच शैली दिसून येते. तो म्हणतो—

'आयुष्यभर आपण एकनिष्ठ राहू असे वचन तू दिले होतेस. पण प्रिये, आयुष्यच क्षणभंगुर ठरले त्याची काय वाट ?'

आपले प्रेम-रहस्य उघडे पडेल म्हणून तू मातीच्या बुरख्याआड (थडग्यात) जाऊन लपलीस. पडदापद्धतीची ही हद्द झाली !

उम्रभरका तूने पैमाने वफा बांधा तो क्या ?
उम्रको भी तो नहीं है पाया दारी हाथे हाथे ।
शर्मे रुसबाईसे जा छिपना नकाबे खाक में ।
खत्म है उल्फतकि तुझपर पर्दादारी हाथे हाथे ।।

गालिबने आपल्या दीर्घ आयुष्यात अनेक सुखदुःखे पाहिली, अनेक आपत्ती भोगल्या. संततिवियोग त्याच्या नशिबी आला. आर्थिक अडचणी, कर्जबाजारीपणा ही तर शेवटपर्यंत त्याच्या मागे लागली होती. मोगल राजवटीचे, मोगल संस्कृतीचे एक युग झपाटयाने नाहीसे होत असलेले त्याने पाहिले. आणि १८५७ च्या प्रलयंकारी वणव्यात पडलेली मोगल राजघराण्याची आहुती, प्रियजनांचा मृत्यू, अनेक कुटुंबांवर पडलेली संकटे त्याने पाहिली. जीवन हे किती खडतर आहे, किती दुःखपूर्ण आहे आणि किती क्षणभंगुर आहे हे त्याला दिसून आले. त्याच्या काव्यात त्याच्या या अनुभवांचा खोल ठसा उमटला आहे. सर्वभक्षक काळाचा महिमा वर्णन करताना, उर्दू काव्यातील मैफिल, शमा (दिवा) इत्यादी संकेत वापरून तो म्हणतो :

'रात्री मैफिलीत फुलांचा सडा पडलेला दिसतो; जणू काय फुलांची रासच मैफिलीत येऊन पडली आहे. त्या मैफिलीत साकीचे (प्रिया) आकर्षक चालणे म्हणजे डोळयांना स्वर्गदर्शनाचे सुख लाभणे; आणि गायकांचे गाणे म्हणजे कानांना स्वर्गीय संगीताचा लाभ होणे आहे. पण...

पण ह्याच मैफिलीत दिवसा-उजेडी येऊन पाहा. ती रात्रीची मौज आणि ते कर्णमधुर संगीत कोठे ? चहूकडे उदास वातावरण दिसते.

ह्या मैफिलींचा अवशेष म्हणजे एक दिवा शिल्लक राहिला आहे आणि तोही विझून गेला आहे !'

**जीवनावरील भाष्य**

जीवनाबद्दल गालिबने अनेक सुंदर ओळी लिहिल्या आहेत. तो म्हणतो, 'माझे अस्तित्व हेच गाऱ्हाणे आहे. परमेश्वराने या दुःखमय जीवनात मला का आणले आहे ? हृदयाच्या शोक-शाळेत मी अजून धडेच शिकत आहे. तेही दोन शब्दांचे. एक म्हणजे 'गत' आणि दुसरा म्हणजे 'होता.'

माझ्या अस्तित्वामध्येच माझ्या नाशाचे रहस्य लपले आहे. एकीकडे मी अंतर्बाह्य प्रेममय झालो आहे आणि दुसरीकडे मला स्वतःच्या जीवनाची लालसा

आहे. प्रेमाच्या विजेने जीवन दग्ध होण्याचा संभव आहे. तरी पण मी एकीकडे प्रेमाची आराधना करीत आहे, आणि दुसरीकडे जीवनाचा नाश होणार म्हणून हळहळ करीत आहे....

प्रत्येक काम सोपे होणे कठीण आहे. हेच पाहा ना, माणसे तर सर्वत्र दिसतात. पण सगळ्याच माणसांना माणूस (माणुसकीने युक्त) बनणे सोपे नाही.

बसके दुश्वार है हर काम का आसां होना ।
आदमी को भी मुथस्सर नहीं इन्सां होना ॥'

'जगाचे व्यवहार हे इतक्या हौसेने चालले आहेत याचे कारण जीवन हे अल्प आहे म्हणूनच होय. मरण नसते तर जगण्यात गोडी राहिली नसती.

हवसको है निशाते कार क्या क्या
न हो मरना तो जीनेका मजा क्या ?'

'परमेश्वरा, चित्रगुप्ताने आमच्याबद्दल काही लिहून ठेवावे आणि आमच्यावर आरोप ठेवण्यात यावा ? अरे, तो लिहीत असताना आमच्यातर्फे कोणी तरी तेथे हजर होता काय ?

पकडे जाते हैं फरिश्तोंके लिखेपर नाहक ।
आदमी कोई हमारा भी दमे तहरीर भी था ?'

'परमेश्वरा, योग्य आणि बुद्धिमान माणसालाच काळ छळत असतो. आम्ही असे कोण बुद्धिमान लागून गेलो आहोत की काळाने आम्हाला छळण्यास प्रवृत्त व्हावे ? ( गालिबची शैली पाहा. त्यानें आपण बुद्धिमान असल्याचे खुबीने सूचित केले आहे. )

हम कहांके दाना थे ? किस हुनर में यक्ता थे ?
बेसबब्र हुवा गालिब दुश्मन आसमां अपना ॥'

'मूर्ख मानव समजत असतो की, जे आपण काही करतो ते आपणच करतो; पण वास्तविक पाहता एक पान जरी हालायचे असले तरी त्याला परमेश्वराची प्रेरणा लागते.

अरे मानवा, काल-चक्र सारखे फिरत असते. आज वाईट दिवस आले म्हणून घाबरायचे काय ? पुन्हा हे चक्र पालटेलच की !

रात दिन गर्दिशमें हैं सात आसमां
हो रहेगा कुछ न कुछ घबरायें क्या ?'

'जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अनुभव घेतला पाहिजे. म्हणजे जीवनाच्या मागील सत्याकडे पाहण्याची दृष्टी येईल.

जीवन हे संकटांनी भरले आहे. पण ते सर्व सहन केले पाहिजे. सहन केल्यानेच निभाव लागणार आहे. खचून चालणार नाही. कारण एकीकडे प्रसंग बाका आहे तर दुसरीकडे जीव प्यारा आहे.

ताव लायेही बनेगी ' गालिब '
बाकया सख्त है और जान अजीज '

' जीवनरूपी शोकातून पार पडण्यास मृत्यू हाच एक मार्ग आहे. पण तो येईपर्यंत हे जीवन जगलेच पाहिजे. तो दिवा पाहा. पहाट होऊन त्याच्या विझण्याची वेळ येईपर्यंत तो जळतच राहतो ना ? तेच आपणही केले पाहिजे.

गमे हस्तीका ' असद ' किससे हो जुजमर्ग इलाज ।
शमा हर रंग में जलती है सहर होने तक ।। '

' जीवन आकर्षक आणि सुसह्य झाले आहे ते प्रेमामुळे.

या प्रेमाचा लाभ झाल्यामुळेच जीवनाचा खराखुरा आनंद अनुभवास आला. रोगाला औषध मिळाले; पण त्याबरोबर ज्या रोगाला औषध नाही अशी व्यथा पदरी पडली !

इश्क से तबीयतने जीस्त का मजा पाया ।
दर्द की दवा पायी दर्दे बेदवा पाया ।। '

गालिब हा एक संवेदनाशील हृदय बरोबर घेऊन आला होता. जीवनात त्याने अपार दुःखे भोगली. दुसऱ्यांची दुःखे पाहून तो कळवळून जाई. ' अरे, हे हृदय आहे. हा काही दगड नव्हे की वीट नव्हे. मग ते व्यथेने का बरे भरून येणार नाही ? आम्ही हजार वेळा आक्रंदन करू. आम्हास कुणी काय म्हणून त्रास द्यावा ?

दिल ही तो है न संगोखिस्त दर्दसे भर न आयो क्यों ।
रोयेंगे हम हजार बार कोयी हमें सताये क्यों ।। '

पण जीवनाचा आनंद विश्व-जीवनात विलीन झाल्यानेच लाभतो, असा गालिबचा सिद्धान्त आहे. तो म्हणतो :

' जलबिंदूचे सर्वोच्च वैभव म्हणजे समुद्रात मिसळून नाहीसे होणे हेच आहे. म्हणजे आजार अमर्याद झाला की त्यालाच औषधाचे स्वरूप आले म्हणायचे !

इशरते कतरा है दरियामें फना हो जाना ।
दर्दका हदसे गुजरना है दवा हो जाना ।। '

जीवनात झगडण्यासाठी निष्ठा आणि निर्धार ही हवी. यावर गालिबने आपल्या काव्यात ठिकठिकाणी भर दिला आहे. दृढनिष्ठा हेच धर्माचे मर्म होय असे तो म्हणतो– (वफादारी बशर्ते उस्तुवारी अस्लेईमां है । )

**सूफी विचार-प्रभाव**

गालिबचे अध्यात्मासंबंधी विचार पाहिले तर तो पूर्णपणे अद्वैती होता असे दिसते. कुराणप्रणित इस्लाम हा द्वैती आहे. पण सूफीतील अनेक पंथ 'एक ईश्वर सत्य, बाकी सर्व मिथ्या' असे मानीत. गालिबवर सूफी पंथाचा प्रभाव पडलेला दिसतो. उदाहरणार्थ–

"हे असद, या अस्तित्वाच्या भ्रमात गुरफटू नकोस. अरे ही सारी सृष्टी म्हणजे कल्पनांचे जाळे आहे.

हस्तीके मत फरेबमें आजादयो 'असद'।
आलम तमाम हल्काये दामे खियाल है ॥"

"परमेश्वरा, जर तुझ्यावाचून दुसरे कोणी नाही तर हा मतामतांचा गलबला कशासाठी ?

जबके तुझबिन नहीं कोयी मौजूद
फिर ये हंगामा अये खुदा क्या है ?

अथवा

न था कुछ तो खुदा था, कुछ न होता तो खुदा होता।
डबोया मुझको होने ने, न होता मैं तो क्या होता ?"

धर्माबद्दल गालिबला आदर होता. पण कर्मठ माणसे, नेमनियमांचे स्तोम माजविणारे लोक, स्वर्ग–नरक इत्यादींबद्दल गालिबने मिस्किल शब्दांत आपली नापसंती व्यक्त केली आहे. ती पुढीलप्रमाणे :

"हे प्रवचनकारा, मशिदीच्या शेजारी मद्यालय हवे. अरे परमेश्वराने नाही का मशिदीच्या कमानीसारख्या भुवयांपाशी मद्यालयासारखे डोळे निर्माण केले ?

मस्जिद के जेरे साया खराबात चाहिये।
भौंपास आंख किब्लाये हाजात चाहिये ॥"

"तुमचा स्वर्ग कसा काय आहे हे आम्हाला माहीत आहे. मनाच्या करमणुकीला चाळा म्हणूनच हा स्वर्गविचार बरा आहे !

हमको मालूम है जन्नत कि हकीकत।
लेकिन दिलके खुश रखनेको गालिब ये खियाल अच्छा है ॥"

गालिबच्या धर्माच्या कल्पनेत असहिष्णुतेला थारा नव्हता. त्याच्या मित्रांत आणि शिष्यांत सर्व जातीजमातींचे लोक होते. एका पत्रात तो म्हणतो, "बंदा परवर, मैं तो मुसलमान हो या हिंदू या नक्रुसरानी (खिस्ती) अजीज रखता हूं। और अपना भाई गिनता हूँ। दूसरा माने या न माने ॥"

**गजलांतील गोडवा**

गालिबच्या प्रेमगीतांत उत्तान शृंगार नाही, पण गोडवा आणि कल्पकता हे गुण प्रकर्षाने आढळून येतात. रमणींची आपादमस्तक वर्णने 'सरापा' या पद्य-प्रकारात आढळतात. पण गजलांतून प्रेयसी प्रियकराकडे दुर्लक्ष करते, त्याचा छळ करते, त्यामुळे प्रियकराच्या मनाची मोठी शोचनीय स्थिती होते ! या प्रसंगीच्या भावनांचे वर्णन कवी गजलांतून करतो. सौन्दर्याचे वर्णन गजलांत नसतेच असे नाही. पण ते गजलांचे वैशिष्टच नव्हे. अशा वर्णनातही गालिबची स्वतःची अशी लकब दिसून येतेच. काही उदाहरणे पाहा :

"आधीच ती (प्रिया) अप्सरा आणि त्यातून तिचे वर्णन करणारा मी ! पण दुर्दैव माझे. ज्या मित्राला मी विश्वासात घेऊन त्याच्यासमोर तिचे वर्णन केले, तोच माझा प्रतिस्पर्धी बनला !

जिक्र उस परीवश का और फिर बयान अपना ।
बन गया रकीब आखिर जो था राजदां अपना ।। "

"प्रियेने बुरख्याच्या आत कपाळाला आठ्या घातलेल्या दिसतात ! म्हणूनच बुरख्यावर कपाळाच्या ठिकाणी सुरकुती पडली आहे !

है तेवरी चढी हुयी अंदर नकाब के ।
है इक शिकन पडी हुयी तर्फ नकाब में ।। "

"प्रियेचे शेकडो संकेत आणि इशारे असोत. पण तिची एक चोरटी नजर या सर्वांपेक्षा अधिक प्रभावी आहे. तसेच तिचे अनेक शृंगार असोत, पण तिचा एक रुसवा सर्व शृंगारापेक्षा जास्त आहे !

लाखों लगाव एक चुराना निगाह का ।
लाखों बनाव एक बिगडना इताब में ।। "

"मी प्रियेला म्हटले की या जन्मात नाही तरी परलोकात तू अप्सरा होशील. तेव्हाच मी तुला हस्तगत करीन. तेव्हा ती नखऱ्याने म्हणते, काय अप्सरा ही सौन्दर्यात माझी बरोबरी करू शकेल असे समजता की काय ?

मैं जो कहता हूं के हम लेंगे कयामत में तुम्हे ।
किस रऊनत से वो कहते हैं के हम हूर नहीं ।। "

"प्रेमिकांचा छळ करण्याची तिला सवय ! पण आता तीही एकाच्या प्रेमात सापडून दुःख भोगू लागली आहे. आम्हाला असा न्याय मिळाला म्हणावयाचा !

दिल लगाकर लग गया उनकोभी तनहा बैठना ।
बारे अपनी बेकसी की हमने पाई दाद यां ।। "

" तुझे अलकपाश ज्यांच्या खांद्यावर खेळतील त्यांच्या रात्री, त्यांच्या निद्रा आणि त्यांचे विलास यांचे काय वर्णन करावे ?

नींद उसकी है, दिमाग उसका है, रातें उसकी हैं।
तेरी जुल्फें जिसके शानोंपर परीशां हो गयी ॥ "

" नाजुक प्रियेचे पाय आज का बरे दुखत आहेत ? ती कुणाच्या तरी स्वप्नात चालत तर गेली नसेल ना ?

शबको किसीके ख्वाबमें आया न हो कहीं।
दुखते हैं आज उस बुते नाजुक बदन के पांव ॥ "

" प्रेमात सापडून ती अप्सरा अधिकच नाजूक दिसू लागली आहे. जितका प्रेमचिंतनाने तिच्या चेहेऱ्यावरचा रंग (कान्ती) उडून चालला आहे, तितकाच तिच्या प्रेमरंगाला बहर येत चालला आहे !

होके आशिक वो परीरुख और नाजुक बन गया।
रंग खुलता जाये है जितना उडता जाये है ॥ "

" तिच्या संभाषणाची गोडी काय वर्णावी ? ती काही बोलली की असे वाटू लागते की तोच विषय नेमका माझ्या मनात घोळत आहे !

देखना तकरीर की लज्जत के जो उसने कहा।
मैंने ये जाना के गोया ये भी मेरे दिल में है ॥ "

" माझी दृष्टी तिच्यापर्यंत पोहोचून बेभान झाली. ती विखुरल्यामुळे तिचे दर्शन घडणे अशक्य झाले. जणू काय माझी विखुरलेली दृष्टी हाच तिचा बुरखा बनला !

नज्जारे ने भी काम किया वां नकाब का।
मस्तीसे हर निगाह तिरे रुखपर बिखर गयी ॥ "

" ती आल्याने माझ्या चेहऱ्यावर कळा येते. आणि तिला वाटते की माझा आजार नाहीसा झाला आहे !

उनके देखेसे जो आ जाती है मूंहपर रौनक।
वो समझते है के बीमार का हाल अच्छा है ॥ "...

" ती इतकी नाजूक आहे की, ती हाती लागली तर तिला हात लावावा की नाही याचा संकोच वाटू लागतो !

इस नजाकत का बुरा हो वो भले हैं तो क्या।
हाथ आवे तो उन्हें हात लगाये न बने ॥ "

अशी किती म्हणून उदाहरणे द्यावी ?

**पुन्हा एकदा**

अनेक दिवसांनंतर प्रेयसी भेटण्यास येत आहे असे कळल्यास प्रेमिकाची काय मनस्थिती होते, याचे गालिबने मोठे सुंदर चित्रण 'मुद्दत हुयी है यार को मेहमा किये हुये' या प्रसिद्ध कवितेत केले आहे. तो म्हणतो :

"प्रियेला पाहुणी करून आणि तिच्या स्वागतार्थ मैफिली सजवून आणि घरात दिवाळीची आरास करून अनेक दिवस झाले आहेत ! आता ती पुन्हा येणार म्हणून हृदयाचे इतस्ततः विखुरलेले तुकडे पुन्हा एकत्र करीत आहे. कारण हृदय भग्न करण्याकरिता म्हणून तिच्या पापण्यांना आमंत्रण देऊन बरेच दिवस झाले आहेत !

आता पुन्हा जीव गुदमरू लागला. प्रेमवेडात स्वतःचे कपडे फाडून टाकल्याला अनेक दिवस झाले. आता प्रिया पुन्हा येणार म्हणून पहिल्यासारखी मनःस्थिती होऊ लागली आहे ! फिरून निःश्वासांची दाहकता दिसून येऊ लागली आहे. दाहक निश्वासांनी दिव्यासारखी आरास झालेल्याला पुष्कळ दिवस झाले आहेत.

हृदयाच्या भग्नावस्थेची विचारपूस करण्यासाठी प्रेम पुन्हा वाट चालू लागले आहे आणि जखमांवर मीठ शिंपडण्याकरिता प्रेमाने आपल्याबरोबर मिठाच्या अगणित पेटचा घेतल्या आहेत.

माझ्या पापण्यांची लेखणी मी पुन्हा हृदयाच्या रक्तात बुडवीत आहे. त्या लेखणीने मला आपल्या कपड्यांवर रंग उमटावयाचे आहेत !

हृदयाची प्रियेच्या चिंतनासाठी आणि डोळ्यांची प्रियेच्या दर्शनाकरिता आपसात चढाओढ लागली आहे. अहंकाराचे आसन उध्द्वस्त करून हृदय पुन्हा अवमान आणि अवहेलना यांची वाट चालू लागले आहे !

रसिकतेने विक्रीकरिता म्हणून पुन्हा आपली बुद्धी, हृदय आणि प्राण बाजारात मांडले आहेत.

दृष्टी पुन्हा पुन्हा आपली सारी शक्ती एकवटून फुलांनी बहरलेल्या उपवनाकडे वळत आहेत.

प्रियेचे पत्र उघडून त्याच्या आकर्षक शीर्षकावरून पुन्हा जीव ओवाळून टाकावा असे वाटू लागले आहे.

प्रिया आपले केश मुक्त सोडून पुन्हा गच्चीवर यावी, असे मनाला पुन्हा वाटू लागले आहे.

कुणी तरी डोळ्यांना काजळ लावून आपले नयनशर तीक्ष्ण करावे आणि समोर येऊन बसावे असे वाटू लागले आहे.

वारुणी पिऊन जिचा सुंदर चेहरा उजळून निघाला आहे, अशा प्रमदेकडे

पाहण्यासाठी डोळे पुन्हा उत्कंठित झाले आहेत. कुणाच्या तरी उंबरठ्यावर डोके टेकून आणि रखवालदाराचे ऋणी होऊन पडावे असे पुन्हा वाटू लागले आहे !

दिवसरात्र प्रियेचे चिंतन करीत बसावे असे पुन्हा वाटू लागले आहे.

आम्हाला छेडू नका बरे. आमचे ऊर भरून आले आहे आणि आम्ही वादळाची तयारी करून बसलो आहोत !'......

## गालिबच्या शब्दांत गालिब

गालिबच्या स्वभावात मिस्किलपणा आणि विनोद ही आढळून येतात. या वृत्तीमुळेच तो अनेक दुःखदायक प्रसंग सहन करू शकला. स्वतःबद्दल लिहिताना त्याची ही खेळकर वृत्ती दिसून येते. उदाहरणार्थ, हे शेर पाहा :

"सूफी तत्त्वज्ञानाचे प्रश्न? आणि त्याचे तुझ्याकडून इतके प्रभुत्वपूर्ण विवेचन? अरे, तू मद्यपी नसतास तर आम्ही तुला संतच समजलो असतो !

ये मसाइले तसव्वुफ, ये तेरा बयान 'गालिब'।
तुझे हम वली समझते जो न बाबाख्वार होता ॥ "......

गालिबला मरून पुष्कळ दिवस झाले. पण अद्याप त्याची आठवण येते. विशेषतः त्याचे प्रत्येक गोष्टीला 'असे झाले असते तर काय झाले असते' हे म्हणणे आठवते !

"हुयी मुदत के गालिब मर गया पर याद आता है ।
वो हर इक बात पर कहना कि यूं होता तो क्या होता ? ॥ "

"लोक विचारतात की गालिब कोण आहे ? आता तुम्हीच सांगा की यावर आम्ही काय म्हणावे ?

पूछते हैं वह कि गालिब कौन है ।
कोयी बतलावो के हम बतलाये क्या ॥

"जगात अनेक चांगले कवी आहेत. पण लोक म्हणतात की गालिबची शैली काही और आहे !

है और भी दुनिया में सुखनवर बहोत अच्छे ।
कहते हैं कि गालिबका है अंदाजे बयां और ॥ "

"अरेरे, तो सौंदर्योपासक मद्यपी असदुल्लाखान गालिब मरण पावला.

असदुल्लाखाँ तमाम हुवा ।
ऐ दरेगा वो रिंद शाहिद बाज ॥ "

"आम्ही गालिबला एकान्तात आणि बैठकीत अनेक वेळा पाहिले आहे. तो

वेडा नसेल, पण शहाणाही दिसत नाही !

देखा असद को खल्वतो जल्वत में बारहामें ।
दीवाना गर नहीं है तो हुशियार भी नहीं ॥ "

"दुर्दशेत असलेल्या गालिबवाचून जगाचे कोणते व्यापार अडून राहिले आहेत ? मग ही हळहळ आणि ही आक्रंदने काय म्हणून ?

गालिबे खस्ता के बगैर कौनसे काम बंद है ।
रोइये जार जार क्या कीजिये हाय हाय क्यों ॥ "

–असा होता हा कविश्रेष्ठ गालिब. स्वाभिमानी, कुटुंबवत्सल, सर्वांबद्दल सहानुभूती बाळगणारा, दुसऱ्यावरील संकटांनी कळवळून उठणारा, आयुष्यातील अनेक दुःखे निर्धाराने आणि खेळकरपणे सहन करणारा. त्याच्याच शब्दांत सांगायचे तर 'परमेश्वर त्याच्यावर कृपा करो,–तो एक विलक्षण स्वच्छंदी असा जीव होता !

हक मगफिरत करे, अजब आजाद मर्द था'

. १७ .

## अबुलकलाम आजादांचे एक पत्र

मौलाना अबुलकलाम आजाद यांचा एक पत्रसंग्रह गुबारे खातिर ( विचार-कण ) हा ग्रंथ म्हणजे उर्दू साहित्याचे एक अमूल्य लेणे आहे. १९४२ साली अहमदनगरच्या किल्ल्यात नजरकैदेत असताना आजादांनी ही पत्रे लिहिली आहेत. पत्रांतून आजादांचे अगाध पांडित्य आणि अभिजात रसिकता यांचा मनोहर संगम झालेला आढळून येतो. आजाद हे चहाचे पट्टीचे शौकीन होते. या विषयावरील त्यांचे पुढील पत्र पाहा :

सतरा डिसेंबर १९४२ किल्ले अहमदनगर

आदरणीय आणि सत्त्वशील,

वेळ तीच आहे. पण हाय ! अवखळ प्रकृतीला धुंदी आणणारा आणि जगात खळबळ माजविणारे विचार बाळगणाऱ्यांना विश्रांतीचे आमंत्रण देणारा तो चहा नाही.

गालिबच्या ओळी– अरे कोणी तरी माझ्यासमोर द्राक्ष मदिरापात्र ठेवा आणि मग पाहा माझ्या मुखातून शब्दांची फुले कशी पडतात ती—

फिर देखिये अंदाजे गुल अफशानीये गुफ्तार
रख दे कोयी पैमानाये सहबा मिरे आगे

मला चिनी चहा पिण्याची सवय आहे. त्याचा साठा संपून आज कित्येक दिवस झाले. अहमदनगर आणि पुणे येथील बाजारात या उंची वस्तूची कुणाला ओळखही नाही.

फारसी कवि मिर्जा काजिम कुमी याच्या ओळी—

अहो या नगरातून उन्मादकारी ध्वनी उठत नाहीत. ज्या नगरात मदिरालय नाही ते नगर उजाडच म्हटले पाहिजे. नाइलाज म्हणून हिंदुस्थानातील काळी पत्ती उकळून पीत आहे. कृष्णवर्णी माणसाला कर्पूरधवल म्हणावे या न्यायाने हिंदुस्थानात या काळ्या पत्तीला लोक चहा म्हणतात. आणि त्यात दूध मिसळून त्याचे गरम सरबत बनवितात.

कवी बाबा कुगानीच्या ओळी—

शहाणी माणसे नियम घालून गेली आहेत; आम्ही मात्र त्यामुळे अजीजीला आलो आहोत.

सुखदुःखाच्या या जगात प्रत्येक सुखाबरोबर काहींना काहीं हुरहुर ही लागलेली असते. पात्रात कितीही स्वच्छ पाणी ओता, तळाशी काही ना काही गाळ हा आढळणारच. यशाच्या धुंदीच्या मागोमाग अपूर्णतेची जाणीव असतेच. वसंत-ऋतूच्या हास्याच्या मागोमाग हेमंताची पीडा असल्याचे दुःख सगळेच करतात.

अबुल्फजलने किती यथार्थ म्हटले आहे—

पात्र भरते न भरते तोच रिकामे होते. पान वाचून होते न होते तोच दुसरे पान समोर येते.

कोणतीही इच्छा पूर्ण होण्यात काय अर्थ आहे ? पान वाचून झाले की ते उलटावे लागतेच.

एका रमजानच्या प्रसंगी आपण आपल्यापाशी असलेल्या 'सुगंधी' चहाचा उल्लेख केला होता. त्याला दुर्मिळतेची बाधा झाली नसेल अशी मी आशा करतो.

फारसी ओळी —

तू काही दरिद्री नाहीस; आणि उपासाच्या दिवशी मदिरापान हे तर दिलदारीपणाचे लक्षण आहे. या प्रश्नाच्या अर्थाकडे आपण कधी लक्ष दिले की नाही हे मला माहीत नाही. माझी काय स्थिती आहे ती काय सांगू ? वस्तुस्थिती अशी की, अनेक इतर गोष्टींप्रमाणे या बाबतीतही माझा स्वभाव सामान्य जनमताशी जुळू शकला नाही. काळाच्या निरर्थक गतीबद्दल मी नेहमीच शोक करीत आलो आहे.

राकिम मशहदीच्या फारसी ओळी—

लोक जातात त्या वाटेने गेले की आपण रस्ता भटकणारच. म्हणून कारवान ( प्रवाशांचा तांडा ) जातो त्या वाटेने मी कधीच जात नाही. चहाच्या बाबतीत माझे आपल्या सहकाऱ्यांशी मतभेद आहेत. हे मतभेद पाने आणि पत्ती यांच्यापुरतेच मर्यादित असते तर काही तडजोड होऊ शकली असती. पण मतभेद मुळातच आहेत. शाखेबद्दल नव्हे तर मूल तत्त्वाबद्दलच मतभेद आहे.

कवि जौकची ओळ—

दहन का जिकर क्या या सर ही गायब हे गरीबांसे—तोंडाचे काय बोलता, येथे माझ्या अंगरख्याच्या गळ्यापाशी माझे डोकेही नाही.

आता चहासंबंधीचा पहिला प्रश्न चहा या वस्तूचाच होय. मी चहा पितो तो चहासाठी म्हणून—लोक पितात ते दूध आणि साखर यांसाठी. म्हणज चहा हे माझे उद्दिष्ट. इतरांना चहा म्हणजे दुय्यम दर्जाचे साधन. तुम्हीच विचार करा, माझी भूमिका काय आणि लोकांची प्रवृती कशी.

कवी हाफिज यांच्या फारसी ओळी—

तुम्हाला स्वर्गातील कल्पवृक्षाची ओढ आणि मला सुरेख बांध्याच्या तरुणीची ओढ. जाऊ द्या झाले. प्रत्येकाचे विचार त्याच्य त्याच्या ऐपतीप्रमाणे असतात. सुरेख बांध्याच्या आकर्षणाला तशीच हिंमत लागते.

चहाची पैदास चीनची. गेली पंधराशे वर्षे चिनी लोक चहा वापरीत आले आहेत. पण या सुंदर पदार्थात दूध मिसळून तो घाणेरडा करण्याची कल्पना चिनी लोकांना कधीच शिवली नाही. रशिया, तुर्कस्तान, ईराण या देशांत चहा गेला तो रास्त चीनहूनच. पण तेथेही चहात दूध मिसळावे असे कुणालाच वाटले नाही. सतराव्या शतकात इंग्रजांना प्रथम चहाचा परिचय झाला. त्यांना काय वाटले कोण जाणे, त्यांनी चहात दूध मिसळण्याची अनिष्ट प्रथा चालू केली. हिंदुस्थानात चहाचा प्रचार झाला तो इंग्रजांच्याचमुळे. त्यामुळे चहात दूध मिसळण्याची वाईट प्रथा येथेही पसरली. हे प्रकरण वाढत वाढत शेवटी या थराला गेले की, लोक चहात दूध मिसळण्याऐवजी दुधात चहा घालू लागले! जगात अन्यायाचे मूळ असे थोडे होते. त्यात पुढे भरच पडत गेली. आता इंग्रज म्हणू लागले की, चहात दूध फार घालू नये. पण त्यांनी या अनिष्ट प्रथेचे बी पेरले त्याला फळे आली आहेत. या वृक्षाच्या फांद्या आता कोणी छाटू शकेल काय? आता लोक चहा काय तयार करतात,– वाहता शिराच म्हणाना. हा शिरा खाण्याच्या ऐवजी पितात आणि आपण चहा प्यालो असे समजून खुष होतात. या अज्ञान्यांना कुणी सांगावे की—

हाय कमबख्त, तूने पीही नहीं

चहा कोणत्या प्रकारचा असावा हाही एक मूलभूत प्रश्न आहे. यासंबंधी एक विचित्र गैरसमज जगभर पसरला आहे. आता कुणाकुणाशी भांडावे आणि कुणाकुणाची समजूत काढावी?

हाफिजची फारसी ओळ—

रात्रंदिवस माणसांशी सतत भांडत राहणे शक्य नाही. हिंदुस्थान आणि लंका या देशांतून जी पत्ती होते तिलाच सामान्यपणे लोक चहा म्हणतात. या चहाचे निरनिराळे प्रकार कल्पून त्यांत कनिष्ठ आणि वरिष्ठ असा भेद करतात; आणि या बाबतीत आग्रह धरतात. कोणी म्हणतात, सीलोनचा चहा चांगला; दुसरा म्हणतो, दार्जिलिंगचा चहा अधिक चांगला. म्हणजे हा प्रकार पुढील कवितेप्रमाणेच म्हणावयाचा :

हाफिजच्या फारसी ओळी—

प्रेमाच्या मार्गात मर्माला हात घालण्याची निश्चिती कोणी देऊ शकत नाही. प्रत्येकजण आपापल्या ऐपतीप्रमाणे अर्थ लावतो, इतकेच.

आता रंग, रूप, गंध यांवर भाळलेल्या या भोळसटांची कुणी समजूत

घालावी ? की बाबांनो, तुम्ही ज्याचा इतका आग्रह धरता तो मुळात चहा नाहीच.

हाफिजची ओळ—

त्यांनी वस्तुस्थिती अनुभविली नाही, म्हणून ते वाटेल त्या गप्पा मारतात.

हा गैरसमज सर्वत्र पसरण्याचे कारण असे की, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला चहाची मागणी सर्वत्र होऊ लागली. हिंदुस्थानातील काही मळेवाल्यांना वाटले की सिलोन आणि हिंदुस्थान या देशांतील उंच आणि पाऊस मुबलक असलेल्या ठिकाणी चहाचे मळें पिकविण्याचा प्रयोग करावा. त्यांनी चीनहून चहाची कलमे मागविली आणि ती या देशात लावली. त्यातून चहा काही बाहेर पडला नाही, पण जवळजवळ चहाचाच आकार आणि रंग असलेला एक नवीन पदार्थ बाहेर पडला या दुष्टांनी या पदार्थाचे नाव चहा असे ठेवले. खऱ्या चहापासून हा पदार्थ वेगळा आहे हे दाखविण्यासाठी ते या चहाला काळा चहा म्हणू लागले.

गालिबच्या ओळी—

विषयाच्या वर्णनातील गोंधळ विचारू नका. आक्रंदनाला लोक कवितेतून वर्णन करून मर्यादित करू पाहतात.

गलतीहाये मजामीं मत पूछ, लोग नाले को रसा बांधते हैं

जगाला तरी काय हवे होते ? हा दुर्मिळ चहा स्वस्त हवा होता ! झाले, मागेपुढे विचार न करता या नकली चहावर सगळेजण तुटून पडले. सगळी माणसे या गैरसमजाला एकमताने मान्यता देती झाली. तुम्ही आता कितीही डोके आपटून घ्या, ऐकतो कोण ?

मुफ्ती सद्रुद्दीन आजुर्दा यांच्या ओळी—

अंतिम न्यायदानाच्या दिवशी सारेजण तिच्याच म्हणण्याला होकार देऊ लागले. आम्हा दाद मागणाऱ्यांची कोणी चौकशीही करीना.

उसीकीसी कहने लगे अहले हशर
कहीं पुर्सिशे दादरव्वाहां नहीं

या सर्व प्रकरणांतील दुःखदायक गोष्ट म्हणजे, चीनच्या किनारपट्टीवरील काही माणसेही या गैरसमजाला बळी पडली आणि आपल्या या पत्तीलाच चहा समजून पिऊ लागली. म्हणजे बदख्शान ( येथे लाल माणके होतात ) च्या लोकांनी तांबड्या दगडाला लाल माणिक म्हणावे किंवा काश्मीरच्या लोकांनी रंगीत गवताला केशर समजून त्याने आपल्या पगड्या रंगवाव्या असा प्रकार झाला म्हणावयाचा.

फारसी ओळ— मक्केतच काफरांचे राज्य झाले तर मुसलमानी शिल्लक तरी कोठे राहणार ?

लोकमतातून ठरलेले बहुतेक निर्णय असेच असतात. मानवसमाजाचा

स्वभावच असा. शहाणी माणसे एकटी-दुकटीच असतात. सर्वत्र मूर्खांचाच बाजार आढळतो. ही माणसे काय करतील नेम नाही. विश्वास ठेवतील तर गाईला परमेश्वर मानतील, कुणाच्या विरुद्ध होतील तर येशू ख्रिताला सुळावर चढवितील.

कवी हकीम सिनाई याचा हा शोक पाहा.

'लोक तरी काय विचित्र आहेत ! गाईला परमेश्वर मानतील ( ज्यू लोकांनी मोसेसचा आदेश धुडकावून एकदा असे केले होते. ) आणि महात्मा नोआची पैगंबरीवर विश्वास ठेवणार नाही.'

यामुळे ज्ञात्यांना म्हणावे लागले :

कवि बेदिल याच्या फारसी ओळी—

लोकमताला अनुसरून वागू नका; म्हणजे तुम्ही खऱ्या मार्गावर आहात असे समजा. स्वतःवर लक्ष केंद्रित करा. त्यातच तुमचे सामर्थ्य आहे. लोकांचे अनुकरण म्हटले की तत्त्वनाश समजावा. म्हणून अनुकरण सोडा, त्यातच सत्याचा शोध आहे.

हा झाला प्रश्न मूलतत्त्वांचा. आता तपशिलाच्या गोष्टी घ्या. या बाबतीत तरी मार्ग सरळ आहे का ? नाही. सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तो साखरेचा. प्रमाण आणि प्रकार या दोन्ही बाबतींत.

कवी सादी याच्या ओळी—

रोग सहन करा, असे वैद्य म्हणतात. आणि आम्हाला तर साखरेशिवाय चालत नाही.

साखरेच्या प्रमाणाविषयी म्हणाल तर मला गोड पदार्थांबद्दल विशेष आवड नाही.

हे माझे नशीबच असावे, किंवा गोड पदार्थांची मला शिसारी बसली असावी. एक चहाच काय, कोणत्याही पदार्थात जास्त गोड असे काही मिसळले तर ते मला आवडत नाही. लोकांना गोड आवडते पण त्यामुळे माझी चव बिघडते. गोड पदार्थ खाल्ला की तोंडाची चव गेलीच. लोकांना गोड पदार्थाची आवड तर मला मिठाची आवड. खाद्यपदार्थात मीठ घातले तरी मी वरून पुन्हा मीठ घालतो. फिकट गोऱ्या रंगाला नव्हे तर नमकीन सावळ्या रंगाला मी बळी पडतो.

मी म्हणू शकतो की, ( पैगंबरांची एक आख्यायिका ) मी सावळा आहे आणि यूसुफ (जोसेफ) गोरा होता.' या आख्यायिकेस अनुसरून मी नमकीन अशा सावळ्या रंगाचा मर्मज्ञ आहे. फारसी ओळ 'प्रेमाचे तुम्ही रसिक मर्मज्ञ असाल तर माझी गोष्ट ऐका.'

या आख्यायिकेवरून प्रवचनकार आणि कथाकार यांच्या एका वचनाची आठवण झाली. 'धर्म गोड आहे. आणि खऱ्या मुसलमानाला गोड आवडायला हवे.' पण धार्मिक प्रगतीची आणि निष्ठापूर्ण जीवनाची हीच कसोटी असेल तर कठीणच म्हणावे लागेल. आम्हाला गोड आवडत नाही. आमची आवड म्हणजे

चहाच्या काही पेल्यांपुरती मर्यादित. त्यातसुद्धा साखरेचे प्रमाण कमी. आणि आम्हाला त्याचीही खंत वाटते की, इतकी तरी साखर चहात का घालावी? मौलाना शिब्लीच्या ओळी आठवतात.

फारसी ओळी– मुमुक्षू द्विधा मनस्थितीत आहे. एकीकडे आपण काफर आहोत याची त्याला लाज वाटते; दुसरीकडे त्याला सद्धर्माची आवड आहे. मोठे कठीण कर्म आहे.'

मुलांना गोड पदार्थ आवडतात हे तर सर्वांना माहीत आहे. पण तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल, लहानपणीसुद्धा मला गोड पदार्थांची आवड नव्हती. माझे मित्र मला चिडवीत. ते मला म्हणत, ' तू लिंबाची पाने चघळीत जा.' त्यांनी मला एकदा वाटलेली पाने खाऊ घातली होती.

जौक कवीच्या ओळी–

लहानपणी दाया मुलांना अफू खाऊ घालते. का म्हणाल, तर पुढे येणाऱ्या काळाच्या कडूपणाची सवय व्हावी म्हणून.

इसी वादूस से दाया तिफ्लको अफ्यून देती है
के ता होजाये लज्जत आशना तलखीये दौरांसे

गोड पदार्थ न आवडणे हा दोष समजला जातो, म्हणून मी ती आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला; पण मला प्रत्येक वेळी अपयश आले. कवी चंद्रभानसारखी माझी स्थिती झाली आहे.

फारसी ओळी—

माझे हृदय काफराशी परिचित. ते बरोबर घेऊन मी मक्केला गेलो आणि तेथून परत आलो. तो माझे हृदय ब्राह्मण म्हणूनच परत आले.

साखरेच्या प्रमाणाची ही गोष्ट झाली. पण ती येथेच संपणार थोडीच?

' अरे, अदूरदृष्टीच्या माणसा, माझी गोष्ट थोडक्यात आटोपतो.' साखर कशा प्रकारची हवी हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. सामान्यपणे समजूत अशी की, इतर खाद्यपदार्थांत जी साखर घालतात तीच चहात घातली पाहिजे. चहासाठी काही विशेष प्रकारची साखर घालण्याची जरूर नाही. जावा आणि मॉरिशसहून येणारी बारीक दाण्याची साखर,– ती आता हिंदुस्थानातही तयार होते, चहात वापरली जाते. पण चहाची गोष्ट अगदी भिन्न आहे. चहा म्हणजे काही हलवा नव्हे. चहा म्हणजे चवदार आणि दोषरहित पदार्थ. त्यात मिसळावयाचा पदार्थ तितकाच स्वस्छ आणि चविष्ट हवा. नाही तर चहाची चव बिघडून जाईल असेच म्हणा ना.

इन्शा कवीची ओळ—

प्रभातकाळच्या वायूनेही तिला स्पर्श केला की तिच्या चेहऱ्याचा रंग मलिन होतो.

'नसीमें सुबह जो छू जाये, रंग हो मैला'

वर सांगितलेली साखर स्वच्छ करतात. पण ती पूर्णपणे स्वच्छ होत नाही. साखर वाचविण्यासाठी म्हणून:ती पूर्णपणे स्वच्छ करण्यात येत नाही. याचा परिणाम काय होतो पाहा. ही साखर चहात घातली की चहाची खरी चव बिघडते. साखर घातल्यावर चव बदलणे अपरिहार्य आहे हे तर खरेच. चहात दूध ओतून तो प्या. चहाच्या चवीची जाणीव होत नाही. चहाच्या चवीवर दुधाचा प्रभाव पडतो, आणि त्यावरच पिणाऱ्याचे भागते. पण साधा चहा घ्या. चहाचीच अशी चव जाणवल्याशिवाय राहणार नाही. अशा चहाच्यासाठी लागणारी साखर म्हणजे स्फटिकासारखी दोषरहित आणि बर्फासारखी स्वच्छ हवी. अशी साखर मिळते. पण ती वड्यांच्या स्वरूपात अगर मोठ्या दाण्याच्या रूपाने (साखऱ्या). मी नेहमी मोठ्या दाण्यांचा स्वच्छ साखऱ्या वापरतो. गालिब मदिरेत गुलाब मिसळीत तसा मी चहात हा साखऱ्या वापरतो.

गालिबच्या फारसी ओळी—

गालिब तू निश्चित राहा. स्वच्छ मदिरेत गुलाब मिसळणे हा तिचा स्वभावच आहे.

सरबत पिणाऱ्यांना जसा गूळ आणि साखर यांतील फरक जाणवतो तसेच माझे साखरेच्या प्रकाराच्या बाबतीत आहे. पण ही गोष्ट मला इतरांना पटवून देता येत नाही. मी लोकांना सांगतो पण कोणाला वाटते मी अतिशयोक्ती करीत आहे. कुणाला वाटते की हा माझा भ्रम आहे. असे वाटते की, एक तर माझ्याच तोंडाची चव बिघडली आहे, नाही तर जगात कुणाचीच चव बरोबर नाही.

चहात तुम्ही काय काय प्रकार घालता याला महत्त्व नाही. महत्त्व आहे चहाच्या मधुर चवीच्या जाणिवेत. अनेक माणसे चहात साखऱ्या किंवा साखरेच्या लहान टिकल्या घालतात. यूरोपमध्ये तर टिकल्या वापरण्याची पद्धत आहे. पण यात चहाची चव चांगली असावी असा हेतू नसतो. केवळ शिष्टाचार म्हणून टिकल्या वापरतात. टिकल्या थोड्या महाग असतात. तुम्ही युरोपात साधी साखर घालून चहा द्या. ते निमूटपणे पिऊन टाकतील. चहाच्या चवीत फरक पडला असे त्यांना वाटणार नाही.

साखरेच्या बाबतीत मला खरे पारखी आढळले ते ईराणी होत. कोणता चहा वापरावा याबद्दल ते मुळीच चोखंदळ नाहीत. पण साखरेच्या बाबतीत मात्र त्यांना मर्मज्ञ म्हणावे लागेल. इराक आणि ईराण या दोन देशांतून सामान्यपणे एक गोष्ट आढळून आली. साध्या साखरेच्या ऐवजी तेथे साखऱ्या वापरण्यात येतो. हा साखऱ्या स्वच्छ असतो. त्याचे दाणेही मोठ्या दाण्याच्या साखरेप्रमाणे असतात. आजकाल तिकडे काय पद्धत आहे याची मला कल्पना नाही.

चहाच्या बाबतीत गोंधळ कुणी निर्माण केला असेल तर तो इंग्रजांनी होय, असे

मी निःशंकपणे म्हणेन. यूरोप आणि अमेरिका येथील देशांतून चहाचा प्रसार झाला तो इंग्लंडच्याद्वारे झाला. जगभर चहाचा प्रसार झाला त्याचे बरेचसे श्रेय इंग्रजांना आहे, पण हे अदूरदृष्टीचे इंग्रज चहाच्या मूळ तत्त्वापासून इतक्या लांब जाऊन पडले की चहाची खरी माधुरी आणि चव यांचा स्पर्शही त्यांना झाला नाही. इंग्रज हे चहाचे प्रवर्तक. त्यांची ही स्थिती तर त्यांचे अनुकरण करणाऱ्यांची काय अवस्था झाली ती दिसतच आहे.

फारसी ओळ– अध्यात्मातील टप्पे ओळखणाऱ्यांची ही स्थिती, मग त्या मार्गात अगदी नवखे असत त्यांचा वाली परमेश्वरच.

चहा पिणे हे इंग्रज चिन्यांकडून शिकले. पण यापलीकडे ते गेले नाहीत. हिंदुस्थान आणि सीलोन येथे आढळणारी काळी पत्ती म्हणजे त्यांच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट चहा होय. त्यावर कहर म्हणजे हे लोक चहात गार दूध मिसळून चहा संपूर्णपणे बिघडवून टाकतात. आणखी मौज पाहा, पेय असे घाणेरडे. आणि यापैकी कोणती चव चांगली आणि कोणती चव साधारण हे ठरविण्यासाठी तज्ज्ञांचे तांडे तयार असतात. यांना कुणी तरी विचारावे की मुर्खांनो, काळी पत्ती उकळत्या पाण्यात टाकूत पिणे हेच तुमचे चहापान; तर त्यासाठी तज्ज्ञांच्या संशोधनाची आवश्यकता काय ? कोणतीही पत्ती घ्या. ती टाकल्याने पाणी काळे होत असेल आणि त्याला थोडा कडक वास येऊ लागला की तो चहा समजा. त्यात गार दुधाचा एक चमचा घाला म्हणजे तुम्हाला हवे तितके घाणेरडे पेय तयार मिळेल. चहाचा तज्ज्ञ झाला तरी आणखी काय माती सांगणार आहे !

मोमिन कवीची ओळ–

"मैं यही कहनेको वो भी और क्या कहने को हैं"

फ्रान्स आणि यूरोप खंडाचे इतर देश यांतून कॉफीचा प्रसार अधिक आहे. तरी पण तेथील उच्च वर्गांतून चहाचीही आवड दिसून येते. या बाबतीत त्यांचा रसिकपणा इंग्रजांपेक्षाही चांगला आहे. ते लोक बहुतेक चिनी चहा वापरतात. काळी पत्ती वापरलीच तर ते तीत दूध घालणार नाहीत. लिंबूचा एक तुकडा तीत पिळतील. त्यामुळे चहाच्या चवीला बाधा येत नाही. उलट त्यामुळे चहा अधिक स्वादिष्ट लागतो. लिंबू पिळण्याचा हा प्रघात रशिया, तुर्कस्तान आणि ईराण या देशांतून सुरू झाला. समरकंद आणि बुखारा येथील प्रघात म्हणजे तिसऱ्यांदा चहा घेताना त्यात लिंबू पिळतात. काही ईराणीसुद्धा चहाचा शेवटचा पेला लिंबू पिळून पितात. चहात दूध मिसळण्याची विचित्र पद्धत इंग्रजांनीच सुरू केली. ही आपत्ती त्यांच्यामुळेच ओढवली.

बेदिल कवीची फारसी ओळ–

"या आपत्तीचे मूळ कोठे आहे ते मी ओळखतो."

आता एक नवीनच संकट उद्भवले. साखरेचे वेगळे वेगळे प्रकार चहात वापरतात याची तक्रार होती. पण आता चहात गूळ घालण्याचा प्रकार रूढ होऊ पाहात आहे. हिंदुस्थानात पूर्वी लोक गूळ वापरीत. तेथून त्यांनी प्रगती केली तेव्हा ते लाल साखर वापरू लागले. पांढऱ्या साखरेची स्वच्छता लाल साखरेत मुळीच नव्हती. पण अशुद्ध गुळाच्या पुढचे ते एक पाऊल होते. पांढरी साखर तयार होऊ लागली, तसा लाल साखरेचा वापर फक्त खेड्यापाड्यांतून शिल्लक राहिला. पण इतके पुढे आल्यावर जग पुन्हा पूर्वपदावर येऊ लागले आहे. आजकाल अमेरिकेत लाल साखरेला खूपच मागणी आहे. तेथील रसिक म्हणतात की, लाल साखर नसली तर कॉफीला चव येत नाही. त्यांचेच अनुकरण करीत आमच्याइकडील रसिक लाल साखरेची जोरजोराने स्तुती करू लागले आहेत. तुम्ही माझी भविष्यवाणी ऐकून ठेवा, लाल साखरेचे महत्त्व कमी होईल आणि शुद्ध गुळाची मागणी वाढू लागेल. आणि रसिक म्हणू लागतील की, गुळाच्या खड्याशिवाय चहात काय आणि कॉफीत काय चव येणार नाही. आता तुम्हीच सांगा, याच्यापुढे शिल्लक काय राहिलेच आणि आम्ही कशाची अपेक्षा करावयाची ?

हाफिजची फारसी ओळ—

‘ हाय, आजच्या दिवसानंतर काय, तर उद्याचा दिवस. ’

साखर आणि गूळ हे अगदी भिन्न पदार्थ आहेत. एखाद्याला एक आवडला तर त्याला दुसरा पदार्थ आवडत नाही. माझ्या पाहण्यात आले आहे की, ज्यांनी जीवनात दोनचार वेळा गूळ खाल्ला त्यांच्यात साखरेची चवच शिल्लक राहात नाही. जवाहरलालना गोड पदार्थ अतिशय आवडतात म्हणून त्यांना गुळाची आवड आहे. साखरेच्या विविध प्रकारांतील फरक जो मला जाणवतो तो त्यांना पटवून देण्यासाठी मी हजार प्रयत्न केले पण मला यश लाभले नाही. शेवटी मी थकून गप्प बसून राहिलो.

सारांश, लोक वस्तुस्थिती दृष्टिआड करतात या गोष्टीचा किती शोक करावा.

हाफिजची फारसी ओळ—

‘ ही कथा दीर्घ आहे. ती संक्षिप्त करणे शक्य नाही.’

आता मी आपल्याविषयी थोडे सांगतो. रसिक म्हणतात की, सौंदर्य आणि कला या बाबतींत आपण देशप्रेमाचे स्तोम माजवू नये.

फारसी ओळ—

वस्तू चांगली असली म्हणजे झाले. मग ती कोणत्याही दुकानात का मिळेना.

या उक्तीप्रमाणे आपण वागले पाहिजे. म्हणून मी चहाच्या बाबतीत भारतीय सुंदरीच्या ऐवजी चिनी सुंदरीवर लुब्ध आहे.

हाफिजच्या फारसी ओळी–

'अहो, हे औषध तुमच्या हृदयव्यथेवर गुणकारी ठरेल. कारण ते चिनी सुरईतून हलब शहराच्या काचेच्या पात्रात ओतून आणले आहे.'

माझ्या भूगोलात चीनला स्थान आहे. जनरल चांग काय शक आणि मादम चांग तेथील राहणारे म्हणून नव्हे, तर चहा तेथून येतो म्हणून.

गालिबच्या फारसी ओळी–

उत्कृष्ट मदिरा फिरंग्यांच्या देशांतून येते आणि तातार देशांतून सुंदरी मिळतात. बगदाद आणि बिस्ताम या शहरांचे मला महत्त्व वाटत नाही.

कित्येक वर्षांपासून मला चिनी चहा आवडतो तो म्हणजे व्हाइट जस्मिन हा होय. गोरी चंबेली म्हणा ना.

उर्फी कवीच्या फारसी ओळी–

ज्याला प्रभातकाळच्या वायूचे रहस्य उमजले तो हे जाणू शकतो की, हिवाळा असला तरी वातावरणात चमेलीचा सुगंध शिल्लक असतोच.

या चहाचा सुगंध सुखद आहे. त्याची धुंदीही विलक्षण आहे. या चहाचा रंग काय वर्णावा ! लोक तर त्याला वाहती आग म्हणतात.

खुस्रौच्या फारसी ओळी,– मदिरापात्रातील ही मदिरा पाहा. पाण्यात आग ओतली आहे असे वाटते.

पण आगीची कल्पना ढोबळ वाटते. चहाचे उच्च स्थान पाहता त्याला दुसरीच उपमा हवी. मी सूर्याची किरणे मुठीत धरू पाहतो. असे समजा की, सूर्याची किरणे वितळवून स्फटिकमय पात्रात ओतण्यात आली आहेत. कवी मुल्ला महंमद मांजिदरानी हा चहा पीता तर त्याने खानखानानच्या मदिरेची पुढील शब्दांत स्तुती केली नसती.

पाण्यात मिसळलेली ही दारू नव्हे. सूर्याला वितळवून पाण्यात सोडण्यात आले आहे.

युद्धामुळे जहाजांची ये-जा थांबली. त्यामुळे चिनी चहाच्या आयातीवरही परिणाम झाला. कलकत्त्याच्या एका चिनी स्टोअरमधून मी चहा मागवीत असे. तेथील साठा संपत आला होता. तरी पण मला चहाचे काही डबे मिळाले. माझ्या काही चिनी मित्रांनी भेटीदाखल चहाचे काही डबे पाठविले. मी कलकत्त्याला निघालो तेव्हा माझ्याबरोबर एक डबा होता. एक घरी राहिला. मुंबईला मला पकडण्यात आले आणि येथें आणण्यात आले. माझ्या सामानात चहाचा पण डबा आला. तो संपण्यापूर्वी घरात असलेला डबाही आला. येथे इतर गोष्टींचा कितीही तुटवडा असो, पण मला चहा कमी पडला नाही; आणि चहाची उणीव नाही तर बाकी कोणत्याच गोष्टीची उणीव नाही.

हाफिजच्या फारसी ओळी–" हाफिज, अरे तुला या जगापासून आणखी काय

हवे आहे ? मदिरापान आणि सुंदरीचा सहवास ही तर तुला उपलब्ध आहेत ना ! ”

माझ्यापाशी असलेला चहाचा डबा किती दिवस चालेल याची मी काळजी केली नाही. सादीची पुढील शिकवण नेहमी माझ्या डोळ्यांसमोर असते :

“ मदिरापात्र भरले आहे ना, मग पी कसा.”

येथील आम्हा कैद्यांच्या मंडळीत चहाचा भोक्ता कोणी नाही. बहुतेक मंडळी दूध आणि दही घेणारी आहेत. दह्यादुधाचे जग आणि चहाचे जग यांत किती अंतर आहे हे तुम्ही समजू शकता. कितीही काळ जावो, हे अंतर नाहीसे होणे शक्य नाही. अहो, कुठे चहाच्या मधुर चवीचे आणि तीतून होणाऱ्या धुंदीचे जग आणि कुठे पोटाची भरती करण्यासाठी निर्मिलेले दह्यादुधाचे जग !

कवी हाली याच्या ओळी,

प्रेमाची टोचणी गोड वाटू लागण्यास सगळे आयुष्य गेले पाहिजे. हृदय-व्यथेची गोडी आज कुठे आढळून येणार ?

इक उम्र चाहिये के गवारा हो नैशे इश्क
रखी है आज लज्जते जख्मेजिगर कहां

जवाहरलालना चहाची सवय आहे, यात संशय नाही. यूरोपच्या बड्या मंडळींच्या सहवासामुळे ते बिन दुधाचा चहा पिऊ लागले आहेत. पण चहा कोणत्या प्रकारचा या बाबतीत ते धोपट मार्गाच्या बाहेर पडले नाहीत. ते आपले लिप्चू पिप्चू प्रकारच्या चहावरच संतुष्ट आहेत. अशा परिस्थितीत या मंडळींना माझा चहा पाजणे निरर्थकच होते. अपात्री दान दिल्यासारखे म्हणा ना.

गालिबच्या फारसी ओळी—

अरे या कर्मठांना मदिरा देऊच नकोस. अरे या जमातीला ही दिव्य वस्तू म्हणजे मिठाचे पाणी वाटते.

या मंडळीत एकच गृहस्थ असे आहेत की, एकदा प्रवासात त्यांनी माझा हा चहा घेतला होता. ते म्हणाले, ‘हा चहा बिनदुधाचा असला तरी बरा आहे.’ याचा अर्थ काय, तर रोज चहात दूध आणि साखर घालून गरम सरबत पितात तोच चहा चांगला. पण हाही काही वाईट नाही. जगाचीच चव बरोबर नाही. त्यात तुमचा चहा बरा आहे असे त्यांचे उद्‌गार. हेही नसे थोडके ! मी त्यांना कधी कधी बोलावून म्हणे, ‘ या, हा ‘ बरा आहे.’ चहाचा एक पेला घ्या.’

फारसी ओळ—

‘ हेच काय कमी आहे ? तुम्हाला दीर्घायू लाभो.’ त्यांना हा चहा केवळ बरा वाटला. पण हाही संपला तर सगळा ग्रंथच आटोपला म्हणावयाचा. गालिबने म्हटले आहे—

अरे कर्मठा, माझ्या या द्राक्षमदिरेकडे तुच्छ नजरेने पाहू नकोस. अरे, तुझी

दृष्ट लागल्यामुळे माझा पेला कमी भरतो आहे बघ.

पण माझा हा चहाचा डबा किती दिवस चालणार? तो संपू लागला. चीताखान (सुपरिटेंडेंटचे टोपणनाव) याने नगरला चौकशी केली. पुण्यालाही लिहिले. पण मला हव्या त्या चहाचा पत्ता लागला नाही. मुंबई आणि कलकत्ता येथेही लिहिण्यात आले आहे, पाहावे काय होते ते. एक आठवड्यापासून तीच हिंदुस्थानची काळी पत्ती पीत आहे, आणि भविष्यातील आशेवर जगत आहे.

गालिबच्या फारसी ओळी–

परमेश्वरा, मुसलमानांच्या सुकलेल्या ओठांची तू काही सोय केली नाहीस. आणि ख्रिस्त्यांना मात्र तू मदिरा मिळवून दिलीस.

आजकाल हिंदुस्थानातील सर्व शहरांतून चिनी आढळून येतात. ठिकठिकाणी चिनी रेस्टॉरंट्स उघडली आहेत. अहमदनगर इंग्रजी फौजेची मोठी छावणी आहे. येथेही एक चिनी रेस्टॉरंट आहे. आमच्या जेलरला वाटले की, मला हवा असलेला चहा या रेस्टॉरंटमध्ये मिळेल. त्याने माझा रिकामा डबा रेस्टॉरंटमध्ये पाठवून चौकशी करविली. चिनी म्हणाले, 'हा चहा आता कोठे मिळणार? पण हा रिकामा डबा तुम्हाला कोठून मिळाला? या चहाची येथे काय आवश्यकता आहे? चीनचा कोणी बडा मनुष्य येथे आला आहे काय?" वॉर्डर चौकशीसाठी बाजारात गेला होता. त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. चिन्यांचे समाधान झाले नाही. दुसऱ्या दिवशी नगरमध्ये अफवा पसरली की, माडाम च्यांग काय शेक किल्ल्यातील कैद्यांची भेट घेण्यासाठी येत आहेत. आणि त्यांच्यासाठी चिनी चहाची व्यवस्था करण्यात येत आहे.

कवी नजीरी याची फारसी ओळ––

पाहा आपले आशाचित्र कसे खोटे ठरले आहे.

चहाच्या डब्याच्या तळाशी थोडी पूड साठलेली असते. चहा संपला की डबा फेकून देतात. माझा डबा संपत आला. तळाशी थोडी पत्ती साचली होती. तिचा काय उपयोग म्हणून मी दुर्लक्ष केले होते. चीताखान म्हणाला, 'अहो, युद्ध चालू आहे. वस्तूंचा नाश करू नका असे सगळे म्हणतात. ही पत्ती पण वापरून टाका ना.'

मी विचार केला की,

हाफिजच्या फारसी ओळी– 'अरे बाबा शांत राहा.–मदिरा असो की पात्राच्या तळाचा गाळ असो, साकी देईल ती कृपाच समजावी.'

मी ती पत्ती वापरू लागलो. थोडी थोडी पत्ती उकळून पिऊ लागलो. कपात चहा ओतला की पत्ती जणू काय मला म्हणत असे,

सादीच्या फारसी ओळी– 'माझ्यात तो रंग आणि गंध नसेल, पण मीसुद्धा परमेश्वराच्या बागेतीलच गवत आहे ना.'

या पत्तीच्या कणांनी मला आनंद झाला. धुंदी चढली. माझ्या विचारांचा घोडा दौड करू लागला. त्याला या धुंदीमुळे उत्तेजन मिळाले. मी धुंद होऊन एका निराळयाच विश्वात जाऊन पोहोचलो. कवी बेदिल याने माझीच अवस्था वर्णिली असावी. तो म्हणतो,

फारसी ओळी– या विलासमंदिरात मी मस्त आहे. मी पेला धारण करतो ती ऐट सम्राट जमलाही साधणार नाही. माझ्या विचाराच्या साम्राज्यात माझी बरोबरी करील असा कोण आहे? माझा आत्मविश्वास पूर्ण आहे. कोणत्याही दृष्टीने कमी नाही. हे मला पुरे आहे."

या प्रयोगानंतर माझ्या मनात विचार आला. आम्ही तहानलेले लोक. आमच्या नशिबात धुंद करणारी पेये कोठे! पायाच्या तळाशी असलेला हा गाळ ( पत्ती ). त्याचेच दोन-चार घोट प्यायला मिळावे ही अपेक्षा. गालिबने म्हटले आहे—

साकीला सांगण्यास लाज वाटते. खरे म्हणजे मदिरा पात्राच्या तळाशी असलेला गाळही आम्हाला मिळाला तरी फार झाले.

कहते हुये साकीसे हया आती है वर्ना
यूं है के मुझे दुर्दे तहे जाम बहोत है

मी येथे आल्यावर साखरेचा प्रश्न उभा राहिला होता. पण मी तो लवकर सोडविला. त्याची मला आता काळजी नाही. मोठ्या दाण्याचा शुद्ध साखऱ्या थोडासा माझ्याबरोबर होता. तो काही दिवस चालला. तो संपला तसे मला वाटले की, येथे सहज मिळेल. तो मिळाला नाही. मला वाटले साखरेच्या टिकल्या तरी मिळतील. बाजारात चौकशी करविली. शांततेच्या काळातही या मालाला मागणी नव्हती. युद्धामुळे तर उरलीसुरली शक्यता नाहीशी झाली आहे. शेवटी निरुपाय होऊन मी खडीसाखर मागविली. ती कुटून साखर म्हणून वापरावी असे मी ठरविले. पण ती कुटण्यासाठी मला खलबत्ता हवा होता. मी म्हटले, मला एक खल आणि बत्ता आणून द्या. दुसऱ्या दिवशी मला कळले की, येथे खलही मिळत नाही आणि बत्ताही नाही.

मला आश्चर्य वाटले. अहो, या गावात बत्ता मिळू नये म्हणजे काय! येथे प्रेमवेडे आपली डोकी फोडून घेतात तरी कशाने? का त्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही? येथे लोक जीवन जगतात तरी कसे?

सादीच्या फारसी ओळी—

"प्रेयसीच्या दाराच्या उंबरठ्यावर उभे राहण्याचे ज्यांच्या नशिबी नाही त्यांना प्रेम काय आहे हे कसे कळणार?"

निरुपाय होऊन मी एक युक्ती योजली. मी एक स्वच्छ कापड घेतले. त्यात

खडीसाखर ठेवली आणि खाली कागद ठेवले. एक दगड घेतला. येथे काम करण्यासाठी एक कैदी आला होता. त्याला मी म्हटले, ‘ हा दगड घे आणि आपल्या डोक्याऐवजी तो घाल या खडीसाखरेवर.’

फारसी ओळी–

फरहादने प्रेमापायी आपला जीव दिला. त्याची कथा शिल्लक आहे.

पण मी सांगितलेला कैदीही विचित्रच निघाला. एक घाव तरी बरोबर घालावा. खडीसाखरेची पूड झाली पण कागदाचे तुकडे उडाले. कापडाचीही तीच अवस्था झाली.

जौकची ओळ–

‘ चली थीं बर्छी किसीपर किनी के आन लगी ’

शेवटी एकदाचा खलबत्ता मिळाला तोही भयंकर होता. असा विचित्र खलबत्ता मी कधीच पाहिला नव्हता. अलीकडे टाटांनी एक पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यात लिहिले आहे की, हजारो वर्षांपूर्वी मध्यभारतातील एका जमातीने लोहयुगाची निर्मिती केली. हा खलबत्ताही त्या जमातीने घडविलेला असावा. कालचक्राच्या फेऱ्यात तो वाट पाहात असावा. अहमदनगर किल्ल्यात कैदी येतात केव्हा आणि त्यांना आपली डोकी हातोड्यांनी फोडून घेण्याऐवजी खलबत्त्याचा वापर करण्याची आवश्यकता वाटते केव्हा, याची हा खलबत्ता वाट पाहात असावा.

गालिबच्या ओळी–

या प्रेमवेडापायी माझे मस्तक हे माझ्या खांद्याला भारभूत झाले आहे. पण हे परमेश्वरा, या वाळवंटात टेकायला भिंतही आढळत नाही.

शोरीदगीके हात से सर है वबाले दोश
सहरा में अय खुदा कोयी दीवार भी नहीं

ते काही असो. खडीसाखर कुटून घेण्याचा मार्ग सापडला. पण हाय, कुटलेली खडीसाखर आहे तर ज्यात ती घालायची तो चहा कोठे आहे ?

फारसी ओळ–

‘ हात मिळतील पण प्रेमवेडाच्या झटक्यात फाडण्यासाठी कपडे हवेत ना ?’

पाहिलेत ? इतकीशी गोष्ट सांगावी म्हणत होतो, की माझ्याजवळचा चहा संपला आहे. बावीस पाने लिहून झाली पण अद्याप मजकूर संपला नाही.

फारसी ओळी–

‘ माझ्या प्रेमकथेत मी एक शब्द वाढविला नाही. पण मौज पाहा की, ती संपता संपत नाही.’

. १८ .

# नवाब चारुदत्त आणि बेगम वसंतसेना

बादशहा, नबाब, अमीर, उमराव इत्यादींच्या ऐषारामाची वर्णने आपल्याला फारसी इतिहासग्रंथांतून विपुलतेने आढळून येतात. माळव्याचा बाज बहादुर, गोवळकोंड्याचा मुहंमदकुली कुतुबशहा, जहांगीर, मुहंमदशहा रंगीला, लखनौचा नवाब वाजह अलीशहा इत्यादींच्या विलासोपभोगांच्या वर्णनाने इतिहासाची पानेची पाने भरली आहेत. बादशहाच्या विलासी जीवनाचे अनुकरण अमीरउमरावांनीही केले. बादशहांप्रमाणे अमीरउमरावांच्या दिमतीला अनेक गायिका आणि नर्तकी कसत.

अठराव्या शतकात दिल्ली आणि एकोणिसाव्या शतकात लखनौ ही अनेक सुंदर कलावंतिणींची आगरे बनली होती. सगळेच बादशहा आणि अमीरउमराव विलासी होते असे नाही; पण कित्येकजण विलासापायी भिकेला लागले यात शंका नाही. तसेच कित्येक नर्तकांनी आणि गायिकांनी अनेक श्रीमंत अमीर उमरावांना आपल्या नादी लावून त्याना खंक करून सोडले. चांगले नवाब, उधळपट्टी करणारे नवाब, एकनिष्ठ राहणाऱ्या गायिका, तसेच इतरांना लुबाडणाऱ्या कलावंतिणी इत्यादींची वर्णने उर्दू कथा-कादंबऱ्यांतून भरपूर आढळतात. पंडित रतननाथ सरशार यांची फसानाये आजाद ही कादंबरी, नजीर अहमदच्या कादंबऱ्या, सुप्रसिद्ध कादंबरी लेखिका कुतुलऐन हैदर यांच्या सफीनाये गमे दिल आणि मेरेभी सनमखाने, शरर यांचे शामे अवध, अजीम बेग चगताई नाटके, यांची फरतुल्ला बेग यांचे निबंध इत्यादी साहित्यातून नवाबी जीवनाची विविध अंगे रंगविण्यात आली आहेत. अलीकडे सुप्रसिद्ध कादंबरीकार हयातुल्ला अन्सारी यांची कादंबरी लहके फूल—रक्ताची फुले ही अतिशय गाजली आहे. या कादंबरीला या वर्षी भारतीय साहित्य अकेडमीचे पाच हजारांचे पारितोषिक मिळाले आहे. या कादंबरीत श्री अन्सारी यांनी भारताचा आणि विशेषतः उत्तर प्रदेशाच्या पन्नास वर्षांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचा आढावा घेतला आहे. कष्ट करणारे शेतकरी, त्यांना नागवणारे अधिकारी आणि सावकार, ऐष आरामी नबाब, गायिका, कलावंतिणी, मिलमध्ये राबणारे मजूर, कॉंग्रेस-खिलाफत, हिंदु-मुस्लिम संबंध इत्यादी अनेक विषय त्यांनी मोठ्या कुशलतेने आपल्या कादंबरीतून गुंफिले आहेत. कादंबरीचे पाच खंड

असून तिची पृष्ठसंख्या अडीच हजार आहे. कादंबरीतील पानापानांतून लेखकाची राष्ट्रीय वृत्ती आढळून येते. त्याने जातीयवादी माणसांची आणि संस्थांची– मग ती हिंदू असोत की मुसलमान असोत, अगदी निःपक्षपाती दृष्टिकोनातून छाननी केली आहे.

कादंबरीत खालावलेल्या परिस्थितीतील नवाब आणि तरीही त्यांच्याशी निष्ठा बाळगून असलेल्या दिलरुबा नावाच्या एक कलावंतिणीची हकीकत श्री अन्सारी यांनी दिली आहे. हे प्रकरण मोठे बहारीचे आहे. एका प्रथितयश उर्दू कादंबरीकाराच्या भाषाशैलीची मराठी वाचकांना कल्पना यावी म्हणून ती कथा शक्य तितकी श्री. अन्सारी यांच्या शब्दांतच दिली आहे. नवाब रफी उश्शान हे त्यांचे वडील हयात असताना दिलरुबा नावाच्या नर्तकीच्या प्रेमात सापडले होते; आणि तिच्याशी ते अनेक विलास खेळले होते. पुढे त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. आणि इस्टेट त्यांचा सावत्र भाऊ अफसरद्दौला याच्या नावे झाली. अफसरद्दौलाची आई ही मोठ्या नवाबाची दासी, पण ती त्यांची निका झालेली विधियुक्त पत्नी असे जाहीर करण्यात आले आणि इस्टेट तिच्या मुलाच्या नावे झाली. याउलट रफीउश्शानची आई ही मोठ्या नवाबाची बायकोच नव्हे असे मानण्यात आले. रफीउश्शानला अगदी तुटपुंजी रक्कम दर महिना देण्यात येऊ लागली आणि अफसरद्दौला हे लाखो रुपयांच्या इस्टेटीचे मालक होऊन बसले. रफीउश्शानची अक्षरशः उपासमार होऊ लागली. त्यांची पत्नी आपल्या मागे एक मुलगा शौकतुश्शान याला ठवून वारली. रफीउश्शान आणि शौकत हे उपासमारीचे जीवन जगत होते. एके दिवशी रफीउश्शान रस्त्यावरून चालले होते. श्री. अन्सारी म्हणतात :

" नवाब रफीउश्शान यांना संधी मिळाली असती तर त्यांनी लालजीकडून बरीच रक्कम कर्जाऊ घेतली असती. आपला खटला प्रीव्ही कौन्सिलपर्यंत गेला तर आपण तो जिंकू शकू असे त्यांना वाटत होते. आपली आई आणि वडील यांच्यात विधियुक्त लग्न झाले होते एवढेच त्यांना सिद्ध करावयाचे होते. हे सिद्ध करणे काय अवघड होते ? ते स्वतःशी म्हणाले, " माझी आई प्रतिष्ठित कुळातील होती. विधियुक्त लग्न झाल्याशिवाय कोणी प्रतिष्ठित गृहस्थ आपल्या मुलीला दुसऱ्याच्या घरी पाठवील काय ? असे कधी घडले आहे काय ? न्यायालयाने एका दासीपुत्राला औरस संतती समजून सगळी इस्टेट त्याला देऊन टाकली. ही अंधेरनगरीच म्हटली पाहिजे. माझे वकील अप्रामाणिक असले पाहिजेत किंवा मूर्ख तरी असले पाहिजेत. अशी वकिलांची निवडसुद्धा माझ्या सल्लागारांनी स्वार्थावर दृष्टी ठेवूनच केली असली पाहिजे. माझे निमकहराम सल्लागार माझ्या दावेदारांना जाऊन मिळाले असले पाहिजेत." नवाबसाहेबांना याची खात्री होती. पण काय करावे, प्रीव्ही कौन्सिलपर्यंत खटला नेण्यासाठी त्यांच्यापाशी पैसाअडका नव्हता.

इस्टेट हातची गेल्यानंतर नवाबसाहेबांपाशी जी काही थोडीबहुत शिल्लक

होती ती घेऊन घरची दासी कुणाचा तरी हात धरून पळून गेली. कपडेलत्ते आणि भांडीकुंडी होती तीही वाटेल त्या किमतीवर मध्यस्थांच्या मार्फतीने विकून टाकण्यात आली. आता जुनी आठवण म्हणून नवाबसाहेबांपाशी दोन अंगरखे राहिले होते. नवाबसाहेब बारा महिने तेच वापरीत. अंगरख्यांना इतकी भोके पडली होती की उजेडासमोर त्यांना धरले तर गाळणे धरले आहे असेच वाटावे.

अंगात घालण्यायोग्य कपडे नसल्यामुळे नवाबसाहेबांनी मित्र आणि आप्तेष्ट यांच्याकडे जाणे सोडून दिले होते. फक्त एक-दोन ठिकाणीच ते जात असत. त्यांपैकी एक म्हणजे लालाजीचे घर होते. तिकडून ते आता परत चालले होते. ते विचारमग्न होते आणि पाय नेतील तिकडे चालले होते. ते एकाएकी भानावर आले. पाहतात तो काय, ते दिलरुबाच्या वाड्यासमोर उभे आहेत. ते चटकन मागे वळणार, तोच वाड्यावरच्या पहारेकऱ्याने म्हटले, ' नवाबसाहेबांना नम्र मुजरा. हुजुरांनी यावे. बाईसाहेब (उत्तर भारतात कलावंतणींना बाईजी म्हणतात) खोलीत आहेत. आणि अनेक दिवसांपासून त्या आपल्या वाटेकडे डोळे लावून आहेत.'

नवाबसाहेब विचारात पडले. त्यांची प्रतिष्ठा पाहिली तर खिशात पंधरावीस रुपये असले तरच त्यांनी इकडे यायला हवे होते. पूर्वी ते येत ते संध्याकाळी सहाला, आणि रात्री दहा वाजता परत जात. पण आज त्यांच्या खिशात पैसे नव्हते; आणि शिवाय रात्रीचे दहा वाजले होते.

पहारेकऱ्याने वाड्यात वर्दी दिली.

' महलदारनी नवाब रफी उश्शान वालाकद्र आलीशान तशरीफ ला रहे हैं.'

यानंतर नवाब रफी उश्शानना परतणे अशक्य झाले.

दिलरुबाचे वय पंचेचाळीसच्या पुढे होते. कलप लावल्यामुळे केस काळे दिसत. पण चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या. शरीरही सुटले होते. असे असूनही चेहऱ्यावर गोडवा, आवाजात माधुरी आणि हावभावात नखरा ही अद्याप शिल्लक होती. रसिकपणात आणि संभाषणचातुर्यात तिचा आजही हात धरणारा कोणी नव्हता. तिच्याकडे येणाऱ्या जुन्या लोकांपैकी अद्यापही दोघेजण येत, तेव्हा चार सहा तासांची मैफल जमत असे. दहा वर्षांपूर्वी दिलरुबाची गणना चौकातील सुप्रसिद्ध कलावंतिणींत होत असे; पण त्याच काळात नवाब रफीउश्शान यांची इस्टेट त्यांच्या हातातून निघून गेली. नवाबसाहेबांपाशी देणेकऱ्यांच्या तावडीतून वाचलेल्या हिऱ्याच्या हजार हजार रुपयांच्या दोन अंगठ्या राहिल्या होत्या. त्या त्यांनी दिलरुबाला देऊन तिला कायमचा निरोप दिला होता. त्या दिवसापासून दिलरुबाने चौकातील आपला वाडा सोडला, आणि ती एका आळीत येऊन राहिली होती.

इस्टेट हातची निघून गेल्यानंतर नवाबसाहेब एक वर्षभर दिलरुबाकडे गेले नाहीत. ती मात्र त्यांच्याकडे दर आठवड्यास विडे करून खासदानात ( विडे ठेवण्याचा डबा ) ठेवून पाठवी. कधी कधी शिरा किंवा मुरंबाही पाठवीत असे. प्रत्येक

वेळी नवाबसाहेबांना ती निरोप धाडी :

‘अल्ला सूरत तो कभी दिखला जाइये– कधी कधी दर्शन तरी देत जा. मुवा इलाका गया तो गया– मेली इस्टेट गेली तर गेली. आप मुझसे क्यों रुठ गये ?– तुम्ही माझ्यावर का रुसला आहात ? ’

शेवटी नवाबसाहेबांच्याने राहवेना. ते एक दिवस आले. एकमेकांना पाहताच दोघांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. दिलरुबाने त्यांचे अश्रू पुशीत म्हटले, “नवाब, केवळ संपत्तीसाठी प्रेम करणाऱ्या कलावंतिणींत तुम्ही माझी गणना केलीत ना ? तुम्ही मला अशीच समजलात ना !”

तिचा निरोप घेताना नवाबसाहेबांनी तबकात दहा रुपये ठेवले. ते पाहून दिलरुबाचे डोळे पाण्याने भरून आले. पण नवाबसाहेबांना वाईट वाटेल या विचाराने ती काहीच बोलली नाही. यानंतर नवाबसाहेब पाच–सहा महिन्यांतून एकदा फेरी टाकून जात. या खेपेस मात्र ते तब्बल एक वर्षाने आले.

नवाबांना पाहताच दिलरुबा उभी राहिली. तिने त्यांचे आदराने स्वागत केले आणि त्यांना मसनदीवर बसविले. ती स्वतः त्यांच्याजवळ येऊन बसली. आनंदातिशयाने तिचे डोळे चमकत होते. लटका रुसवा दाखवून आणि कपाळाला आठ्या चढवून ती म्हणाली,

‘अल्लाद, नवाब मी म्हणते, तुम्हाला हृदयच नाही की काय ? तुम्ही आता माझ्याकडे यावे असे स्वरूप माझे राहिले नसेल. पण माझे प्रेमही काय कुचकामाचे झाले आहे काय ? तुम्ही तर वर्षे वर्षे तोंडच दाखवीत नाही ! ’

नवाबसाहेब म्हणाले, ‘अगे दिलरुबा, माझ्या हृदयाचे काही विचारू नकोस. ते तर जलबिन मछलीप्रमाणे तडफडत असते. पण काय करू ? माझा निरुपाय होतो.”

दिलरुबा म्हणाली, “जाऊ द्या ? मनात नसले तर हजार कारणे सापडतात. –तेराही जी न चाहे तो बातें हजार हैं. मग स्पष्टच का म्हणत नाही, की माझ्या आवाजात आता माधुरी नाही आणि पायांत चापल्य नाही ? माझ्यात गायन आणि नर्तन या दोन्ही कला आता राहिल्या नाहीत. आता माझ्याकडे कुणी यावे तर का यावे ?

**ऐसे में यार आये तो क्यौं आये ?**

असे म्हणून दिलरुबाने आपली मान वळविली. तिच्या कानांतील डूल चमचम चमकू लागले.

नवाबसाहेब म्हणतात, “अगे, प्रेमिक काय प्रेयसीकडे गेल्याशिवाय राहील काय ? बुलबुल आपले बागेतील घरटे सोडील तरी कसा ?”

होती ती घेऊन घरची दासी कुणाचा तरी हात धरून पळून गेली. कपडेलत्ते आणि भांडीकुंडी होती तीही वाटेल त्या किमतीवर मध्यस्थांच्या मार्फतीने विकून टाकण्यात आली. आता जुनी आठवण म्हणून नवाबसाहेबांपाशी दोन अंगरखे राहिले होते. नवाबसाहेब बारा महिने तेच वापरीत. अंगरख्यांना इतकी भोके पडली होती की उजेडासमोर त्यांना धरले तर गाळणे धरले आहे असेच वाटावे.

अंगात घालण्यायोग्य कपडे नसल्यामुळे नवाबसाहेबांनी मित्र आणि आप्तेष्ट यांच्याकडे जाणे सोडून दिले होते. फक्त एक–दोन ठिकाणीच ते जात असत. त्यांपैकी एक म्हणजे लालाजीचे घर होते. तिकडून ते आता परत चालले होते. ते विचारमग्न होते आणि पाय नेतील तिकडे चालले होते. ते एकाएकी भानावर आले. पाहतात तो काय, ते दिलरुबाच्या वाड्यासमोर उभे आहेत. ते चटकन मागे वळणार, तोच वाड्यावरच्या पहारेकऱ्याने म्हटले, ‘ नवाबसाहेबांना नम्र मुजरा. हुजुरांनी यावे. बाईसाहेब (उत्तर भारतात कलावंतणींना बाईजी म्हणतात) खोलीत आहेत. आणि अनेक दिवसांपासून त्या आपल्या वाटेकडे डोळे लावून आहेत.’

नवाबसाहेब विचारात पडले. त्यांची प्रतिष्ठा पाहिली तर खिशात पंधरावीस रुपये असले तरच त्यांनी इकडे यायला हवे होते. पूर्वी ते येत ते संध्याकाळी सहाला, आणि रात्री दहा वाजता परत जात. पण आज त्यांच्या खिशात पैसे नव्हते; आणि शिवाय रात्रीचे दहा वाजले होते.

पहारेकऱ्याने वाड्यात वर्दी दिली.

‘ महलदारनी नवाब रफी उश्शान वालाकदर आलीशान तशरीफ ला रहे हैं.’

यानंतर नवाब रफी उश्शानना परतणे अशक्य झाले.

दिलरुबाचे वय पंचेचाळीसच्या पुढे होते. कलप लावल्यामुळे केस काळे दिसत. पण चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या. शरीरही सुटले होते. असे असूनही चेहऱ्यावर गोडवा, आवाजात माधुरी आणि हावभावात नखरा ही अद्याप शिल्लक होती. रसिकपणात आणि संभाषणचातुर्यात तिचा आजही हात धरणारा कोणी नव्हता. तिच्याकडे येणाऱ्या जुन्या लोकांपैकी अद्यापही दोघेजण येत, तेव्हा चार सहा तासांची मैफल जमत असे. दहा वर्षांपूर्वी दिलरुबाची गणना चौकातील सुप्रसिद्ध कलावंतिणींत होत असे; पण त्याच काळात नवाब रफीउश्शान यांची इस्टेट त्यांच्या हातातून निघून गेली. नवाबसाहेबांपाशी देणेकऱ्यांच्या तावडीतून वाचलेल्या हिऱ्याच्या हजार हजार रुपयांच्या दोन अंगठ्या राहिल्या होत्या. त्या त्यांनी दिलरुबाला देऊन तिला कायमचा निरोप दिला होता. त्या दिवसापासून दिलरुबाने चौकातील आपला वाडा सोडला, आणि ती एका आळीत येऊन राहिली होती.

इस्टेट हातची निघून गेल्यानंतर नवाबसाहेब एक वर्षभर दिलरुबाकडे गेले नाहीत. ती मात्र त्यांच्याकडे दर आठवड्यास विडे करून खासदानात ( विडे ठेवण्याचा डबा ) ठेवून पाठवी. कधी कधी शिरा किंवा मुरंबाही पाठवीत असे. प्रत्येक

वेळी नवाबसाहेबांना ती निरोप धाडी :

'अल्ला सूस्त तो कभी दिखला जाइये— कधी कधी दर्शन तरी देत जा. मुवा इलाका गया तो गया— मेली इस्टेट गेली तर गेली. आप मुझसे क्यों रुठ गये ?— तुम्ही माझ्यावर का रुसला आहात ? '

शेवटी नवाबसाहेबांच्याने राहवेना. ते एक दिवस आले. एकमेकांना पाहताच दोघांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. दिलरुबाने त्यांचे अश्रू पुशीत म्हटले, "नवाब, केवळ संपत्तीसाठी प्रेम करणाऱ्या कलावंतिणींत तुम्ही माझी गणना केलीत ना ? तुम्ही मला अशीच समजलात ना !"

तिचा निरोप घेताना नवाबसाहेबांनी तबकात दहा रुपये ठेवले. ते पाहून दिलरुबाचे डोळे पाण्याने भरून आले. पण नवाबसाहेबांना वाईट वाटेल या विचाराने ती काहीच बोलली नाही. यानंतर नवाबसाहेब पाच–सहा महिन्यांतून एकदा फेरी टाकून जात. या खेपेस मात्र ते तब्बल एक वर्षाने आले.

नवाबांना पाहताच दिलरुबा उभी राहिली. तिने त्यांचे आदराने स्वागत केले आणि त्यांना मसनदीवर बसविले. ती स्वतः त्यांच्याजवळ येऊन बसली. आनंदातिशयाने तिचे डोळे चमकत होते. लटका रुसवा दाखवून आणि कपाळाला आठ्या चढवून ती म्हणाली,

'अल्लाद, नवाब मी म्हणते, तुम्हाला हृदयच नाही की काय ? तुम्ही आता माझ्याकडे यावे असे स्वरूप माझे राहिले नसेल. पण माझे प्रेमही काय कुचकामाचे झाले आहे काय ? तुम्ही तर वर्षे वर्षे तोंडच दाखवीत नाही !'

नवाबसाहेब म्हणाले, 'अगे दिलरुबा, माझ्या हृदयाचे काही विचारू नकोस. ते तर जलबिन मछलीप्रमाणे तडफडत असते. पण काय करू ? माझा निरुपाय होतो."

दिलरुबा म्हणाली, "जाऊ द्या ? मनात नसले तर हजार कारणे सापडतात. –तेराही जी न चाहे तो बातें हजार हैं. मग स्पष्टच का म्हणत नाही, की माझ्या आवाजात आता माधुरी नाही आणि पायांत चापल्य नाही ? माझ्यात गायन आणि नर्तन या दोन्ही कला आता राहिल्या नाहीत. आता माझ्याकडे कुणी यावे तर का यावे ?

**ऐसे में यार आये तो क्यों आये ?**

असे म्हणून दिलरुबाने आपली मान वळविली. तिच्या कानांतील डूल चमचम चमकू लागले.

नवाबसाहेब म्हणतात, "अगे, प्रेमिक काय प्रेयसीकडे गेल्याशिवाय राहील काय ? बुलबुल आपले बागेतील घरटे सोडील तरी कसा ?"

यार क्यौं कर यारकी गलियोंमें जाना छोड दे
किस तरह बुलबुल चमनसे आशियाना छोड दे

दिलरुबा– 'नवाबसाहेब, कमाल आहे तुमची. दोन्हीकडून तुम्हीच बोलता. मी इकडे राहायला आल्यापासून भेटणे तर, जाऊ द्या, तोंड दाखविणेही सोडून दिलेत. ' अरे नवाबसाहेबांसाठी हुक्का आणा.'

हुक्का आला. नवाबसाहेबांनी एक झुरका घेतला. त्यांच्या पसंतीची अननसाचा अर्क घातलेली तंबाकू होती.

दिलरुबा म्हणाली, ' पिण्यासाठी काही मागवू का ? '

नवाब– ' नको. हकीमांनी पिऊ नका म्हणून बजावले आहे.'

दिलरुबा– ' मग मी भोजनाची (खास) व्यवस्था करते.'

नवाब– ' भोजन ? का तू अजून जेवली नाहीस की काय ? माझे तर जेवण झाले आहे (हे खोटे होते. नवाबसाहेबांना उपवास घडत होते.) आता तर रात्रीचे दहा वाजताहेत.'

दिलरुबा– ' त्याचे असे आहे, आज मला बरे वाटत नव्हते. जेवायचे नाही असे मी ठरविले होते. पण आता तुमच्याबरोबर बसले तर दोन घास तरी पोटात जातील. माझी शपथ आहे तुम्हाला, माझ्यासाठी तरी तुम्ही दस्तरखानवर बसा. इतके तरी माझे ऐका. पहिल्यासारखी मी राहिले नाही म्हणून नाही म्हणू नका.'

नवाब– ' दिलरुबा, हे तू काय म्हणते आहेस ? माझ्या दृष्टीला तर तू पहिल्या भेटीच्या वेळी होतीस तशीच आहेस. पण माझे जेवण झाले आहे.'

दिलरुबा– ' म्हणून तर मी शपथ घातली आहे. आता काही बोलू नका. '

नवाब– ' अग मला तू जबानबंदीची शिक्षा देते आहेस की काय ?'

दिलरुबा– " असे म्हणू नका. मी तुमची बंदी आहे."

असे म्हणून दिलरुबाने आपले दोन्ही हात पुढे केले. जणू कोणी तिचे हात बांधणारच होते. तिच्या मऊ आणि गोऱ्या हातांकडे पाहात नवाबसाहेब म्हणाले,

" वाल्लाह, काय घेराव घातला आहेस ! आता काही सुटका नाही. तुझ्यासमोर कुणाचे काय चालणार आहे ? "

दिलरुबा– " मग मागवू ना जेवण ? "

नबाब– " माझी प्रकृती बरी राहू नये असे वाटत असेल तर."

दिलरुबा– " तुमच्या प्रकृतीची काळजी मला नाही तर कुणाला असणार ? लाल प्यारा तो लालका खयाल प्यारा."

नवाब– " वाह वाह, तू तर मला लाल बनविलेस."

दिलरुबा– " तुम्ही तर माझी जीभच अडविता." (जबान पकडते है– शब्दांत पकडता. )

नवाब– " हाय, ते सुख आता नशिबी कुठे ? प्रियेचा पाहुणचार केल्याला किती तरी काळ गुदरला."– " मुद्दत हुयी है यार को मेहमान किये हुये."

इतक्यात दासीने भोजन तयार असल्याची वर्दी दिली. नवाबसाहेब दस्तरखानवर बसले. कलावंतिणी रात्रीचे जेवण रात्रीं एक वाजता घेत. पण धंदा सोडून दिल्यापासून दिलरुबा रात्री आठ वाजताच जेवून घेत असे. आज केवळ आपल्यासाठी ती रात्री दहा वाजता जेवणाचे नाटक करीत आहे हे त्यांच्या लक्षात आले. खरे पाहता दिलरुबा आठ वाजताच जेवली होती. पण पानावर बसून उगीच शितांची चाळवा-चाळव करीत ती म्हणते काय–

" काय करावे ! भूक कशी नाहीशी झाली हे कळत नाही. तुम्ही आहात म्हणून दोन घास तरी खाते आहे. तुम्ही नसता तर एक घासही घशाखाली उतरला नसता."

नवाबसाहेबांचा गळा भरून आला. आपण उपाशी आहोत हे समजून दिलरुबाने ही भोजनाची तयारी केली आहे हे त्यांनी ओळखले. आपला मुलगा शौकत घरी उपाशी बसला असेल या विचाराने ते व्याकुळ झाले. मोठ्या कष्टाने ते घास गिळीत होते.

दिलरुबा म्हणाली, " नवाबसाहेब, आता कलावंतीण म्हणून घ्यायची लाज वाटू लागली आहे. आता चौकात कशा कशा पोरी येऊन बसू लागल्या आहेत, गिऱ्हाईक पंधरा-पंधरा मिनिटे त्यांच्याकडे जातात. या काय कलावंतिणी म्हणाव्या ? यांना तर दुकानातल्या पुऱ्या म्हणावयाला पाहिजे.– मूई रंडियां हुयीं, दुकान की पूरियां हो गयीं."

नवाबांनी म्हटले– " खरे आहे. या काय कलावंतिणी म्हणाव्या ? यांना काय सलाम करता येतो, का कुशल प्रश्न विचारता येतात ? संभाषणचातुर्य तर विचारायलाच नको. बस्स, विड्यावर विडे चघळतील आणि नखरे करीत बसतील. आणि येणाऱ्या–जाणाऱ्यांकडून चार आणे, आठ आणे मागत बसतील."

दिलरुबा, उपरोधाने हसत– " अच्छा नवाबसाहेब, आपली माहिती खूप दांडगी दिसते. तिकडच्या चकरा मारीत असता वाटते ? मग साहजिकच आहे; माझी आठवण कशाला येईल ? "

नवाब– " अस्तगफरल्ला (परमेश्वर क्षमा करो), काय म्हणतेस तू ? मी काय इतका पतित झालो आहे की काय ? "

दिलरुबा– " बरे बरे, तुमचे म्हणणे कबूल."

कविता : तुम्ही कुठेही आला नाहीत आणि गेला नाहीत. आम्हाला काय माहीत ? पण तुम्ही माझ्या विचारण्याने घामाघूम का झाला ? आपल्या कपाळावरचा घाम पुसा पाहू.

न हम समझे न आप आये कहींसे
पसीना पूंछिये अपनी जबींसे

नवाब– “ हाय ! काय काय आठवणी उजळून येत आहेत ! तुला आठवते. का ? या ओळी एकदा मीच म्हटल्या होत्या.”

हे ऐकून दिलरुबाने हातरुमालाने आपले ओठ लाडिकपणाने पुसले. जणू काय लाजून ती आपला पदर सावरीत होती. तारुण्यातील आठवणी आणि दिलरुबाचा विभ्रम, नवाबसाहेबांच्या चेहऱ्यावर पुन्हा यौवनाची छटा दिसू लागली.

दिलरुबा– “ शहा मीनाच्या जत्रेतून तुम्ही आपल्या बग्गीतून येत होता, गर्दीमुळे माझी गाडी तुमच्या बग्गीजवळ येऊन थांबली होती.”

नवाबसाहेब– “ आता आठवले. त्या वेळी मी खालील ओळी म्हटल्या होत्या :

आम्ही मशिदीच्या कोनाडयात दिवे लावले. अनेक नवस मागून घेतले. अगे दिलरुबा, तुझ्यासाठी जे करायला नको ते सर्व आम्ही केले.”

ताक मस्जिद के भरे, मांगी मुरादे मन्नते
जोन करना भाकिया ओ दिलरुबा तेरे लिये

दिलरुबा– “ बरोबर, याच ओळी त्या. त्या ऐकून मी व्याकुळ झाले. तुम्ही माझ्यावर काय जादू केली कोण जाणे.”

नवाब– “ माझ्या कवितेचा तुझ्यावर इतका आघात झाला होता तर तू त्या वेळी माझ्या पत्राची उत्तरे का दिली नाहीस ?”

दिलरुबा– “ अहो, मी त्या वेळी नवाब विर्जीस सुलतान यांची ठेवलेली होते. माझ्या मावशीने मला बजावले होते की दिलरुबा, तू विर्जीस सुलतानला एकनिष्ठ राहिले पाहिजे. मैफिलींची गोष्ट वेगळी. येणाऱ्याजाणाऱ्याबरोबर गप्पागोष्टी करायला हरकत नाही. पण एकाने ठेवलेली असताना दुसऱ्याशी चोरून भेटणे किंवा निरोप धाडणे या गोष्टी कलावंतिणींच्या ब्रीदाला शोभणाऱ्या नाहीत. हाय, काय तो काळ होता ! ”

रात्र बरीच झाली होती. नवाबसाहेब जाऊ इच्छित होते. पण त्यांना संकोच वाटू लागला. दिलरुबाच्या तबकात टाकायला त्यांच्यापाशी दहा रुपयेही नव्हते. दिलरुबाने ते ओळखले असावे. ती बोलतच राहिली. जणू काय नवाबसाहेब आताच आले असून आता कोठे संध्याकाळ झाली आहे. बोलता बोलता ती म्हणाली,

“ नवाबसाहेब, आपल्याला चौधरीसाहेबांची हकीकत कळलीच असेल.”

नवाब– “ कोणते चौधरीसाहेब ? ”

दिलरुबा– “ अहो, धोलपूरचे चौधरी. अहो, झाले काय की कोर्टात देणेकऱ्यांनी त्यांच्यावर डिक्री आणली. चौधरी साहेबांजवळ एक दमडा राहिला नाही. ते कंगाल होऊन कोर्टातून बाहेर पडले. तसे छुम्मनजानने त्यांचा हात धरला. ती त्यांना

म्हणाली, " चौधरीसाहेब, तुम्हाला माहीतच आहे टाळी दोन हातांनी वाजत असते."

चौधरी– ": बरे मग ?"

छुम्मनजान– " आजपर्यंत मी तुमच्या प्रेमाची परीक्षा पाहिली. आता तुम्ही माझी सत्त्वपरीक्षा केली पाहिजे."

चौधरी– " म्हणजे काय ? "

छुम्मनजान– " तुम्ही आजपर्यंत मला जे जे काही दिले ते तुमच्या सेवेशी हजर आहे. आजपासून तुम्ही मला आपली विकत घेतलेली दासी (जर खरीद लौन्डी) समजा."

चौधरी– " हे असे कसे होईल ? "

छुम्मन रडू लागली. ती म्हणाली– " आताच आता तुम्ही माझ्या इस्टेटीचे मालक म्हणून माझ्या बरोबर चलणार नसला तर मी आत्महत्या करीन ! " चौधरी गप्प झाले. छुम्मन त्यांना आपल्या बग्गीतून घेऊन गेली. त्या दिवसांपासून चौधरी तिच्या इस्टेटीचे मालक आहेत, आणि ती त्यांची दासी."

नवाबसाहेब– ' अशी उदाहरणे आहेत म्हणा. पण मसूदाबाद, नूराबाद, खलीलपूर, माणिकनगर, झोंडी इत्यादी इस्टेटी धुळीला कुणी मिळविल्या ? त्या छुम्मनजानच्या जातकुळीच्याच ना ? आता त्या दुसऱ्या इस्टेटीच्या मागे लागल्या आहेत. हे तमाशाचे जग असेच चालायचे.– अरे ये तमाशबीनी की दुनिया ही ऐसी है."

दिलरुबा– " नवाबसाहेब, इमानपूर्वक सांगा. तुम्ही मला छुम्मनजानच्या स्वभावाची समजता की त्या मेल्या फुलपाखरासारख्या उडणाऱ्या कलावंतिणीं-प्रमाणे ?"

नवाबसाहेब (दीर्घ निःश्वास सोडीत)– ' तुला संशय का वाटावा ? तुला आठवते, मी एक पाच पदरी हार तुला दिला होता. तू तो परत केलास, आणि म्हटलेस की, हा हार तुम्ही आपल्या बायकोच्या गळ्यातून काढून आणला आहे. तो मी घेऊ शकत नाही. वेश्यांच्याने असे करवले असते काय ? तुझ्या उमदेपणाची जाणीव मला त्याच दिवशी झाली."

दिलरुबा–' जर असे असेल तर मी पण छुमनजानप्रमाणे तुम्हाला विचारते, बोला, टाळी दोन हातांनीच वाजते ना ?'

नवाबसाहेबांचे डोळे पाण्याने भरून आले. अश्रू मागे सारून ते अडखळत अडखळत म्हणाले,

' चौधरीसाहेबांची गोष्ट वेगळी आहे.'

दिलरुबा– ' अहो, मला समाधान वाटेल असे काही तरी बोला.'

नवाबसाहेब एवढेच म्हणाले, ' बस करो, जाने दो. ' ते लगबगीने उठले आणि बाहेर पडले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा लागल्या होत्या. ते चौक टाळून

म्हणाली, 'यंदा आमच्या कार्यकारिणीने एकमताने ठरविले आहे की, या वर्षीच्या आमच्या मंडळाच्या व्याख्यानाला आपल्याला बोलवावे. आपण नाही म्हणू नये!' मी त्यांना म्हटले, 'आपण व्याख्यानाचे आमंत्रण दिलेत याबद्दल मी आपला आभारी आहे. पण बाहेरगावी जायचे असल्यामुळे मला आपले आमंत्रण स्वीकारता येत नाही.' यावर त्या म्हणाल्या, 'आपल्याला आमंत्रण स्वीकारता येत नाही याचे आम्हाला वाईट वाटते. आपले नाव सर्वांनाच परिचित असल्यामुळे आम्ही आपल्याकडे आलो होतो.' आपण किती लोकप्रिय आहोत याबद्दल मी मनातल्या मनात स्वतःचे कौतुक करून घेत होतो इतक्यात त्या म्हणाल्या, 'बरे तर; मग सेतुमाधवराव कोठे बसतात हे आम्हाला सांगाल काय?' त्यांचे बोलणे ऐकून मी थक्क झालो. मी म्हटले, 'अहो मीच सेतुमाधवराव.' त्याही आश्चर्यचकित झाल्या. त्या म्हणाल्या, 'आपण सेतुमाधवराव का? आम्हाला वाटले आपण मिस्टर गायतोंडे आहात.' मी विचारले, 'बाहेर शिपायाने आपल्याला माझे नाव सांगितले नाही का?' त्या म्हणाल्या, 'नाही. साहेब आहेत काय म्हणून आम्ही विचारले. तो म्हणाला की आहेत. आणि मग आम्ही आत आलो.' मी हसत हसत त्यांना निरोप दिला. श्री. गायतोंडे हे आमच्या खात्यातील अंडर सेक्रेटरी. मीच गायतोंडे समजून ही मंडळी माझी स्तुती करीत होती या गोष्टीची मला बरीच गंमत वाटली.

मी प्रथम मुंबईला आलो तेव्हा मला मुंबईतील संस्थांची काहीच माहिती नव्हती. व्याख्यानाचे आमंत्रण आले की मी ते सहसा नाकारीत नसे. अभ्यास केलेला विषय असावा, पण तो ऐकण्यास श्रोते अगदीच मोजके असावेत, असे अनेकदा घडे.

### एका उपनगरातील हकीकत

चर्चगेट स्टेशनपासून या उपनगराचे स्टेशन तास दीड– तासाच्या अंतरावर आहे. तेथील एक कार्यकर्ते माझ्याकडे आले. त्यांनी मला व्याख्यानाचे आमंत्रण दिले. ते म्हणाले, 'वेळ रात्री नऊची ठेवतो. मुंबईत दिवसभर काम करून मंडळी संध्याकाळी परत येतात. रात्रीची वेळ त्यांना सोयिस्कर पडते. पण बरीच मंडळी जमतील. श्रोते रसिक आहेत. आपण उर्दू काव्याविषयी बोलावे अशी विनंती आहे.' उर्दू काव्य म्हटले की मी बिचकतो. मी त्यांचे म्हणणे मान्य केले. ठरलेल्या दिवशी मी चर्चगेटहून संध्याकाळी सात वाजता निघालो. त्या दिवशी रात्रीचे जेवण मला संध्याकाळी सहा वाजताच उरकून घ्यावे लागले. साडेआठच्या सुमारास मी त्या उपनगराच्या स्टेशनावर पोहोचलो. टांग्यातून मला व्याख्यानाच्या स्थळी जावे लागले. मला वाटते, ती वाचनालयाची इमारत होती. वाचनालयात चार पाच माणसे होती. श्रोते येण्याची आम्ही वाट पाहात बसलो. नऊ वाजले, सव्वानऊ वाजले तरी श्रोत्यांचा पत्ता नाही. कार्यकर्ते मला म्हणाले, 'आज काय झाले कळत

नाही. फारच थोडी माणसे दिसत आहेत.' मी काहीच बोललो नाही. साडेनऊपर्यंत नऊ माणसे जमली. त्यांत मी वक्ता, कार्यकारिणीचे दोनतीन सभासद, वाचनालयाची झाडलोट करणारा गडी यांचाही समावेश होता. आणि मला सांगण्यात आले की. उर्दू काव्यातील सौन्दर्यस्थळे यावर आपले भाषण सुरू करा. समोरचा तो अफाट समाज पाहून माझ्या मनाची काय स्थिती झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. मी म्हटले, उर्दू काव्य हा विषय आजच्या व्याख्यानाला योग्य आहे असे मला वाटत नाही. आपण वाचनालयाच्या इमारतीत जमलो आहोत. मी ग्रंथ आणि ग्रंथालये याविषयी बोलतो. असे म्हणून मी अर्ध्या– पाऊण तासात माझे भाषण संपविले. त्या दिवशी घरी परत येण्यास मला रात्रीचा एक वाजला. पुन्हा म्हणून मी त्या उपनगराच्या वाटेला गेलो नाही.

**सहा श्रोते**

पण यापेक्षाही कमी श्रोते मला आढळले ते माझ्या एका इंग्रजी व्याख्यानाला. मुंबईत मानवशास्त्राच्या (अँथ्रापॉलॉजी) अभ्यासासाठी एक मंडळ आहे. या मंडळातर्फे मला व्याख्यानाचे आमंत्रण देण्यात आले. विषय होता एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील हैदराबादेतील सांस्कृतिक प्रवृत्ती. सोसायटीच्या कार्यकर्त्यांनी व्याख्यानासाठी मुंबई विद्यापीठाच्या इमारतीतील एक मोठा हॉल घेतला होता. आमंत्रणपत्रिका बऱ्याच ठिकाणी पाठविण्यात आल्या. पण ऐन व्याख्यानाच्या वेळी अवघे सहा श्रोते होते. अध्यक्षस्थानी डॉ. कैकिणी होते. संस्थेच्या सेक्रेटरी मिस क्याबिनेट मेकर, एक स्टेनो, एक ऑस्ट्रेलियन मानवशास्त्रज्ञ आणि मी व्याख्याता, स्वतःच्या व्याख्यानाचा श्रोता. वास्तविक पाहता आम्ही पाचच श्रोते. पण सुदैवाने आम्हांला सहावा श्रोता वास्तविक पाहता आम्ही पाचच श्रोते. पण सुदैवाने आम्हाला सहावा श्रोता लाभला. माझे मित्र दत्तात्रेय विष्णू जोग पवई इन्स्टिटयूटमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक आहेत. त्यांनी फ्लोरा फाउंटनजवळील एका लाँड्रीमध्ये आपले कपडे टाकले होते. ते घेऊन ते माझ्या ऑफिसमध्ये आले. ऑफिस सुटले होते. मी व्याख्यानाला गेलो आहे असे कळल्यावर ते माझा शोध घेत घेत युनिव्हर्सिटीत आले. आणखी एक श्रोता मिळाला म्हणून संस्थेच्या सेक्रेटरीने त्यांचे मोठ्या हर्षाने स्वागत केले. डॉ. कैकिणी मला म्हणाले, 'श्रोते जरा कमी दिसतात. आपण बसून बोला.' ती सवय मला नसल्यामुळे मी उभा राहूनच बोललो. भाषण एक तास झाले. असंख्य श्रोते आपल्यासमोर आहेत असे समजून मी बोलत होतो. त्यामुळे ते रंगले असावे असे म्हणण्यास हरकत नाही.

**आधी कल्पना असती तर !**

नाट्यकलेला वाहिलेली एक संस्था मुंबईत आहे. संस्थेने मला व्याख्यान देण्याची विनंती केली. उर्दू आणि मराठी रंगभूमी हा माझ्या व्याख्यानाचा विषय

गल्ली–बोळातून बाहेर पडत आपल्या घरी आले. घरी पाहतात तो काय, एका पलंगावर खाद्यपदार्थांचा मोठा डबा ठेवला आहे आणि दुसऱ्या पलंगावर कापडाचे एक गाठोडे आहे; आणि त्यांचा मुलगा शौकत त्यांच्याकडे पाहात बसला आहे !

नवाबसाहेबांनी विचारले, ‘ हे काय आहे ?’

शौकत म्हणाला, ‘ माहीत नाही. एक मनुष्य हे सर्व येथे ठेवून गेला. हे कोठून आणले हेही त्याने सांगितले नाही. नवाबसाहेबांना सर्व काही माहीत आहे असे तो म्हणाला.’

नवाबसाहेबांनी विचारले, ‘ यात काय काय आहे ?’

शौकत म्हणाला, ‘ मी अजून त्याला हात लावला नाही.’

नवाबसाहेब आश्चर्यचकित होऊन डबा आणि गाठोडे उघडू लागले. डब्यात हलवा, मिठाया, मुरंबा आणि इतर पक्वान्ने होती. गाठोड्यात दोन शाली आणि दोन अंगरखे होते. नवाबसाहेबांनी दहा वर्षांपूर्वी दिलरुबाला कायमचा निरोप देताना दोन अंगठ्या दिल्या होत्या. त्या तिने परत केल्या होत्या. मी तुम्हाला सोडू इच्छित नाही हेच तिला सुचवायचे होते.

खाद्यपदार्थ आणि कपडे पाहून शौकतला खूप आनंद झाला. पण नवाबांच्या डोळ्यांतून अश्रूंची धार लागली होती. शौकत घाबरून आपल्या बापाच्या चेहऱ्याकडे पाहू लागला. त्यांच्या तोंडून कसेबसे शब्द बाहेर पडले, ‘ माझी जहागीर परत मिळाली तर !’

थोड्याच दिवसांनी या आधुनिक चारुदत्त आणि वसंतसेना, नवाब रफीउश्शान आणि दिलरुबा यांचा विवाह झाला, आणि ते सुखात नांदू लागले.

: १९ .

## आम्ही व्याख्यान देतो

सहा नोव्हेंबर १९५६ रोजी मी हैद्राबादहून मुंबईला आलो. या गेल्या तेरा वर्षांत मला अनेक विषयांवर व्याख्याने देण्याची संधी लाभली. माझ्या डायऱ्यांतून माझ्या व्याख्यानांच्या नोंदी टिपलेल्या आहेत. या तेरा वर्षांत माझी दोनशेसाठ व्याख्याने झाली. मुंबई शहरातील माझ्या व्याख्यानांची संख्या दोनशेच्या वर भरते. माझ्या व्याख्यानांचे विषय सामान्यपणे मराठ्यांचा इतिहास, उर्दू साहित्य आणि साहित्यिक, मराठी आणि उर्दू रंगभूमी, मराठी ऐतिहासिक नाटके आणि कादंबऱ्या हे असतात.

अभ्यास केल्याशिवाय आणि आपल्या आवडीचा विषय असल्याशिवाय आपण व्याख्यान द्यायचे नाही असा माझा शिरस्ता आहे. तसेच अर्धा-पाऊण तास बोलून वेळ मारून नेणे मला जमत नाही. दीड– दोन तास बोलल्याशिवाय आपण श्रोत्यांचे समाधान केले असे मला वाटत नाही. या दृष्टीने मला दोन संस्था अतिशय उपयुक्त वाटल्या. दादरचे अमर हिंद मंडळ आणि गिरगावची ब्राह्मण सभा. तेथील श्रोते रसिक असल्यामुळे तेथे व्याख्यान देण्यात मी रंगून जातो.

पण सर्वच ठिकाणी असा अनुभव आला असे झाले नाही. व्याख्यानाच्या निमित्ताने मला अनेक मौजेचे अनुभव आले ते वाचकांनाही मनोरंजक वाटतील.

**आपले नाव काय ?**

मला मुंबईला येऊन दोन तीन-महिनेच झाले असावे. कोणत्या तरी एका नाटकावर परिसंवाद ठेवण्यात आला होता. परिसंवादाचे अध्यक्षस्थान मला देण्यात आले होते. माझा परिचय करून देताना एक वक्ते म्हणाले, ' आज आपल्या या कार्यक्रमाला एक थोर, विद्वान अध्यक्ष लाभले आहेत.' असे म्हणून ते माझ्याकडे वळून म्हणाले, ' आपले नाव काय ?' त्यांचा हा प्रश्न माइकवरून सर्वांना ऐकू गेला. त्यांच्या या प्रश्नाने मी तर चाटच पडलो ! पण श्रोत्यांमध्येही खळबळ उडालेली दिसली.

**आपण सेतुमाधवराव का ?**

त्या दिवसांत मी सचिवालयात शिक्षण खात्याचा नायब सचिव म्हणून काम करीत होतो. मला वाटते ते १९५८ साल असावे. कोणत्या तरी महिला मंडळाच्या भगिनी मला व्याख्यानाचे आमंत्रण देण्यासाठी आल्या होत्या. एक भगिनी मला

होता. या विषयाची मी पूर्ण तयारी करून गेलो होतो. संस्थेचे कार्यकर्ते व्याख्यानाची जाहिरात करतील आणि श्रोते चांगल्या संख्येने हजर राहतील, अशी माझी साहजिकच अपेक्षा होती. पण हॉलमध्ये जमलेले श्रोते मी मोजले ते अवघे बावीस भरले. त्यातल्या त्यात श्रोत्यांमध्ये श्री. शं. नवरे, मामा पेंडसे आणि केशवराव दाते हे असलेले पाहून मला बरे वाटले. पण कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाला आगाऊ प्रसिद्धी दिली नाही, याचा मला खेद वाटला. माझे व्याख्यान संपल्यावर एक कार्यकर्ते आभार मानण्यास उभे राहिले. ते म्हणाले, 'आजचे व्याख्यान अतिशय सुंदर आणि अभ्यासपूर्ण असे झाले. भाषण इतके छान होईल अशी आधी कल्पना असती तर आले त्याहून अधिक श्रोते जमविण्याची आम्ही खटपट केली असती.' यावर मी काय बोलणार ! कार्यकर्त्यांनी काही बोलायचे शिल्लकच ठेवले नव्हते. मात्र त्यानंतर त्या संस्थेत बोलण्याची मला वेळ आली नाही.

**सह्याच सह्या**

दादरला वक्तृत्वोत्तेजक सभा नावाची एक संस्था आहे. अनेक मराठी शाळांतून वक्तृत्वाच्या स्पर्धा आयोजिल्या जातात. त्यांतून उत्तीर्ण झालेल्या मुलांमुलींना पारितोषिके देण्याचा समारंभ केला जातो. माझे मित्र श्री. शं. नवरे यांनी मला एका वर्षीच्या समारंभात बोलण्याची विनंती केली. मला वाटले की, तासदीड तासात सगळा कार्यक्रम आटोपेल. मी कार्यक्रमास गेलो तेव्हा श्रोत्यांनी हॉल भरून गेला होता. इतकी गर्दी पाहून मला साहजिकच समाधान वाटले. पारितोषिके घेण्यासाठी शेकडो मुले जमली होती. श्री. नवरे मला म्हणाले, 'मुलां-मुलींना पारितोषिकांबरोबर प्रमाणपत्रेही द्यावयाची आहेत. त्यावर आपण सह्या कराव्यात.' मला वाटले, पाचपंचवीस प्रमाणपत्रे द्यावी लागतील. पण माझ्यासमोर सह्यांसाठी कमीत कमी पाचशे प्रमाणपत्रे ठेवण्यात आली. मी एकसारखा सह्या करीत चाललो होतो. त्यात सहज तास— दीड तास मोडला असेल. त्यानंतर मुलांमुलींना पारितोषिके देण्याचा समारंभ सुरू झाला. सात-आठ वर्षांपासून पंधरा-सोळा वर्षांच्या मुलांमुलींपर्यंत पारितोषिके द्यावयाची होती. कुणाला चेंडू, 'कुणाला झबले, कुणाला रबर, पेन्सिली, कुणाला भोवरा तर कुणाला साधे कापड अशी किती म्हणून पारितोषिके सांगावी ! मुले-मुली येत, बक्षिसे आणि प्रमाणपत्रे घेत आणि सरळ हॉलमध्ये जमलेल्या आपल्या पालकांकडे जात. आईबाप त्यांचे कौतुक करीत आणि मुलांना बरोबर घेऊन तडक हॉलच्या बाहेर पडत. हा हा म्हणता हॉल रिकामा होऊ लागला. शेवटचे बक्षीस देऊन होईपर्यंत हॉलमध्ये अवघी पाच पन्नास माणसे राहिली. तोपर्यंत रात्रीचे साडेनऊ वाजून गेले होते. श्री. नवरे म्हणाले, 'आता आपले भाषण सुरू करावे.' मी पंधरावीस मिनिटे वक्तृत्वकलेवर बोललो असेन. श्री. नवरे म्हणले, 'आपल्याला तसदी झाली, असा प्रसंग पुन्हा आपल्यावर येणार

नाही.' हे वचन त्यांनी आजपर्यंत पाळले आहे.

**संशोधक सेतुमाधवराव**

व्याख्यानापूर्वी व्यख्यात्यांचा परिचय करून देण्याची पद्धत आहे. काही कार्यकर्ते माझ्याकडे येऊन माझ्याबद्दलची माहिती विचारून घेत. काही ठिकाणी इतरांना विचारून माझ्याबद्दल माहिती गोळा करण्यात येई. त्यातून मोठे गंमतीचे घोटाळे निर्माण होत. मला वाटते, दादरला कोठे तरी रवींद्रनाथ टागोरांच्यावर बोलण्याचा मला प्रसंग आला. माझा परिचय करून देताना एक बाई म्हणाल्या, 'आजचे वक्ते एक नामांकित इतिहास संशोधक आहेत. ते सतत लेखन करीत असतात. ते सकाळी चार वाजता उठले की (मी इतक्या पहाटे कधीच उठत नाही.) लगेच लेखन करण्यास बसतात. संशोधनाचा त्यांचा हव्यास काय सांगावा! जेथे जातील तेथे संशोधन करू लागतील! ते हैद्राबादेहून प्रथम मुंबईला आले ते तडक धोबी तलावावर गेले. तेथे तलाव आहे काय आणि असल्यास तेथे धोबी अद्याप कपडे धूत असतात काय, याचे त्यांना संशोधन करावयाचे होते. तसेच ते सैतान चौकीकडे गेले. तेथे सैतान अजून दिसतो काय हे त्यांना पाहावयाचे होते. असे हे थोर इतिहास संशोधक आहेत.' मी मोठ्या कष्टाने आपले हसू आवरले.

**आमचे पानिपत झाले**

मुंबईत एक सुप्रसिद्ध चाळ आहे. तेथील पटांगणात पूर्वी मोठमोठ्या पुढाऱ्यांची भाषणे होत. त्यामुळे मला त्या चाळीसंबंधी मोठे कुतूहल वाटत असे. एका गणेशोत्सवात मला या चाळीकडून व्याख्यानाचे आमंत्रण आले. त्या वेळी मी पानिपतच्या युद्धाच्या फारसी साधनांचा अभ्यास करीत होतो. व्याख्यानाला तोच विषय घ्यावा असे मी ठरविले. संध्याकाळी मी चाळीत गेलो. व्याख्यानासाठी एक मोठा पेंडॉल घातला होता. जवळच गणपतीची आरती चालू होती. पेंडॉलमध्ये अद्याप माणसे जमली नव्हती. आरती संपल्यानंतर बराच वेळपर्यंत मंडळी व्याख्यानाला जमेनात. चाळीच्या खोल्यांच्या दरवाजात उभे राहून 'आम्ही येतच आहोत, चालू द्या व्याख्यान' असे म्हणत होती. व्याख्यानाचा प्लॅटफॉर्म लाकडाचा होता. उभे राहिले की तो हालू लागे. मला कित्येक वर्षांपासून मधुमेहाचा विकार आहे. व्याख्यान देताना एखाद वेळ अशक्तपणा जाणवतो. प्लॅटफार्म हालत आहे हे माझ्या लक्षात येईना. व्याख्यानाच्या वेळी मलाच चक्कर येत असावी असे सारखे वाटे. व्याख्यान सुरू होण्याच्या वेळेपर्यंत पाच पन्नास माणसे जमली. त्यांत कोणी इतिहासाचा प्राध्यापक, किंवा कॉलेजचा एम. ए. चा विद्यार्थी मला दिसेना. अस्सल फारसी साधनांवरून मी तयार केलेले माझे भाषण श्रोत्यांच्या डोक्यावरून जाईल अशी मला भीती वाटू लागली. माझे भाषण सुरू होते न होते तोच गणपतिबाप्पाच्या समोर बसून खिरापत खात असलेली मुले माझ्यासमोर येऊन बसली. त्यांची

वये पाचपासून बारा-तेरापर्यंतची असावी. त्यांचा गलका आणि स्वयंसेवक चापटचा मारीत त्यामुळे उडालेला गोंधळ यामुळे मला भाषण सुचेना. माइकही अधूनमधून कामातून जात होता. शेवटी मी म्हटले, 'बंधु-भगिनींनो, पानपतावर मराठे आणि अफगाण यांना परस्परांची धास्ती जितकी बसली नसेल तितकी ही समोरची बाळगोपाळ मंडळी पाहून मला बसली आहे!' या वाक्याचा योग्य तो परिणाम झाला आणि लहान मुलांना सभेतून काढून लावण्यात आले. मी माझ्या भाषणात पानिपतच्या युद्धाची सविस्तर चर्चा केली. या युद्धात मराठ्यांचा पराजय का झाला याची कारणे दिली. युद्धापूर्वी अहमदशहा अबदालीच्या मोठ्या मुलाने बंड कसे केले आणि त्याचा परिणाम अफगाण राजकारणावर काय झाला हेही सांगितले. व्याख्यान संपले. व्याख्यानानंतर आम्ही अल्पोपाहार करीत होतो. एक गृहस्थ म्हणाले, 'आपण पानिपतच्या पराजयाची मीमांसा केली. मला पराजयाचे एक कारण लक्षात आले आहे.' मी कुतूहलाने विचारले, 'ते काय?' ते गृहस्थ गंभीरपणे म्हणाले, 'मराठ्यांच्यात जातिभेद होते. जितकी माणसे तितक्या चुली. एका पंक्तीत बसून ते जेवीत नसत. यामुळे त्यांचा पराभव झाला असावा.' त्यांचे हे उद्‌गार ऐकून मी थक्क झालो! मला वाटते, आठनऊ वर्षांपूर्वीची गोष्ट असावी. यानंतर मी मात्र विषयाची निवड करताना आपल्यासमोरचे श्रोते कशा प्रकारे असतील याचाही विचार करू लागलो.

**पडदे पाडू का ?**

पानिपत या विषयावरील व्याख्यानाचा आणखी एक प्रसंग आठवतो. दादरच्या मराठी रंगमंदिरात पानिपतवर मी लिहिलेल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ होता. समारंभ संध्याकाळी सहा ते आठपर्यंत ठरला होता. पण महामहोपाध्याय पोतदार, प्राध्यापक फाटक इत्यादींची भाषणे संपण्यासच मुळी आठ वाजून गेले आणि साडेआठपासून नाटक सुरू होणार होते. माझे भाषण सुरू झाले तसे अनेक माणसे बाहेर येऊन श्रोत्यांत मिसळली. कित्येकजण उभे राहून माझे भाषण ऐकू लागले. मला वाटले, माझी भाषणे लोकांना आवडतात म्हणून ही गर्दी होत आहे. नंतर चौकशी करता कळले की, ती मंडळी नाटक पाहण्यासाठी म्हणून आली होती. माझे भाषण सुरू होऊन पाचदहा मिनिटे झाली असतील नसतील तोच नाटकाची पहिली घंटा होण्याची वेळ आली. अटीतटीचा सामना करण्याच्या उद्देशाने पानपतावर दोन्ही दळे समोरासमोर आली असे वाक्य आवेशाने उच्चारून मी सहज विंगकडे पाहिले. तो पडद्याचा दोर हातात धरून एक इसम मला खुणेने विचारीत होता, 'पडदा पाडू का?' मी त्याच्याकडे दुर्लक्ष करून श्रोत्यांना उद्देशून बोलू लागलो, 'बंधु-भगिनींनो, चवदा जानेवारी, सत्राशे एकसष्टचा दिवस उजाडला. युद्धाला तोंड लागले.' असे म्हणून मी सहज उजवीकडच्या विंगकडे पाहिले;

तेथेही एक इसम मला खुणेने पडदा पाडू का म्हणून विचारीत होता. हे पाहताच मी पुढे एकदोन वाक्ये कशीबशी उच्चारून माझे व्याख्यान संपविले !

व्याख्यान म्हणजे करमणुकीच्या कार्यक्रमातील एक त्रासदायक पण आवश्यक मध्यंतर होय अशी समजूत गणेशोत्सवातील अनेक कार्यकर्त्यांची दिसते. लावण्या, पोवाडे, लहान मुलींचे नृत्य, व्याख्यान, नंतर नाटक अशा कार्यक्रमांत व्याख्यानाचा निभाव लागणे कठीण होऊन बसते. यामुळे गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात व्याख्याने देण्याचे मी पुढे पुढे टाळू लागलो.

बरे, गणेशोत्सवातील कार्यकर्ते ( काही अपवाद वगळता ) व्याख्यानासाठी विनंती करतात ती अशा पद्धतीने की, आपण नकार दिला तर त्यांना विशेष वाईट वाटेल असे आपल्याला वाटणार नाही.

**तुम नहीं और सही !**

एकदा दादरच्या एका गणेशोत्सवातून मला फोन आला, 'आपण सेतुमाधवराव ना ?' मी म्हटले, 'हो'. 'आपल्याला येऊन भेटावयाचे होते.' मी म्हटले, 'या, अवश्य या.' 'नाही, यंदाच्या आमच्या गणेशोत्सवात आपण व्याख्यान द्यावे अशी विनंती करणार होतो.' मी म्हटले, 'मला जमेलसे वाटत नाही.' 'असे म्हणता, तर दुसऱ्या कुणाचे नाव सुचवा.' मी म्हटले, 'ते काम आपणच करावे.' 'ठीक आहे. मग आपल्याला भेटून काही उपयोग नाही. पुन्हा केव्हा तरी आम्ही आपल्याला विनंती करू. अच्छा, बाय बाय.' आणि मग फोन खाली ठेवला जातो. असे अनुभव मला पाच-सहा वेळा आले.

**स्टचांड बाय**

कधी कधी ठरलेला वक्ता आयत्या वेळी आपल्याला येणे होणार नाही असे कळवतो. आणि मग त्याची जागा घेण्यासाठी मला सांगण्यात येते. संस्थेने आपल्याला स्टचांड बाय का समजावे हे मला कळत नाही. पण काही मोजक्या संस्थांबद्दल मनातून जिव्हाळा असल्यामुळे नाही म्हणवत नाही.

**खरेच, अडचणी फार आहेत**

आपल्या आवडीच्या आणि अभ्यासाच्या विषयावर व्याख्यान देणे हा माझा छंद आहे. मी व्याख्यानाबद्दल इतकीच अपेक्षा ठेवतो की, कार्यकर्त्यांपैकी कोणी तरी येऊन मला व्याख्यानाच्या स्थळी घेऊन जावे, आणि परत आणून सोडावे. इतकी साधी गोष्टही काही जणांच्या लक्षात येत नाही. मी सचिवालयात नायब सचिव असताना एकदा एक प्राध्यापक माझ्याकडे आले. ते म्हणाले, 'आपण आमच्या कॉलेजमध्ये एक व्याख्यान द्यावे अशी आमची इच्छा आहे.' मी म्हटले, 'ऑफिसच्या वेळात मी व्याख्यान देण्यास जात नसतो. आपण व्याख्यान संध्याकाळी

ठेवा.' ते म्हणाले, 'कॉलेज संध्याकाळी बंद होते.' मी म्हटले, 'शनिवारी अर्धा दिवस ऑफिस आम्हाला असते.' ते म्हणाले, 'कॉलेजही अर्धा दिवस असते.' मी म्हटले, 'सकाळी तुमचे आर्ट्स कॉलेजचे वर्ग असतात. तुम्ही सकाळी व्याख्यान ठेवा. मात्र मी दहापर्यंत ऑफिसला पोहोचायला पाहिजे हे लक्षात ठेवा म्हणजे झाले.' यावर प्राध्यापक महाशय म्हणाले, 'ते कठीण दिसते.' मी म्हटले, 'ते कसे काय?' ते म्हणाले, 'असे पाहा, कुलाब्याच्या तुमच्या घरापासून तुम्ही सकाळी बसने व्ही. टी. ला येणार. तेथून लोकलने अमक्या स्टेशनला उतरणार. तेथून आमच्याकडे कॉलेजपर्यंत चालत येण्यास दहा मिनिटे लागणार. पुढे व्याख्यान आटोपल्यावर आपण लोकल गाठणार. सकाळी ऑफिसची वेळ, एक दोन लोकल्स चुकण्याचा संभव आहे. तेथून व्ही. टी. ला येणार, आणि बसने ऑफिसला येणार. दहा पर्यंत हे सर्व होईल असे वाटत नाही! या व्याख्यानात अडचणी फार आहेत.' त्यांचे हे उद्‌गार ऐकून मी थक्क झालो. मी त्यांना म्हटले, 'जाऊ द्या, तुम्ही कशाला मनाला लावून घेता ? माझे व्याख्यान ठरवा असे मी नाही ना म्हटले ? मी आपल्या ऑफिसमध्ये बसून काम करणारा माणूस. तुम्ही मला व्याख्यानाबद्दल विनंती केली पण तुम्हांलाच स्वतःला अडचणी जाणवल्या; त्यामुळे तुमचा नाइलाज झाला.' असे म्हणून मी त्यांना निरोप दिला. सरळ एका साहाय्यक प्राध्यापकाला माझ्याकडे पाठवून टॅक्सीतून माझी आणण्या-नेण्याची व्यवस्था करण्याचे त्यांना सुचले नाही. अति विद्वत्तेमुळे क्षुल्लक गोष्टीकडे आणि शिष्टाचाराकडे त्यांचे दुर्लक्ष झाले असावे !

**आमंत्रण देणाऱ्या व्यक्ती**

संस्थांचे जबाबदार कार्यकर्ते स्वतः व्याख्यानासाठी विनंती करण्यास आले तर त्यांच्याकडून संस्थेबद्दल माहिती मिळविणे आणि तेथे व्याख्यान देण्यास जाणे योग्य की अयोग्य हे ठरविणे सोपे जाते. पण भलतीच माणसे आली की आमंत्रण नाकारावे लागते. कॉलेजतर्फे आमंत्रण आले की प्राचार्य यांचे पत्र यावे, एखादा प्राध्यापक यावा आणि त्याने कार्यक्रमाचा तपशील सांगावा, अशी साहजिकच अपेक्षा असते. माझ्या ऑफिसच्या जवळ असलेल्या कॉलेजच्या वाङ्मय मंडळातून मला दरवर्षी बोलावणे येई. बोलावणारी मुले फर्स्ट इयरची असत. मराठीचे प्राध्यापक कधी आले नाहीत, किंवा प्राचार्यांनी कधी पत्रद्वारे किंवा फोनवरून विनंती केली नाही. मुले म्हणत, दुपारी एकपासून पावणेदोन वाजेपर्यंत मध्यंतर असते. तेवढ्या वेळात व्याख्यान द्या. मी साहजिकच नकार देत असे. असे दोन-तीन वर्षे घडले. शेवटी एकदाची ही गोष्ट प्राध्यापकांच्या लक्षात आली, आणि मग एके वर्षी संध्याकाळी हा कार्यक्रम पार पडला.

एका कॉलेजच्या प्राध्यापकांनी एका विद्यार्थ्याला माझ्याकडे पाठविले. त्याने मला सरळपणे सांगितले, 'आमचे कॉलेज आपल्या ऑफिसला जवळ आहे. आपण ओव्हल ओलांडून आमच्या कॉलेजमध्ये या; लिफ्टने अमक्या अमक्या मजल्यावर जा.

तेथे टीचर्स कॉमनरूममध्ये एका कोपऱ्यातल्या आरामखुर्चीवर आमचे इतिहासाचे प्राध्यापक आराम करीत बसलेले दिसतील. त्यांना उठवा, आणि मी व्याख्यानासाठी आलो असे त्यांना सांगा. ते पुढची व्यवस्था करतील.' वक्त्याचा दर्जा, त्याची प्रतिष्ठा यासंबंधीच्या अज्ञानामुळे हा असे बोलत आहे, हे मी ओळखले. मी त्याला म्हटले, 'तुझ्या प्राध्यापकांना पाठवून दे. मी त्यांच्याशी बोलून घेईन.' त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी प्राध्यापक येऊन भेटले आणि त्यांच्या इतिहासाच्या तासातील पंचेचाळीस मिनिटे व्याख्यानाच्या कार्यक्रमाला मिळाली. अर्थात त्यापैकी तीस मिनिटे त्यांनी माझा परिचय करून देण्यात घालविली आणि त्यामुळे 'भारताच्या इतिहासातील विविध धारा' हा प्रचंड विषय मला अवघ्या दहा मिनिटांत संपवावा लागला ही गोष्ट वेगळी.

**मी जगन्नाथ शंकरशेट**

व्याख्यानासाठी बोलावण्यास येणाऱ्या व्यक्तींची वागणूकही कधी कधी मोठी गंमतीची असते. एकदा मी ऑफिसमध्ये काम करीत बसलो असता एक गृहस्थ माझ्याकडे आले. त्यांनी मला मोठ्या सलगीने नमस्कार केला. मीही त्यांना नमस्कार केला. मी काही त्यांना ओळखू शकलो नाही. ते मला म्हणाले, 'आपण मला ओळखले नाहीत.' मी म्हटले 'माफ करा, मला काही ओळख पटली नाही.' ते म्हणाले, 'आश्चर्य आहे. आपण जगन्नाथ शंकरशेटचे नाव ऐकले आहे ना ?' मी म्हटले, 'हे काय विचारता ? अहो जगन्नाथ शंकरशेटचे नाव ऐकले नाही असा कोण आहे ?' 'मग झाले तर.' ते हसून म्हणाले. मी म्हटले 'पण जगन्नाथ शंकरशेटचा येथे संबंध काय ?' यावर ते आश्चर्याने म्हणाले, 'अहो, मी जगन्नाथ शंकरशेट.' त्यांचे हे उद्‌गार ऐकून मी कमालीचा अस्वस्थ झालो. जगन्नाथ शंकरशेट शंभर वर्षांपूर्वी होऊन गेले आणि समोर असलेले गृहस्थ चक्क म्हणतात. आपण जगन्नाथ शंकरशेट म्हणून. भुताखेतांबद्दल आणि पुनर्जन्माबद्दल मी साशंक आहे. पण अस्वस्थ मनःस्थितीतच मी त्यांना विचारले, 'अहो, पण जगन्नाथ शंकरशेट शंभर वर्षांपूर्वी होऊन गेले ना ?' यावर ते म्हणतात, 'हो, पण मी जगन्नाथ शंकरशेट.' असे बोलून ते म्हणाले, 'मी त्या जगन्नाथ शंकरशेटचा पणतू. त्यांचे नाव आम्ही आडनाव म्हणून लावतो.' मला खुलासा झाला. मी म्हटले, 'इतिहासात पूर्वजांचे नाव आडनाव म्हणून लावल्याची उदाहरणे आहेत. राजे उदाराम, रावरंभा, इत्यादींत आपल्या घराण्याची भर पडलेली दिसते.' जगन्नाथ शंकरशेटच्या शताब्दीनिमित्त त्यांचे पणतू मला व्याख्यानाचे आमंत्रण देण्यास आले होते. अर्थात माझा त्या विषयाचा अभ्यास नसल्यामुळे मी त्यांचे आमंत्रण स्वीकारू शकलो नाही.

**जेवण आटोपून आलोच**

मुंबईला लागून असलेले एक गाव. मुंबईच्या लोकल गाड्या तेथे जातात.

सुमारे दहा वर्षांपूर्वीची हकीकत. त्या गावी मला व्याख्यानासाठी बोलावण्यात आले. त्या वेळी मी मुंबईत एकटाच राहात होतो. बायकामुले हैदराबादला होती. त्या दिवशी माझे मित्र श्रीयुत अंधारे सुपरिंटेंडिंग इंजिनियर यांनी मला आपल्या घरी जेवायला बोलावले होते. दुपारी मी त्यांच्याकडून परत आलो. संध्याकाळी सहाच्या सुमारास मला बोलावण्यास माणसे आली. त्या दिवसांत रात्री आठ-साडेआठला मी चर्चगेटच्या मथुरा डेअरीत जेवायला जात असे. संध्याकाळी सहाची वेळ काही जेवणाची नव्हती. म्हणून मी एक कप कॉफी घेऊन निघालो. लोकलने व्याख्यानाच्या गावी पोहोचण्यास आठ वाजले असावेत. मला गावच्या एका प्रतिष्ठित गृहस्थाकडे नेण्यात आले. मला त्या वेळी भूक लागली होती. आमचे स्वागत करून ते म्हणाले, 'थोडे थांबा हं, मी जेवण आटोपून आलोच.' मी मुंबईहून सहा वाजता निघालो; त्यामुळे मला रात्रीचे जेवण कोठे तरी घेणे प्राप्त होते हे त्यांच्या लक्षात आले नाही. संकोचामुळे मलाही काही बोलता आले नाही. त्यांचे जेवण होईपर्यंत आम्ही दिवाणखान्यात बसून होतो. जेवण झाल्यावर ते गृहस्थ धोतराच्या सोग्याने तोंड पुशीत बाहेर आले आणि म्हणाले, 'चला मंडळी, आपण व्याख्यानाच्या जागी जाऊ.' आम्ही निघालो. मला वाटले, कोणत्या तरी हॉटेलात जाऊन पोटभर जेवावे, निदान फराळ तरी करावा. पण ते जमावे कसे ? भोवती मंडळींचा गराडा. व्याख्यान नऊ वाजता सुरू होणार होते, पण पुरेसे श्रोते वेळेवर न जमल्यामुळे ते साडेनऊला सुरू झाले. भुकेने माझे हाल होत होते; पण तशाही स्थितीत तास – दीड तास मी बोललो. विषय होता महाराष्ट्राचा मध्ययुगीन इतिहास. मी कसेबसे व्याख्यान संपविले. मला वाटले आता तरी आपल्याला अल्पोपाहार मिळेल. केळी, काजू इत्यादींनी तरी पोटाची थोडीबहुत गरज भागेल. पण छे, व्याख्यानानंतर माझ्यासमोर एक कप चहा आणि एक बिस्किट ठेवण्यात आले. वर सुचविण्यात आले की, थोडी घाई केलेली बरी; कारण शेवटची लोकल आता पंधरा मिनिटांत येईल. स्टेशनवर काही केळी विकत घेऊन खावी म्हटली तर मंडळी पोहोचवायला म्हणून शेवटपर्यंत हजर. मला वाटते, मी व्ही. टी. वर आलो तेव्हा रात्री एकचा सुमार होता. स्टॉल्सवर चहाशिवाय काही मिळेना. स्टेशनबाहेर टॅक्सी मिळेना. एक खानावळ उघडी होती. तेथे जाऊन भात मागितला तर पोऱ्याने मांसाचे तुकडे घातलेली बिरयाणी आणली. मी मांसाहार करीत नसल्यामुळे बिरयाणी न खाताच बाहेर पडलो. अशाच भुकेल्या अवस्थेत मी कुलाब्यापर्यंत चालत गेलो. वाटेत रीगल थिएटरपाशी केळी मिळाली. चार-सहा केळी खाल्ल्यावर जिवात जीव आला. घरी मी एकटाच असल्यामुळे जेवणाची व्यवस्था नव्हती. मला झोपण्यास त्या दिवशी रात्रीचे दोन वाजले. मी त्या दिवशी कितीदा तरी स्वतःला उद्देशून म्हटले असेल, 'पुन्हा व्याख्यानाच्या भानगडीत पडशील काय ?' आजही त्या दिवशीचा अनुभव आठवला की भूक नसूनही पोटात

कावळे ओरडू लागतात!

**भयंकर सेतुमाधवराव**

महाराष्ट्रातील एका गावी माझे व्याख्यान होते. स्थानिक मंडळींत माझे एक वर्गबंधू होते. माझी ओळख करून देण्याचे काम त्यांच्याकडे आले. वाक्यागणिक 'भयंकर' हा शब्द वापरण्याची त्यांची लकब होती. माझी ओळख करून देताना ते म्हणाले, 'आजचे वक्ते भयंकर विद्वान आहेत. आम्ही शाळेत एकत्र शिकत होतो त्या वेळी माझी आणि त्यांची भयंकर ओळख होती. त्यानंतर त्यांनी कॉलेजात भयंकर अभ्यास केला आणि एकाहून एक भयंकर परीक्षा ते भयंकर यश मिळवून उत्तीर्ण झाले. अशा भयंकर विद्वानांचे भाषणही भयंकरच होणार आहे. आम्ही त्यांचे भयंकर आभारी आहोत.' या माझ्या मित्राच्या भयंकर मान्यापुढे मी चीत झालो. माझ्या व्याख्यानाच्या सुरुवातीलाच मी श्रोत्यांना कळवळून म्हटले, 'बंधु-भगिनींनो, माझे मित्र सांगतात तसा मी भयंकर माणूस नाही. माझे चार शब्द आपण गोड मानून घ्यावे.'

**व्याख्यान आणि लग्नमंडप**

मुंबईचे एक उपनगर; मला व्याख्यानाचे आमंत्रण आले. मला बोलावण्यास आलेले कार्यकर्ते अननुभवी असावेत. रात्री साडेआठ–नऊच्या सुमारास मी व्याख्यानाच्या स्थळी पोहोचलो. इमारतीच्या आवारात रोषणाई केली होती. असंख्य माणसे जमली होती. टेबले– खुर्च्या मांडल्या होत्या. येणाऱ्या–जाणाऱ्यांचे अत्तर, गुलाबपाणी, पुष्पगुच्छ इत्यादींनी स्वागत होत होते. माझेही अगत्याने स्वागत करण्यात आले. या स्वागताने मी भारावून गेलो. मी मनात म्हटले, 'माझ्यासाठी ही मंडळी किती कष्ट घेताहेत!' इतक्यात समोर वऱ्हांड्यात एक गृहस्थ उभे होते. ते घाईघाईने माझ्याजवळ आले. ते म्हणाले, 'येथे लग्नसमारंभ आहे. आम्ही हे आवार अशा कार्यासाठी भाड्याने देत असतो. आपले व्याख्यान आतील खोलीत आहे.' मी मुकाट्याने त्यांच्यामागे गेलो. खोलीत दहा पंधरा माणसे जमली होती. लग्नसमारंभातील स्त्री-पुरुष खोलीत डोकावून निघून जात. मी विचारले, 'माणसे बरीच कमी दिसतात.' ते गृहस्थ म्हणाले, 'त्याचे काय आहे, शेजारीच संस्था आहे ना, तेथे कीर्तन चालले आहे. त्या संस्थेच्या स्वयंसेवकांनी इकडील श्रोत्यांना तिकडे नेले आहे.' शेवटी वीस पंचवीस श्रोत्यांच्यासमोर मला तासभर बोलावे लागले. विषय होता, 'मध्ययुगीन भारतातील भावनात्मक एकीकरण.'

**मी युनिव्हर्सिटीचा वर्ग घेतो**

हा अनुभवही मोठा विलक्षणच होता. माझे मित्र प्राध्यापक ओतुरकर मला एकदा म्हणाले, 'सेतुमाधवराव, मुंबई विद्यापीठाच्या पदव्युत्तर वर्गात मराठ्यांचा

इतिहास शिकवण्याचे काम मी करतो. मराठा–निजाम संबंध या विषयाचा तुमचा अभ्यास दांडगा आहे. आमच्या एम. ए. च्या वर्गात तुम्ही या विषयावर बोलावे अशी माझी इच्छा आहे.' मी त्यांना म्हटले, 'ऑफीस वेळेबाहेर तुम्ही हा कार्यक्रम ठेवा. शनिवारी ऑफिस अर्ध्या दिवसाचे असते. तुम्ही कोणत्या तरी शनिवारी चारच्या सुमारास तुमचा वर्ग बोलवा. मी येतो.' विद्यापीठाच्या इमारतीत सगळेच वर्ग भरत नसावेत. कारण काही दिवसांनी विद्यापीठाच्या रजिस्ट्रारचे मला पत्र आले की ओतुरकरांचा वर्ग एलफिन्स्टन कॉलेजच्या अमक्या अमक्या नंबरच्या खोलीत चार वाजता भरणार आहे. ठरलेल्या दिवशी ओतुरकर माझ्याकडे साडे-तीनच्या सुमारास आले. माझे ऑफिस जुन्या सचिवालयात होते. मी आणि ओतुरकर एलफिन्स्टन कॉलेजात आलो. पहिल्या मजल्यावर आमच्याभोवती काही विद्यार्थी गोळा झाले. आम्ही सगळे आम्हाला दिलेल्या क्रमांकाची खोली शोधू लागलो. एका खोलीत आम्ही शिरलो. तेथे कोणता तरी वर्ग चालू होता. प्राध्यापकांनी हसून आम्हाला सांगितले, 'अहो, ही खोली तुमची नव्हे.' दुसऱ्या खोलीतून प्राध्यापक व्यास विद्यार्थ्यांना घेऊन बाहेर पडले. मला पाहून ते म्हणाले, 'हाउ डू यू हॅपन टु बी हियर?' मी ओतुरकरांच्याकडे बोट दाखवून म्हटले, 'मी यांच्याबरोबर आलो आहे.' शेवटी एकदाची आमची खोली सापडली. ओतुर-करांनी विद्यार्थ्यांना माझी ओळख करून दिली. नंतर मी आपल्या विषयावर बोलू लागलो. मला वाटते आमच्या पूर्वी त्या खोलीत गणिताचा वर्ग भरला असावा. कारण फळ्यावर अनेक आकडे मांडलेले दिसले. टेबलावर खडूंचा चुरा साठलेला होता. मी टेबलावर तळहात टेकून बोलत होतो. हाताला खडूचा चुरा लागला. तिकडे माझे लक्ष नव्हते. मध्येच चेहऱ्यावरचा घाम घाम पुसण्यासाठी मी कपाळा-वरून हात फिरविला. तो कपाळावर भस्माचे पट्टे उठले. विद्यार्थी मात्र लक्षपूर्वक माझे भाषण ऐकत होते. विषय रंगत होता. तोच ओतुरकर मला म्हणाले, 'अजून पाचदहा मिनिटे आपण बोलू शकता.' मला थोडक्यात माझे भाषण आटोपते घ्यावे लागले.

भाषण संपल्यावर आम्ही दोघे विद्यार्थ्यांमध्ये येऊन बसलो. मी म्हटले, 'ओतुरकर, मला आता घरी जाऊ द्या.' ते म्हणाले, 'चहा घेतल्याशिवाय कसे जाल?' असे म्हणून त्यांनी कँटीनमधून चहा मागविला. वर्गातील बाके कलती होती; त्यावर कप ठेवताच त्यातील चहा सांडून माझी नुकतीच इस्त्री केलेली पँट खराब झाली. हा कार्यक्रम आटोपल्यावर आम्ही खोलीतून बाहेर पडलो. मी म्हटले, 'ओतुरकर, आपण लिफ्टने खाली जाऊ या.' ते म्हणाले, 'आपण मधल्या वाटेने जाऊ.' आम्ही कोणता जिना उतरलो ठाऊक नाही, पण उतरल्यावर पाहतो तो आम्ही कँटीनचे पदार्थ तयार होत होते त्या खोलीत होतो. तेथे खाद्यपदार्थांची भट्टी पेटलेली. काही क्षणांतच माझा जीव गुदमरू लागला. आम्ही बाहेर आलो तो

बसस्टँडजवळ. तेथे ओतुरकरांनी माझा निरोप घेतला, आणि मी कपाळावरील भस्म पुशीत आणि पँटवरचे डाग काढून टाकण्याचा प्रयत्न करीत घरीच जाण्याची वाट धरली. पुन्हा म्हणून मी प्राध्यापकाशी लगट केली नाही.

**श्रोते**

मुंबईकर श्रोते मात्र रसिक, चिकित्सक आणि शिस्तप्रिय आहेत. अमर हिंद मंडळ, ब्राह्मणसभा इत्यादी संस्थांतून व्याख्यानाचा योग म्हणजे आनंदाची पर्वणी वाटते. मुंबईकर श्रोते शांतपणे भाषण ऐकून घेतात. मध्ये हेर्कलिंग करीत नाहीत, किंवा व्याख्यान चालू असताना मध्येच प्रश्न विचारीत नाहीत. भाषण पडले तरी नापसंती दर्शवीत नाहीत. व्याख्यानानंतर मात्र काही श्रोते व्यासपीठामागच्या हॉलमध्ये शंका विचारतील आणि थोडीबहुत चर्चा करतील त्यामुळे वक्ता मुंबईकर श्रोत्यांवर खुश असतो. निदान माझा तरी ह्याच अनुभव आहे. पण एखादे वेळेस अशा चर्चेच्या वेळी माझ्या भाषणात नसलेला अर्थ शोधून काढण्याचे प्रयत्न होतात. मी राजकारण या विषयावर कधीच बोलत नाही. तो माझा प्रांत नव्हे. एकदा मी शिवाजीमहाराजांवर व्याख्यान दिले. विजापूरच्या आदिलशाहीत त्या वेळी कशी बजबजपुरी माजली होती हे सांगितले. व्याख्यान संपल्यावर एक श्रोते मला कौतुकाने म्हणाले, ' चांगली सरकारवर टीका केलीत तुम्ही.' मी ताबडतोब म्हटले, ' विजापूरच्या आदिलशाही सरकारवर.' थोरले माधवराव पेशवे यांचे ' यवनांना जरबेत ठेवून तीर्थस्थाने सोडवावीत असा मानस आहे.' हे उद्‌गार मी श्रोत्यांना सांगितले. टाळ्यांचा कडकडाट पडला. लगेच मी म्हटले, ' हे उद्‌गार थोरल्या माधवरावांचे आहेत हे विसरू नका.'

**वर्तमानपत्रांतील रिपोर्ट**

भाषणाचे तपशीलवार रिपोर्ट देण्याची पद्धत मुंबईतील फार थोड्या वृत्तपत्रांतून दिसून येते. दिलीच तर संक्षिप्त बातमी दिली जाते. बातमीची शीर्षकेही बरोबर नसतात, आणि भाषणाचे रिपोर्टही अर्धवट असतात. माझ्या एका भाषणाचा रिपोर्ट देताना एका बातमीदाराने म्हटले, ' पहिल्या बाजीरावाने (१७२०–४०) खर्ड्याच्या लढाईत (१७९५) निजामाचा पराभव केला.' याच्याही पलीकडे एका वृत्तपत्रात रिपोर्ट आला तो कळसच होय. मी एका व्याख्यानात म्हटले होते, ' सूर्याजी पिसाळाने रायगडावर फितुरी करून किल्ल्याचे दरवाजे मोगलांना उघडून दिले असे म्हणतात, ते खरे नाही. कारण सूर्याजी पिसाळ हा त्या वेळी रायगडावर नव्हता. तो मराठ्यांचा नोकर नव्हता, तो होता रायगडाखाली मोगलांच्या नोकरीत. वर्तमानपत्रात रिपोर्ट काय यावा ! ' सेतुमाधवराव म्हणतात, सूर्याजी पिसाळ नावाचा इसमच नव्हता.' यावर एका दैनिकात उपसंपादकीय टीप आली की, ' आता फितुरी लोकांना सूर्याजी पिसाळ म्हणण्याची सोय राहिली नाही.'

असेच एका भाषणात उर्दू साहित्यासंबंधी चर्चा करताना मी म्हटले, की उर्दू साहित्यिकांचा समाज, जीवन, देश इत्यादींसंबंधी वैचारिक गोंधळ आहे. या गोंधळाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दिसून येत आहे. दुसऱ्या दिवशी एका दैनिकात भाषणाचा रिपोर्ट आला. शीर्षक होते– उर्दूचे भविष्य अंधकारमय !

अर्थात माझ्या व्याख्यानांतून मला वर आलेले अनुभव हे फार थोड्या व्याख्यानांना लागू आहेत. माझ्या बहुतेक व्याख्यानांविषयीचा संस्था, श्रोते, कार्यकर्ते यांच्याबद्दलचा अनुभव सुखद आहे. मुंबईत मला अनेक विषयांवर बोलता आले आणि रसिक श्रोत्यांनी माझे कौतुक केले, याची मला धन्यता वाटते.

. २० .

# ईराणचा कविसम्राट हाफिज शीराजी

[ मृत्यू इ. स. १३८८ ]

ईराणचा कविसम्राट हाफिज हा शीराज या सुप्रसिद्ध शहराचा रहिवासी. सुप्रसिद्ध कवी आणि गुलिस्तान व बूस्तान या ग्रंथांचा कर्ता शेख सादी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले शीराज हे शहर म्हणजे मध्ययुगीन इराणातील विद्वानांचे आगर होय.

हाफिजचे नाव सम्सुद्दीन मुहंमद. कुराण ग्रंथ त्याने मुखोद्‌गत केल्यामुळे त्याला लोक हाफिज (पाठक) म्हणू लागले. त्याने आपले कवितेतील नाव हाफिज च ठेवले. आणि याच नावाने तो फारसी साहित्यात प्रसिद्ध झाला आहे.

हाफिजचा जन्म नक्की कोणत्या वर्षी झाला यासंबंधी माहिती उपलब्ध नाही. याचा बाप हा प्रतिष्ठित घराण्यातील असावा. हाफिजचे शिक्षण शीराजलाच झाले. त्या काळाच्या पद्धतीप्रमाणे त्याने अरबी, फारसी या भाषांचा अभ्यास केला. इतिहास, धर्मशास्त्र, सूफी तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवर त्याने प्रभुत्व संपादन केले. हाफिजचा मित्र आणि आश्रयदाता वजीर हाजी किवामुद्दीन याने शीराज येथे धर्मशास्त्राचे एक विद्यापीठ स्थापन केले होते, तेथेच कुराणभाष्य शाखेत प्राध्यापक म्हणून हाफिजची नेमणूक झाली. याच कामावर तो शेवटपर्यंत होता.

**काव्याची प्रेरणा**

हाफिजच्या काव्यसाधनेसंबंधी एक मनोरंजक आख्यायिका आहे, ती अशी :

शीराजपासून चार मैलांवर पीरेसब्ज ( हिरवा पीर ) नावाचे स्थळ आहे. या स्थळासंबंधी एक दंतकथा होती. या स्थळी बसून जो कोणी चाळीस रात्री जागरणात घालवील तो प्रतिभावान कवी म्हणून लौकिक मिळवील, असा लोकांचा समज होता. तरुण हाफिजने हे अवघड व्रत पाळण्याचे ठरविले. याच वेळी तो शाखेनबात ( साखरेची कांडी ) नावाच्या एका तरुणीच्या प्रेमात सापडला होता. तो रोज सकाळी तिच्या घरावरून जाई. त्याचा दुपारचा वेळ भोजन आणि विश्रांती यात जाई. आणि रात्रीचे जागरण तो पीरेसब्ज येथे करी.

पीरेसब्ज येथील त्याचे अनुष्ठान एकोणचाळीस दिवस चालले. आता फक्त

शेवटचा, चाळिसावा दिवस राहिला होता. त्या दिवशी सकाळी तो आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आपल्या प्रेयसीच्या घरावरून चालला होता. तोपर्यंत तिने त्याला आपल्या घरी बोलाविलेच नव्हते. पण आज मात्र तो रस्त्यावर दिसताच तिने संकेत करून त्याला आत बोलाविले. हाफिजचा आनंद गगनात मावेना. शाखेनबातने त्याचे मोठे प्रेमपूर्वक स्वागत केले. ती त्याला म्हणाली, " धन्य माझे भाग्य, मी एका प्रतिभावान माणसाची प्रेयसी आहे ! माझ्या नजरेत वैभवशाली राजपुत्राचे प्रेम तुच्छ वाटते."

हाफिजने तो सगळा दिवस शाखेनबातच्या सहवासात मोठ्या आनंदाने घालविला. पुढे प्रणयीजनांना आनंद देणारी रात्र आली. शाखेनबातने हाफिजला हळूच सुचविले की आजची रात्र आपण माझ्या घरीच घालवावी. हाफिजला याहून अधिक असे काय हवे होते ? तो या गोष्टीला आनंदाने कबूल झाला असता; पण त्याला आपल्या कठोर व्रताची आठवण झाली. त्याने मोठ्या संयमाने आपल्या प्रेयसीच्या आग्रहाला नकार दिला,– आणि तो पीरेसब्जकडे निघून गेला.

हाफिजने चाळिसावी रात्र जागरणात आणि आराधनेत घालविली. पहाट झाली. त्याचे खडतर व्रत पूर्ण झाले होते. ऐन प्रातःकाळी त्याला देवदूत खिज्र याचे दर्शन घडले. खिज्रने त्याला अमृताचे प्राशन करविले, आणि तुझी वाणी अमर होईल असा त्याला आशीर्वाद देऊन तो अदृश्य झाला. हाफिजचे काव्य अजरामर झाले आहे. पण त्याची प्रेयसी मात्र यानंतर त्याच्या आयुष्यातून निघून गेलेली दिसते. त्याच्या पुढील आयुष्यात तिचा उल्लेख आढळत नाही.

इतर संसारी माणसांप्रमाणे हाफिजचेही लग्न झाले. तो एक कुटुंबवत्सल मनुष्य होता. त्याचा संसार सुखासमाधानाचा झाला असावा. मधून मधून पतिपत्नीत कुरबुरी होत. अशाच एका प्रसंगी त्याची पत्नी घर सोडून निघून गेली; तेव्हा त्याने एक गोड कविता लिहून तिची समजूत घातली. त्या कवितेच्या शेवटच्या दोन ओळी अशा–

आपल्या स्वामीला सोडून पळून जाणारा दास मी नव्हे. कृपा कर आणि परत ये. तुझ्या कोपामुळे माझी अगदी दुर्दशा झाली आहे.

हाफिज न गुलामस्त के अज ख्वाजा गुरेजद
लुत्फे कुन व बाज आ के खराबम ज दूतावत

हाफिजची पत्नी त्याच्या हयातीतच मरण पावली. तिच्यावर त्याने हृदयस्पर्शी असे शोकगीत रचले आहे. हाफिजच्या एका मुलाचाही अल्पवयात मृत्यू झाला असावा. मृत्यूचे वर्ष ( हिजरी ७७८ इ. स. १३७५ ). हाफिजने मुलाच्या मृत्यूवर रचलेल्या शोकगीतात आढळते. या शोकगीतात तो आपल्या मुलाबद्दल म्हणतो–

बा हृदया, माझा मुलगा म्हणजे स्वर्गाचे फळ होते. ते तू का दवडलेस ? ते

साठवून का ठेवले नाहीस ?

आ मेबायें बिहिश्ती के आमद बदस्त अयें जां
दरदिल चरा न किस्ती अज कफ चरा बहश्ती

**धामधुमीचा काळ**

इसवी सनाचे चौवदावे शतक हे ईराणच्या दृष्टीने अतिशय धामधुमीचे गेले. बगदादेतील खलीफांची राजवट मंगोल लोकांनी नष्ट करून टाकली होती. अनेक मंगोल सरदार, त्यांना इलखान म्हणत, इराणच्या निरनिराळ्या भागांत राज्य करू लागले. बगदाद येथे हुसेन बुजुर्गचे घराणे राज्य करीत होते. या घराण्यात सुल्तान ओवेस, त्याचा मोठा मुलगा सुल्तान हुसेन आणि धाकटा मुलगा सुल्तान अहमद हे राजे होऊन गेले. सुल्तान अहमद याने आपला भाऊ सुल्तान हुसेन याला गादीवरून काढून स्वत: गादी बळकावली. त्याची कारकीर्द इ. स. १३८२ पासून १३८८ पर्यंत होती. हाफिजने सुल्तान ओवेस आणि सुल्तान अहमद यांच्या स्तुतिपर कविता रचल्या आहेत. या घराण्याच्या ताब्यात शीराज हा प्रांत होता. शीराजचा सुभेदार अबू इसहाक याने इ. स. १३३६ मध्ये बगदादच्या राजघराण्याची सत्ता झुगारून दिली. त्याने शीराज येथे इ. स. १३५७ पर्यंत राज्य केले.

हाफीजने आपल्या काव्यातून ठिकठिकाणी अबू इसहाकची स्तुती केली आहे. बादशहा हा न्यायी आणि उदार होता. त्याचा वजीर हाजी किवामुद्दीन हा तर हाफिजचा मित्र आणि आश्रयदाता होता. त्याने स्थापन केलेल्या विद्यापीठातच हाफिज हा धर्मशास्त्राचा प्राध्यापक म्हणून काम करीत असे.

**शीराजचे मुजफ्फरी घराणे**

अबू इसहाकने शीराज येथे आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले खरे, पण ते त्याला फार दिवस टिकविता आले नाही. ईराणचा बादशहा सुल्तान अबू सैदखान यांच्या दरबारात मुबरिजुद्दीन नावाचा सरदार होता. बादशहा अबू सैदखान हा इ. स. १३३५ मध्ये वारला. त्याच्या मृत्यूनंतर मुबारिजुद्दीन याने यज्द प्रांताचा ताबा घेतला, आणि तो स्वतंत्र बादशहाप्रमाणे वागू लागला. इ. स. १३५३ मध्ये त्याने अबू इसहाककडून शीराज जिंकून घेतले. इ. स. १३५७ मध्ये अबू इसहाकला अत्यंत क्रूरपणे ठार मारण्यात आले. शीराजवर मुबारिजुद्दीनचे राज्य सुरू झाले. मुबारिजुद्दीनने अलमुजफ्फर (विजेता) ही पदवी धारण केली. त्यामुळे त्याच्या घराण्याला मुजफ्फरी हे नाव मिळाले.

अलमुजफ्फरने स्वतंत्र राज्य चालू केले खरे, पण त्याचा दीर्घकाळ उपभोग घेणे त्याच्या नशिबातच नव्हते. इ. स. १३५९ मध्ये अलमुजफ्फरचा मुलगा शहाशुजा याने आपल्या बापाविरुद्ध बंड करून त्याला कैद केले. अलमुजफ्फरचे डोळे काढण्यात आले. या घटनेवर हाफिजची पुढीलप्रमाणे कविता आहे.

या जगावर आसक्ती ठेवू नका. कारण या जगाकडून निष्ठेचा असा अनुभव कुणालाच आला नाही. या जगाचा अनुभव म्हणजे सुख आणि दुःख यांचे मिश्रण आहे. पण मधमाशा चावल्याशिवाय या मोहोळातील मध आपल्या वाट्याला येत नाही. या बागेतील फळे लोकांनी चाखली; पण काटे बोचल्याशिवाय त्यांना फळे घेता आली नाहीत. येथे कोणीही दिवा लावला की मृत्यूच्या वाऱ्याने तो विझलाच असे समजावे. या जगावर आसक्ती ठेवणारा मनुष्य एक अंतःस्थ शत्रू पोसतो आहे असे समजावे. मुहंमद मुजफ्फर बादशहाच घ्या. आपल्या रक्त ठिबकणाऱ्या तलवारीच्या एका हल्ल्यात तो शत्रूसैन्याची दणादाण उडवून देत असे. त्याच्या एका हुंकाराने शत्रुसैन्याच्या रांगांची पांगापांग होई. त्याने अनेक निरपराध सरदारांना कैद केले. अनेकांचा वध केला. त्याच्या धाकाने सिंहिणी आपल्या पिल्लांना टाकून देऊन पळत सुटत. त्याने शीराज तबरीज आणि ईराक हे देश काबीज केले. शेवटी त्याच्या मृत्यूचा क्षण जवळ आला. मुजफ्फरचा मुलगा शहाशुजा याने आपल्या बापाच्या तेजस्वी नेत्रांत सळई फिरवली.

मुजफ्फरच्या घराण्याने शीराजवर एकंदर सत्त्याहत्तर वर्षे राज्य केले. मुजफ्फरच्या नंतर त्याचा मुलगा शहाशुजा हा इ. स. १३५९ मध्ये गादीवर आला. इ. स. १३६४ मध्ये त्याचा भाऊ शहा मुहंमद याने त्याला हुसकून लावून शीराज आपल्या ताब्यात घेतले. शहा मुहंमद हा इ. स. १३७५ मध्ये वारल्यानंतर शहाशुजा याने पुन्हा शीराजचा ताबा घेतला. शहाशुजा याने इ. स. १३८४ पर्यंत राज्य केले. शहाशुजा आणि कवी हाफिज यांचे आपसातील संबंध विशेष घनिष्ठ नसावेत. आपल्या एक-दोन कवितांतून हाफिजने शहाशुजाची टिंगल उडविली आहे.

**नमाज पढणारे मांजर**

किरमान शहरात ख्वाजा इमाद नावाचा एक साधू राहात असे. त्याने एक मांजर पाळले होते. असे म्हणतात की, ख्वाजा इमाद किरमानी हा नमाज पढण्यासाठी उभा राहिला की ते मांजरही त्याच्यामागे उभे राहात असे. शहाशुजाला वाटे की, हा ख्वाजा इमान किरमानीच्या साधुत्वाचा परिणाम होय. यामुळे तो किरमानीचा भक्त बनला. यावर हाफिजने एक कविता रचली. तीतील काही ओळी पुढीलप्रमाणे होत्या.

हा पहा लबाड सूफी, त्याने आपले जादूचे जाळे पसरले आहे. पण काळ या जादुगाराची विटंबनाच करीत आहे. अरे, हा मोहक जादुगार आपल्या मधुर संगीताने लोकांना सन्मार्गापासून दूर नेत आहे. अरे डौलाने चालणाऱ्या हंसा, कुठे चालला आहेस ? अरे मांजर नमाज पढत आहे म्हणून गर्व करू नकोस.

या कवितेमुळे शहाशुजा हा हाफिजवर चिडला. हाफिजला पेचात पकडावे

असा त्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यात शहाशुजाला अप्रिय वाटणारी आणखी एक गोष्ट घडली. शहाशुजा हा कविता करी. याला आपल्या कवित्वगुणावर गर्व होता. तोपर्यंत हाफिजच्या काव्याची कीर्ती जगभर पसरली होती. एकदा शहा-शुजाने हाफिजला म्हटले,

"कविराज, तुमची गजल एकाच विषयावर सलगपणे रचली आहे असे दिसत नाही. दोन चार ओळी मदिरेवर तर दोन चार ओळी प्रेयसीवर, आणि काही ओळी अध्यात्मावर; अशा तुमच्या गजला आहेत. हे काव्यशास्त्रज्ञांनी घालून दिलेल्या नियमांविरुद्ध आहे." यावर हाफिजने म्हटले, "आपण म्हणता ते खरे आहे. पण असे असूनही माझ्या कविता जगभर पसरल्या आहेत. पण माझ्या प्रति-स्पर्ध्यांच्या कविता मात्र शीराजच्या वेशीच्या बाहेर पडल्या नाहीत." शहाशुजाला गप्प बसावे लागले.

## हाफिजची एक कविता

याच सुमारास हाफिजने एक कविता रचली होती. आपल्या काव्यामधून हाफिज हा कर्मठ आणि रुक्ष धर्मनिष्ठांची टिंगल उडवितो. मदिरा, मदिराक्षी इत्यादी संकेत सढळ हाताने वापरतो. त्याच्या पुढील कवितेतील काही ओळी पाहा.

या सर्व मैफिलीत माझ्यासारखा छांदिष्ट कोणी नसेल. माझी भगवी वस्त्रे मी दारूपायी गहाण ठेवली आहेत. माझे हृदयही इतरत्र गुंतले आहे. अरे, कोणी मदिरापात्र आणा, माझ्या प्रियेचा चेहरा मला दिसत नाही. माझ्या नेत्रांतून अश्रूंची धार लागली आहे. मी शपथ घेतली आहे की मदिरा प्यायची तर मदिरा-क्षीच्या संगतीतच. मला फक्त प्रियेच्या आणि मदिरापात्राच्याच गोष्टी सांगा. मला इतर कोणत्याच गोष्टीत रस वाटत नाही.

शेवटच्या दोन ओळींत हाफिजने म्हटले होते, हाफिज हाच धर्म मानीत असेल तर परलोकगतीची गोष्टच कशाला ?

मुसलमान लोक परलोकगतीवर श्रद्धा ठेवतात. ज्याला अशी श्रद्धा नाही त्याला काफर समजतात. हाफिजची वरील गजल वाचून शहाशुजाने तक्रार केली की, हाफिजचा परलोकगती ( फ्यूचर स्टेट ) वर विश्वास नाही. त्याला काफर म्हणून जाहीर करण्यात यावे. हाफिजलाही ही गोष्ट कळली. त्याने त्या बाबतीत आपला मित्र आणि सुप्रसिद्ध धर्मशास्त्रज्ञ मौलाना जैनुद्दीन अबू बकर याचा सल्ला घेतला. त्याने हाफिजला सांगितले की, शेवटच्या दोन ओळींच्या पूर्वी तुम्ही एक ओळ घाला म्हणजे अर्थ बदलून जाईल. हाफिजने त्याप्रमाणे केले.

शहाशुजाच्या आज्ञेने हाफिजची गजल धर्मशास्त्रज्ञांपुढे ठेवण्यात आली. शेवटच्या दोन आक्षेपार्ह ओळींच्या पूर्वी हाफिजने लिहिलेल्या दोन ओळी होत्या—

ईं हेदीसम चे खुश आमद के सहरगह मी गुफ्त
बरदरे मैकदा बादफ व नै तरसाई

एके सकाळी एक ख्रिस्ती मनुष्य डफ आणि बासरीवर हे गाणे म्हणत असताना असे म्हणाला,

गर मुसलमानी अजईं अस्त के हाफिज दरराह

आह अगर अज पये इमरोज बुवद फर्दाई– हाफिज वागतो तोच मुसलमानी धर्म असेल तर आजच्यानंतर भवितव्य काय होईल हे काय सांगावे!

आता बाजू शहाशुजावर उलटली. धर्मशास्त्रज्ञ म्हणाले, 'अहो, हे शब्द हाफिजचे नाहीत. हे एका ख्रिस्ती माणसाचे आहेत असे हाफिज म्हणतो. आणि या आधारावर तुम्ही हाफिजला काफर ठरवू पाहता. हा शुद्ध अन्याय आहे. अशा रीतीने हाफिजची या आरोपातून सुटका झाली.

हाफिजच्या काव्याची कीर्ती आता चहूकडे झाली होती. महाराष्ट्रात त्या वेळी बहामनी राजघराणे राज्य करीत होते. सुल्तान मुहंमदशहा बहमनी याने हाफिजला आपल्या दरबारी येण्याचे आमंत्रण दिले. यासाठी मुहंमदशहाचा वजीर मोर फजलुल्ला अंजू याने प्रवासखर्चासाठी म्हणून हाफिजकडे बरीच रक्कम पाठविली. हाफिज हिंदुस्थानात येण्यासाठी निघाला. पण हुर्मुजच्या बंदरावर पोहोचल्यावर समुद्रावर मोठे वादळ आल्याचे त्याला दिसले. जलप्रवासाला तो घाबरला. जहाजावरून तो लगबगीने खाली उतरला. आणि आपण हिंदुस्थानात येण्यास असमर्थ आहोत असे त्याने मुहंमदशहाला कळविले. या प्रसंगी त्याने रचलेल्या कवितेची एक ओळ अशी आहे–

बरौ, गंजे कनाअत जू बकुंजे आफियत बनिशीं

के यकदम तंगदिलबूदन बबहर व बर नमी अर्जद – स्वस्थतेचा खजिना शोधा. शांतता आणि स्वस्थपणा यांचा प्रयत्न करा. समुद्र काय आणि जमीन काय, यावर कोठेही अस्वस्थ व्हावे अशी वेळ येऊ देऊ नये; या दगदगीत अर्थ नाही.'

सुलतान मुहंमदशहाला ही बातमी कळली. इतका प्रतिभावान कवी आपल्या दरबारात येण्याचा प्रयत्न करीत होता. हाच आपला मान आहे असे समजून त्याने हाफिजकडे सोन्याच्या एक हजार मोहरा पाठविल्या.

शहाशुजाचा मृत्यू झाल्यावर त्याचा मुलगा शाहजैनुल आबिदीन हा शीराजच्या गादीवर आला (इ. स. १३८४). त्याचे आणि हाफिजचे संबंध चांगले होते. पण इ. स. १३८८ मध्ये शहा मन्सूरने त्याला – जैनुल आबिदीनला कैद करून त्याचे डोळे काढले.

**तैमूरलंगाची स्वारी**

याच सुमारास तैरमूलंगाने ईराणवर स्वारी केली. इ. स. १३८७–८८ मध्ये त्याने इस्पाहान शहर घेऊन तेथील सत्तर हजार माणसांची हत्या केली. जैनुलाबिदीन हा शुस्तर या गावी पळून गेला होता. तैमूरने शीराज शहरात प्रवेश केला. या वेळी त्याचा आणि कविश्रेष्ठ हाफिज याचा संबंध आला. त्यासंबंधी हाफिजच्या हजर-जबाबीपणाची एक मोठी मजेदार आख्यायिका आहे. शीराज येथे असताना तैमूरच्या नजरेखालून हाफिजने लिहिलेल्या पुढील दोन ओळी गेल्या–

ती शीराज सुंदरी माझे हृदय आपल्या ताब्यात घेईल तर तिच्या गालावरील तिळासाठी समरकंद आणि बुखारा ही नगरे मी तिच्यावरून ओवाळून टाकण्यास तयार आहे.

अगर अं तुर्के शीराजी बरदस्त आरद् दिले मारा
बखाले हिंदु अश बख्शम समरकंद बुखारारा

समरकंद ही तर तैमूरची राजधानी, आणि बुखारा हे त्याच्या साम्राज्यातील महत्त्वाचे शहर. तो रागाने लाल झाला. त्याने हाफिजला दरबारात बोलावणे पाठविले. हाफिज घाबरून गेला. तो अंगात फाटके कपडे घालून दरबारात गेला. त्याला पाहताच तैमूरने त्याला रागाने विचारले, 'आपल्या प्रेयसीच्या गालावरील तिळासाठी माझी समरकंद आणि बुखारा ही शहरे देण्यास निघालेला उद्धट कवी तूच काय ?'

हाफिजने ओळखले की, आपला मृत्यू आता जवळ आला आहे. पण तशा स्थितीही त्याला विनोद आठवला. तो म्हणाला, 'होय महाराज; या माझ्या औदार्यामुळेच माझी स्थिती किती केविलवाणी झाली आहे हे आपण पाहात आहात.' तैमूरला हाफिजचा हजर-जबाबीपणा इतका आवडला की त्याने हाफिजला चांगले बक्षीस देऊन त्याचा गौरव केला.

या घटनेनंतर लवकरच म्हणजे इ. स. १३८८ मध्ये हाफिजचा मृत्यू झाला.

हाफिजची काव्यसंपदा विपुल आहे. त्याच्या गजलांची संख्या साडेपाचशेच्या वर आहे. याशिवाय शोकगीते, तीन मनस्वी, एकशे-तीन रुबाया आणि इतर अनेक फुटकळ कविता त्याने रचल्या. पण त्याची प्रतिभा प्रकर्षाने दिसून येते ती त्याच्या गजलांतून होय. आज हाफिजला मरून पावणेसहाशे वर्षे झाली. पण त्याच्या तोडीचा गजलकार अद्याप निर्माण झाला नाही, असे म्हणण्यास हरकत नाही.

· २१ ·

## दिल्लीच्या फूलवालोंकी सैरची कथा

मोगलांच्या काळात खुद्द मोगल दरबारात अनक सण-समारंभ साजरे केले जात. अशा समरंभांचा धर्माशी काही संबंध नसे. नौरोज हा वसंतागमनाचा सण. हा प्राचीन इराणात साजरा होत असे. तो मोगलांनी उचलला. कित्येक दिवसपर्यंत हा समारंभ चालू असे. झरोक्यात बसून प्रजेला दर्शन देण्याचा मोगल बादशहांचा शिरस्ता असे. याचाही इस्लाम धर्माशी काही संबंध नसे. आपल्या वाढदिवसप्रसंगी बादशहा तुलादानाचा समारंभ करवीत. अशा अनेक बिगर इस्लामी रीतिरिवाजांची नोंद आपल्याला मोगल दरबाराच्या माहितीत आढळते. काही रिवाज तर काही विशिष्ट घटनांच्यामुळे दरबारात चालू झाले. रक्षाबंधन अगर राखी बांधणे हा प्रकार त्यांतीलच होय. हा प्रकार सुरू होण्याचे कारणही तितकेच उद्‌बोधक आहे.

### दुसरा आलमगीर बादशहा

त्या वेळी दिल्लीच्या गादीवर दुसरा आलमगीर (१७५३–१७५९) हा बादशहा राज्य करीत होता. त्याचे आणि त्याचा वजीर गाजिउद्दीन इमादुल्मुल्क यांचे परस्परांत फार वैर होते. कुणीकडून तरी आलमगीर बादशहाचा काटा निघावा याची गाजिउद्दीन हा सारखी धडपड करीत होता. एका प्रसंगाने ती संधी त्याला आयतीच चालून आली. सूफी, फकीर इत्यादींच्याबद्दल आलमगीरला अतिशय आदर वाटत असे. दिल्लीत कोणी एखादा औलिया आला आहे असे समजण्याचा अवकाश, बादशहाने त्याला बोलावलेच. त्याच्याशी धर्मचर्चा करूनत याला काही भेट दिल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. बादशहाच्या या स्वभावाचा गाजिउद्दीनने फायदा घेतला. एके दिवशी गाजिउद्दीनने बादशहाला सांगितले की, दिल्लीत एक औलिया आले असून त्यांचा मुक्काम पुराण्या कोटल्यात आहे. त्यांचा आध्यात्मिक दर्जा फार मोठा आहे. ते अनेक चमत्कार करून दाखवू शकतात. पण ते कुणाकडे जात नाहीत आणि कुणाला आपल्याकडे येऊ देत नाहीत. हे ऐकून बादशहाची उत्सुकता इतकी वाढली की, एक दिवस तो एकटाच औलियांना भेटण्यासाठी पुराण्या कोटल्यात गेला. गाजिउद्दीन याच संधीची वाट पाहात होता. बादशहा कोटल्यात जाऊन पाहतो तो तेथे चिटपाखरूही नाही. त्याला आश्चर्य वाटले. तो तसाच आतील इमारतीत गेला. गाजिउद्दीनचे मारेकरी तेथे त्याची वाट पाहात

बसले होते. त्यांनी बादशहावर एकाएकी हल्ला केला. त्याला ठार मारण्यात येऊन त्याचे प्रेत पुराण्या कोटल्याच्याखाली यमुनेच्या वाळवंटात फेकून देण्यात आले. मारेकरी तेथून पसार झाले. ती वेळ संध्याकाळची होती. योगायोग पाहा. त्याच वेळी यमुनेच्या वाळवंटातून रामकुंवर नावाची ब्राह्मण बाई चालली होती. तिच्या दृष्टीला बादशहाचे प्रेत पडले. बाई घाबरली. तिने प्रथम पळून जाण्याचा विचार केला. नंतर तिला वाटले की, न जाणो, कुत्र्या–लांडग्यांकडून प्रेताची विटंबना व्हावयाची. हा विचार करून रामकुंवर प्रेताजवळ गेली. बादशहाचे डोके तिने आपल्या मांडीवर घेतले. रात्रभर ती प्रेताचे रक्षण करीत बसली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी बादशहाचे प्रेत समारंभपूर्वक नेण्यात येऊन दफन करण्यात आले.

याच आलमगीरचा मुलगा शहा आलम हा पुढे इ. स. १७७१ मध्ये दिल्लीला आला. बापाच्या मृत्यूच्या वेळी तो बिहारमध्ये होता. दिल्लीला आल्यावर रामकुंवरची हकीकत त्याच्या कानावर गेली. त्याने रामकुंवरला मोठ्या प्रेमाने बोलाविले. ती आल्यावर त्याने तिचे मोठे आदरातिथ्य केले. तो म्हणाला, मी तुला माझी बहीण मानतो. पुढे काही दिवसांनी राखीबंधनाच्या वेळी रामकुंवर शहाआलमच्या दरबारात गेली. तिने आपल्याबरोबर मोती गुंफलेली राखी नेली होती. शहा आलमने मोठ्या आनंदाने बहिणीकडून राखी बांधून घेतली. तिला आणि तिच्या नातेवाइकांना त्याने उंची अहेर केला. याशिवाय इतर राजपुत्रांनीही राखी बांधून घेतल्या. त्या दिवसापासून अठराशे सत्तावनपर्यंत लाल किल्ल्यात राखीबंधनाचा उत्सव दरवर्षी साजरा होऊ लागला.

**फूलवाल्यांच्या मेळाव्याची सुरुवात**

उर्दू कविश्रेष्ठ गालिब याने म्हटले आहे की, दिल्लीची शान चार गोष्टींमुळे होती. लाल किल्ला, चांदणी चौक, जुम्मामशीद आणि फुलवाल्यांचा मेळावा (फूलवालों की सर). फूलवाल्यांची सैर म्हणजे दिल्लीतील एक मोठा उत्साहप्रसंग असे. भाद्रपद महिन्यात दिल्लीहून हजारो लोक कुतुबमिनारजवळ असलेल्या कुतुबुद्दीन बख्त्यार काफी या साधूच्या दर्ग्यावर जमत. दिल्लीतील सगळे फुलमाळी एकत्र येऊन फुलांचे हार, पडदे, पंखे आणि चादरी तयार करीत. हे सर्व समारंभपूर्वक दर्ग्यातील समाधीवर चढविण्यात येत. कुतुबमिनारजवळ हिंदूंचे एक योगमाया मंदिर आहे. हिंदूही याच वेळी या उत्सवात भाग घेऊन हजारोंच्या संख्येने योगमायेच्या मंदिरात जात आणि देवीला फुलांचा पंखा अर्पण करीत. अशा रीतीने हा मेळावा म्हणजे हिंदुमुसलमानांचा एक संमिश्र समारंभ असे. हा समारंभ तीनचार दिवस चालत असे. या समारंभात दिल्लीचे बादशहा बहादुरशहा, त्याच्या बेगमा, राजपुत्र आणि राजकन्या मोठ्या आनंदाने भाग घेत.

फूलवालोंकी सैर या उत्सवाला सुरुवात झाली ती पुढील कारणामुळे. त्या

वेळी शहाआलम बादशहाचा (१७५९–१८०६) मुलगा दुसरा अकबर शहा (१८०६–१८३८) हा दिल्लीच्या गादीवर होता. त्याचा मोठा मुलगा सिराजुद्दीन जफर (हाच पुढे बहादुरशहा या नावाने १८३८ पासून १८५८ पर्यंत गादीवर होता.) हा वास्तविक पाहता गादीचा वारस. पण जफरचा सावत्र भाऊ मिर्जा जहांगीर याला युवराजपद मिळावे अशी अकबर शहा बादशहा आणि जहांगीरची आई नबाब मुमताज महरू यांची इच्छा होती. इंग्रजांनी या गोष्टीला संमती द्यावी अशी त्यांनी खटपट केली. पण इंग्रज रेसिडेंट सेटन या गोष्टीला कबूल झाला नाही. त्याचे म्हणणे असे की मोठा मुलगा सिराजुद्दीन जफर हा असताना युवराजपद धाकट्या मुलाला कसे मिळू शकेल ? याशिवाय दुसरेही कारण होते. मिर्जा जहांगीर हा पट्टीचा पिणारा आणि तोंडाचा फटकळ असा मनुष्य होता. एक दिवस त्याने भर दरबारात सेटनचा 'लुलू हैं वे,–हलका दास' असे म्हणून अपमान केला. एकदा तर त्याने सेटनवर गोळी झाडली. याचा परिणाम असा झाला की, इंग्रजांनी मिर्जा जहांगीरला अलाहाबादेस नजरकैदेत ठेवले. मिर्जा जहांगीरच्या आईने नवस केला की माझा मुलगा सुटून दिल्लीला परत आला तर ख्वाजा कुतुबुद्दीन बख्त्यार काफी यांच्या दर्ग्यावर जाऊन त्यांच्या कबरीवर उंची वस्त्रे (चादर) आणि फुलांचे चार पडदे (मसहरी) चढवीन. तिचा नवस फळाला आला. मिर्जा जहांगीर अलाहाबादेहून सुटून आला. मुमताजमहलने मोठ्या समारंभाने आपला नवस पूर्ण केला. कुतुबमिनारजवळील कुतुबुद्दीनच्या समाधीपाशी मोठी यात्रा जमली. फुलांच्या पड्याबरोबरच फुलांचा एक मोठा पंखा तयार करण्यात आला. तोही समाधीला अर्पण करण्यात आला. दिल्लीच्या फुलमाळ्यांनी हौसेने तयार केलेला पंखा अतिशय आकर्षक होता. या पंख्यावर युवराज सिराजुद्दीन जफर (भावी बहादुरशहा) याने कविता केली. त्यातील काही ओळी अशा आहेत–

रंग का जोश है माहीसे जबस माहतलक
डुबे हैं रंगमें मदहोशसे आगाह तलक
आज रंगीन है रय्यत से लगा शाहतलक
जाफरान जार है इक बामसे दरगाह तलक
देखने आई है इस रंग से खल्कत पंखा

पाताळापासून आकाशापर्यंत सगळे रंगून गेले आहेत, त्यांत शुद्ध, कुंद आणि बेहोष सगळेच रंगले आहेत. प्रजेपासून बादशहापर्यंत सगळे रंगात बुडाले आहेत. घरादारापासून राजवाड्यापर्यंत जितडेतिकडे केशरी रंगाप्रमाणे रंग उधळत आहे. रंगामध्ये अशा प्रकारे धुंद झालेली हजारो माणसे पंखा पाहण्यास जमली आहेत.

अकबरशहा बादशहाला हा समारंभ आवडला. तो म्हणाला, दरवर्षी भाद्रपद

महिन्यात हा फुलवाल्यांचा मेळा करावा. मुसलमानांनी कुतुबुद्दीनच्या दर्ग्यावर पंखा अर्पण करावा आणि हिंदूंनी योगमायेच्या मूर्तीला. म्हणजे या समारंभात हिंदु-मुसलमान दोघेही भाग घेऊ शकतील. दिल्लीचे नागरिक या गोष्टीला कबूल झाले आणि त्या वेळेपासून दरवर्षी हा मेळा भरू लागला.

उर्दूचे सुप्रसिद्ध साहित्यिक मिर्जा फहरतुल्ला बेग यांनी इ. स. १८४८ मध्ये भरलेल्या या फूलवालोंकी सैर म्हणजे मेळाव्याचे मोठे उत्कृष्ट वर्णन केले आहे. ते म्हणतात–

१८४८ चे साल. श्रावणाचा मुसळधार पाऊस संपला होता. भाद्रपद महिना सुरू झाला. पावसाचा जोर कमी झाला. दिल्लीचे प्रमुख नागरिक लाल किल्ल्यात गेले. बहादुरशहाच्या हुजुरात उपस्थित होऊन ते म्हणाले, 'पीरो मुर्शद, फूलवालोंकी सैर का जमाना आगया है. झरना (झरा) आणि शम्सी तलाव (कुतुबमिनारजवळचा तलाव) हे काठोकाठ भरले आहेत. मेळ्याची तारीख ठरवावी. आपणही आलात तर आमचे भाग्य उदयाला आले असे आम्ही समजू– अगर जहांपन्हाभी तश्रिफ लाये तो जहे नसीब. यावर बादशहा म्हणाले, 'अमां ठीक तो है. जो तुम्हारी खुशी वो हमारी खुशी. पंदरा तारीख मुक्रर करदो. रहा हमारा आना. तो जहां तुम वहां हम. क्यौं न आयेंगे.'

तारीख ठरताच दरबारात शहाजणे वाजू लागली आणि दिल्लीचे नागरिक मेळ्याच्या तयारीला लागले.

इकडे बादशहा दरबार बरखास्त करून जनानखान्यात गेले. त्यांनी बेगमा, शहाजादे आणि शहाजाद्या यांना सांगितले की, पंधरा तारीख नेमली असली तरी आपण तीन चार दिवस आधीच म्हणजे उद्याच निघू. म्हणजे दिल्लीच्या नागरिकांना आपल्यामुळे त्रास होणार नाही.

बादशहाची आज्ञा होताच राजवाड्यात सामानाची हालवाहालव सुरू झाली. छकडे (बैलगाड्या), उंट, शिक्रम (उंटाच्या गाड्या) इत्यादी वाहनांवर सामान भरण्यात आले. लगेच गाड्यांची रवानगी कुतुबमिनारकडे करण्यात आली. लाल किल्ल्यातील बेगमांची धावपळ काही विचारू नका. कोणी बांगडेवालीकडून बांगड्या भरवून घेत आहेत, कोणी रंगाऱ्याकडून दुपट्टे रंगवून घेत आहेत. कुठे मेंदी तयार करवून घेण्यात येत आहे. या गडबडीत मध्यान्ह रात्र झाली. रात्रौ दोन वाजता स्वारीचा बिगुल वाजला. खाशा बेगमांच्यासाठी तयार केलेली वाहने नौबतखाना आणि लाहोरी दरवाजा यांमधील मैदानात जमू लागली. दासींची गडबड तर विलक्षण होती. अभाये ( दाया ), मुघलाणी ( स्त्री-नोकर ) खवासच्या बायका, छोकऱ्या, लौंडिया ( पगारदार बटकी ), खरीत्यां ( विकत घेतलेल्या बटकी ) या बैलगाड्यांतून बसून निघाल्या. बरोबर मशालजी मशाली आणि तेलाच्या कुप्या घेऊन निघाले.

**बेगमांची वाहने**

बेगमांची वाहने पुढीलप्रमाणे होतीः नीमे ( अर्धी पालखी ), ग्याने (मेणे), पालखी, चौपहले, चंडोल, आणि सुखपाल. बेगमा बाहेर येऊ लागल्या तेव्हा पडद्याचा कडक बंदोस्त करण्यात आला. पल्टणीच्या शिपायांनी रस्ते बंद केले. तुर्कीण आणि गुर्जीण ( वेत्रधारी ) या स्त्री–शिपायांनी आडपडदा म्हणून कनाती उभ्या केल्या. एकेक करून बेगमा बाहेर आल्या की त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांना वाहन मिळे. प्रत्येक वाहनाबरोबर एक कल्माकनी आणि एक अर्दाबेगनी ( स्त्री-सैनिक ) असे.

रात्री तीन वाजता या स्वाऱ्या निघू लागल्या. सर्वांत शेवटी बहादुरशहाची पट्टराणी नवाब जीनतमहल. तिचे वाहन सुखपाल हे होते. लाहोरी दरवाजाचा इंग्रज अधिकारी कॅप्टन डग्लस याने तेथे सुखपाल पोहोचताच जीनत महलला मानवंदना दिली. स्वारी पुढे निघाली तसे पल्टणीची एक तुकडी पुढे आणि एक मागे अशी व्यवस्था झाली. राजकन्यांच्या भोवती कल्माकन्या चालत होत्या. या स्त्रिया मर्दानी पोशाख करीत, डोक्याला वळणे असलेल्या पगथळ्या, असा त्यांचा थाट असे. बेगमांच्या स्वाऱ्यांच्या भोवती तुर्किणी होत्या. त्यांचाही पोशाख मर्दानी असे. गौरवर्ण, डोक्यावरचे केस मानेवर रुळत असलेले, डोक्यावर लहानसे फेटे आणि त्यावर पांढऱ्या पिसांचा तुरा. हातांत लहान बर्च्या, खांद्यावर धनुष्य आणि पाठीला भाता, कमरेला तलवार आणि पोटापाशी खंजीर खोचून ठेवलेला. त्यांना पाहून वाटे की, तुर्कांची फौज तर दिल्लीत घुसली नाही ना !

नवाब जीनतमहलच्या स्वारीचा थाट काय वर्णावा ! तिच्या स्वारीच्या पुढे दोन शिद्दिणी घोड्यावर स्वार होऊन चालत होत्या. त्यांचे कुरळे केस, त्यावरच्या लाल रंगाच्या पगड्या, पगड्यांना पांढरे गोंडे असत. जाड ओठ, लाल डोळे, तांबडे आणि ढगळ असे कोट, हातात बारीक छड्या, घोड्यावर नगारे ( डंके ) असत. एक शिद्दीण डंक्यावर टोला मारी, लगेच दुसरी शिद्दीण म्हणे " अदबसे, निगाह रुबरु हजारत बादशहा बेगम सलामत."

जीनतमहल कधीही बाहेर निघाली की डंके, नौबती वाजविणाऱ्यांना बरोबर ठेवीत असे. यामुळे दिल्लीत तिला डंकेवाली बेगम म्हणत असत.

जीनतमहलच्या सुखपाल ( वाहन ) बरोबर दोन गुर्जिण्या ( वेत्रधारिणी ) चालत. एकीच्या हातात मोर्चेल तर दुसरीच्या हातात चौरी असे. पावलागणिक त्या बिसमिल्ला, बिसमिल्ला म्हणत. सुखपालच्या मागे अर्दाबेगिण्या असत. या हत्यारबंद पोशाख असत. यांची मर्दानी असे. त्यांच्या मागे मशालजी असत. ही मिरवणूक दिल्ली दरवाजापर्यंत जाऊन थांबली.

**बहादुरशहा**

आता बहादुरशहाची निघण्याची वेळ झाली. बादशहा पहाटे चार वाजता

उठला. प्रार्तविधी आटोपल्यावर त्याने गुळाचे शरबत घेतले आणि घशात बोट घालून ते काढून टाकले. यानंतर त्याने याकुती शरबत प्राशन केले. यानंतर त्याने विचारले, " अमां, सबसिधार, ( सगळे गेले काय ? ) खिदमतगारांनी सांगितले, ' जहांपन्हा के इक्बालसे सब इंतिजाम हो गया. मीरतुजक (दरबारचे व्यवस्थापक) हजर आहेत." यावर बादशहांनी म्हटले, " अच्छा बिसमिल्ला करो ( म्हणजे– परमेश्वराचे नाव घ्या आणि कामाला सुरुवात होऊ द्या." )

**बादशहाचे प्रयाण**

आता दिवाणेखासमध्ये बादशहा आणि शहाजादे यांची वाहने आली. हे पालख्यांचेच विविध प्रकार होते. शहाजादा मिर्जा शहारुख याचे वाहन तख्तेरवां, मिर्जा फरुखचे वाहन बोचा, युवराज दारा याचे वाहन तामझाम, आणि बादशहाचे वाहन हवादार. बाकीचे राजपुत्र घोड्यावर स्वार झाले. बादशहांनी हवादारमध्ये पाय ठेवताच चोपदारांनी ललकारी दिली, " अदबसे, ताजीमसे मुजरा बजालाव, हजरत बादशहा सलामत." शहाजाद्यांनी तलवारी काढून बादशहाला सलामी दिली. इतरांनी वाकून मुजरे केले. बादशहाच्या मागोमाग युवराज मिर्जा शाहरुख आणि फखरू हे आपापल्या वाहनात शिरले. बादशहाच्या हवादारच्या मागे एका खिजमतगाराने अबदागिरी धरली. दुसऱ्याने छत्र धरले.

बादशहा दिल्ली दरवाजापाशी आले. मिरवणुकीच्या अग्रभागी निशाणाचा हत्ती होता. त्यानंतर नगारे ठेवलेले उंट, नंतर सैन्याचे पथक, त्यानंतर नौबती, त्यानंतर मीरतुजक (व्यवस्थापक), मग राजपुत्रांच्या स्वाऱ्या, त्यानंतर दूरबाश (चाकू बांधलेला ससाणा, बादशहापासून लोकांना दूर ठेवण्यासाठी) आणि मग बादशहाचे हवादार.

दिल्ली दरवाजाच्या बाहेर निघाल्यावर बादशहाच्या आज्ञेने दानधर्म करण्यात आला. किल्ल्यापासून शहराच्या प्रमुख दरवाजापर्यंत बादशहाला पाहण्यासाठी लोकांची दुतर्फी गर्दी झाली होती. लोकांनी बादशहाला डोळे भरून पाहून घेतले. याच दिल्ली शहरावर अवघ्या नऊ वर्षांनी १८५७ मध्ये केवढे संकट कोसळणार होते याची लोकांना काय कल्पना !

शहराबाहेर पडल्यावर बादशहा प्रथम हुमायू बादशहाच्या मकबऱ्यावर गेले. तेथे तैमूर वंशाचे अनेक राजे आणि राजपुत्र चिरविश्रांती घेत पडले आहेत. तेथे थोडा वेळ विश्रांती घेऊन बादशहा निजामुद्दीन औलियाच्या दर्ग्याला आले. तेथे समाधीचे दर्शन घेऊन ते निघाले तो संध्याकाळच्या सुमारास कुतुब्मिनारला पोहोचले. तेथे दोन राजवाडे होते. एकाला जंगली महल म्हणत आणि दुसऱ्याला मिर्जा बाबरचा वाडा म्हणत. बादशहा आणि त्याचा परिवार यांचा मुक्काम या दोन वाड्यांत झाला.

**जंगली महल**

पूर्वी जंगली महलच्या आवारात सात-आठ मोठे मोठे वाडे होते. त्यांना दिवाणे खास, दिवाणे आम, खास महरू अशी नावे होती. वाड्याच्या प्रवेशद्वाराला बाबे जफर म्हणत. आता फक्त प्रवेशद्वार शिल्लक आहे. आतील वाडे जमीनदोस्त झाले आहेत. पण शिल्लक राहिलेल्या प्रवेशद्वारावरून, बाबे जफरवरून, आतील भव्य वाड्यांची कल्पना यावी. हा दरवाजा पन्नास फूट उंच आहे. तो लाल दगडांचा आहे. दरवाजावर संगमरवरी दगडांची एक पट्टी बसविण्यात आली असून तीवर दरवाजाच्या बांधणीचे वर्ष नोंदले आहे. दरवाजाच्यावर जाण्यास आतील बाजूस वर्तुळाकार जिने आहेत. दरवाजावर बादशाही सभागृह आहे. त्या बारादरीत बसून बादशहा आणि बेगमा पंख्याची मिरवणूक पाहात असत.

**झरना (झरे)**

दुसऱ्या दिवशी सकाळी आकाश अभ्राच्छादित होते. मधून मधून पावसाच्या अगदी बारीक आणि झिमझिम अशा सरी येत. भाद्रपदाचाच महिना! तो काय आषाढ श्रावणाच्या मुसळधार वर्षावाचा महिना थोडाच होता? सर्वांनी बादशहांना विनंती केली की, आपण झरण्यावर जाऊ द्या.

झरना हा काय प्रकार आहे? कुतुबमीनारजवळ त्या काळी एक मोठा तलाव होता. त्याला शम्सी तलाव म्हणत. फीरोजशहा तुघलक याने शम्सी तलावाचे पाणी नौलखी कालव्यात सोडले होते. हा कालवा पुढे तुघलकाबादच्या कालव्यांना जोडण्यात आला होता. पण पुढे हा कालवा उपयोगात राहिला नाही. तलावाचे पाणी जंगलात वाहू लागले. इ. स. १७०० मध्ये निजामुल्मुल्काचा मोठा मुलगा गाजीउद्दीन फीरोजजंग याने शम्सी तलावाच्या काठासमोर हौद बांधले, कालवे काढले, आणि कारंजी काढली. तेथे एक सुंदर बाग तयार झाली. काही वाडे बांधण्यात आले. तेथे कालांतराने घनदाट झाडी अस्तित्वात आली. तलावाच्या बांधातून पाणी झिरपून झिरपून येत असे म्हणून या भागाला झरना म्हणू लागले. तलावाच्या काठाला लागूनच एक तीन दरवाजांचे दालान आहे. दालानचे छत आतून पोकळ आहे. पण तेथे तलावाचे पाणी झिरपून गोळा होते. छताला लहान लहान छिद्रे पाडण्यात आली आहेत. त्यांतून पाणी पडू लागले की, दालानात झिमझिम पाऊस पडत असल्याचा भास होतो. दालानाच्या समोरच्या भिंतीत कोनाडे आहेत. त्यांत दिवे लावून ठेवीत. त्यांच्या समोर पावसाचे तुषार सारखे पडू लागले की पाण्याला कोणी आग तर लावली नाही ना किंवा सोने वितळून पावसाच्या सरीचे रूप तर धारण केले नसेल ना असेच कुणालाही वाटले असते. छतावर साठलेले पाणी वरून कोसळून खालील हौदात पडत असे. त्याचा धो धो आवाज होत असे. हौद तुडुम्ब भरल्यावर त्यातील पाणी पुढे कालव्यात जाऊन पडत असे.

कालवा जेथे संपतो तेथे गुळगुळीत दगडाचा एक लहानसा बांध घालण्यात आला आहे. दगडावर रंगीबेरंगी माशांची चित्रे कोरण्यात आली आहेत. त्यावरून पाणी वाहू लागले की मासे इकडून तिकडे फिरत आहेत असा भास निर्माण होई.

झरण्याला लागूनच गर्द आंबराई आहे. इतकी गर्द झाडी इतरत्र पाहूनही सापडायची नाही. या झाडीतून आकाशाचे दर्शन क्वचितच होई. जमिनीवर तर हिरवळीमुळे हिरवा गालिचा पसरून ठेवल्याप्रमाणे वाटे. झरण्यातील पाण्याचा प्रवाह, ते उडत असलेले फवारे आणि ती कारंजी, आमराईतील मोरांचे ओरडणे, कोकिळेचे कूजन, आणि पपीह्याची पुकार, ही जागा म्हणजे नंदनवनाचाच एक भाग आहे म्हणावे लागेल.

हाय ! आज तेथे काय शिल्लक राहिले आहे ? शम्सी तलावाचा एक लहानसा हौद बनला आहे, कालवे वाळून गेले आहेत. हौद मातीने भरून गेले आहेत. आंबराईतील झाडे वाळून गेली आहेत. त्या काळचे काही वाडे शिल्लक राहिले आहेत. तेही काही दिवसांनी पडून जातील, कालाय तस्मै नमः !

बादशहा झरण्यावर आले. तेथे काही राजपुत्र आणि राजकन्या आणि काही दासदासी पाण्यात खेळू लागल्या. बादशहा आणि बेगमा ही आमराईत आली. तेथे झाडाझाडांना झोके बांधले होते. बादशहा तख्तावर विराजमान झाले. त्यांनी आज्ञा केली, चला, सगळ्याजणी झोके घ्या. खाण्याचे पदार्थ तयार होत आहेत. गरम गरम भजी, अनारशे, इत्यादी पदार्थ खात जावे आणि झोके घेत जावे, यासारखी मजा नाही. इकडे दासदासींनी झाडाखाली चुली मांडल्या आणि त्यावर कढया चढविल्या. इकडे बादशहांनी आपल्या दोन बेगमांकडे—नबाब जीनतमहल आणि ताजमहल— यांच्याकडे पाहिले.

**जीनतमहल**

ही बहादुरशहाची आवडती पट्टराणी. हिच्या सौंदर्याचे काय वर्णन करावे ! तिचा वर्ण म्हणजे गुलाबाच्या पाकळीसारखा. तिचा चेहरा उभट होता. मोठे डोळे, सरळ नाक असे तिचे रूप होते. तिच्या भुवया विरळ होत्या, म्हणून ती त्या ठिकाणी सुर्म्याची रेघ ओढीत असे. तिच्या डोक्यावर जरतारी काम केलेला दुपट्टा असे. अंगात लाल चोळी, पातळ कुडता, हिरव्या रंगाचा पायजामा, मोती जडवलेले चढावाचे जोडे, डोळ्यांत गडद काजळ. तिला पाहून ही कोण परीच आपल्या राज्यातून निघून आमराईत आली असे वाटावे. बादशहाच्या आज्ञेने ताजमहल आणि जीनतमहल झोपाळ्यावर बसल्या.

**गायिका**

बादशहांनी म्हटले, टिळमुईखानम आणि दिलदार या दोन गायिकांना बोलवा. त्यांनी झोके द्यावे आणि गाणी म्हणावी. या दोन्ही दरबारातील प्रसिद्ध गायिका

होत्या. तसा त्या वेळचा दरबारातील प्रसिद्ध गवई म्हणजे तानरसखान हा होता. वरील गायिकांच्या नाती ( मुलींच्या मुली दुनीजान आणि कालीजान या विसाव्या शतकाच्या सुरुवातीस दिल्लीत प्रसिद्ध गायिका म्हणून गाजल्या. ) टिळमुईखानम आणि दिलदार या बेगमांना झोके देत पुढील दर्दभरे गाणे म्हणू लागल्या—

झूला किन डारो रे अमरैयां, झूला किन डारो रे अमरैयां
रैन अंधेरी, ताल किनारे, मुरला झिंगा रे, बादलकारे

बूंदिया पडे फनिया फनिया
झूला किन डारो रे अमरैयां ॥ १ ॥

दो सखी झूले, दोही झूलाए, चार मिल गय्या भुलभुलैया
झूला किन डारो रे अमरैयां ॥ २ ॥

तो मधुर आवाज, तो समयानुकूल राग, ती सुंदर वेळ, मोरांचा झंकार, पपीह्याची पीहू पीहू, कोकिळेचे कुहू कुहू. असे वाटे की, झाडांच्या पानापानांतून सूर उमटताहेत–

" झूला किन डारोरे अमरैयां "

शहाजाद्या या दोन बेगमांच्या झोक्याभोवती गोळा झाल्या होत्या. इतक्यात पावसाची एक बारीकशी सर आली. थोडीशी पळापळ झाली. बादशहा म्हणाले, " वाह, ही पळापळ कशी, वाह, अमां, वाह, कुतुबमें मेंहसे भागते हो. भादोंका छींटा है, अभी बरसा अभी निकल गया. हां बी दिल्दार, कोई और चीज हो जायें."

दिल्दारने गाणे सुरू केले.

सुनो सखीसय्यां जोगिया हो गये,
सुनो सखी सय्यां जोगिया हो गये मैं जोगन तेरे साथ,
सुनो सखी सैयां जोगिया हो गये ॥ १ ॥

जोगिया बजाये बीन बांसरी, जोगिया बजाये बीन बांसरी,
जोगिया गाये हैं मल्हार, सुनो सखी सैयां जोगिया हो गये ॥ २ ॥

जोगियाने छाई जंगल झोपडी, जोगियाने छाई जंगल झोपडी,
जोगियाने छाया है बिदेस, सुनो सखी सैयां जोगिया हो गये ॥ ३ ॥

जोगियाने पहने लाल कपडे, जोगियाने पहने लाल कपडे,
जोगनके लंबे लंबे केस, सुनो सखी सैयां जोगिया हो गये ॥ ४ ॥

अशा आनंदात बहादुरशहा आणि त्याचा परिवार याने कुतुबमिनारजवळ तीन दिवस घालविले.

पंधरा तारखेला कुतुबमिनारजवळ पंख्याची यात्रा जमली. सगळी दिल्लीच यात्रेच्या ठिकाणी लोटली होती. मेहसली गावात जो बाजार भरला त्याचा थाट काही विचारू नका. कापडविके, जवाहिरे, हलवाई, तांबोळी, खेळण्यांचे दुकानदार जागजागी ठाण मांडून बसले. भाडयाने हुक्के ओढण्याची सोय ठिकठिकाणी होती. हुक्क्याची आरस तरी पाहा. हुक्क्याचा नेचा तीन फूट उंच, त्यावर ठेवलेल्या चिलिमीत दीडपाव तंबाखू मावली असती. हुक्क्याची नळी दहा पाच हात लांब, नळीवर सुगंधी गवत पसरलेले, आणि त्यावर मोतिया आणि चमेली यांच्या माळा खच्चून घातलेल्या. फुलांच्यामुळे नळी पांढरी शुभ्र दिसते. श्रीमंत लोक हुक्क्याची नळी तोंडात धरून दोन–तीन झुरके घेत तेव्हा हुक्केवाला ओरडून म्हणे,

"हुजुरांनी पांढरी शुभ्र नळी तोंडात धरली. अहो कृत्तिका नक्षत्राला दुग्धगंगा जाऊन मिळाली आहे."

हुक्का जो है हुजुरे मुल्ला के हाथ में
गोया के कहकशां है सुरय्या के हाथ में

संध्याकाळी पंख्याची मिरवणूक निघाली. रोशनाईमुळे रात्रीच्याऐवजी दिवस असल्याचा भास होऊ लागला. प्रथम ढोल–ताशेवाले, नंतर झेंडे आणि दिवे. त्यांच्या मागे पोलिस कोतवाल शरफुलहक्कचा घोडा, नंतर पोलिसची तुकडी, नंतर नौबती, नंतर दिल्लीचे आखाडे. कोणी लाठी चालवीत आहे, कोणी लेझीम खेळत आहे. कोणी बनेटीचे हात दाखवीत आहे. कोणी आपले तलवारीचे कौशल्य दाखवीत आहे. यानंतर सनई वाजविणारे, मग फकिरांचा तांडा, नंतर गवई आणि बजवय्ये, नंतर तरणारवां (उघडा फ्लॅटफार्म, खांद्यावर वाहून नेलेला)वर दिल्लीच्या नर्तकी. पायात छुमछूम आणि अंगावर भारी मोलाचे दुपट्टे, त्यांचे सारखे नृत्य चालू आहे, नंतर इंग्रजी बँड. त्याच्यामागे घोडेस्वार शिपाई, त्यांच्यामागे दिल्लीचे राजपुत्र आणि प्रतिष्ठित घरांतील तरुण घोडयावर स्वार होऊन चाललेले. नंतर प्रतिष्ठित हिंदु-मुसलमान नागरिक आणि शेवटी मिरवणुकीचा पंखा आणि पंख्याच्या मागे माळ्यांची जमात.

ही मिरवणूक बादशहाच्या वाडयासमोर आली. तेथे शिपाई, पहिलवान, दांडपट्टेवाले, गवई, कलावंतिणी इत्यादींनी आपापली कामे करून दाखविली. बादशहांनी सर्वांना बक्षिसे दिली. यानंतर ही मिरवणूक योगमायेच्या मंदिरात गेली. देवीला पंखा वाहण्यात आला. दुसऱ्या दिवशी कुतुबुद्दीनच्या समाधीवर अशाच समारंभाने पंखा वाहण्यात आला.

रात्री शम्सी तलावावर बादशहा आणि त्यांचा परिवार यांच्यासमोर प्रेक्षणीय अशी आतिशबाजी झाली. हा समारंभ रात्री दोन वाजेपर्यंत चालला होता. बादशहाने कारागिरांना शाली, दुशाली, शेले, मंदिले वाटली.

यानंतर ही यात्रा संपली. बादशहा रात्रीच तेथून निघून पहाटेपर्यंत दिल्लीला पोहचले.

१८५७ नंतर बहादुरशहाला रंगूनला पाठविण्यात आले. हा फुलवाल्यांचा मेळावा पुढेही दरवर्षी होत होता. पण त्यात पहिल्यासारखा उत्साह राहिला नाही. मध्ये काही काळ तर तो अजिबात बंदच झाला होता. गेल्या दोन-तीन वर्षांपासून या उत्सवाचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत.

अशी आहे ही दिल्लीच्या फूलवालोंकी सैरची कथा.

. २२ .

## मला भेटलेले काही गप्पिष्ट

माझ्या साठ वर्षांच्या आयुष्यात मला अनेक व्यक्तींच्या खाजगी गप्पांचा अनुभव आला. अर्थात विद्यार्थीदशेत असताना थोर माणसांत बसून त्यांच्या गप्पा ऐकण्याची संधी क्वचितच मिळत असे. पण निजामराज्यात नोकरीच्या निमित्ताने समाजाच्या निरनिराळ्या थरांत मला वावरावे लागले. प्रतिष्ठित आणि खानदानी मुसलमानांच्या खाजगी बैठकीत रंगणाऱ्या गप्पांची गोडी काही औरच असते.

अशा घरंदाज लोकांच्या बैठकी रंगण्यास त्यांच्या घरच्या वातावरणाचाही उपयोग होत असावा. त्या काळी हैदराबादेत प्रतिष्ठित सरंजामदारांच्या वाड्यांचे मर्दाना आणि जनाना असे दोन स्वतंत्र आणि वेगळे भाग असत. पुरुषांच्या वापराचा वाडा वेगळा असे. वाड्यासमोर मोठा ओटा अगर अंगण. तेथे रात्री आठ–नऊच्या सुमारास नवाबसाहेब अगर वडे अधिकारी खुर्च्या टाकून बसत. भोवती दहाबारा खुर्च्या असत. त्यांवर त्यांचे मित्र आणि इतर भेटीस आलेले बसत. मध्ये तिपाईवर पानाचे तबक ठेवलेले. नवाबसाहेबांचा मनुष्य पानाचे तबक पाहुण्यांसमोर धरी. त्यातील एक विडा काढून घेताना पाहुण्याने उठून यजमानांना 'आदब अर्ज करता हूं' असे म्हणायचे आणि अदबीने पुन्हा खुर्चीवर बसायचे.

तोपर्यंत खिजमतगाराने घरातून चांदीचा हुक्का आणून ठेवलेला असायचा. नवाबसाहेबांनी हुक्क्याच्या नळीतून झुरके घ्यायचे. हुक्क्यातील तंबाखूचा सुगंध वातावरणात दरवळे. आणि मग बैठकीत गप्पा चालत. बैठकीचे वातावरण मोठे अदबशीर असे. मी हैदराबादेस निजाम कॉलेजमध्ये शिकत असता एकदा वडिलांच्याबरोबर निजामाचे खाजगीकडील मंत्री कादर नवाजजंग अब्दुल्कादर यांच्याकडे जाण्याचा मला प्रसंग आला होता. नवाबसाहेब हुक्का ओढीत नसत. तेवढे सोडून वातावरण वर सांगितल्याप्रमाणे होते. कादर नवाजजंग हे सूफी असावेत. इस्लामला अद्वैत मान्य नाही. उलट अनेक मुसलमान सूफींचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदान्ताशी मिळतेजुळते असे आहे. कादर नवाजजंग अद्वैत तत्त्वज्ञानावर बोलू लागले. त्यांचा आवाज शांत आणि स्निग्ध होता. ते मोठ्याने बोलत नसत. बैठकीतील मंडळीही काही शंका विचारावयाच्या असल्यास अदबीने आणि हलक्या आवाजात विचारीत. नवाबसाहेबांनी त्यांच्या शंकेचे निरसन केले की ती मंडळी पुन्हा अदबीने म्हणत,

' दुरुस्त ', ' बजा इर्शाद.' नवाबसाहेब जेव्हा अद्वैत तत्त्वज्ञानाचे बारकावे विशद करून सांगू लागले तेव्हा कोणी तरी वैदिक ब्राह्मण वेदांतावर अस्खलित प्रवचन देत आहे असे मला वाटले.

या खानदानी लोकांच्या बैठकीत शिष्टाचाराचे फार महत्त्व असे. अशा शिष्टाचारांना आदाबे मजलिस म्हणत असत. बैठकीत खुर्च्या असल्या तर बसा म्हटल्यावरच खुर्चीवर बसावे. तेसुद्धा पायावर पाय टाकून बसू नये. डोक्यावरची टोपी काढू नये. हसू आले तरी फक्त स्मितहास्य करावे किंवा तोंड वळवून बसावे. बैठकीत वाद घालू नये. अगर मोठ्याने बोलू नये. असे अनेक अलिखित नियम असत. काही काही वेळा अदब दाखविण्याची परिसीमा होई. एकदा परभणीचे कलेक्टर बॅरिस्टर अबुल्हसन यांच्या घरी मी त्यांच्या बैठकीत होतो. अबुल्हसन हा अत्यंत विद्वान आणि सौजन्यशील असा गृहस्थ होता. त्याचे बोलणे म्हणजे विविध माहितीची चमचमीत मेजवानी असे. त्याचे घराणे एक पिढीपूर्वीच इराणहून येऊन हिंदुस्थानात वसले होते. अबुल्हसनने प्रवासही बराच केला होता. तो कधी पॅलेस्टाइनमधील डेड सीबद्दल सांगे, कधी इराणमधील साहित्यिकांचे केंद्र असलेले शीराज शहर याचे वर्णन करी, तर कधी युरोपमधील आपले अनुभव सांगे. त्याला चिरूट ओढण्याचा नाद असे. चिरुटाचा धूर सोडीत त्याने शांतपणे बोलण्यास सुरुवात केली की आपण त्याच्याबरोबरच निरनिराळ्या देशांचा प्रवास करीत आहोत असे वाटे. इतकी विद्वत्ता त्याची, पण गर्वाचा लवलेश नाही. मध्ये तो रजेवर गेला होता. रजेवरून परत आल्यावर मी त्याला म्हटले, ' बरे झाले, आपण परभणीला परत आलात.' यावर त्याने हसून म्हटले, ' बनावट नाणे जसे बाजारात सारखे फिरत राहते तसाच मी पुन्हा येथे उगवलो.– लाइक ए बॅड कॉइन आय हॅव टर्न्ड अप.'

अलाहाबादला माझे कॉलेजचे शिक्षण इ. स. १९३२ मधे संपले. मी अलीगडला दोन महिने काढले. तेथे माझा दोन थोर विद्वानांशी परिचय झाला. ते म्हणजे कै. प्राध्यापक दामोदर धर्मानंद कोसांबी आणि प्राध्यापक मुहंमद हबीब.

प्राध्यापक कोसांबींच्या येथे मी दीड दोन महिने होतो. त्यांच्यासारखा बहुश्रुत आणि व्यासंगी विद्वान माझ्या पाहण्यात आला नाही. त्यांचे वडील धर्मानंद कोसांबी यांचे नाव तर जगप्रसिद्ध आहे. प्राध्यापक दामोदर कोसांबी यांचे शिक्षण अमेरिकेतील हार्वर्डसारख्या विद्यापीठात झाले. त्यांना युरोपियन भाषांपैकी दहाबारा तरी सहज येत असाव्यात. याशिवाय संस्कृत, पाली इत्यादी भाषांचाही त्यांचा व्यासंग दांडगा होता. सामान्यतः मानव्यशास्त्रातील ( ह्युमॅनिटीज ) विद्वानांना विज्ञानात रस नसतो. पण कोसांबी हे गणिताचे प्राध्यापक होते. इतकेच नव्हे तर या विषयावर जगातील प्रमुख तज्ज्ञांमध्ये त्यांची गणना होत असे. बरे, विद्वान म्हटला की तो शरीराने दुबळा, अशक्त आणि विद्येच्या भाराने वाकलेला असावा असा सर्वसाधारण समज आहे. पण कोसांबी हे या समजाला अपवाद होते.

उंचीपुरी देहयष्टी, सुदृढ शरीर आणि देखणे व्यक्तिमत्त्व या संपत्तीची देणगी त्यांना मिळाली होती. कोसांबींना शिकारीचाही नाद होता. यासाठी ते काही दिवस उत्तर प्रदेशातील तराई भागातही गेले होते. कोसांबींचे खाजगी ग्रंथालय अप्रतिम होते. त्यातील ग्रंथांची संख्या कमीत कमी दहा हजार तरी असावी. ग्रंथ अनेक भाषांचे आणि अनेक विषयांवरचे होते. कोसांबींचे वाचन सतत चालू असे. त्यांच्याशी गप्पा मारण्याची मला संधी मिळे तो रात्री साडेआठ-नऊच्या सुमारास. कोसांबी हे माझ्याशी बहुतेक इंग्रजीतूनच बोलत. अधून मधून मराठी वाक्ये वापरीत इतकेच. बोलताना ते आवाज कधीच चढवीत नसत, पण त्यांचे बोलणे धारदार, माहितीने खच्चून भरलेले आणि मोठे उद्बोधक असे. इतिहास, वाङ्मय, भाषाशास्त्र इत्यादी विषयांत त्यांची गती सारखीच असे. कधी ते रशियासंबंधी बोलतील, कधी मध्ययुगीन इटालीच्या राजकारणाची माहिती देतील, कधी अमेरिकेतील शिक्षणपद्धतीवर आपले मत देतील, तर कधी दासोपंताच्या गीतार्णवासंबंधी चर्चा करतील. त्यांच्या प्रतिभेचे विविध पैलू कुणालाही थक्क करून सोडतील असेच होते.

त्यांना आपल्या पांडित्याचा अभिमान होता. पण त्याचबरोबर इतर विद्वानांचे कौतुक त्यांनी केलेले मला कधीच आठवत नाही. या बाबतीत त्यांची दृष्टी कठोरच होती असे म्हणावे लागेल. त्याच वर्षी मी राज्यशास्त्र हा विषय घेऊन अलाहाबादेहून एम. ए.च्या परीक्षेत पहिल्या वर्गात पहिला आलो होतो. साहजिकच माझा त्या विषयाचा अभ्यास ताजा होता. कोसांबींच्या विधानावर मी मतभेद व्यक्त केला तर ते त्यांना विशेष आवडत नाही असे मला आढळून आले. भारतीय विद्वानांबद्दलही त्यांचे मत काही चांगले नसे. अर्थात या गोष्टीचा मला धक्का बसे.

अगदी याउलट प्राध्यापक हबीब हे होते. ते इतिहासाचे गाढे विद्वान आहेत. मुहंमद गजनी, अमीर खुस्रौ इत्यादींची त्यांनी चरित्रे लिहिली आहेत. इलियट आणि डौसन यांनी संपादिलेल्या भारतीय इतिहासकारांच्या शब्दांत भारताचा इतिहास या ग्रंथाचे आठ खंड आहेत. या ग्रंथाचे पुन्हा संपादन करण्यात आले आहे. या ग्रंथाच्या संपादित आवृत्तीच्या पहिल्या खंडाला प्राध्यापक हबीब यांनी शंभर पानांची अप्रतिम अशी प्रस्तावना लिहिली आहे. ती वाचून त्यांच्या प्रकांड पांडित्याची कल्पना येते. अलीगड येथे असताना मी अनेक वेळा त्यांच्याकडे गेलो. आमच्या बैठकी दीड-दोन तासपर्यंत रंगत. प्राध्यापक हबीब यांच्या विद्वत्तेने मी भारावून गेलो. पण माझ्या मनावर जो कायमचा ठसा उमटला तो त्यांच्या सौजन्याचा. माझ्या अभ्यासाबद्दल त्यांनी आस्थापूर्वक चौकशी केली. प्राध्यापक हबीब जितके बोलत तितकेच दुसऱ्यांनाही बोलू देत. त्यामुळे संभाषणात आम्ही दोघेही रंगून जात असू. माझा त्या वेळी माकियावेलीचा अभ्यास चालू होता. त्या निमित्ताने राज्यशास्त्रावर मी त्यांना माहीत असलेल्या गोष्टी सांगितल्या. प्राध्यापक हबीब खाजगी बैठकीत प्रसन्नपणे बोलत. त्यांच्या संभाषणाचा ओघ संथ आणि शांत असे.

इतर इतिहासकारांवर टीका करण्याचे ते आपल्या भाषणात सहसा टाळीत. मतभेद दाखवीत तेसुद्धा सौम्यपणे. इतिहासकारांचा उल्लेखही ते 'माझे मित्र' असाच करीत. ते मला म्हणाले, 'भारतावर आक्रमण करणारे मध्य आशियातील तुर्क हे शरीराने धिप्पाड आणि सुदृढ होते. त्यांच्या जयाचे हे एक कारण होते असे माझे मित्र ईश्वरीप्रसाद म्हणतात. पण मी त्यांना म्हणतो; मलेरियाग्रस्त मध्य आशियात तुम्ही एकदा फेरफटका मारून या. तिथली खुजी आणि रोगजर्जर माणसे पाहून तुमचा भ्रमनिरास होईल.' याहून कडक टीका मी हबीब यांच्या तोंडून कधीच ऐकली नाही.

इ. स. १९५१–५२ मध्ये मी औरंगाबादेस कलेक्टर असताना राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी औरंगाबादेस भेट दिली. दोन-तीन दिवस मी त्यांच्या सहवासात घालविले. दोनचार वेळा त्यांच्याशी खाजगी बैठकींत भाग घेण्याची मला संधी मिळाली. राजेंद्रप्रसाद यांचे व्यक्तिमत्त्व अलौकिकच म्हटले पाहिजे. शांत आणि सौम्य अशा त्यांच्या चेहेऱ्यावर सरळपणा आणि एक प्रकारचा निरागसपणा आढळून येई. त्यांचा उर्दू, पर्शियन इत्यादी भाषांचा अभ्यास चांगलाच होता. ते थोडेच बोलत. पण त्यातूनही त्यांचे गुणग्राहकत्व आणि कौतुक ही दिसून येत. औरंगजेबाच्या दर्ग्याच्या पायऱ्या चढत असताना त्यांनी मला सूफी संतांविषयी माहिती विचारण्यास सुरुवात केली. त्यांनी एकेका सूफीबद्दल विचारावे आणि मी माहिती पुरवावी असे सतत चालले होते. माझी सूफी संतांविषयीची माहिती त्यांना आवडली. राजेंद्रप्रसाद हे उर्दू आणि फारसी या भाषांचे पंडित आहेत हे मला माहीत होते. मी त्यांच्याशी फारसीप्रचुर आणि अदबशीर अशा उर्दूतून बोलत होतो. ते स्मित हास्य करून म्हणाले, 'फार्सी कहां सीखे हो भाई ?'

त्याच दिवशी संध्याकाळी मी आणि माझे मित्र बळवंतराव घाटे हे एकनाथ संशोधन समितीने प्रकाशित केलेल्या एकनाथदर्शन या ग्रंथासाठी राजेंद्रप्रसादांचा आशीर्वाद घेण्यासाठी त्यांच्याकडे गेलो होतो. त्यांनी एकनाथांसंबंधी माहिती विचारली. पैठणला जाण्याचा आपला कार्यक्रम ठरविण्यात आला नाही म्हणून हळहळ व्यक्त केली आणि प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहून देण्याचे मोठ्या आनंदाने कबूल केले. या वेळची माझी संस्कृतप्रचुर हिंदी पाहून त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. कौतुकाने माझ्याकडे पाहात ते म्हणाले, 'सुबहकी फारसी आमेज उर्दू और अब ठेठ हिंदी.' मी विनयाने म्हटले, 'सकाळचा विषय सूफींचा होता आणि आताचा भागवत धर्माचे श्रेष्ठ श्री एकनाथ यांचा आहे.'

राजेंद्रप्रसाद तसे मितभाषी असावेत. पण त्यांच्या सहवासात आलेल्यांना त्यांची मोजकी वाक्ये, त्यांची स्निग्ध आणि प्रेमळ दृष्टी आणि त्यांचे शांत पण तेजस्वी व्यक्तिमत्त्व यामुळे त्यांच्या बैठकीतील बोलण्यामुळे कृतार्थ वाटत असे.

औरंगाबादेस श्री. के. एम मुन्शी यांच्या सहवासाचाही मला योग आला.

त्यांच्याबरोबर वेरूळ आणि अजिंठा येथील लेणी पाहण्यास मला जावे लागले. मुन्शी हे अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेचे आणि विद्वान पंडित. त्यांना इतिहासाची आवड. मलाही तोच विषय हवा. प्रवासात आम्ही सारखे बोलत होतो. विषयांना काहीच तोटा नव्हता. गुजरातची राजघराणी, मध्ययुगीन भारत, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव, वेरूळची शिल्पकला आणि अजिठ्याची चित्रकला, मोगल स्थापत्य,–असे एक की दोन, किती म्हणून विषय सांगावेत! मुन्शींची स्मरणशक्ती दांडगी होती. कुतूहल त्याहूनही अधिक. ते स्वतः जितकी माहिती देत तितकीच माझ्याकडून काढीत. मधून मधून ते पोलिस अॅक्शन काळातील हैदराबादच्या आपल्या आठवणी सांगत. त्यांनी सांगितलेली एक गोष्ट अद्याप माझ्या आठवणीत राहिली आहे. ते म्हणाले,

"निजामाची एक आवडती बेगम होती. तिचे नाव लैला बेगम. ती एकदा अतिशय आजारी पडली. औषधोपचार चालू होते, पण तिला काही गुण येईना. शेवटी कुणी तरी निजामाला सांगितले की, ब्राह्मणाला गाय दान दिल्यास तुमची बेगम या आजारातून उठेल. निजाम हा धार्मिक बाबतीत अतिशय कर्मठ होता. निजाम आणि ब्राह्मणाला गाय दान देईल! ही कल्पनाच त्याला सहन होईना. पण इकडे बेगमेचे प्राण धोक्यात. तो शेवटी या गोष्टीला कबूल झाला. पण त्याने सांगितले की, ही गोष्ट गुपचूपपणे पार पाडली पाहिजे. कुणालाही यातील काही कळता कामा नये. पण हे व्हावे कसे? राजवाड्यात हा विधी पार पडला तर शहरभर त्याचा गाजावाजा होईल. निजामाची रोज संध्याकाळी मोटारीतून शहरातून फिरण्याची सवय असे. शेवटी एका ओसाड जागी एका भिंतीच्या आड एका ब्राह्मणाला उभे करण्यात आले. त्याच्याजवळच एक गाय बांधून ठेवण्यात आली. निजामाची मोटार तेथे येऊन पोहोचली. निजाम मोटारीतून खाली उतरला. भिंतीपाशी जाऊन त्याने ब्राह्मणाच्या हातावर उदक सोडले आणि तो घाईघाईने मोटारीत येऊन बसला. ही बातमी फुटणार नाही अशी दक्षता घेण्यात आली!"
के. एम. मुनशी जेव्हा ही गोष्ट सांगत होते तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर मिस्किल हसू होते. त्यांच्या बोलण्यात कोटिबाजपणाही असे. अजंठ्याच्या रेस्ट हाउसमध्ये भोजनाच्या वेळी मी त्यांच्या एका बाजूला बसलो. दुसऱ्या बाजूला पुरातत्त्व खात्याचे संचालक डॉक्टर श्रीनिवासाचार यांना त्यांनी बसवून घेतले. त्या वेळी मुन्शी आमच्याकडे पाहात म्हणाले, "विद्वत्ता माझ्या दोन्ही बाजूंना बसली आहे. तिच्यामुळे माझे रक्षण होवो. लेट मी बी प्राटेक्टेड बाय लर्निंग ऑन बोथ द साइडस." मुन्शींशी संभाषण म्हणजे मला एक मोठा उत्साहवर्धक अनुभव वाटला.

आपले माजी राष्ट्रपती डॉक्टर जाकिर हुसेन यांना भेटण्याचा मला दोनदा योग आला. एकदा ते हैदराबादेस आपले बंधू इतिहासकार डॉक्टर युसुफ हुसेनखान यांना भेटण्यास आले होते. त्या वेळी मी हैदराबादच्या शिक्षणखात्याचा संचालक

होतो. मला वाटते. ते १९५३ अगर ५४ साल असावे. डॉक्टर युसुफ हुसेन यांच्या घरी मी जाकिर हुसेनसाहेबांना भेटलो. वर्धा शिक्षण योजनेचे जनक म्हणून मला त्यांच्याबद्दल अतिशय आदर होता. त्यांचे आणि माझे बोलणे तास-दीड तास चालू होते. त्यांनी मला वर्धा योजना समजावून सांगितली. मी काढलेल्या शंकांची उत्तरे दिली. मी त्यांना म्हटले, मी बुनियादी तालीमची प्रत्यक्ष पाहणी केली आहे, त्यात आपला मंत्र दिसत नाही, केवळ तंत्रपालन दिसते. ते म्हणाले, हीच तर माझी व्यथा आहे. ते उर्दूत बोलत होते. ते म्हणाले, "मेरे स्कीमका रंग बदल गया. लोगोंको असल बात पर श्रद्धा रखनी चाहिये." ते खरे शिक्षण-तज्ज्ञ होते. त्यांच्या बोलण्यात, एका विचारवंताचे गंभीर विचार आपण गंभीर भाषेत ऐकत आहोत, असे वाटे. त्यांच्या विद्वत्तेचा आणि त्याहूनही अधिक त्यांच्या बौद्धिक सचोटीचा माझ्यावर फार प्रभाव पडला. ते सदा चिंतनशील असावेत असे वाटे.

पण त्यांच्यातील रसिक वृत्तीचा आविष्कार ते उपराष्ट्रपती असताना मी त्यांना दिल्लीत भेटलो त्या वेळी मला दिसला. मी काही सरकारी कामानिमित्त दिल्लीला गेलो होतो. त्या वेळी मी मुद्दाम डॉक्टर जाकिर हुसेन यांना भेटलो. माझी काही पुस्तके मी त्यांना दिली. उर्दू आणि फार्सी साहित्य मराठीत आणण्याचा मी गेल्या बारा वर्षांपासून प्रयत्न करीत आहे हे मी त्यांना सांगितले. गालिबच्या उर्दू काव्याचा मराठी अनुवाद, पंचवीस उर्दू कवींचा परिचय, उर्दू–फार्सी साहित्याचे परिचयात्मक असे तीन खंड, फार्सी सुमारे पाच हजार पाने भरतील इतक्या साधनांचे मराठी अनुवाद ही कामे मी केली हे ऐकून त्यांना मोठे आश्चर्य वाटले. 'आपने इतना काम किया और हमें इसका पताही नहीं' असे उद्गार त्यांनी काढले. गालिब, जौक, मोमिन इत्यादी कवींची घरे, कबरी वगैरे स्मारके मी आज पाहणार आहे हे ऐकून त्यांनी मला अनेक साहित्यिकांची माहिती दिली. या वेळी त्यांची रसिक वृत्ती किती जागृत आहे याचा मला अनुभव आला. मुलाखत दहा मिनिटांसाठी होती. पण जाकिर हुसेनसाहेब माझ्याशी जवळ जवळ पाऊण तास बोलत होते. फार्सी साधनांविषयी बोलताना मी जदुनाथ सरकारांनी केलेल्या अनुवादातील काही चुकांचा उल्लेख केला. यावर या उदार माणसाने काय म्हणावे ? "मुन्शियोंने बेएहतियाती की होगी."– त्यांच्या मुन्शी लोकांनी धरसोड केली असावी. जाखीर हुसेन यांचा मला घडलेला सहवास हा मी अतिशय मोलाचा समजतो.

गप्पा मनोरंजक करणारे अनेक मित्र मला आयुष्यात भेटले आहेत. घटना सत्यच. तीत अतिशयोक्ती न करता खुलवून सांगण्याची लकब अनेकांत असते. परभणीचे माझे मित्र कै. रामचंद्रराव पाचपोर ऊर्फ अण्णासाहेब वकील हे एक उमदे गृहस्थ होते. परभणीला मी गेलो की स्टेशनजवळच्या अनंतविजय फॅक्टरीच्या आवारात माझे आप्त भाऊसाहेब अष्टपुत्रे यांच्या घरी बैठकी होत. तेथे अण्णा-

साहेब वकील आपल्या गोष्टींनी बैठकीत असा काही रंग भरीत म्हणता ! त्यांच्या गप्पांतून अधिकाऱ्यांच्या गोष्टी, स्वतःचे अनुभव, जुना इतिहास इत्यादींची रेलचेल असे. विनोदी गोष्टी सांगताना ते स्वतः हसत नसत; पण हावभाव इत्यादींच्या द्वारे ती गोष्ट ते खुमासदार पद्धतीने सांगत. याचे एकच उदाहरण सांगतो. अण्णासाहेब म्हणाले, "आज मी सकाळी कोर्टात गेलो. सेशनजज्ज अद्याप आपल्या चेंबरमध्येच होते. मला त्यांनी बोलावू पाठविले. मी आत गेलो तेव्हा ते हातरुमालाने आपले ओठ झाकून बसले होते. मला पाहताच ते म्हणाले, 'वकीलसाहेब, आज मैं रुख्सत (रजा) लेना चाहता हूं.' मी उभा राहून (येथे अण्णासाहेब आमच्या बैठकीत उभे राहात.) त्यांना काळजीच्या स्वरात (येथे अण्णासाहेबांच्या चेहऱ्यावर काळजीची छटा दिसते, विचारले,) 'क्यों, खैरियत ?' (कुशल आहे ना ?) यावर सेशनजज्ज म्हणाले, 'क्या कहूं वकीलसाहब, मेरी मूछें जल गयीं. (माझ्या मिशा जळाल्या)' (येथे अण्णासाहेबांच्या चेहऱ्यावर केविलवाणा भाव दिसतो.) मी घाबरून विचारले, 'पण हे झाले कसे ?'– यह हादसा (अपघात) हुवा कैसे ? (येथे अण्णासाहेबांच्या आवाजात काळजी आणि विस्मय यांचे मिश्रण झालेले दिसते.) सेशनजज्ज म्हणाले, 'अहो, मिशांना (कलप) लावीत होतो. त्यात काय तेजाब (दाहक द्रव्य) मिसळलेले होते. माझ्या मिशा भुरभुर जळून गेल्या. आता लोकांना तोंड कसे दाखवू ?' असे म्हणून जज्जांनी हातरुमालाने आपले तोंड झाकून घेतले." (येथे अण्णासाहेब आपले तोंड झाकून घेतात.)

बैठकीत आम्ही सारखे हसत असू. पण अण्णासाहेब गोष्ट सांगताना गंभीर बनल्याचा आव आणीत. पण इतर कोणी एखादी विनोदी गोष्ट सांगितली की त्यांचे हसणे अगदी लांबपर्यंत ऐकू जात असे. अगदी सात मजली हसू म्हणाना.

गप्पागोष्टीत तिखटमीठ लावून ती मनोरंजक केली तर ऐकणाऱ्याची करमणूकच होते. पण गोष्टीचा मूळ गाभा हा खऱ्या घटनेवर आधारलेला असतो. पण थापा मारणारे गप्पिष्ट हे बैठकीवर आपल्या महत्त्वाचा, बहुश्रुतपणाचा आणि विद्वत्तेचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न करीत असावेत. पापा हेमिंग्वे या गाजलेल्या ग्रंथातील अर्नेस्ट हेमिंग्वे याने मारलेली थाप अशीच आहे. सुप्रसिद्ध स्त्री-हेर माताहरी हिच्याबरोबर आपण एकदा झोपलो होतो अशी थाप हेमिंग्वेने मारली. ग्रंथकर्ता लिहितो, 'हेमिंग्वेने आपल्या या प्रणयक्रीडेचे रसभरित वर्णन केले. मलाही ते खरे वाटले. नंतर माझ्या लक्षात आले की माताहरीच्या वधानंतर तब्बल एक वर्षाने हेमिंग्वे हा युरोपात आला. त्याची आणि माताहरीची गाठ पडणेच शक्य नव्हते.'

हैद्राबादेतील एक अधिकारी दर चार-सहा महिन्यांनी आपल्या पत्नीचा गर्भपात झाल्याच्या थापा मारीत. ते पौरुषहीन होते हे जगजाहीर होते. एक अधिकारी मला म्हणत, 'माझी बायको सारखी माझ्यावर पाळत ठेवीत असते.

'तुमच्या सौंदर्यावर एखादी स्त्री लुब्ध झाली तर काय करू !' असे ती म्हणते आता तुम्हीच सांगा माधवराव, मी सुंदर आहे हा गुन्हा आहे का ?' माझे एक मित्र युसुफ हुसेनखान हे हैद्राबादेत घडलेली कोणतीही घटना वर्णन करून सांगताना आपण त्या ठिकाणी होतो, (मैं वहीं था) असे आवर्जून सांगत. इराणच्या बादशहाने काही भारतीय प्रवाशांना स्वतःच्या मोटारीतून घरी पोहोचविले, मैं वहीं था. निजामाने अमक्या अधिकाऱ्यांना आपल्या समोरून घालविले, मैं वहीं था. एका रेल्वे स्टेशनावर निजामाला शेळीचे दूध हवे होते. मैं वहीं था. मी जवळ चरणारी शेळी पकडून तिचे दूध काढून निजामाला दिले. पुष्कळदा तीच गोष्ट ते वेगळ्याच पद्धतीने सांगत. फारसीत म्हण आहे, 'द रोग गोरा हाफिजानबाशद' खोटे बोलणाऱ्यांना स्मरणशक्ती नसते हेच खरे. अर्थात अशा गप्पांनीही माझी भरपूर करमणूक होत असे हे सांगणे नकोच.

तेरा वर्षांपूर्वी मी मुंबईला आलो. त्या कालात मुंबईतील धकाधकीच्या जीवनामुळे बैठकी आणि गप्पा यांचे प्रसंग कमी कमी होत गेले. कुणाकडे विशेष जाणेयेणेही होत नाही. मुंबईत प्राध्यापक न. र. फाटक यांच्याशी बऱ्याच वेळा गप्पा मारण्याचा प्रसंग येतो. त्यांचे घर म्हणजे ज्ञानपीठ आहे. त्यांच्या खोलीत हजार दोन हजार पुस्तके सहज असतील. फाटकांच्या बोलण्याचे अनेक विषय आहेत. संतवाङ्मय, इतिहास, महाराष्ट्रातील गेल्या पाच पन्नास वर्षांतील सामाजिक आणि राजकीय नेते, इत्यादी विषयांवर फाटकांचे बोलणे ऐकत असताना किती तरी नवीन माहिती आपल्याला मिळत जाते. त्यांच्या बोलण्यात येत असलेली माहितीपूर्ण विधाने ऐकताना कुणाला वाटावे की ते लोकांवर सतत टीका करीत असतात, पण मला तर त्यांच्या बैठकींतील गप्पा नेहमी उद्बोधक वाटतात.

महामहोपाध्याय पोतदार यांच्या सहवासात एखादा साधा मनुष्यही इतिहासाचा तज्ज्ञ बनून जाईल, इतका इतिहासाचा संग्रह त्यांच्या आठवणीत साठलेला आहे. त्यांच्या-माझ्या अनेकदा गाठीभेटी झाल्या आहेत. ते मराठ्यांच्या इतिहासाविषयी नवीन नवीन माहिती देऊ लागले की ती किती ऐकू आणि किती नाही असे होऊन जाते. त्यांच्या गप्पा तास– दोन तास सहज चालतात. बरे, त्यांच्या गप्पांतून कुणाविषयी अनुदार शब्द अगर टीकेचे उद्गार मला कधीच आढळले नाहीत. यामुळे त्यांच्या गप्पा ऐकताना कधीच अस्वस्थ वाटत नाही. न. र. फाटक आणि पोतदार यांच्या बैठकींतील गप्पा ऐकत मीही अर्धामुर्धा इतिहास-संशोधक बनलो ही वस्तुस्थिती आहे.

आयुष्यात मला आलेल्या अनेक बैठकींच्या अनुभवाने मी हे सांगू शकतो की, अनेक मनोरंजक तसेच उद्बोधक गप्पांतून भाग घेण्याचे प्रसंग आले यामुळे माझे जीवन अधिकच समृद्ध बनले आहे.

२८८६
२२८४२
निबंध

REFBK-0022842